# म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी मर्यादित

## १२वां वार्षिक अहवाल वित्तीय वर्ष २०१६-२०१७

## अनुक्रमणिका


| अनु. क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १. | **संचालक मंडळ** | |
| २. | **संचालकांचा अहवाल** | ०१ |
| ३. | **स्वायत्त वित्तीय विवरणपत्र** | |
| | ➤ स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल | ८२ |
| | ➤ भारताचे नियंत्रक व लेखापाल यांचा अभिप्राय | ९६ |
| | ➤ ताळेबंद | ९७ |
| | ➤ नफा व तोटा विवरण पत्र | १०० |
| | ➤ रोकड प्रवाह विवरण पत्र | १०२ |
| | ➤ समभाग बदलाचे विवरण | १०५ |
| | ➤ लेखांवरील टिपा क्र. १ ते ३७ | १०९ |
| ४. | **एकत्रित वित्तीय विवरणपत्र** | |
| | ➤ स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल | १७३ |
| | ➤ भारताचे नियंत्रक व लेखापाल यांचा अभिप्राय | २१७ |
| | ➤ ताळेबंद | २१८ |
| | ➤ नफा व तोटा विवरण पत्र | २२१ |
| | ➤ रोकड प्रवाह विवरण पत्र | २२३ |
| | ➤ समभाग बदलाचे विवरण | २२६ |
| | ➤ लेखांवरील टिपा क्र. १ ते ५१ | २२८ |

# महाराष्ट्र राज विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित

## वित्तीय वर्ष २०१६-२०१७ साठी संचालक मंडळाची सूची

**( वार्षिक सर्वसाधारण सभेचा तारखेपर्यंत )**

### अध्यक्ष

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे,** मा. मंत्री (ऊर्जा, नवीन व नवीनीकरण ऊर्जा), महाराष्ट्र (१८ डिसेंबर २०१४ पासून)

### उपाध्यक्ष

श्री. मदन येरावार, मा. राज्य मंत्री (ऊर्जा), महाराष्ट्र ( ८ जुलै २०१६ पासून)

### व्यवस्थापकीय संचालक

| | |
|---|---|
| **श्री अरविंद सिंह (भाप्रसे)** | (१४ फेब्रूवारी, २०१७) |
| **श्री. बिपिन श्रीमाळी (भाप्रसे)** | (२५ मे, २०१६ ते १४ फेब्रूवारी, २०१७ पर्यंत) |

### संचालक

| | |
|---|---|
| **श्री. बिपिन श्रीमाळी (भाप्रसे)** | १८ फेब्रुवारी, २०१४ पासून |
| **श्री. संजीव कुमार (भाप्रसे)** | २१ डिसेंबर, २०१५ पासून |
| **श्री. राजीव कुमार मित्तल (भाप्रसे)** | २१ जानेवारी, २०१५ पासून |
| **श्री. सुरेंद्र एन पांडेय (भापोसे)** | २६ ऑक्टोबर, २०१६ पासून |
| **श्री. प्रकाश पागे** | ७ जुलै, २००५ पासून |
| **श्री. आर. बी. गोयंका** | २५ फेब्रुवारी, २०१५ पासून |
| **श्री. विश्वास पाठक** | २५ फेब्रुवारी, २०१५ पासून |

### संचालक (वित्त) व मुख्य वित्तीय अधिकारी

**श्रीमती अनुराधा भाटिया (आय आर एस)** - २४ ऑगस्ट, २०१५ ते ३१ मार्च, २०१७ पर्यंत

**श्री जयकुमार श्रीनिवासन** - २१ ऑगस्ट, २०१७ पासून

### कंपनी सचिव

**श्री सुबोध रमेशरावजी झारे** - २१ ऑगस्ट, २०१५ पासून

# संचालकांचा अहवाल

प्रति,

मा. सदस्य,

मराविमं. सूत्रधारी कं. लि.

आपल्या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाच्या म्हणजे ११वां वार्षिक अहवाल आपणाला सादर करतांना सर्व संचालकांना आनंद होत आहे. या अहवालासोबत ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाची लेखा परिक्षण केलेली वित्तीय विवरण पत्रके सुध्दा जोडली आहेत.

**१. वित्तीय निष्कर्ष :** **(रक्कम रु. मध्ये)**

| **तपशील** | **२०१६-२०१७** | **२०१५-२०१६** |
|---|---|---|
| एकुण उत्पन्न | ४२,७७,५१,७८४ | ४१,२२,१८,६३७ |
| खर्च | | |
| कर्मचाऱ्यांचे परिश्रमिक आणि लाभ | ७,०९,१२,१६७ | ६,८८,९५,५५२ |
| इतर खर्च | २५,०१,२७,२३३ | २६,७४३,०५९१ |
| घसारा | ४६,०८,०१,९७६ | ४६,०५,३९,९३८ |
| एकुण खर्च | ७८,१८,४१,३७६ | ७९,६८,६६,०८१ |
| नफा / (तोटा) करपूर्व | (३५,४०,८९,५९२) | (३८,४६,४७,४४४) |
| कराची तरतुद - चालू वर्षाचा कर, मागील वर्षाचा कर आणि स्थगित कर (निव्वळ) | ३,३९,८७,६५९ | (१,५५,१२,८७३) |
| नफा / (तोटा) करोत्तर | (३२,०१,०१,९३३) | (३६,९१,३४,५७१) |
| नफा किंवा तोटा करण्यासाठी वर्गीकृत केलेला बाबी | (३२,९९,२४३) | ५६,७७,१८१ |
| या कालावधीतील व्यापक उत्पन्न | (३२,३४,०१,१७६) | (३६,३४,५७,३९०) |

आढावा वर्षामधे करपूर्व तोटा रु. ३५,४०,८९,५९२/- एवढा असून मागील वर्ष २०१५-२०१६ मधे ३८,४६,४७,४४४/- एवढा होता. वित्तीय वर्ष २०१६-२०१७ मध्ये कर तरतुदी नंतरचा एकुण तोटा रु. ३२,०१,०१,९३३/- एवढा आहे. मागील वर्षा २०१५-२०१६ मध्ये रु. ३६,९१,३४,५७१/- एवढा होता. उपकंपण्याला त्यांच्या वापराकरिता दिलेल्या मालमत्तेवरील भाडे हेच कंपनीच्या महसूलाचा प्रमूख घटक आहे.

३१ मार्च, २०१७ चा अखेरीस कंपनीची एकुण सकल मालमत्ता आधार रु. ११२५.६१ कोटी एवढा होता. कंपनीला वर्षभरात तोटा

सहन करावा लागला आहे, जो मुख्यात्वे रु. ४६,०८,०१,९७६/- एवढ्या घसाऱ्यामूळे झाला आहे.

कंपनी व्यवहार मंत्रालयाने, भारत सरकाराच्या दिनांक १६.०२.२०१५ चा अधिसूचनेव्दारे भारतीय लेखा मानके अधिसूचित केले त्या काही वर्गीकृत कंपन्यांना लागू आहेत. विद्यमान साधरणत: स्विकरलेल्या लेखा माणके कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३ अन्वये विहीत केलेल्या कंपनी (लेखा) नियम २०१४ सह सहवाचन, च्या जागी भारतीय लेखा मानके पुनर्स्थित केले.

वित्तीय वर्ष २०१६-२०१७ पासून भारतीय लेखा मानकांच्या आवश्यतेनुसार वित्तीय विवरण तयार करणे बंधककारक झाले आहे. आपल्या कंपनीने वित्तीय वर्ष २०१६-२०१७ साठी पहिले वित्तीय विवरण भारतीय लेखा मानकांअनूसार तयार केले आहे. ३१ मार्च, २०१६ या संपलेल्या वर्षापर्यंत आपल्या कंपनीने कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३ अन्वये ज्याचे सहवाचन कंपनी (लेखा) नियम २०१४ च्या नियम ७ अधिसूचित केकेल्या लेखा माणदंडाच्या अनूसार कंपनीने आपले वित्तीय विवरण तयार केले आहेत. (भारतीय साधरणत: स्वीकारलेली लेखा मानके).

## २. वित्तीय क्षेत्रातील महत्वाच्या घटना

i) कंपनीच्या एकुण उत्पन्नमध्ये उपकंप्याकडून कंपनीच्या मालमत्तेच्या वापरासाठी मिळालेल्या भाडेपट्टीची रक्कम ३८.४३ कोटी रुपयाचा समावेश आहे.

ii) त्यामध्ये मुदत ठेवीवर मिळालेले वाज रु. ३.३९ कोटी आणि निर्धारण वर्ष २०१४-१५ च्या आयकर परव्याचे ७४.६५ लाख रुपयाचा सुध्दा समावेश आहे.

iii) भारतीय लेखा मानकां मध्ये संक्रमण झाल्यानंतर लेखामध्ये खालील समायोजने केली आहेत.

अ) कंपनीने १ एप्रिल २०१५ गुंतवलूक केकेल्या सर्व मालमत्ताची मुळ मूल्य पुढे चालू ठेवण्याचे निवडले आहे ज्याचे मुल्यांकन केंद्र सरकारव्दारे अधिसूचित केकेल्या कंपनी (लेखा मानक) नियम २००६ मध्ये निर्दिष्ट मागीत सामान्यत: स्वीकृत लेखा मानके (गॅप) नुसार मोजले जातात. आणि कंपनी कायदा १९५६ मधील इतर तरतूदीचा समावेश आहे आणि मालमत्तेच्या गुतवणूकीचा माळण्यात येणारा खर्च म्हणून ते वहन मूल्य वापरते.

ब) मालकीची जमीन आणि कार्यालयीन इमारतीचा मालमत्तेतील गुंतवणुक म्हणून वर्गीकरण केले आहे.

क) मेसर्स रत्नागिरी गॅस ॲन्ड पॉवर प्रा.लि. मधील सहभागामधील गुंतवणूक मेसर्स केपीएमजीचे केलेल्या स्थीरमत्ताच्या दुर्बलतेच्या अभ्यास अहवालाच्या आधारावरुन रु. ५,१६,२८,००,००० (मागील वर्षी ५,१६,२८,००,०००) एवढ्याने कमी केली आहे.

ड) भाडे प्राप्तीवर रु. १,७७,३०,४८३ एवढ्या रकमेची अपेक्षित पत नुकसानीची तरतूद या वर्षामध्ये केली आहे.

## ३) व्यवसायात काही बदल असल्यास त्याचे निवेदन

कंपनीच्या-व्यवसायाच्या स्वरुपात कोणताही बदल केला नाही.

## ४) लाभांश:

आढाव्या वर्षाच्या अखेरीस झालेला तोटा लक्षात घेऊन आणि राखीव स्थितीचा विचार करुन ३१ मार्च २०१७ ला संपलेल्या आर्थिक वर्षासाठी संचालक मंडळाने लाभांशाची शिफारस केलेली नाही.

## ५) वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यास मुदतवाढ

आपल्या कंपनीने मा. कंपनी निबंधक, कंपनी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे अर्ज करुन १२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याची मुदत वाढविण्याची परवानगी मागितली होती. मा. निबंधकांनी त्यांचे पत्र दि. २१ सप्टेंबर २०१७ द्वारे वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यास ३ महिने मुदत वाढवून दिली.

## ६) संचालक :

श्री. अरविंद सिंह, भाप्रसे कंपनी संचालक म्हणनू १४ फेब्रुवारी, २०१७ पासून नियुक्ती करण्यात आली आणि त्याचप्रमाणे कंपनाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून दि. १ मार्च २०१७ पासून श्री. बिपिन श्रीमाळी, भाप्रसे यांच्या जागी नेमणूक करण्यात आली. त्यांच्याकडे २५ मे, २०१६ ते १ मार्च २०१७ पर्यंत व्यवस्थापकीय संचालक पदाचा अतिरिक्त पदभार सांभाळला होता.

श्रीमती अनुराधा भाटीया, आयआरएसने सरकारी आदेशाच्या अनुषंगाने दि. ३१ मार्च २०१७ रोजी संचालक (वित्त) व मुख्य वित्त अधिकारी पदाचा कार्यभार सोडला.

कंपनी सोडून गेलेल्या सर्व संचालकांनी त्यांच्या सेवेच्या काळातील कामामध्ये जे मौल्यवान योगदान दिले त्याबद्दल संचालक मंडळ गौरव करते.

## ७ व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्ती:

वि. वर्ष २०१६-१७ मध्ये कंपनी अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार कंपनीच्या व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्तींची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अनु क्र. | महत्वाच्या व्यक्तींची नांवे | पदनाम | नियुक्तीची तारीख | कार्यकाल समाप्तीची तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. मुकेश खुल्लर | व्यवस्थापकीय संचालक | २५ फेब्रुवारी २०१५ | २५ मे २०१६ |
| २) | श्री. बिपीन श्रीमाळी | व्यवस्थापकीय संचालक | २५ मे २०१६ | ०१ मार्च २०१७ |
| ३) | श्री. अरविंद सिंह | व्यवस्थापकीय संचालक | १ मार्च २०१७ | - |
| ४) | श्रीमती अनुराधा भाटीया | संचालक (वित्त) व मुख्य वित्त अधिकारी) | २४ ऑगस्ट २०१५ | ३१ मार्च २०१७ |
| ५) | श्री. सुबोध आर झारे | कंपनी सेक्रेटरी | २१ ऑगस्ट २०१५ | |

## ८ संचालकांच्या जबाबदारीचे निवेदन:

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३४(५) च्या आवश्यकतेनुसार आणि कंपनीच्या व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीच्या आधारे येथे खालील बाबींची निश्चिती देण्यात येते:

अ) दि. ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाचे वार्षिक अहवाल तयार करताना त्यासाठी लागू होणाऱ्या लेखा मानकांचे अनुपालन केले आहे, आणि जेथे प्रत्यक्ष काही विचलन झाले असेल तर त्याचे योग्य स्पष्टीकरण सादर केले.

ब) संचालकांनी योग्य अशी लेखा धोरणांची निवड केली आहे व ती धोरणे सातत्याने लागू केली आहेत. तसेच वित्तीय वर्षाच्या अखेरीस कंपनीच्या स्थिती आणि या कालावधीतील कंपनीच्या नफा व तोटा पत्रकातून यांचे सत्य व यथार्थ दर्शन घडावे या हेतुसाठी संचालकांनी सुज्ञतेने निर्णय घेतले तसेच योग्य व रास्त असे अंदाज केले.

क) कंपनीच्या मालमत्तांचे रक्षण व्हावे आणि कोणत्याही लबाडीला प्रतिबंध व्हावा व अशी लबाडी व अनियमितता शोधता याव्यात या हेतूने संचालकांनी कंपनी अधिनियम २०१३ यातील तरतुदीनुसार लेखांचे दस्तऐवज जतन करण्यासाठी योग्य पुरेशी काळजी घेतली.

ड) ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचे वार्षिक अहवाल हे ही कंपनी सतत कार्यरत असणारी संस्था असल्याच्या तत्वानुसार तयार केले.

इ) संचालकांनी घालून दिलेल्या अंतर्गत आर्थिक नियंत्रण प्रणालीचे इतर तरतूदी आणि लागू असलेल्या कायद्याचे पालन केले त्याद्वारे कंपनीच्या अंतर्गत आर्थिक नियंत्रण यंत्रणा पर्याप्त आणि प्रभावीपणे कार्य करीत आहेत.

फ) कंपनीला लागू होणाऱ्या सर्व कायद्यातील तरतुदींचे पालन करण्यासाठी कंपनीच्या संचालकांनी योग्य अशा कार्यप्रणालीच्या रचना केल्या आहेत. आणि त्या सर्व रचना पुरेशा असून प्रभावीरित्या काम करीत आहेत.

९ **स्वतंत्र संचालकाचे प्रकट** :

कंपनीचे स्वतंत्र संचालक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४९ (७) यानुसार घोषित केले आहे की, ते कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४९ (६) मध्ये स्वतंत्र संचालक या पदासाठी दिलेल्या निकषांची पूर्तता करतात.

**१० संचालकांच्या कार्याचे मूल्यांकन :**

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १७८(२) यानुसार संचालकांच्या कार्याचे मूल्यमापन शासकीय कंपन्यांप्रमाणे कंपनी व्यवहार मंत्रालयाची अधिसूचना दि. ०५ जून २०१५ नुसार केले आहे.

**११. ठेवी** :

आपल्या कंपनीने या अहवाल वर्षात कंपनी अधिनियम २०१३ चे प्रकरण (५) यातील समावेश करता येईल अशाप्रकारे जनतेकडून ठेवी स्वीकारलेल्या नाहीत.

**१२. भाग भांडवल :**

३१ मार्च २०१७ रोजी कंपनीचे अधिकृत भाग भांडवल रु. ९९००० कोटी असून त्यात कोणताही बदल नाही.आढावा वर्षात कंपनीच्या समभाग भांडवलात खालीलप्रमाणे वाढ झाली आहे.

| तपशील | भाग भांडवल (रु.) |
|---|---|
| ३१/०३/२०१६ रोजी भाग भांडवल | ८,६२,९९,७७,२०,६३० |
| वर्ष भरातील वाटप | १०,९२,९८,००,००० |
| ३१/०३/२०१७ रोजीचे भाग भांडवल | ८,७३,९२,७५,२०,६३० |

**१३. राखीव मध्ये स्थानांतरीत केलेल्या रकमा :**

कंपनीला तोटा असल्या कारणामुळे संचालक मंडळाने राखीवमध्ये कोणतीही रक्कम स्थानांतरीत करण्याचा प्रस्ताव केला नाही.

**१४. एकत्रित लेखा** :

३१ मार्च २०१७ रोजी कंपनीच्या पूर्ण मालकीच्या तीन उपकंपन्या आणि चार उपकंपन्यांच्या उपकंपन्या आहेत.

भारतीय लेखा मानके - ११० (एकत्रित वित्तीय विवरण) च्या अनुसार, कंपनीने एकत्रित वित्तीय विवरण तिच्या उपकंपन्यांसह तयार केले आहेत. जे वार्षिक अहवालाचा एक भाग आहे. हे वित्तीय विवरण संबंधित उपकंपन्यांच्या मंडळाकडून मंजूर केलेल्या लेखा परिक्षित केलेल्या वित्तीय विवरणामधून तयार करण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी एकत्रित वित्तीय विवरण वार्षिक लेख्याचा भाग म्हणून जोडले आहे.

**एकत्रित आधारावर घेतलेल्या परिणामांचे थोडक्यात सारांश खाली दिले आहे.**

**(रक्कम कोटी मध्ये)**

| **तपशील** | **२०१६-१७** | **२०१५-१६** |
|---|---|---|
| **महसूल** | - | - |
| प्रवर्तनापासून महसूल | ५८,२५७.६७ | ५५,६५०.६६ |
| इतर उत्पन्न | २,७२९.३१ | ३,३८३.१८ |
| एकूण उत्पन्न | ६०,९८६.९८ | ५९,०३३.८४ |
| **खर्च** | | |
| वापरलेल्या साहित्याचा खर्च | ४०,५१७.१६ | ३९,३६१.३९ |
| कर्मचारी पारिश्रमिक व लाभ | ६,३२८.४० | ६,१९९.७० |
| वित्त खर्च | ६,८४४.६० | ५,४८३.६८ |
| घसारा/कर्जफेडीची तरतूद | ६,०९३.२२ | ५,५०७.१० |
| इतर खर्च | ७,२३९.८४ | ४,९२९.८१ |
| **एकूण खर्च** | ६७,०२३.२२ | ६१,४८१.६८ |
| **नफा/(तोटा) करपूर्व** | (६,०३६.२४) | (२,४४७.८४) |
| करासाठी तरतूद - चालू वर्षाचे कर, मागील वर्षाचे कर आणि स्थगित कर (निव्वळ) | २४९.७२ | (२.५४) |
| **नफा/(तोटा) करोत्तर** | (५,७८६.५२) | (२,४४५.२९) |
| नफा किंवा तोटा करण्यासाठी वर्गीकृत केलेल्या बाबी | (२३१.९३) | (१७२.२९) |
| **या कालावधीसाठीचे व्यापक उत्पन्न** | (६,०१८.४५) | (२,६१७.५९) |

एकत्रित आधारावर कंपनीच्या एकूण उत्पन्नामध्ये वित्तीय वर्ष २०१५-१६ मध्ये ५९,०३३.८४ कोटी होता तो वित्तीय वर्ष २०१६-१७ मध्ये ३.३ टक्के वाढ होऊन रु. ६०,९८६.९८ कोटी एवढा नोंदविला आहे. महावितरणच्या प्रवर्तनापासून महसूलामध्ये मुख्यत्वे विज विक्रीपासून मिळालेले उत्पन्न असून त्यांची किंमत रु. ५७,६०१ कोटी (एकल) एवढी आहे ती मागील वर्षाच्या तुलनेत ३,९८१ कोटीने वाढ झाली आहे.

३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षासाठी एकूण खर्च रु. ६१,४८१.६८ कोटी एवढा होता या तुलनेत ३१ मार्च २०१७ रोजी रु. ६७,०२३.२२ कोटी एवढा झाला आहे. वापरलेल्या वस्तूसाठीचा खर्च वित्तीय वर्ष २०१५-१६ मध्ये ३९,३६१.३९ कोटी होतो या तुलनेत ३१ मार्च २०१७ रोजी ४०,५१७.१६ कोटी एवढा झाला आहे. कर्मचारी खर्च रु. ६,१९९.७० कोटींवरुन वाढून तो ६,३२८.४० कोटी एवढा झाला आहे. वित्त खर्च रु. ५,४८३.६८ कोटींवरुन वाढून तो ६,८४४.६० कोटी एवढा झाला आहे. घसारा आणि कर्जफेडीचा खर्च वित्तीय वर्ष २०१५-१६ मध्ये रु. ५,५०७.१० एवढा होता तो वाढून रु. ६,०९३.२२ कोटी एवढा झाला आहे.

मागील वर्षाच्या तुलनेमध्ये चालू वर्षामध्ये एकत्रित करोत्तर तोटयामध्ये रु. ३,३४१.२३ कोटीने वाढ झाली आहे. ज्यांचा संबंध महानिर्मितीच्या नुकसानीमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत रु. १९२६ कोटीने (एकल) वाढ झाली आहे.

१५. **वित्तीय विवरणपत्राशी संबंधित अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची पुरेशी व्यवस्था** :

आपल्या कंपनीने अलीकडे एक सल्लागार नियुक्त केला आहे. ज्याने या विषयावर संबंधित अहवाल सादर केला आहे आणि सूचनांचा अवलंब केला जात आहे.

१६. **नियामक संस्था, न्यायालये किंवा न्यायाधीकरण यांच्या महत्वाच्या आदेशांचे कंपनीच्या कार्यरत स्थितीवर आणि प्रवर्तवर परिणाम :**

ज्याचा आपल्या कंपनीच्या सतत कार्यरत असणाऱ्या स्थितीवर आणि प्रवर्तन कार्यावर महत्वाचे परिणाम करतील असे कोणतेही आदेश कोणतीही/नियामक संस्था/न्यायालय/लवाद यांनी दिले नाही.

१७. **कंपनीची आर्थिक स्थितीवर परिणाम करणारे प्रत्यक्ष बदल किंवा बांधिलकी** :

या वित्तीय वर्षाच्या अखेरीपासून वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यापर्यंत व या अहवालाची तारीख या काळात कंपनीच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करतील असे कोणतेही प्रत्यक्ष बदल आणि बांधिलकी नाहीत.

१८. **कर्ज, हमी गुंतवणुकी व प्रतिभूती यांचा तपशील** :

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८६ नुसार देय झालेल्या कर्जाचे तपशील, केलेली गुंतवणूक किंवा हमी किंवा कंपनीने दिलेली प्रतिभूती ज्या मर्यादेपर्यंत लागू होतो त्याचे फकल वित्तीय विवरणाच्या टिपामध्ये दिले आहेत.

१९. **जोखमांचे व्यवस्थापन :**

आपल्या कंपनीच्या व्यवस्थापनाने जोखीमांचे व्यवस्थापन करण्यासाठी धोरण तयार केले आहे. त्यामध्ये जोखीमांचे व धोक्यांचे प्रकार आणि त्या कमी करण्याचे उपाय यावर तपशीलवार माहिती दिली आहे.

२०. **दक्षता यंत्रणा :**

मंडळाने दि. ११/२/२०१६ रोजीच्या बैठकीत दक्षता यंत्रणा मंजूर केला. त्यामध्ये अयोग्य कृतीबाबत सावध करणारी व त्याला आळा घालणारी यंत्रणा कंपनीमध्ये तयार करुन ती त्याची माहिती देईल तसेच कंपनीचे जे कर्मचारी अशा अयोग्य कामे/गंभीर अनियमीतपणा याविषयी काळजी व्यक्त करुन इच्छितात त्यांना संरक्षण देण्यात येईल.

**२१ महिलांवर कामाच्या जागी होणाऱ्या लैंगिक छळवणूक (प्रतिबंध, बंदी, व सोडवणूक) अधिनियम २०१३ नुसार बंधकारक कृती:**

कामाच्या ठिकाणी महिलांची होणारी लैंगिक छळवणूक रोखण्यासाठी (प्रतिबंध, बंदी आणि सोडवणूक) अधिनियम २०१३ नवीन कायदा महिलांच्या रक्षणार्थ अंमलात आला असून ९ डिसेंबर २०१३ रोजी अधिसूचित केला गेला आहे.

आपल्या कंपनीमध्ये एकही महिला कर्मचारी वेतन पटावर नाही आणि जे कर्मचारी कार्यरत आहेत ते उपकंपन्यांकडून प्रतिनियुक्तीने नेमलेले आहेत, ज्यांनी कामाच्या ठिकाणी महिलाच्या लैंगिक छळासंदर्भातील तक्रारीचे निवारण करण्यासाठी स्वत:ची खतंत्र स्थापन केली आहे.

कंपनीसाठी कार्यरत असलेल्या महिला कर्मचारी आपली तक्रार संबंधित नियुक्त केलेल्या कंपन्यांकडे दाखल करु शकतात.

**२२. माहिती अधिकार अधिनियम २००५**

आपली कंपनी माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अनूपालन सूनिश्चित करते. वर्ष २०१६-१७ दरम्यान ९ अर्ज प्राप्त झाले ज्याचे योग्यते उत्तर दिले आहेत.

**२३ मंडळाच्या बैठका**

या वित्तीय वर्षात म्हणजे दि. १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत संचालक मंडळाच्या योग्य अशा १० (दहा) बैठका पार पडल्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

| अनु.क्र. | बैठकीचा क्रमांक | बैठकीची तारीख |
|---|---|---|
| १. | ६९ वी मंडळ बैठक | ०१.०६.२०१६ |
| २. | ७० वी मंडळ बैठक | २०.०७.२०१६ |
| ३. | ७१ वी मंडळ बैठक | ३०.०८.२०१६ |
| ४. | ७२ वी मंडळ बैठक | १४.०९.२०१६ |
| ५. | ७३ वी मंडळ बैठक | २७.०९.२०१६ |
| ६. | ७४ वी मंडळ बैठक | २६.१०.२०१६ |
| ७. | ७५ वी मंडळ बैठक | २३.११.२०१६ |
| ८. | ७६ वी मंडळ बैठक | २१.१२.२०१६ |
| ९. | ७७ वी मंडळ बैठक | १८.०१.२०१७ |
| १०. | ७८ वी मंडळ बैठक | १८.०३.२०१७ |

बैठकीच्या मधील काळाचे अंतर हे कंपनी अधिनियम २०१३ यात विहित केल्याप्रमाणे होते.

या बैठकांना संचालकांची उपस्थिती खालील प्रमाणे होती :

| अनु.क्र. | मा. संचालकांची नावे | एकूण बैठकी संख्या | उपस्थितीची संख्या |
|---|---|---|---|
| १. | श्री. चंद्रशेखर कृष्णराव बावनकुळे | १० | १० |
| २. | श्री. मदन येरावार | ८ | ५ |
| ३. | श्री. अरविंद सिंह | १ | १ |
| ४. | श्री. बिपीन कुमार पुनम भाई श्रीमाळी | १० | १० |
| ५. | श्री. संजीव कुमार | १० | ८ |
| ६. | श्री. राजीव कुमार प्रेमभूषण मित्तल | १० | ६ |
| ७. | श्री. सूर्यप्रताप गुप्ता | २ | २ |
| ८. | श्री. सुरेंद्र एन. पांडेय | ४ | ४ |
| ९. | श्रीमती अनुराधा भाटीया | १० | १० |
| १०. | श्री. प्रकाश विठ्ठल पागे | १० | ८ |
| ११. | श्री. विश्वास वसंत पाठक | १० | ९ |
| १२. | श्री. राजेंद्र बालभद्र गोएंका | १० | ७ |

**२४. मंडळाच्या समित्या :**

कामकाजावर अधिक लक्ष केंद्रीत करता यावे आणि अधिक प्रभावी प्रशासनाचे व जबाबदारीने कार्य करता यावे यासाठी मंडळाने खालीलप्रमाणे विविध समित्यांची स्थापना केली :

**२४.१ लेखा परिक्षण समिती :**

२४.१.१ लेखा परिक्षण समितीमध्ये श्री. प्रकाश पागे (अध्यक्ष) आणि श्री. राजीवकुमार मित्तल आणि विश्वास पाठक सदस्य म्हणून आहेत.

२४.१.२ लेखा परिक्षण समिती ही सांविधिक, सेक्रेटरीयल आणि अंतर्गत लेखापरिक्षक आणि कंपनीचे संचालक यांच्यात दुवा साधण्याचे कार्य करते तसेच ही समिती मंडळास वित्तीय माहिती घेण्याबाबत लक्ष ठेवण्याची जबाबदारी पार पाडते तसेच वित्तीय विवरणपत्राचा आणि लेखापरिक्षण कार्य यांचा नित्य आढावा घेते.

२४.१.३ या वर्षात लेखा परिक्षण समितीची पुनर्रचना करण्यात आली आणि या समितीच्या वर्षभरात तीन वेळा बैठका झाल्या. त्याच्या तारखा

अशा: १६/०७/२०१६, २७/०९/२०१६, आणि ०२/१२/२०१६ त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

| अनु क्र. | मा. सदस्यांची नावे | पदनाम | एकूण बैठकीची संख्या | उपस्थितीची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. पी.व्ही. पागे | अध्यक्ष | ३ | ३ |
| २. | श्री. विश्वास पाठक | सदस्य | ३ | ३ |
| ३. | श्री. मुकेश खुल्लर | सदस्य | ३ | ३ |

**२४.२ नामनिर्देशन आणि पारिश्रमिक समिती :**

२४.२.१ नामनिर्देशन व पारिश्रमिक समितीमध्ये सर्व श्री. राजीव कुमार मित्तल (अध्यक्ष), श्री. पी.व्ही.पागे आणि श्री. विश्वास पाठक यांचा सदस्य म्हणून समावेश आहे.

२४.२.२ या समितीची वर्षभरात दि. २६.१०.२०१६ रोजी एक बैठक झाली त्याचा तपशील असा :

| अनु.क्र. | मा. सदस्यांची नावे | पदनाम | एकूण बैठकींची संख्या | उपस्थितीची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. राजीव कुमार मित्तल | अध्यक्ष | १ | १ |
| २. | श्री. पी.व्ही. पागे | सदस्य | १ | १ |
| ३. | श्री. विश्वास पाठक | सदस्य | १ | १ |

**२४.३ कंपनीची सामाजिक जबाबदारी समिती**

२४.३.१ कंपनीची सामाजिक जबाबदारी समितीमध्ये श्री. प्रकाश पागे आणि श्री. विश्वास पाठक सदस्य आणि श्री. अरविंद सिंह, व्यवस्थापकीय संचालक हे समितचे अध्यक्ष आहेत.

२४.३.२ या वर्षादरम्यान सामाजिक जबाबदारी समितीची एकही बैठक झाली नाही.

**२५ सांविधिक लेखा परिक्षक :**

भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी डुगर अ‍ॅड असोशिएट्स, सनदी लेखापाल, मुंबई (एफआरएन: ०००५६१ एन) यांची कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १३९ अंतर्गत, सांविधिक लेखा परिक्षक म्हणून २०१६-१७ या वर्षासाठी नियुक्ती केली.

आपल्या कंपनीच्या संचालक मंडळाने सांविधिक लेखा परिक्षकांचे शुल्कापोटी रु. ७,५०,०००/- (रुपये सात लक्ष पन्नास हजार मात्र) अधिक लागू होणारा सेवा कर याप्रमाणे निश्चित केला.

**२६ सांविधिक लेखापरिक्षकांचा अहवाल:**

सांविधिक लेखापरिक्षकांनी दि. ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रांमध्ये दिलेल्या विविध विषयांवर त्यांचे पात्रता विषयक मत दिले आहे.

लेखापरिक्षकांनी कंपनीच्या दि. ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाचा स्वायत्त व एकत्रित वित्तीय विवरणपत्रांबाबत त्यांची मते व निरिक्षणे अहवालात नोंदली असून कंपनीच्या मंडळाने त्याची उत्तरे दिली आहे. ही उत्तरे या अहवालाचे परिशिष्ट -१ आणि परिशिष्ट - १ अ येथे अनुक्रमे जोडली आहेत.

**२७. भारताचे लेखा नियंत्रक व महा लेखापरिक्षक यांचा आढावा :**

भारताचे लेखा नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी कंपनीच्या मंडळाने स्वीकारलेल्या व सांविधिक लेखा परिक्षकांनी लेखा परिक्षित केलेल्या कंपनीच्या स्वायत्त आणि एकत्रित वित्तीय विवरण पत्रांचा आढावा घेतला.

दि. ३१/०३/२०१७ रोजी संपलेल्या वर्षातील स्वायत्त आणि एकत्रित या दोन्ही वित्तीय विवरणपत्रांवर कॅग यांचे अभिप्राय निरंक आहेत. भारताचे लेखा नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी स्वायत्त व एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर दिलेल्या अभिप्रायाची प्रत या अहवालाचे परिशिष्ट क्र. २ आणि परिशिष्ट क्र. ३ यात जोडली आहे.

**२८. अंतर्गत लेखा परिक्षक :**

मेसर्स ए.एन.ए.आर. अ‍ॅड कंपनी, सनदी लेखापाल, मुंबई (एफआरएन:१२४२११डब्लू) यांची संचालक मंडळाने वित्तीय वर्ष २०१६-१७ साठी अंतर्गत लेखा परिक्षक म्हणून नियुक्त केले आहे.

**२९. सेक्रेटरीयल ऑडिटर :**

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम २०४ ज्याचे सहवाचन कंपनीज (व्यवस्थापकीय व्यक्तीची नियुक्ती व परिश्रमिक) नियमावली २०१४ यातील नियम क्र. ९ त्याला अनुसरुन संचालक मंडळाने मेसर्स ए वाय साठे अ‍ॅड कं. व्यावसायिक कंपनी सेक्रेटरीज, मुंबई यांची ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाच सेक्रेटरीयल ऑडीट करण्यासाठी नियुक्ती केली होती.त्याचा अहवाल परिशिष्ट क्र.४ येथे जोडला आहे.

**३०. सेक्रेटरीयल ऑडीट रिपोर्ट :**

सेक्रेटरीयल ऑडिटर यांची फॉर्म क्र. एम आर - ३ यामध्ये त्यांचा अहवाल सादर केला असून वित्तीय वर्ष २०१६-१७ साठी पात्र केलेली मते/निरिक्षणे मांडली आहेत. सेक्रेटरीयल ऑडिटर यांच्या मतावर मंडळाने दिलेली उत्तरे या अहवालाचे परिशिष्ट क्र. ५ येथे जोडली आहे.

**३१. ऊर्जा संवर्धन, तंत्रज्ञानाचा स्वीकार व परकीय चलनातील मिळकत व खर्च**

कंपनी (लेखा) नियमावली २०१४ च्या नियम८(३) सह वाहन कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १३४ यात विहित केलेल्या ऊर्जा संवर्धन आणि तंत्रज्ञानाचा स्वीकार परकीय चलनातील मिळकत व खर्च याबाबतची प्रकटने परिशिष्ट ६ मध्ये जोडली आहेत.

**३२. कर्मचाऱ्यांची माहिती :**

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १९७ आणि त्याखाली बनविलेल्या तरतुदी आणि नियमानुसार संचालकांच्या अहवालामध्ये मर्यादेपक्षा जास्त परिश्रमिक मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांचे तपशीलाचा समावेश करण्याबाबत सरकारी कंपन्यांना

सूट देण्यात आली आहे.

**३३. वार्षिक परताव्याचा उतारा :**

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ९२ मधील उप कलम (३) यानुसार वार्षिक परताव्याचा सारांश येथे परिशिष्ट क्र.७ मध्ये जोडला आहे.

**३४. उपकंपन्या :**

**खाली दिलेल्या उपकंपन्या आहेत**

१. महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.लि. - विज वितरण करण्याचे काम करते

२. महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कं.लि. - विज निर्माण करण्याचे काम करते

३. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.लि. - विज वाहून नेण्याचे काम करते

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १२९ च्या उपकलम (३) नुसार उपकंपन्यांच्या वित्तीय विवरणावर ठळक वैशिष्ट्ये असलेले एक निवेदन AOC-१ या अहवालात परिशिष्ट क्र. ८ मध्ये जोडले आहे. आढावा वर्षात कंपनीची कोणतीही उपकंपनी बंद झाली नाही.

**३५. उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम यांची कामगिरी आणि कंपनीच्या संपूर्ण कार्यक्षमतेत त्यांचे योगदान :**

कंपनी (लेखा) नियम २०१४ च्या नियम ८ (१) नुसार (सुधारित स्वरुपात) उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम कंपन्यांच्या कामगिरी संदर्भात माहिती लागू प्रमाणात आणि त्यांच्या संपूर्ण कामगिरी मध्ये योगदान म्हणून कंपनी अहवालात परिशिष्ट - ९ मध्ये जोडला आहे.

**३६. कंपनीची सामाजिक जबाबदारी :**

कंपनीची सामाजिक जबाबदारी (सीएसआर) मध्ये कंपनी विश्वास ठेवते की, त्याच्या भागधारकांना आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीयदृष्ट्या टिकाऊ अशा प्रकारे व्यवसायाचे संचालन करण्याची जबाबदारी कंपनीने पारदर्शी व नैतिकतेने पार पाडली आहे. भागधारकांमध्ये कंपनीचे कामकाज, स्थानिक समुदाय, पर्यावरण आणि समाजाचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडतो. बांधिलकी वाढविण्यासाठी आपल्या कंपनीने एक व्यापक धोरण विकसित केले आहे. कंपनीची सामाजिक जबाबदारी या उपक्रमाचा वार्षिक अहवाल या अहवालाची परिशिष्ट - १० मध्ये जोडला आहे.

**३७. संबंधित पक्षासह करार किंवा व्यवस्था**

कंपनी कायदा २०१३ च्या तरतुदीच्या अनुषंगाने कंपनीने त्याच्या संबंधित व्यक्तीबरोबर केलेल्या करार व व्यवस्थेचे तपशीलावार माहिती या अहवालाच्या परिशिष्ट -११ म्हणून जोडलेल्या फॉर्म एओसी-२ मध्ये जोडले आहे.

**३८. सर्वसाधारण**

i) कंपनीच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने भाग धारण केले नसल्यामुळे कंपनी कायदा २०१३ च्या कलम ६७ (३) (क) चे सहवाचन कंपनी नियम १६(४) (कंपनीचे भाग भांडवल आणि कर्ज रोखे) नियम २०१४ नुसार त्यांच्याकडून थेट मतदान करण्याचे अधिकाराच्या संदर्भात दिलेला नाही. यापुढे कंपनीने वित्तीय वर्षादरम्यान कंपनीच्या समभागांची खरेदी करण्यासाठी

कोणत्याही व्यक्तीस कोणतीही आगाऊ रक्कम दिली नाही.

ii) समभागावरील भिन्न अधिकार असलेला लाभांश, मतदान किंवा तसे काही आणि कोणत्याही योजनेखाली कर्मचाऱ्याला समभाग जारी केल्याचा असा कोणत्याही प्रसंगाची नोंद नाही.

iii) कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४३ (१२) अनुसार लेखा परिक्षणाच्या प्रक्रियेदरम्यान वैधानिक लेखापरिक्षकाकडून फसवणुकीचा कोणता प्रकार उघडकीस किंवा नोंद केल्याची कोणत्याही प्रसंगाची नोंद नाही.

**३९. ऋणनिदेश :**

कंपनीत यावर्षी केंद्र व राज्य शासनाची विविध मंत्रालय/विभाग यांनी जे सहकार्य केले त्याबद्दल संचालक त्यांचे विषयी कृतज्ञता व्यक्त करतात तसेच या वर्षी कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी यावर्षी तळमळीने व समर्पित वृत्तीने काम केले त्याबद्दल त्यांची प्रशंसा करुन ती या अहवालात नोंदवित आहेत.

**संचालक मंडळाच्या वतीने**

**जयकुमार श्रीनिवासन**
संचालक (वित्त)
डीआयएन ०१२२०८२८

**अरविंद सिंह**
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन ०२७८०५७३

स्थळ : मुंबई
दिनांक : ३०, डिसेंबर २०१७

नोंदणीकृत कार्यालय :
हाँहकाँग बँक इमारत, ३ व ४ मजला,
महात्मा गांधी मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४००००१, महाराष्ट्र

सीआएन : यु४०१००एमएच२००५ एसजीसी१५३६४९
ईमेल आयडी : msebhcl@gmail.com
दुरध्वनी क्र. : ९१-२२-२२६०८३८३
फॅक्स क्र. : ९१-२२-२२६१९१०१

**परिशिष्ट- १**

## १.४.२०१६ ते ३१.३.२०१७ या कालावधीसाठी एकल वित्तीय विवरणपत्रावर लेखा परिक्षकाच्या अहवालाला उत्तरे

| अ. क्र. | लेखापरिक्षकांचा अभिप्राय | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|---|
| १. | **कंपनीच्या भारतीय लेखा मानकांनुसार स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांवर अहवाल :**<br>आम्ही, या अहवालासोबत जोडलेल्या म.रा.वि. मं. सूत्रधारी कंपनी लिमिटेडच्या भारतीय लेखा मानकांनुसार स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांचे, लेखापरिक्षण केले आहे. या विवरण पत्रात कंपनीचे दि. ३१ मार्च २०१७ रोजीचे ताळेबंद पत्रक व या दिवशी संपलेल्या आर्थिक वर्षाचे नफा व तोटा पत्रक (इतर व्यापक उत्पन्नासह) तसेच रोकडता प्रवाह विवरण पत्रक आणि समभागामधील बदलाचे विवरण व महत्वाच्या लेखा धोरणांचा सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश होतो. (यापुढे ''भारतीय लेखा मानकांनुसार स्वायत्त वित्तीय विवरणपत्र'' म्हणून संदर्भित). | वस्तुस्थिती |
| २. | **स्वायत्त विवरण पत्रकांविषयी व्यवस्थापनाची जबाबदारी :**<br>कंपनी अधिनियम २०१३ (कायदा) यातील कलम १३४(५) यात दिलेल्या विषयानुसार, भारतात सर्वमान्य लेखातत्वे यानुसार आणि भारतीय लेखा मानकांनुसार विशेषतः या कायद्याचे कलम १३३, ज्याचे सहवाचन कंपनी (लेखा) नियमावली २०१५ सोबत होते, यात विनिर्देशित केलेली लेखामानके यांना अनुसरुन, कंपनीची वित्तीय स्थिती, कामगिरी इतर व्यापक उत्पन्न् आणि रोकडता प्रवाह आणि समभागामधील बद्लाच विवरण याची सत्य व रास्त दर्शन घडविणारी वित्तीय विवरणपत्रे तयार करणे. ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असते. या जबाबदारीमध्ये कंपनीच्या मत्तांचे रक्षण करण्यासाठीच्या कायद्यातील तरतुदी याच्याशी सुसंगत असे लेख्यांच्या दस्तऐवजांचे जतन करणे, लबाडी व इतर अनियमिततांना शोधणे व आळा घालणे, लेख्यांसाठी योग्य धोरणे निवडणे, प्रमाणशिर व सुज्ञ | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| | न्यायनिर्णय व अंदाज करणे, अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची रचना करुन तिची अमलबजावणी व संचालन करणे व त्यातून लेख्यांच्या दस्तऐवजांची अचूकता व परिपूर्णता यांची हमी मिळविणे आदि कर्तव्यांचा समावेश होतो. तसेच त्यातून लबाडी किंवा युक्तीने होणाऱ्या गैर विवरणापासून मुक्त व सत्य दर्शन घडविणारी भारतीय लेखा मानकांनुसार स्वायत्त स्वरुपाची वित्तीय विवरण पत्र तयार करुन सादर करणे याचाही समावेश होतो. | |
| ३. | **लेखा परिक्षकांची जबाबदारी:**<br>या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रांवर आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे, आमची मते व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही कायद्यातील तरतुदी, लेख्यांची व लेखा परिक्षणाची मानके आणि कायद्यातील तरतुदी व त्या अंतर्गत केलेली नियमावली या साठी आवश्यक ते विषय या बाबींचा विचार करुन लेखा परिक्षणाच्या अहवाल तयार करतांना त्या समाविष्ट केल्या. आम्ही आमचे लेखा परिक्षण कायद्याचे कलम १४३(१०) यात विनिर्देशीत केलेल्या ‘लेखा परिक्षणांची मानके’ याला अनुसरुन केले. या मानकांनुसार आम्ही नैतीक गरजांचे अनुपालन करणे, आणि ही भारतीय लेखा मानकांनुसार स्वायत्त वित्तीय लेखा परिक्षणे गैरविवरणापासून मूक्त असल्याचेही योग्य आश्वासन मिळवणे आवश्यक आहे. या स्वायत विवरण पत्रकांतील रकमा व प्रकटने या विषयी लेखापरिक्षणातून पुरावे मिळविण्याच्या दृष्टीने या लेखापरिक्षणाची प्रकीया केली जाते. यासाठी कार्यपध्दतींची निवड ही लेखा परिक्षकांची न्याय बुध्दीवर अवलंबून असते. या मध्ये भारतीय लेखा मानकांनुसार स्वायत्त वित्तीय विवरण पत्रात लबाडी किंवा चुकीने प्रत्यक्ष गैरविवरण होण्याच्या धोक्यांचे मुल्यमापन करावयाचे असते. अशा धोक्यांचे मुल्यमापन करण्यासाठी, लेखापरिक्षक भारतीय लेखा मानकांनुसार स्वायत वित्तीय विवरणपत्रकांशी संबधित कंपनीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे विचारात घेतात. ही भारतीय लेखा मानकांनुसार स्वायत वित्तीय वितरणपत्रे | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीचे वास्तव व योग्य चित्रण घडविणारी असावीत या साठी लेखापरिक्षणाच्या परिस्थितीनुसार योग्य पध्दतींची रचना करण्यात येते. वापरलेली लेखा धोरण योग्य आहेत किंवा कसे व कंपनीच्या संचालकानी केलेले लेखा विषयक अंदाज प्रमाणशीर आहेत किंवा नाहीत, आणि या भारतीय लेखा मानकांनुसार स्वायात वित्तीय विवरणपत्रांचे एकूण सादरीकरण यांचे मुल्यमापन यांचाही विचार लेखा परिक्षणात केला जातो. | |
| ४. | आमच्या लेखा परिक्षणा संबंधीच्या मतांसाठी योग्य व पुरेसे आधार देणारे लेखा परिक्षणांचे पुरावे आम्ही मिळविले असा आमचा विश्वास आहे.<br><br>**पात्र मतांचा आधार :**<br>अ) आम्ही, खाली नमदु केलेल्या विषयां संबंधात आमच्यालेखा पारीक्षणासाठी आवश्यक असणारी माहीती आणि स्पष्टीकरणे मिळवण्यात असमर्थ ठरले :<br>१) शासन निर्णय क्र. रिफार्म २०१० / प्र. क्र. ११७ / उर्जा १४,४५,३४,००,०००/- - 'यानुसार दि. ३१ मार्च २०१६ रोजी अंतिमीकरण झालेल्या हंगामी हस्तांतरण योजनेच्या अंतर्गत हस्तांतरातील झालेल्या काही मूर्त मत्तांची मालकी निश्चित करणे. (संदर्भ टिपा क्र. ७.२) | पूर्वीच्या म.रा.वि मंडळाच्या जमिनी व इमारती यांची मालकी, मराविमं सूत्रधारी कं.लि. च्या नावे करणे व हस्तांतरीत करणे ही प्रक्रिया चालू आहे. संबंधित प्राधिकाऱ्यांना हस्तांतरण करण्याविषयी पत्रे दिली आहेत. |
| ब) | कंपनीने तिच्याकडे शेअर ॲप्लीकेशन मनी रु. ६,९३,७८,९३,३८९/- ठेऊन घेतले आहेत, ही बाब कंपनी अधीनियम २०१३ च्या कलम ४२ चे उलंघन करणारी आहे (संदर्भ टिपा क्र १५). | निर्धारित कालावधीत म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनीला उपकंपन्यांकडून समभाग जारी न केल्यामुळे हे उल्लंघन झाले आहे.<br>आता सर्व उपकंपन्यांना आदेश देण्यात आले आहेत की, त्यांना शेअर्स विहीत कालमर्यादेत द्यावेत. त्यानंतर मराविमं सूत्रधारी कं.लि.शेअर्स महाराष्ट्र शासनाला विहीत काल मर्यादेत देईल. |
| क) | कंपनीच्या उपकंपन्या म्हणजे महावितरण, महापारेषण आणि | सूत्रधारी कंपनी व उप कंपन्या यांच्यामध्ये आंतर |

| | | |
|---|---|---|
| | महानिर्मिती यांच्या ज्या थकीत शिलकी कंपनीच्या लेखा वह्यात यांचे मेळ करणे, त्यावर बोलणी व विमर्श करणे चालू आहे. (पहा टिपा क्र. ९.१ व १९.१). त्याचा वित्तीय स्थितीवर तसेच वित्तीय विवरण पत्रकातील काही प्रकटनावर मोठा परिणाम होऊ शकेल. वरील परिछेद क्र. (अ) ते (क) यांचा तोटा, राखीव आणि प्रतिभाग मिळकत यांच्यावर होणाऱ्या विपरीत परिणामांचे सांख्यिकीकरण करता येणे अशक्य आहे, तसेच ते प्रकट करता येणे शक्य नाही. | कंपनीच्या शिलकीच्या थकिताविषयी मतभिन्नता असल्याने त्या आंतर कंपनी शिलकी थकीत राहिल्या आहेत.<br>उपकंपन्याकडे काही मत्ता/राखीव/दायित्वे इ. स्थानांतरित केली आहेत पण त्यांनी ते स्वीकारण्याचे काम होणे आहे. या कारणांमुळे आंतर कंपनी शिलकीमध्ये काही मतभेद उद्‌भवले आहेत ते वर्ष २०१७-१८ मध्ये सोडविण्यात येतील. |
| ५. | **पात्र मत :**<br>आमच्या मते व आमची सर्वोतपरी माहिती तसेच आम्हास दिलेली स्पष्टिकरणे यानुसार असे नमुद करण्यात येते की, वरील पात्रमतांचा आधारे या परिच्छेदात वर्णन केलेल्या विषयांचे परिणाम आता खालील काही भारतीय लेखा मानकांची पूर्तता न होणे यासंबंधीचा परिच्छेद ८.३ (डी) वगळता आमच्या मते व आमची सर्वोतपरी माहिती तसेच आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यानुसार वरील भारतीय लेखा मानकांनुसार स्वायत्त विवरणपत्रे कायद्यानुसार आवश्यक असणाऱ्या पद्धतीव्दारे माहिती देतात. तसेच कंपनीची दि. ३१ मार्च २०१७ रोजी व्यवहाराची स्थिती, त्या तारखेला संपलेल्या वर्षातील कंपनीचा तोटा (वित्तीय कामगीरी इत्तर व्यापक उत्तपनासह) आणि रोकडता प्रवाह आणि समभागामधील बदलाचे विवरण याचे, भारतात सर्वसाधारणपणे स्विकारलेल्या लेखा तत्वांशी सुसंगत असे सत्य व रास्त दर्शन घडवितात. | वस्तुस्थिती |
| ६.<br><br><br><br>६.१ | **विषयांवर भर देणे :-**<br><br>**वित्तीय विवरणपंत्रातील खालील विषयांकडे आम्ही लक्ष वेधतो.**<br>टिपा क्र. १०.२ पहावी तेथे कंपनीने अग्रिमकर रु. १,३८,५८,००,०८१/- दाखविली आहे. लेखा वह्यात कर तरतुदीची निव्वळ रक्कम रु. ४०,०७,२७,७२९/- आहे. | आयकर विभागाने वित्तीय वर्ष २००५-०६ पासून काही खर्च मान्यता देत नाही म्हणून वित्तीय वर्ष २००५-०६ पासून आयकराच्या प्रकरणी अपिल दाखल केली आहेत.<br>भाडेपट्टी, उत्पन्न व व्याजावरील उत्पन्नावर विवरण पत्रानुसार जरी कराचे दायित्व दिसत नसले तरी मोठ्या प्रमाणात होऊ शकणारे दंड टाळण्यासाठी |

| | | |
|---|---|---|
| | आयकर अभिलेखामध्ये असे दायित्व नाही कारण प्रकरणांवर अपील केले आहे. तरतुदीची रक्कम कंपनीच्या न्यायबुध्दीनुसार आहे. | व्यवस्थापनाने कर भरण्याचा निर्णय घेतला आहे. |
| ६.२ | टिपा क्र. ११.१ पहावी, तेथे उपकंपन्यांकडून मालमत्तेच्या भाड्यापोटी ऋणाची थकबाकीची एकूण रु.२,३५,२२,०१,३२४/- (मागील वर्षी रु. २,०९,६२,८४,७०५/-) दीर्घकाळ थकीत आहे. | वस्तुस्थिती |
| ६.३ | टिपा क्र. २५.३ पहावी, तेथे कंपनीने महाराष्ट्र शासनाने दिलेल्या शेअर्स बाबतचे मुद्रांक शुल्कापासून माफी मिळावी अशी विनंती महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाकडे केली आहे. ही माफी मिळेल अशी व्यवस्थापनाला खात्री आहे. | पाठपुरावा करण्यात येत आहे. |
| ६.४ | टिपा क्र. ९.५ पहावी : कंपनीची महावितरण कंपनीमधील गुंतववुक रु. ४,६७,९७,६३,४९,०४० चे अवमुल्यन झाले आहे. कारण महावितरण कंपनीला निरंतर नुकसान सहन करावे लागत आहे. अवमुल्यन झालेली समभागांची किंमत पुस्तकात दिलेली नाही. गेल्या वर्षापासुन महावितरणचा संपूर्ण तोटा रु. १४,९७,८७३ लाख समभागाच्या मुल्यामध्ये प्रतिबिंबित होत नाही. ३१.०३.२०१७ ची आकडेवारी निश्चित केलेली नाही. | वस्तुस्थिती |
| ७. | **इतर विषय**<br>३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षासाठी कंपनीची वित्तिय माहिती आणि १ एप्रिल २०१५ ची संक्रमण तारखेच्या सुरवातीचा ताळेबंद या भारतीय लेखा मानकांनुसार स्वायत्त वित्तिय विवरण पत्रात समाविष्ट करण्यात आली आहे. मार्च अखेरिस मिळालेल्या पूर्वीच्या वैधानिक वित्तिय विवरण पत्रावर आधारीत आहे. ३१ मार्च २०१६ आणि ३१ मार्च २०१५ कंपन्यांच्या (लेखा विषयक मानक) नियम २००६ (तयार केलेल्या सुधारीत स्वरुपात) यांच्यानुसार तयार करण्यात आले. ज्या २०१५-१६ व वर्ष २०१४-१५ साठी पूर्ववर्ती लेखापरिक्षकांनी आम्हाला लेखापरिक्षित केलेल्या, ज्यामध्ये सुधारित २७ सप्टेंबर २०१६ आणि २९ सप्टेंबर २०१५ ची अनुक्रमे अनुदान देण्यात आले आहे. भारतीय लेखा मानकांच्या संक्रमण काळात कंपनीने वापरलेल्या लेखाविषयक तत्वांतील फरकांकरीता त्यां वित्तीय विवरण | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| | पत्रात तरतूद करुन लेखापरिक्षण केले गेले आहेत.<br>वरील मत ६ व ७ मध्ये नमूद केलेल्या बाबींबाबत आमचे मत पात्र नाही. | |
| ८. | **इतर कायदेशीर व नियामक आवश्यकता :**<br>८.१ कायद्याचे कलम १४३चे उपकलम (११) यातील अटींनुसार भारताकडे सरकारने दिलेला आदेश कंपन्यांचे (ऑडिटर्स रिपोर्ट) ऑडर्स,२०१६ याप्रमाणे आम्ही 'जोडपत्र अ' यामध्ये सदर आदेशाचे परिच्छेद ३ व ४ यात विहित केलेल्या विषयांवर त्यांच्या लागू होण्यास मर्यादांच्या संदर्भात आम्ही एक निवेदन जोडलेले आहे. | वस्तुस्थिती |
| | ८.२ कायद्याचे कलम १४३(५) यानुसार आम्ही कंपनीच्या लेखा वह्या व अभिलेख यांच्यावरील तपासणीबाबत आम्हास योग्य वाटते असे, आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यानुसार, भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांच्या निदेशानुसार जोडपत्र 'ब' येथे आमचा अहवाल जोडला आहे. | वस्तुस्थिती |
| | ८.३ कायद्याचे कलम १४३ (३) यानुसार आम्ही अहवाल देतो की :- | वस्तुस्थिती |
| अ) | आम्ही आमचे सर्वोत्तम ज्ञान व विश्वास यानुसार फक्त वर दिलेला परिच्छेद - ४ वगळता आमच्या लेखा परिक्षणाच्या हेतूसाठी आवश्यक सर्व माहिती व स्पष्टिकरणे शोधली व मिळवली आहेत. | वस्तुस्थिती |
| ब) | आमच्या मते पात्रता मतप्रणालीच्या परिच्छेद ४ साठी दिलेल्या गोष्टींचा प्रभाव वागळता, कायद्यानुसार आवश्यक अशी सर्व लेखा वह्या-पुस्तके कंपनीने योग्य प्रकारे जतन केली आहेत; असे आम्हाला त्या पुस्तकांच्या परिक्षणांवरुन दिसून आले. | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| क) | या अहवालाशी संबंधीत ताळेबंद, नफा तोटा पत्रक आणि रोकडता प्रवाह आणि समभाग बदलाचे विवरण ही वित्तीय विवरणपत्रे ही लेखा वह्यांशी संबंध दर्शवतात. | वस्तुस्थिती |
| ड) | वरील परिच्छेद ४ मधील आपल्या निरिक्षणाच्या अधीन, आमच्या मते उपरोक्त भारतीय लेखा मानकांनुसार स्वायत्त वित्तीय विवरणपत्रे भारतीय लेखा मानकांचे पालक करीत असलेल्या कायद्याच्या कलम १३३ अन्वये नियत संबधित नियमाचे पालन करतात. | वस्तुस्थिती |
| इ) | कंपनी अधीनियम २०१३ चे कलम १६४ (३) यातील तरतुदी, भारतसरकारची अधिसुचना क्र. जी एस आर ४६३ (इ) दि. ५ जून २०१५ यानुसार या सूत्रधारी कंपनीला लागू होत नाहीत. | वस्तुस्थिती |
| फ) | वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यांची योग्यता आणि अशा नियंत्रणांचा प्रभावीपणा यात समावेश करण्याचा इतर विषयावर आम्ही जोडपत्र क यात वेगळा अहवाल दिला आहे. | वस्तुस्थिती |
| ग) | **कंपनीचे (ऑडीट व ऑडीटर्स) नियम २०१४, नियम ११ यांच्याशी सुसंगत इतर विषयांच्या लेखापरिक्षकांच्या अहवालातील समावेशा संदर्भात, आमच्या मते आणि आमची सर्वोत्कृष्ट माहिती व दिलेली स्पष्टिकरणे यानुसार :-** | वस्तुस्थिती |
| अ) | कंपनीने प्रलंबित असलेल्या कायद्याच्या प्रकरणांची वित्तीय विवरणपत्रावर होऊ शकणाऱ्या परिणामांची भारतीय लेखा मानकांनुसार स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाच्या टिपा २४मध्ये प्रकट केल्या आहेत. | वस्तुस्थिती |
| ब) | कंपनीचे साधित करारासह कोणतेही दीर्घ मुदतीचे कंत्राटे नाहीत. तसेच मंडळाच्या अंदाजानुसार लागू होणाऱ्या कायद्यानुसार किंवा लेखा मानकांनुसार तरतूदी कराव्या | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| | लागतात असा प्रत्यक्ष अंदाज करता येतील असे तोटे नाहीत. | |
| क) | कंपनीने गुंतवणुकदार शिक्षण व रक्षण निधीत हस्तातरीत करणे आवश्यक आहे असे निधी नाहीत. | वस्तुस्थिती |
| ड) | टिपा क्र. ३४ चा भाग म्हणुन कंपनीने केलेल्या बँकेच्या ठेवींविषयी प्रकटीकरण कंपनीच्या भारतीयलेखा मानकांनुसार स्वायत्त वित्तीय विवरणपत्रात हाताळणी करण्या बरोबरच ८ नोव्हेंबर २०१६ ते ३० डिसेंबर २०१६ या कालावधीतील विशिष्ट बँक नोट्सनुसार कंपनीने लेखापुस्तके ठेवली आहेत. इतर प्रकटीकरण जसे ‘प्रारंभिक शिल्लक’ ‘अधिकृत प्राप्ती’ आणि ‘देयके’ आणि ‘अंतिम शिल्लकी’ वरील त्याचा परस्परविरोधी परिणाम सत्यापित करणे शक्य नाही. कारण ‘एसबीएन’ आणि ‘अन्य संवेदन’ मध्ये चलन नोट्सच्या ढिलाईला पाठिंबा देणारे समाधानकारक पुरावे / दस्ताऐवज कंपनीत उपलब्ध नाहीत. | वस्तुस्थिती |

# स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र 'अ'

आमच्या समानतारखेच्या अहवालातील इतर कायदे व नियमने यांच्या आवश्यक्ता या शीर्षकांचा परिच्छेद ८.१ यातील संदर्भाप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | स्थिर मत्तांच्या संदर्भात:<br>अ) मराविमं सूत्रधारी कंपनीने हस्तांतरीत योजनेनुसार तिच्याकडे दिलेल्या मत्तांच्या करिता स्थिर मत्ता नोंदवही जतन केली आहे. तसेच वरील योजनेनुसार कंपनीची संस्थापना झाल्यानंतर मत्तांमध्ये पडलेली भर तसेच त्यांच्या संख्या आणि स्थान यांचा तपशील त्यात समाविष्ट केला आहे. (टिपा क्र. ७.५ पहावी) | वस्तुस्थिती |
| | ब) आम्हास दिलेल्या स्पष्टिकरणानुसार या स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी यावर्षी केलेली नाही. व्यवस्थापनाने या स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी २०१०-११ यावर्षी केली होती. वर्ष २०१०-११ नंतर नोंदवहीत प्रत्यक्ष किंवा अन्य प्रकारे काही विसंगती असल्या तर त्याचा अंदाज करता येत नाही. (टिपा क्र. ७.५ पहावी) | वस्तुस्थिती |
| | क) आमच्या मते व आम्हास दिलेली स्पष्टिकरणे यानुसार अचल मालमत्तेच्या स्वामित्वाचे विलेख कंपनीच्या नावे धारण केलेले नाहीत. याचे कारण म्हणजे सर्व मत्तांचे हस्तांतरण महाराष्ट्र शासनाने विद्युत अधिनियम २००३ मधील प्रकरण (**xiii**) यातील तरतुदीनुसार पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या पुनर्रचनेसाठी घेतलेल्या निर्णयानुसार झालेले आहे, आणि हंगामी हस्तांतरण योजनेत ते वाढविले. या हंगामी योजनेचे अंतिमीकरण दि. ३१ मार्च २०१६ रोजीच्या शासन निर्णय क्र. रिफार्म /२०१०/ प्र. क्र. ११७/उर्जा ३ यानुसार झाले आहे. ज्यां प्रकरणी विलेख कंपनीच्या नावे झालेले नाहीत त्याचा तपशील :- | कंपनीच्या नांवावर मत्ता हस्तांतर करण्याच्या प्रक्रियेच्या पाठपूरवा चालू आहे. |

| मत्तेचे वर्णन | प्रकरणांची सरता | क्षेत्रफळ एकरमध्ये | ३१/०३/१७ रोजीचा ठोक गट (रु) | ३१/०३/१७ रोजी निव्वळ गट (रु) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| जमीन भाडेपट्टीची | २ | ७.१० | २,०४,५९,३४,४६८ | १,७१,२२,६२,७७६ | विलेख हस्तांतरित करण्यासाठी कंपनीने कायदेशिर सोपस्कार पूर्ण करण्यासाठी योग्य कृती सुरू केली आहे. |
| जमीन मालकीची | ४ | १.८९ | ७०,८८,८०,००० | ७०,८८,८०,००० | |
| इमारत व रचना | १३ | उपलब्ध नाही | ११,८०,५२,९९,९०४ | ८,७६,९१,६१,६४६ | |

| | | |
|---|---|---|
| २. | आम्हास दिलेली माहीती व स्पष्टिकरणे यानुसार यावर्षी कंपनी फक्त भाडेपट्टीच्या कामात गुंतलेली होती. त्यामुळे कंपनीने कोणत्याही वस्तूमाल सूची तयार केली नाही. परिणामी खंड ३ (ii) कंपनीला लागू होत नाही. | वस्तुस्थिती |
| ३. | आम्हास दिलेली माहीती व स्पष्टिकरणे यानुसार, कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८९ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत समाविष्ट केलेल्या कंपन्या, फर्म्स किंवा इतर व्यक्ती संस्था यांना मराविम सुत्रधारी कंपनीने कोणतीही प्रतीभूती असलेली किंवा अप्रतीभूती असलेली कर्जे दिलेली नाहीत. त्यामुळे त्या संबधित खंड -३ (iii) (अ) व (ब) कंपनीस लागू नाहीत. | वस्तुस्थिती |
| ४. | या कंपनीने, कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८५ आणि १८६ यात समाविष्ट असल्याप्रमाणे कोणतेही कर्जे किंवा हमी आणि प्रतिभूती दिलेली नाही. तसेच उपकंपन्यातील गुंतवणुकीसाठी कंपनी अधीनियम २०१३ च्या कलम १८५ व १८६ तील तरतुदींच्या पूर्तता या कंपनीने केलेली आहे. | वस्तुस्थिती |
| ५. | आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यानुसार कंपनीने जनतेकडून कोणत्याही ठेवी स्वीकारलेल्या नाहीत. म्हणून भारतीय रिझर्व बँकेचे निर्देश तसेच कंपनी अधिनियम २०१३ ची कलमे ७३ ते ७६ यातील किंवा अन्य कोणत्याही तरतुदी आणि त्या अंतर्गत तयार केलेल्या नियमावली लागू नाहीत. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यानुसार कंपनी कायदे किंवा राष्ट्रीय कंपनी लवाद कायदा किंवा भारतीय रिझर्व बँक किंवा अन्य कोणत्याही न्यायालय किंवा लवाद मंडळ यांनी यासंबधी कोणतेही आदेश या कंपनीवर बजावलेला नाही. | वस्तुस्थिती |
| ६. | ही कंपनी उत्पादन, प्रक्रिया, निर्मिती आणि / किंवा तात्सम कार्ये यामध्ये गुंतलेली नसल्याने कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४८ यातील उपकलम (१) नुसार खर्चाचे अभिलेखन जतन करण्यासाठी शासनाने विहित केलेली नियमावली या कंपनीस लागू नाही. परिणामी संबधीत आदेशाचे खंड ३ (६) लागू होत नाही. | वस्तुस्थिती |
| ७. | (अ) आम्हास दिलेली माहीती व स्पष्टिकरणे तसेच लेखा वह्याचे आमचे परिक्षण या आधारे ही कंपनी ज्याचा वाद नाही अशी सांविधिक देणी योग्य त्या प्रधिकाऱ्याकडे नियमीतपणे जमा करीत आहे. या देण्यांमध्ये पुढील बाबींचा समावेश होतो. भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर, विक्रीकर, सेवाकर, सिमा शुल्क, उत्पादन शुल्क, मूल्यवर्धीत | वस्तुस्थिती |

<table>
<tr><td></td><td>कर, उपकर, लागू होणारी संविधिक देणी.</td><td></td></tr>
<tr><td></td><td>(ब) कंपनीचे अभिलेख आणि आम्हास दिलेली माहीती व स्पष्टिकरणे यानुसार दि. ३१ मार्च २०१७ रोजी कंपनीला देय असलेली वादग्रस्त आयकर, विक्रीकर, सेवाकर, सीमा व उत्पादन शुल्क किंवा मूल्यवर्धीत कर यांची माहीती खालील तक्त्यात दिली आहे :
<table>
<tr><th>अनु क्र</th><th>सांविधिक देण्याचे</th><th>देण्याचे स्वरुप</th><th>रक्कम (रु.) मध्ये</th><th>देण्याचा कालावधी</th><th>वाद प्रलंबित असलेल्या मंचाचे नांव</th></tr>
<tr><td>१</td><td>आयकर कायदा १९६१</td><td>दंड</td><td>८४,७६,५२,८४७</td><td>निर्धारण वर्ष २००७-०८</td><td>आयकर आयुक्त (अपील्स)</td></tr>
<tr><td>२</td><td>आयकर कायदा १९६१</td><td>दंड</td><td>१,०३,४८,१५,२०७</td><td>निर्धारण वर्ष २००९-१०</td><td>आयकर आयुक्त (अपील्स)</td></tr>
<tr><td>३</td><td>आयकर कायदा १९६१</td><td>कर व व्याज</td><td>३,९६,०१,५४०</td><td>निर्धारण वर्ष २०१०-११</td><td>आयकर आयुक्त अपिल लवाद</td></tr>
<tr><td>४</td><td>आयकर कायदा १९६१</td><td>कर व व्याज</td><td>८,२४,९०,९१०</td><td>निर्धारण वर्ष २०११-१२</td><td>आयकर आयुक्त अपिल लवाद</td></tr>
<tr><td>५</td><td>आयकर कायदा १९६१</td><td>कर व व्याज</td><td>७,२५,२५,०२०</td><td>निर्धारण वर्ष २०१२-१३</td><td>आयकर आयुक्त (अपील्स)</td></tr>
<tr><td>६</td><td>आयकर कायदा १९६१</td><td>कर व व्याज</td><td>११,५८,९८,५६०</td><td>निर्धारण वर्ष २०१३-१४</td><td>आयकर आयुक्त (अपील्स)</td></tr>
</table>
</td><td>वस्तुस्थिती</td></tr>
<tr><td>८.</td><td>कंपनीने वित्तीय संस्था किंवा बँकाकडून कोणतीही कर्जे घेतलेली नाहीत. तसेच ऋणपत्रे दिली नाहीत. मात्र, पूर्वीच्या म.रा.वि. मंडळाने काढलेल्या ऋणपत्राच्या बाबत हंगामी हस्तांतरण योजनेनुसार कंपनीला मिळालेल्या दायित्वाची निश्‍चिती कायम करण्यासाठी कंपनीच्या लेखा पुस्तकात नोंद नाही.हंगामी हस्तांतरण योजनेचे अंतिमीकरण दि. ३१ मार्च २०१६ रोजी शासन निर्णय क्र. रिफार्म २०१०/प्र.क्र. ११७/ऊर्जा नुसार झाले. यात काही कसूर असेल तर त्यावर अभिप्राय आम्हास देता येत नाही.</td><td>वस्तुस्थिती</td></tr>
<tr><td>९.</td><td>आमच्या मते व आम्हास दिलेली माहीती व स्पष्टिकरणे यानुसार कंपनीने प्रारंभिक पब्लीक ऑफर व्दारे किंवा त्यानंतरच्या पब्लीक ऑफर व्दारे सार्वजनिकरित्या</td><td>वस्तुस्थिती</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | कोणताही निधी किंवा मुदतीची कर्जे उभारलेली नाहीत. परिणामी यासंबधीचा आदेश यातील खंड ३ (९) कंपनीला लागू नसल्याने अभिप्राय दिलेला नाही. | |
| १०. | लेखापरिक्षणाची सामान्यपणे स्वीकारलेल्या मानंकानुसार आम्ही लेखा वह्याचे परिक्षण केले त्या काळात तसेच आम्हाला दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यानुसार आम्हाला यावर्षी कोणतीही लबाडीची घटना निदर्शनास आली नाही. कंपनीनेही तसे कळविलेले नाही. | वस्तुस्थिती |
| ११. | कंपनी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार, यांची अधिसूचना क्रमांक जी एस आर ४६३ (इ) दि. ५ जून, २०१५ यानुसार कायद्यातील कलम १९७ कंपनीस लागू नाही. त्यामुळे संबंधित आदेशाचे खंड ३ (११) कंपनीस लागू होत नसल्याने त्याविषयी अभिप्राय दिलेला नाही. | |
| १२. | आमच्या मते ही कंपनी 'निधी कंपनी' नाही. म्हणून निधी कंपनीसाठी असलेल्या आदेशातील खंड ३ (१२) यातील तरतुदी कंपनीस लागू होत नसल्याने त्यावर अभिप्राय दिलेला नाही. | वस्तुस्थिती |
| १३. | आम्ही पालन केलेली लेखापरिक्षणाची कार्यपध्दती आणि आम्हास दिलेली माहीती आणि स्पष्टिकरणे यानुसार कंपनी अधिनियम २०१३ यातील संबधित नातलग व्यक्ती व संस्था सोबत व्यवहार विषयीचे कलम १७७ व १८८ यांच्या तरतुदी जर लागू होत असतील तर त्याचे अनुपालन कंपनीने केले आहे. लागू होणाऱ्या भारतीय लेखा मानकांनुसार, नातलग व्यक्ती - संस्था सोबतच्या व्यवहाराविषयी तपशील कंपनीने वित्तीय विवरण पत्रकांमध्ये प्रकट केला आहे. | वस्तुस्थिती |
| १४. | आम्हाला देण्यात आलेल्या माहीती व स्पष्टीकरणानुसार आणि ताळेबंदाच्या आमच्या संपूर्ण परिसणाच्या आधारवर, कंपनीने आढाव्या वर्षामध्ये वाटप किंवा समभागाचे खाजगी वाटप केले आहे. कंपनीने आढाव्या वर्षामध्ये पूर्णत: किंवा अंशता परिवर्तनीय रोख्याचे अधिमान्य वाटप किंवा खाजगी वाटप केलेले नाही. कंपनीने अधिनियमातील कलम ४२च्या अवश्यकतांची पूर्तता केली आहे. आणि ज्या हेतूसाठी निधीच्या केला गेला त्यासाठी त्या रकमेचा वापर गेला आहे. | वस्तुस्थिती<br><br>वस्तुस्थिती |
| | | |

| | | |
|---|---|---|
| १५. | आमच्या लेखापरिक्षणाची कार्यपध्दतीच्या आधारे आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यावरुन कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १९२ यात समाविष्ट केलेले संचालक किंवा यांच्यासोबतच्या व्यक्तीबरोबर कंपनीने कोणतेही विना रोखीचे व्यवहार केलेले नाहीत. | |
| १६. | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यानुसार रिझर्व बँक ऑफ इंडिया कायदा १९३४ चे कलम ४५ - आयए यानुसार कंपनीची नोंदणी करणे आवश्यक नसल्याने संबधित आदेशाचे खंड ३ (१६) कंपनीस लागू नाही. | |

# स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालाचे ‘जोडपत्र क’

## कंपनी अधिनियम २०१३ (कायदा) यातील कलम १४३ चे उपक्रम ३ अंतर्गत खंड (१) नुसार अंतर्गत वित्तीय नियंत्रणे याबाबत अहवाल

| | | |
|---|---|---|
| १. | आम्ही मराविमं सुत्रधारी कंपनी लि. या कंपनीचे दि. ३१ मार्च २०१७ या तारखेला संपलेल्या वर्षाच्या भारतीय लेखा मानकांनुसार लेखापरिक्षण करीत असताना त्या सोबत वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचेही लेखे परिक्षण पार पाडले. | |
| २. | **अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी :**<br>भारतीय सनदी लेखापाल शिक्षण संस्थेने वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणचे लेखापरिक्षण या बाबत एक मार्गदर्शन टिपा वितरीत केली आहे. त्यात अंतर्गत वित्तिय नियंत्रणाचे. घटक नमूद केलेले आहेत. त्याचा विचार करून कंपनीने वित्तीय अहवाल देण्याचे निकष निश्चित केले असतात. त्याच्या आधारे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित करून प्रभावीरित्या त्यांचे संचालन करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असते. या जबाबदारीमध्ये पुढील कार्यांचा समावेश होतो :-<br>अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे संकल्प चित्र तयार करणे, त्याची अंमलबजावणी करून प्रभावीरित्या त्यांचे प्रवर्तन करणे आणि त्यातून कंपनीच्या व्यावसायिक कृती शिस्तबद्ध रितीने व कार्यक्षमरित्या चालविणे आणि त्याचवेळी कंपनीच्या धोरणांना धरून वर्तन करणे, तिच्या मत्तांचे रक्षण करणे, लबाडी व चुका शोधणे व त्याला प्रतिबंध करणे, दस्तऐवज अचूक व परिपूर्ण ठेवणे आणि कंपनी अधिनियम २०१३ च्या आवश्यकतेप्रमाणे विश्वासार्ह वित्तीय माहिती वेळेवर तयार करणे. | वस्तुस्थिती |
| ३. | **लेखा परिक्षकांची जबाबदारी :**<br>कंपनीच्या वित्तीय माहिती देण्यासाठी तिच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधी, आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे, मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. भारतीय सनदी लेखापाल शिक्षण संस्था यांनी अंतर्गत लेखा परिक्षणाची मार्गदर्शक टिपा आणि कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (१०) यात विनिर्देशित केलेली लेखा मानके यांचे दोन्हीचे विवरण केले आहे. ते कंपनीस ज्या मर्यादित लागू होते त्याप्रमाणे परिक्षण केले जाते. आम्ही नैतिक गरजेचे अनुपालन होईल अशा प्रकारे आमच्या लेखा परिक्षणाचे नियोजन करून कार्य पार पाडावे, जेणे करून त्यातून अंतर्गत वित्तीय नियंत्रणे ही वित्तीय माहितीसाठी योग्य व पुरेशी असल्याबद्दल आणि त्यांचे | कंपनीने आर्थिक अहवालावर आधारित अंतर्गत आर्थिक नियंत्रण त्यावर आधारीत निकषावर किंवा चार्टर्ड अकाउटेन्ट ऑफ इंडिया इंस्टीट्यूट द्वारे जारी केलेल्या आर्थिक अहवालाच्या अंतर्गत आर्थिक नियंत्रणाचे लेखा परिक्षण करण्यावर मार्गदर्शक |

| | | |
|---|---|---|
| | कार्य परिणामकारकरित्या चालू असल्याची खात्री मिळेल.<br>खाली 'अस्वीकार बाबतेची मत' या परिच्छेदात वर्णन केलेल्या मजकूराच्या कारणास्तव, आम्ही कंपनीच्या वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे याविषयी लेखापरिक्षणाचे मत देण्यासाठी आधार देतील असे योग्य व पुरेसे लेखापरिक्षणात्मक पुरावे आम्ही मिळवू शकलो नाही. | टिपणी मध्ये केलेल्या नियंत्रणाच्या आवश्यक घटक विचारात घेणे. अंतर्गत आर्थिक नियंत्रण अहवालाचे मुल्यांकण करण्यासाठी आणि त्याची पूरेशी माहीती तपासण्यासाठी चार्टर्ड अकाउटंन्ट फर्मची नियुक्ती केली. या प्रकरणाचा अहवान आम्हाला सादर केला. त्याचे ६ सप्टेंबर,२०१७ रोजी झालेल्या अंतर्गत लेखा परिक्षण समितीच्या बैठकीत त्यावर चर्चा करण्यात आली. |
| ४. | **वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यांचा अर्थ -**<br>कंपनीचे वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गतज वित्तीय नियंत्रणे या प्रक्रियेची रचना वित्तीय विश्वासार्हतेचे प्रमाणबद्ध - हमी मिळविण्यासाठी आहे. तसेच सर्वसाधारणपणे स्वीकारलेली लेखा तत्वे यांना सुसंगत अशी आणि बाह्य हेतूसाठी वित्तीय विवरणपत्रे तयार करणे हे सुद्धा यात अंतर्भूत आहे. कोणत्याही कंपनीचे वित्तीय माहिती देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यामध्ये पुढील बाबी समाविष्ट असतात. १) अभिलेख योग्य तपशीलासह जतन करणे व त्यातून कंपनीच्या मत्तांचे व्यवहार, विल्हेवाट इ. चे अचूक व रास्त दर्शन घडविणे. २) सर्वसाधारण स्वीकारलेल्या लेखा तत्वानुसार वित्तीय विवरणे तयार करण्यासाठी मान्यता देण्यासाठी आवश्यक असतील अशा प्रकारे व्यवहाराची नोंदणी करण्यात येते आणि कंपनीच्या प्राप्ती व खर्च हे व्यवस्थापनाने व संचालकांची प्राधिकृत केल्याप्रमाणेच होत आहेत याची हमी देणे आणि ३) वित्तीय विवरणपत्रात प्रत्यक्ष बाधक ठरू शकतील असे कंपनीच्या मत्तेच्या संबंधीच्या कृती - म्हणजे संपादन वापर किंवा विल्हेवाट इत्यादींना प्रतिबंध केला जातो किंवा ते वेळीच शोधता येतात याबद्दल योग्य हमी देणे. | वस्तुस्थिती |
| ५. | **मत्तांचा अस्वीकार :**<br>आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने भारतीय लेखापाल संस्थेने वित्तीय माहिती देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे याविषयाच्या | कंपनीने आर्थिक अहवालावर आधारित अंतर्गत आर्थिक नियंत्रण त्यावर आधारीत निकषावर किंवा |

| | | |
|---|---|---|
| | मार्गदर्शक टिपणीस नमूद केलेल्या निकषाचे किंवा आवश्यक घटकांच्यानुसार अंतर्गत वित्तीय नियंत्रणे अद्याप स्थापित केलेली नाही.<br><br>या कारणास्तव कंपनीमध्ये वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे आहेत किंवा कसे? आणि अशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे दि. ३१ मार्च २०१७ रोजी प्रभावीरित्या कार्यरत होती किंवा कसे? या विषयावर माझे / आमचे मत व्यक्त करण्यासाठी पुरेसे योग्य लेखा परिक्षणात्मक पुरावे आम्हास मिळवता आले नाहीत.<br><br>आम्ही दिलेले अस्वीकार विधान आम्ही विचारात घेऊन लेखापरिक्षणाचे स्वरूप, वेळ आणि मर्यादा निश्चित केल्या. आमच्या लेखा परिक्षणात्मक कसोट्या लागू करून कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्राचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे आणि हे अस्वीकार विधान कंपनीच्या एकच वित्तीय विवरणपत्रावरील आमच्या मतांना बांधक होत नाही. | चार्टर्ड अकाउटेन्ट ऑफ इंडिया इंस्टीट्यूट द्वारे जारी केलेल्या आर्थिक अहवालाच्या अंतर्गत आर्थिक नियंत्रणाचे लेखा परिक्षण करण्यावर मार्गदर्शक टिपणी मध्ये केलेल्या नियंत्रणाच्या आवश्यक घटक विचारात घेणे. अंतर्गत आर्थिक नियंत्रण अहवालाचे मुल्यांकण करण्यासाठी आणि त्याची पूरेशी माहीती तपासण्यासाठी चार्टर्ड अकाउटंन्ट फर्मची नियुक्ती केली. या प्रकरणाचा अहवान आम्हाला सादर केला. त्याचे ६ सप्टेंबर,२०१७ रोजी झालेल्या अंतर्गत लेखा परिक्षण समितीच्या बैठकीत त्यावर चर्चा करण्यात आली. |

# जोडपत्र ब - अहवालातील परिच्छेह ८.२ यांत संदर्भ दिल्याप्रमाणे, कंपनी अधिनियमाचे कलम १४३ यातील उपक्रम (५) नुसार आमच्या नियंत्रक आणि भारतातील महालेखापरिक्षकाने दिशानिर्देश केलेल्या निर्देशांवर आमचा अहवाल

कायदयाच्या कलम १४३ च्या उपकलम ५ नुसार भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षकाने दिलेले निर्देश आणि कंपनीच्या पुस्तके आणि नोंदी अशा तपासणीच्या आधारावर आपण योग्य मानले आणि त्यानुसार आम्हाला दिलेली माहिती आणि स्पष्टीकरण, आम्ही दिलेल्या निर्देशांमध्ये नमुद केलेल्या गोष्टींवर एक निवेदन देतो.

**कंपनी अधिनियमाचे कलम १४३ यांतील उपक्रम (५) नुसार निर्देश**

| लेखापरिक्षकांचे अभिप्राय | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | निर्देश | उत्तरे | |
| १ | पूर्ण मालकीच्या व भाडेपट्टीच्या जमिनीच्या नावाच विलेखे / करार कंपनीकडे आहेत किंवा कसे ? असा विलेख भाडेपट्टी करार नावांवर नसल्यास अनुक्रमे मालकीच्या व भाडेपट्टीच्या जमिनीचे क्षेत्रफळ नमूद करावे. | आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यानुसार कंपनीच्या अचल संपत्तीचे नामकरणाचे विलेख अद्याप कंपनीकडे नाहीत. कारण अशा मत्ता हंगामी हस्तांतरण योजनेद्वारे कंपनीकडे हस्तांतरीत झाल्या होत्या. या योजनेचे अंतिमीकरण, शासन निर्णय क्र. रिफार्म / २०१०/ प्र. क्र.११७/उर्जा नुसार दि.३१ मार्च २०१६ रोजी झाले. ज्या मालकीच्या व भाडेपट्टी वरील जमिनीच्या क्षेत्रफळाचा तपशील उपलब्ध नाही. त्याचा तपशील सोबतच्या जोडपात्र १ मध्ये (खाली) दिलेला आहे. | वस्तुस्थिती |
| २ | कर्जे / ऋणे / व्याज इ. सोडून देण्याची / निर्लेखित करण्याची काही प्रकरणे आहेत. किंवा कसे ? असल्यास त्यांची कारणे व त्यांच्या रकमा यांची माहिती द्यावी. | आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहीती व स्पष्टकरणे यानुसास कर्जे / ऋण / उसनवारी / व्याज र. सोडणे / निर्लेखित करणे या विषयीची अन्य कोणतीही प्रकरणे नाहीत. | वस्तुस्थिती |
| ३ | तिसऱ्या पक्षाकडे असलेल्या वस्तू सूची / माल यांचे योग्य अभिलेख जतन केले आहेत काय किंवा कसे ? तसेच शासन किंवा अन्य प्राधिकारी संस्थाकडून मत्ता भेट / अनुदानाच्या स्वरुपात मिळाल्या त्याचे अभिलेख आहेत का? | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यानुसार तिसऱ्या पक्षांकडे कोणताही वस्तूमाल ठेवलेला नाही. तसेच शासन किंवा अन्य प्राधिकाऱ्याकडून कोणतीही मत्ता, भेटी / अनुदानाच्या स्वरुपात मिळालेल्या नाहीत. | वस्तुस्थिती |

## जोडपत्र - १ (जोडपत्र 'ब' च्या परिच्छेद क्र. १ यानुसार)

**(रक्कम रु. मध्ये)**

| मत्तेचे वर्णन | प्रकरणांचा सरता | क्षेत्रफळ एकरमध्ये | ३१/०३/१७ रोजीचा ठोक गट (रु) | ३१/०३/१७ रोजीचा निव्वळ गट (रु) | शेरा | |
|---|---|---|---|---|---|---|
| जमीन भाडेपट्टीची | २ | ७.१० | २,०४,५९,३४,४६८ | १,७१,२२,६२,७७६ | विलेख हस्तांतरित करण्यासाठी कंपनीने कायदेशीर सोपस्कार पूर्ण करण्यासाठी योग्य कृती सुरू केली आहे. | वस्तुस्थिती |
| जमीन मालकीची | ४ | १.८९ | ७०,८८,८०,००० | ७०,८८,८०,००० | | |
| इमारत व रचना | १३ | उपलब्ध नाही | ११,८,०५,२९९,९०४ | ८,७६,९१,६१,६४६ | | |
| | | | | | | |

## जोडपत्र 'ब' विभागांसाठी निश्चित 'उप' निदेश

| लेखापरिक्षकांचे अभिप्राय | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **निर्देश** | **उत्तरे** | |
| १ | मिळालेल्या व्यापारी येण्यातील शिल्लकी, देय रकमा, मुदतीच्या ठेवी, बँकखाती व रोखप्राप्ती या कायम केल्याबद्दल अभिप्राय द्यावेत. | खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे | वस्तुस्थिती |
| २ | केंद्र / राज्य शासन यांच्याकडून तसेच काही विशिष्ट कामासाठी इतर संस्थाकडून मिळालेली अनुदाने /अर्थसहाय्य यांच्या विचलनाच्या प्रकरणांची माहिती द्यावी. | चालु वर्षी कंपनीला केंद्र / राज्य शासन यांच्याकडुन तसेच काही विशिष्ठ कामासाठी इतर संस्थांकडुन कोणतेही अनुदान मिळालेले नाही. मात्र मागील काही वर्षाकरिता रु. ५७,४६,१७० (व्याजासह) अद्याप देय आहेत. आम्हास दिलेल्या माहितीनुसार याचा दावा करणारे सापडत नसल्याने त्या रक्कम अद्याप देय आहेत. | वस्तुस्थिती |

### अनुक्रमांक १ मध्ये उल्लेख केलेल्या माहितीचा तक्ता

| अ.क्र. | तपशील | मिळालेली निश्चित (% टक्केवारी मध्ये) | |
|---|---|---|---|
| १. | व्यापारी येणी | ०.००% | वस्तुस्थिती |
| २. | व्यापारी देणी (आंतर कार्यालयीन देण्याव्यतिरिक्त) | ०.००% | |
| ३. | व्यापारी देणी (आंतर कार्यालयीन देणी) | ०.००% | |
| ४. | मुदतीच्या ठेवी | १००% | |
| ५. | बँक खाती (चालू खाती) | १००% | |
| | | | |

**परिशिष्ट- १ अ**

## लेखापरिक्षकांनी दि. १.४.२०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत एकत्रित वित्तीय अहवालावर दिलेल्या अभिप्रायावर माराविमं सुत्रधारी कं.लि.ची उत्तरे

| अ.क्र. | लेखापरिक्षकांचा अभिप्राय | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|---|
| अ. | **पात्र मतांचा आधार**<br>**सूत्रधारी कंपनीच्या प्रकरणी (भराविमं सूत्रधारी)**<br>आम्हाला आमच्या लेखा परिक्षणासाठी खाळील नावींची आवश्यक माहिती आणि स्पष्टीकरणे मिळू शकत नाही.<br>शासन निर्णय क्र.रिफॉर्म २०१०/प्र.क्र.११७/ ऊर्जा रु. १४४५.३४ कोटी यानुसार ३१ मार्च २०१६ रोजी अंतिमीकरण झालेल्या आणि हंगामी हस्तांतरण रोजनेनुसार हस्तांतरीत झालेल्या काही मूर्त मत्तांची मालकी निश्चित करणे. (आमची टीप-२ पहावी.) | पूर्वीच्या म.रा.वि.मंडळाची जमिनी व इमारती यांची मालकी म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.लि.च्या नावे करणे व हस्तांतरित करणे ही प्रक्रिया चालू आहे. संबंधित प्राधिकाऱ्यांना हस्तांतरण करण्याविषयी पत्रे दिली आहेत. |
| ब | कंपनीने भाग अर्ज निधीची रक्कम रु. ६९३.७९ कोटी ठेवून घेतली ही बाब कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ४२ याचे उल्लंघन करणारी आहे. (आमची टीप क्र. १९ पहावी.) | उपकंपन्यांनी मराविमं सुत्रधारी कंपनीला समभाग विहित कालमर्यादेत दिले नसल्याने हे उल्लंघन झाले होते. आता सर्व उप कंपन्यांना आदेश देण्यात आले आहेत की, त्यांनी शेअर्स विहित कालमर्यादेत द्यावेत त्यानंतर मराविमं सुत्रधारी कं.लि. शेअर्स महाराष्ट्र शासनाला विहित कालमर्यादेत देईल. |
| क | कंपनीच्या लेखा वहीत उपकंपन्या म्हणजे महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण यांच्या शिलकी रकमा असून त्यांचा मेळ व विचार विमर्श चालू आहे. (टीप क्र. ४३ पहावी) त्याचे परिणाम वित्तीय स्थितीवर आणि काही प्रकटनांवर होऊ शकतात. वरील परिच्छेद (अ) ते (क) यांचे तोटा, राखीव आणि प्रतिभाग मिळकत यावर परिणाम संख्यात्मक नाहीत तसेच ते संख्येत सांगता येणार नाहीत व त्याचे प्रकटन करता येणार नाही. | सुत्रधारी कंपनी आणि उपकंपन्या यांच्यामध्ये आंतर कंपनीच्या शिलकीच्या थकिताविषयी मतभिन्नता असल्याने त्या आंतर कंपनी शिलकी थकित राहिल्या आहेत. उप कंपन्यांकडे काही मत्ता/राखीव/ दायित्वे इ.स्थानांतरित केली आहेत, पण त्यांनी ते स्वीकारण्याचे काम होणे आहे. या कारणामुळे आंतर कंपनी शिलकीमध्ये काही मतभेद उद्भवले आहेत ते वित्तीय वर्ष २०१७-१८ मध्ये सोडवण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| १ | **महापारेषणच्या संबंधी :-**<br>दि. ३१/३/२०१७ रोजी एकूण संचित विलंब भरणा आकर रु. ११४९१० लाख होते. या संचित डीपीसी साठी या कंपनीने रु. ८५४९९.०० लाख (३ विवरण, परवानाधारक संस्थांकडील) याचा लेखा चालू वर्षी 'इतर उत्पन्न' यामध्ये केला. कंपनीने यासाठी म.वि.मि. आयोग यांचे प्रकरण ३१ वर्ष २०१६ चा संदर्भ घेतला. त्यामध्ये आयोगाने कंपनीचे दि. २०१५-१६ चे वार्षिक महसूल आवश्यकता वरील रक्कम ८५४९९.०० लाखाने कमी केली आहे व त्याचे वर्गीकरण 'दराव्यतिरिक्त उत्पन्न' यात केले. आयोगाच्या संदर्भाच्या आधारे असे डीपीसी रु. ८५४९९.०० लाख यांचा लेखा उपार्जन तत्वावर केला आहे . व त्यास निश्चित व खात्रीचे उत्पन्न मानले आहे. त्याची वसूली असंशयास्पद मानली. या डीपीसी रु. ८५४९९.०० लाखांचा लेखा 'इतर उत्पन्न' असा करणे हे कंपनीच्या लेखा धोरणांचे उल्लंघन करणारे आहे. टीप क्र.१ जी-९ या महत्वाच्या धोरणावरील टिपेत म्हटले आहे की, 'जेव्हा उत्पन्नांची वसुली निश्चित नसेल असे उत्पन्न वगळता अन्य उत्पन्नास मान्यता देण्यात येईल.' कंपनीने वित्तिय. वर्ष २०१५-१६ च्या लेखांच्या टिपांमध्ये म्हटले आहे की, ''विलंब भरणा आकार संपूर्णतः वसूल अशक्यप्राय आहे. म्हणून वित्तिय. वर्ष २०१५-१६ साठी डीपीसीची रु. ८३४९५ लाख यांची नोंद केली नाही.'' यावरुन स्पष्ट दिसते की, डीपीसीचा उत्पन्न म्हणून लेखा करणे वसुली तत्वानुसारच केला जाऊ शकतो. (चालू वर्षी अशा डीपीसीचा केलेला लेखा 'भारतीय लेखा मानक - १८ महसूल यानुसार सुसंगत नाही. भारतीय लेखा मानक -१८ मधील परिच्छेद -९, १४ (सी) व (डी), १८,२०, २२, २३ आणि २६ यानुसार महसूलाच्या मान्यतेसाठी पुढील बाबी आवश्यक आहेत.: जेव्हा एखाद्या व्यवहाराचे आर्थिक लाभ अस्तित्वातील संस्थेला मिळतात. तेव्हाच फक्त महसुलाला मान्यता देता येते. भारतीय लेखा मानक १८ चा सारांश आहे की, जेव्हा वसुली निश्चित होणार असेल तरच महसूल मान्य करता येईल. | महापारेषण मागील वर्षामध्ये थकबाकी असलेल्या डीपीसीची नोंद इतर उत्पन्नामध्ये घेत नाही कारण महापारेषण इतर उत्पन्न उपार्जित आधारावर नोंद घेते. शिवाय जेव्हा अशा इतर उत्पन्नाचे प्रत्यक्ष जमा होणे अनिश्चित आहे. तथापि महाराष्ट्र विज नियामक आयोगाने २०१६ चे प्रकरण ३१ मध्ये आदेशाद्वारे महापारेषणला वार्षिक दर परताव्याला मंजुरी दिली, वित्तीय वर्ष २०१५-१६ साठी डीपीसी हे विज विक्रीतून नसलेले उत्पन्न असे विचारात घेऊन रु. ८५४.९९ कोटीने कमी केले. त्यामुळे महापारेषणचे वित्तीय वर्ष २०१६-१७ साठी वार्षिक परताव्याचा दर अतिशय कमी झाला आहे. वित्तीय वर्ष २०१६-१७ मध्ये महापारेषणचे पारेषण शुल्कामधून मिळणारे महसूल फक्त रु. १९७९.४९ कोटी होता. (पहिल्या ३ महिन्यांसाठी २२३.६६ कोटी रुपये आणि पुढील ९ महिन्यांसाठी १४५.३९ कोटी रुपये) जे वित्तीय वर्ष २०१५-१६ मध्ये ३१५९.२६ कोटी रुपये होता. (पहिल्या दोन महिन्यांसाठी ४६१.३३ कोटी रुपये आणि पुढील १० महिन्यांसाठी २२३.६६ कोटी रुपये) महाराष्ट्र विज नियामक आयोगाने घेतलेल्या वरील निर्णयामुळे महापारेषणेसुद्धा वित्तीय वर्ष २०१६-१७ मध्ये रु. ८५४.९९ कोटीच्या विलंब देयक शुल्काची लेखा पुस्तकात नोंद घेतली. |

| | | |
|---|---|---|
| | जेव्हा रास्त निश्चितीने अंतिमत: जमा होण्याच्या शक्यतेचे नसेल, तर अशी मागणी करताना, महसुलाची मान्यता अनिश्चितीच्या मर्यादेपर्यंत पुढे ढकलावी.<br>कंपनीने आता डीपीसीचे उत्पन्न म्हणून उपार्जन तत्वावर नोंद केली आहे. त्यासाठी संबंधित घटक/वितरणाचे परवानाधारक यांचेकडून वसूली होण्याची खातरजमा/ आश्वासन यांचेशिवाय केलेली आहे. म्हणून ते चालू वर्षाच्या लेख्यात अनिश्चित उत्पन्न अशा आहे. यामुळे खालील परिणाम झालेले आहेत.<br>वित्तिय वर्ष २०१६-१७ च्या महसूलात रु. ८५,४९९ लाखांचे जादा विवरण<br>करपूर्व निव्वळ तोटा रु. ७६,६६३.९७ लाख याचे (या डी.पी.सी. उत्पन्नाचा लेखा करण्यापूर्वी हिशेब करणे) रु. ८८३५.०३ लाख एवढा कर पूर्व नफा यामध्ये रुपांतर करणे. (डीपीसी उत्पन्नाचा लेखा करणे)<br>ज्याची वसुली नक्की नाही अशा रु. ८५४९९.०० लाख या रकमेने वित्तीय वर्ष २०१६-१७ च्या ऋणकोंना मान्यता देणे. | |
| २ | **लेखाशीर्षातील शिलकी :**<br>१) किरकोळ ऋणको - (जी एल कोड २६००४०, २६००६०)<br>२) किरकोळ धनको - (संलग्नपणे भेडा प्रकल्प खाजगी विकासकांना देण्यासाठी देय रकमा यात संलग्न आहेत.) (जीएल १३१०१०, १३२०१०, १३३०१०, १३४०१०, १३१०३०)<br>३) निकामी मालसाठा (भंगार समाविष्ठ) (जीएल कोड २५६०१०)<br>४) चौकशी प्रलंबित असल्याने मालाची हानी (जीएल कोड २५५०२०)<br>५) बांधकाम चालू असलेल्या मत्ता (जीएल कोड २३००४०- ७०, २३००९०, २३२०१०, २३७०१०, २३७०२०, ७३७०३०) | बँकेच्या कर्जाच्या शिलकीची संबंधित बँकांद्वारे पुष्टी करण्यात आली आहे, मराविमं सुत्रधारी कंपनी व तिच्या उप कंपन्यांच्या शिलकीचा ताळमेळ घातला आहे. संबंधी किरकोळ धनको आणि ऋणको यांच्या शिलकी कायम करण्याचे काम चालू आहे. |

| | | |
|---|---|---|
| | ६) कंत्राटदार/पुरवठादारांना अग्रिमे (जीएल कोड २९००१०)<br>७) प्रकल्पांकरता भांडवली अग्रिमे (जीएल कोड २९००२०)<br>८) संकीर्ण कर्जे व अग्रिमे (जीएल कोड २९३०५०)<br>९) विक्रेत्यांकडून वसूली योग्य खर्च (जीएल कोड २९६०५०, २९६०६०)<br>१०) भांडवली कामांसाठी तरतुदी (जीएल कोड १५००१०)<br>११) जॉब कामाची सुरक्षा अनामत (१२३०४०)<br>१२) मराविमं सुत्रधारी व सहकारी उप कंपन्या<br>१३) इतर अनामती (जीएल कोड २९७०२०)<br>१४) ओआरसी अनामती (यात भेडा प्रकल्पांसाठी खाजगी विकासकांना देण्यासाठी मिळालेल्या रकमा समाविष्ट) (जीएल कोड १२३१००)<br>लेखाशिर्षातील शिलकी खात्री होणे व मेळ केल्यानंतर समायोजने करणे यांच्या अधीन आहेत. जुन्या थकीत रकमांचा समायोजने, मेळ आणि समझोते आणि थकबाकीची वसूली न होणे किंवा अपुरी होणे यांच्या परिणामांचा अंदाज करता येत नाही. | |
| १ | **महावितरणच्या प्रकरणी :**<br>आम्ही खाली वर्णन केल्ल्एा बाबींवर लक्ष वेधू इच्छितो. काही व्यक्तिगत किंवा एकत्रितपणे झालेल्या गैर विवरणे, तसेच काही प्रकरणात पुरेसे योग्य लेखा परिक्षणाचे पुरावे मिळविणे आम्हास शक्य झालेले नसल्याने भा.ले.मा. वित्तीय विवरणपत्रकावर झालेले/होऊ शकणारे परिणाम परिणाम खाली दिले आहेत. ते प्रत्यक्ष असले तरी सर्वव्यापी नाहीत.<br><br>**१. मालमत्ता, कारखाने व साधने :**<br>अ) वित्तीय विवरणपत्राची टीप क्र. ४४.४ यात नमूद केल्याप्रमाणे कामे पूर्ण केल्याचे योग्य व पूर्ण अहवाल उपलब्ध नसल्याने मालमत्ता, कारखाने व साधने यांचे भांडवलीकरण झालेले नसणे/अपूर्ण असणे अशी काही प्रकरणे निदर्शनास | भांडवलीकरण वेळेवर करावे असे आदेश क्षेत्रिय कार्यालयाला दिले आहेत आणि भांडवलीकरण प्रगतीवर मुख्य कार्यालयाच्या स्तरावर सॅपच्या अहवालामार्फत लक्ष ठेवले जाते. |

| | | |
|---|---|---|
| | आली. भांडवलीकरणाच्या विलंबामुळे त्या विलंब काळातील घसाऱ्यावर परिणाम झाला. | |
| ब | महावितरण ''महत्वाची लेखा धोरणे'' या विषयाची टीप क्र.१(ज) (४) पहावी. या कंपनीने वर्षभरातील कर्मचारी खर्च, कार्यालय व प्रशासन खर्च रक्कम रु. ४१,१३१.६८ लाख यांचे भांडवलीकरण हंगामी तत्वावर प्रगतीपथावरील भांडवली कामे याच्या १५ टक्के दराने भर करुन केले आहे. परंतु 'प्रगतीपथावरील भांडवली कामे यांचे किंवा स्थिर मत्ता संपादण्याचे असे खर्च निश्चितपणे ओळखणे किंवा त्यात भर घालणे याची पद्धती या कंपनीमध्ये नाही. म्हणून ही कृती ''भारतीय लेखा मानक क्र. १६ - मालमत्ता - कारखाने व साधने याच्याशी सुसंगत नाही. लेखा परिक्षणाचे सुयोग्य व पुरेसे पुरावे आम्हला नसल्याने त्याच्या अचूकतेबद्दल मत व्यक्त करता येत नाही. | महावितरण कंपनीकडे भांडवलीकरण आणि संचलन वस्तूव्यवस्थेची कामे यासाठी वेगळ्या कार्यशाखा नाहीत. ही दोन्ही कामे क्षेत्रिय स्तरावर आणि मुख्य कार्यालयात ही कामे संबंधी कार्य विभाग/कर्मचारी यांच्याकडून करण्यात येतात. त्यामुळे भांडवली कामासाठी लागणारा प्रशासकीय खर्च वेगळा निश्चित करणे सहजपणे शक्य होत नाही. म्हणून १५ टक्के दराने भांडवलीकरण करावे असे लेखा धोरण महावितरणने सातत्याने यापूर्वी आणि वित्तीय वर्ष २०१६-१७ मध्ये अनुसरले आहे. |
| क | महावितरणच्या संबंधी 'महत्वाची लेखा धोरणे' यातील टीप क्र. १(ज) (४) पहावी. प्रगतीपथावरील भांडवल कामे यात भर घालण्याची उसनवारी खर्चाची रक्कम रु. २५१५.३९ लाख ही ११.४२ दराने दिली आहे. (भागील वर्षच्या वेटेड सरासरी व्याज दराने दिशेष केला आहे.) हिशेब केला आहे.) मात्र त्यासाठी पात्र मत्ता किंवा व्यत्यय आलेले प्रकल्प निश्चित केलेले नाहीत ही बाबत 'भारतीय लेखा मानके २३ उसनवारी खर्च' याला अनुसरुन नाही. याशिवाय प्रगतीपथावरील भांडवली कामांचा पुढे नेलेल्या शिलकीवरील आवश्यक व्याजाचे भांडवलीकरण केलेले नाही. ही पात्र होणारी मत्ता आहे. पुरेशा व योग्य पडताळणी अभावी जर काही तिचा वित्तीय विवरणपत्रांवर होऊ शकणारे परिणाम असल्यास त्याचा अंदाज करता येत नाही. | यासंदर्भात लेखा धोरणे मुद्दा क्र. १० (ब) टिपणी २ मध्ये महत्वपूर्ण लेखा विषय धोरणे यामध्ये नमूद केले आहे.<br>कर्जावर लागू सरासरी व्याज दराच्या आधारावर बांधकाम काळातील व्याज पात्र मालमत्ता अधिग्रहीत करण्यासाठी भांडवली खर्च म्हणून प्रगती पथावरील काम यामध्ये दर्शविले जाते.<br>कंपनी सातत्याने व्याजाचे खर्च भांडवली खर्च या धोरणाचे अनुसरण करीत आहे. |
| ड) | व्यवस्थापनाने यावर्षी मूर्त मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. प्रत्यक्ष पडताळणीचा जर काही वित्तीय विवरणपत्रांवर परिणाम होणार असल्यास त्याचे अंदाज करता येत नाही. | वित्तीय वर्ष २०१७-१८ मध्ये कंपनीने स्थीर मत्तेच्या भौतिक तपासणीसाठी धोरण तयार केले आहे. त्याचा अवलंब केला जाईल. |

<table>
<tr>
<td>२.<br><br>अ)</td>
<td>भारतीय लेखा मानके यानुसार वित्तीय विवरणपत्रे सादर करणे.<br>अ) एकत्रित वित्तिय विवरणपत्रांवरील टिपा क्र. ४४(६) (बी) (i) यात नमूद केल्याप्रमाणे भारतीय लेखा मानक १०९, व्यापारी येणी अंतर्गत अपेक्षित पत हानी यासाठी तरतूद केलेली नाही. त्याचा हिशेबासाठी कंपनीने ग्राहकांकडून मिळालेली अनामती रकमा वजा करुन व्यापारी येणी विचारात घेतली. ह्या अनामती लागू होणाऱ्या व्यापारी येण्यांच्या ऐवजी त्यांच्या गटातील व याच्या प्रमाणातील मूल्याच्या प्रमाणात वितरित केल्या आहेत. त्यामुळे काही श्रेणीतील ग्राहकांकरिता दिलेली अनामत रक्कम थकीत शिलकीपेक्षा जास्त असल्याने त्या श्रेणींना इसीएलची तरतूद केलेली नाही. वरील कारणाच्या कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रावर होणारे संभाव्य परिणामावर आम्ही पत देऊ शकत नाही. शिवाय इसीएलच्या हिशेबासाठी कंपनीने व्यापारी येणी व सुरक्षा यांच्या आय.टी. डेटाबेस मधील थकीत रकमा विचारात घेतल्या; लेखा वह्यातल्या घेतल्या नाहीत. या दोन्हीकडील शिलकीत खालीलप्रमाणे फरक आहे.<br><br>
<table>
<tr><th>तपशील</th><th>३१/३/१७ रोजीची शिल्लक लेखा वह्यांमधील (अ)</th><th>३१/३/२०१७ रोजीची शिल्लक आयटी डेटा बेसप्रमाणे (ब)</th><th>फरक (अ-ब)</th></tr>
<tr><td>व्यापारी येणी</td><td>३२,७६,८४७</td><td>३६,१६,०८९</td><td>(३३९२२४२)</td></tr>
<tr><td>सुरक्षा रक्कम</td><td>६,४४,५०९</td><td>६,४२,८८९</td><td>१,६१८</td></tr>
</table>
<br>याविषयी लेखा परिक्षणात्मक योग्य व पुरेसे पुराव्यांच्या अभावी आम्हास मत व्यक्त करता येत नाही.</td>
<td>इसीएल गणना करताना, व्यापाराचे प्राप्य व्यवहाराविरुद्ध समानतेचे वाटप करण्याऐवजी संबंधी वय श्रेणीतील मूल्याच्या प्रणालीतील व्यापार प्राप्तीच्या तुलनेत सुरक्षा ठेवीची तरतूद करण्यात आली आहे. जसे की, इसीएल ग्राहकांच्या काही श्रेणीमध्ये त्या वयोगटातील थकबाकीपेक्षा जादा सुरक्षा ठेवी प्रदान केली गेली नाही. तथापि रु. ३२७६८ कोटीच्या एकूण व्यापारी श्रेणीचा विचार करुन ३१ मार्च २०१७ पर्यंत व्यापारी येणीवर इसीएल भत्ता ७६०३७.६२ लाख आहे. जे एकूण प्राप्तीसाठी सुमारे २३ टक्के आहे. अशा व्यापारी येणीवर इसीएल पुरेसा आहे.</td>
</tr>
<tr>
<td>ब)</td>
<td>टीप क्र. ७ चालू नसलेल्या वित्तीय मत्ता - याकडे लक्ष वेधण्यात येते. भारतीय लेखा मानक १०९ प्रमाणे, संबंधित व्यक्तींना दिलेले बिनव्याजी कर्ज रु. ७१,३४७.१० लाख हे त्याच्या विद्यमान मूल्याने पुढे नेले पाहिजे. परंतु कंपनीने अशी कर्ज खर्चाप्रमाणे पुढे नेली. ही कृती भा.ले.मानकांच्या आवश्यकतेनुसार नाही. योग्य माहितीच्या अभावी त्यांचे वि.</td>
<td>सदर रक्कम पैशाचा वेळ मूल्याचा विचार करुन कमी करण्यात आली आहे.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | विवरणपत्रावरील संभाव्य परिणामांवर मत व्यक्त करण्यास आम्ही असमर्थ आहोत. | |
| ३ | **घसारा:** आमच्या निदर्शनास आलेली काही प्रकरणी मत्ता, कारखाने व साधने यांचा घसारा योग्य प्रमाणे मोजलेला नाही. कारण विविध मत्ता वापरात घेण्याच्या तारखेबाबत विसंगत/ फरक आहे. लेखापरिक्षणासाठी योग्य पाठपुरावा नसल्याने त्याचा घसाऱ्यावरील परिणाम व नंतर वित्तीय विवरणपत्रांवर होणाऱ्या परिणामांचे सांख्यीकरण करण्यास आम्ही असमर्थ आहोत. | सॅप इआरपी प्रणालीद्वारे स्थीर मत्तेवर घसारा आकारला जातो. त्यामुळे चुकीची गणना करण्याची शक्यता कमी करण्यात आली आहे. काम पूर्ण झालेल्या अहवालाच्या तारखेला मत्तेचे भांडवलीकरणाची तारीख समजण्यासाठी अशी सूचना जारी करण्यात आली आहे. तसेच मत्ता अधिकृत तारखेच्या आधी जर मत्ता वापरात आणली तर अशावेळी फरकाच्या कालावधीचा घसारा स्वहस्ते प्रदान केली जाते. |
| ४ | **व्यापारी येणी:** अ) टीप क्र. १ सी (फ) महत्वाची लेखा धोरणे पहावी. यात म्हटले आहे की, कंपनीने व्यापारी येण्याचे आणि इतर मत्तांचे ई.सी.एल. यांना वेळेवरची पतहानी ही तरतुदीच्या मेट्रीक्सच्या आधारे काढण्यात आली आहे. मात्र तरतुदीचा मेट्रिक्स तयार करताना कंपनीने ग्राहकांच्या वर्तनाचे भविष्यकालीन स्वरुप या विषयी कोणताही अंदाज बांधणारी माहिती ठरविलेली नाही. तरतुदीचा मेट्रिक्स तयार करताना ग्राहकांच्या वर्तनाचा विचार केलेला नसणे आणि शास्त्रीय पद्धतीचा वापर नसणे यामुळे अपेक्षित पत हानीसाठी केलेल्या तरतुदी पुरेशा आहेत. किंवा कसे यावर आम्हाला मत देण्यात येत नाही. | भारतीय लेखा मानांक - १०९च्या गरजा लक्षात घेऊन कंपनीने अपेक्षित क्रेडिट नुकसानी भत्ताचा पुरेपूर अंदाज लावला आहे. जरी प्रगतीच्या दृष्टीने माहिती अद्याप विकसीत झाली नाही आणि ग्राहकांच्या वर्तणुकीची पद्धत पूर्णत: उपलब्ध नाही, भारतीय लेखा मानके १०९ च्या आवश्यकतेनुसार अपेक्षित क्रेडीट नुकसान गणना करण्याच्या घटकांचा विवेकपूर्ण आणि वाजवी अंदाज तयार करण्याची गरज आहे. अपेक्षित क्रेडीट नुकसानीचे अनुमान जटील आणि स्वाभाविकपणे निर्णय घेण्यासारखे आहेत. भारतीय लेखा मानके १०९ ची तत्वेदेखील आवश्यक असलेल्या डेटाची विस्तृत माहिती विचारात घेण्यासाठी अपेक्षित क्रेडीट नुकसानीच्या आकलनाची आवश्यकता आहे, जे कदाचित सूक्ष्म आणि सूक्ष्म आर्थिक घटकांचे अग्रेसर अंदाज आणि त्या अंदाज आणि रकमेच्या दरम्यान संबंधाच्या व्यवस्थापनाची गृहीत धरुन आणि तात्काळ उपलब्ध नसेल. ग्राहकांकडून वसूल होण्याची वेळ आणखी असे की जेव्हा महावितरणचे २.५० कोटी ग्राहक प्रोफाईल खूप |

| | | |
|---|---|---|
| | | भिन्न व पसरले आहे. तसेच कंपनीला शासकीय निर्देशाचे पालन करणे आवश्यक आहे. तसेच काही सामाजिक जबाबदारी आहेत. ज्याद्वारे अपेक्षित क्रेडीट नुकसानीची अपेक्षा प्रभावित होते. त्यानुसार व्यवस्थापनाला हे ठामपणे मान्य आहे की, अपेक्षित क्रेडीट नुकसान ठरविण्यासाठी गृहीतके आणि पद्धती व्यावसायिक आणि जोखीम व्यवस्थापन पद्धत आणि धोरणांप्रमाणे आहेत. ज्यामध्ये नियामक मार्गदर्शकतत्वे तसेच शासकीय निर्देशांचे पालन करणे समाविष्ट आहे. ३१ मार्च २०१७ रोजी व्यापाराच्या प्राप्तीसाठी अपेक्षित क्रेडीट नुकसानीचा भत्ता रु. ७६,०३७.६२ लाख आहे. जे एकूण व्यापार प्राप्तीच्या २३.६८ टक्के च्या जवळपास आहे. म्हणून कंपनीचा असा अभिप्राय आहे की, भारतीय लेखा मानकांप्रमाणे आर्थिक विवरणामध्ये अपेक्षित क्रेडीट नुकसान मान्यताप्राप्त आहे जे योग्य व वाजवी आहे आणि मानकांच्या आवश्यकतेनुसार आहे. |
| ब) | एकत्रित वित्तिय विवरणपत्राची टीप क्र. ४४.६ (बी) (i) अ - यांच्या म्हटल्याप्रमाणे दि. ३१-३-२०१७ रोजी व्यापारी येण्याच्या शिलकी लेखा वह्या आणि आयटी डेटा बेस यांच्याकडे आकडेवारीत रु. ३,३९,२४२ लाखांचा फरक असून त्याचा मेळ करणे प्रलंबित आहे. तसेच वित्तिय वर्ष २०१५-१६ चे रु. ३,०१,२१३ लाख आहेत. योग्य मेळाच्या अभावामुळे त्याचा वि. विवरणपत्रावर होणाऱ्या परिणामाचा अंदाज करता येत नाही. | आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये लेखा पुस्तकातील शिलकी आणि माहिती प्रणाली अहवालाचा ताळमेळ घातला जाईल आणि समायोजनाच्या नोंदी घेतल्या जातील. |
| क) | व्यापारी येण्याची रक्कम रु. ३६,२२,०७५.८० लाख समायोजने वगळता) ही पत शिल्लक रु. ५,५६,११८.९२ लाख यातील निव्वळ आहे. व्यक्तिगत ग्राहकांच्या पतशिलकीसंबंधी योग्य तपशील नसल्याने त्याच्या वित्तीय विवरणपत्रावर होणाऱ्या परिणामांचे अंदाज आम्ही करु शकत नाही. | लेखा पुस्तकातील व्यापारी प्राप्तीचा माहिती प्रणाली अहवालाशी शिलकीचा ताळमेळ घातला जाईल. गरज भासल्यास आवश्यक समायोजन प्रविष्ट क्रेडीट शिलकीच्या नोंदी घेतल्या जातील. |

| | | |
|---|---|---|
| ड) | एकात्रित वित्तिय विवरण पत्राची टीप क्र. ११ यात नमूद केल्याप्रमाणे विविध ग्राहकांकडून मिळालेल्या सुरक्षा अनामतीची रक्कम रु. ४,१३,७६९.७५ लाख ही प्रतिभूत ऋणको यांची असे दर्शविले आहे. मात्र त्यासाठी सुरक्षा अनामतीचा ग्राहकनिहाय नकाशा तयार केलेला नाही. परिणामी प्रतिभूत ऋणको रकमेचे, दि. ३१ मार्च, २०१७ रोजी ज्या ग्राहकांची थकबाकी सुरक्षा रकमेपेक्षा कमी आहे अशा ग्राहकांकडून मिळालेल्या अनामतीला मर्यादेपर्यंत जादा विवरण झाले आहे. | विविध ग्राहकांकडून प्राप्त झालेली रक्कम रु. ४१३७६९.७५ लाख सुरक्षा ठेवीच्या मर्यादेपर्यंत प्राप्त करण्यायोग्य व्यापाराठीची रक्कम सुरक्षित कर्जदार म्हणून ग्राहकांची वर्गवारी श्रेणी तयार न करता दर्शविलेले आहेत. |
| इ) | एकत्रित वित्तिय विवरण पत्राची टीप क्र. ४४.९ यात म्हटल्याप्रमाणे मे.ग्लोबल टॉवर लि. यांच्याकडील व्यापारी येणे रु. १३,६२१.२२ लाख या अंतिम चुकती करण्याच्या अधीन आहे. याशिवाय थकित शिलकीसाठी इ.सी.एल. ची तरतूद नाही. यामुळे व्यापारी येण्याची पर्याप्तता आणि त्याचा कंपनीच्या वित्तिय विवरण वरील परिणाम यावर आम्हास मत व्यक्त करता येत नाही. | मेसर्स जीटीएल कडून १३६२१.२२ लाख रुपयाची वसूली करण्यासाठी कायदेशीर कार्यवाही कंपनीद्वारे सुरु केली जात आहे. त्यामुळे अपेक्षित क्रेडीट नुकसानीची तरतूद त्या रकमेसाठी तयार केलेली नाही. |
| ५) | **ग्राहकांकडील सुरक्षा अनामती : -**<br>एकात्रित वित्तिय विवरण पत्राची टीप क्र. ४४.६ (बी) (१) अ यात म्हटल्याप्रमाणे लेखा वह्या व आयटी डेटा बेस यातील सुरक्षा रकमांच्या शिलकीत रु. १,६१८ लाखांचा फरक आहे. त्याचा मेळ प्रलंबित आहे. योग्य मेळाव्या अभावी त्याचा वित्तिय विवरण पत्रावर होऊ शकणाऱ्या परिणामाचा आम्हास अंदाज करता येत नाही. | महावितरण ही सुमारे २.४० कोटी ग्राहकाच्या आधारावर सर्वात मोठी वितरण कंपनी आहे. ग्राहकांकडून सुरक्षा ठेवी संदर्भात वित्तीय खात्यातील शिलकीचे ग्राहकांच्या सामान्य खात्याच्या शिलकीचे माहिती प्रणालीप्रमाणे वारसाप्रणालीप्रमाणे ताळमेळ घालणे प्रलंबित आहे. शिलकीचा ताळमेळ घालण्यासाठी २०१७-१८ मध्ये वेगळा उपक्रम घेण्यात येईल. |
| ६) | **लेख्यांची उपार्जनपद्धती :-**<br>एकात्रित वित्तिय पत्राची टीप क्र. १ (फ) - ''महत्वाची लेखा धोरणे'' पहावीत. आमच्या लेखापरिक्षणात आम्हास काही खर्च विशेषत: दुरुस्ती व देखभालीचे खर्च ज्यांचे लेखे उपार्जन/वाणिज्य तत्वांवर करण्याऐवजी रोख तत्वांवर | उपार्जित आधारावर लेखा तयार करण्यात येतात. प्रलंबितदायित्वे/खर्च उपलब्ध माहितीच्या आधारावर आणि सर्वोत्तम अंदाजानुसार प्रदान करण्यात येतात. सॅप यंत्रणेच्या अंमलबजावणी केल्यामुळे किरकोळ स्वरुपाचे खर्च वगळता रोखीने केलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | केले. असे करणे मूलभूत लेखा गृहिते आणि कंपनीचे लेखे धोरण यानुसार नाही. लेखापरिक्षणाचा पाठपुरावा नसल्याने, याबाबीचा एकात्रित वित्तिय विवरण पत्रांवर होणाऱ्या परिणामाचा आम्हास अंदाज करता येत नाही. | खर्चाच्या नोंदीची फार क्वचितच शक्यता आहे. उपार्जित तत्वावर लेखा नोंदी करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयाला योग्य सूचना देण्यात आल्या आहेत. |
| ७) | **शिलकी कायम करणे :-**<br>एकात्रित वित्तिय विवरण ची टीप क्र. ४४.३ विषय - ''व्यापारी येणी, कर्जे व अग्रिमे यांच्या व ग्राहकांची पत शिलकी'' टीप पहावी. यामध्ये पुढील बाबींचे संबंधितांकडून कायम करणे, मेळ व गरज असल्यास समायोजन करणे प्रलंबित आहे. त्या अशा - व्यापारी येण्यांच्या शिलकी, कर्जे व अग्रिमे, काही बँकातील शिलकी, काही अकाऊंटींग युनिटसाठी टपाल कचेऱ्यात गोळा रकमा इ. तिसऱ्या पक्षाकडील शिलकी कायम करण्यासाठी कंपनीची विद्यमान पद्धत अधिक बलशाली करण्याची गरज आहे. याविषयी योग्य अभिलेख/तपशील नसल्यामुळे असे मेळ केल्यानंतर व जुन्या बाकीच्या समझोत्यांनंतर / चूक त्या केल्यानंतर जी समायोजने करावी लागतील. तसेच ही थकबाकी वसूल झाली नाही किंवा अंशत: झाली आणि दायित्वे चुकती झाली नाही तर त्याचे परिणामांचा अंदाज आम्हास करता येत नाही. | विविध कर्जदाराच्या बाबतीत, सर्व ग्राहकांना ऊर्जा बिले कालांतराने देण्यात येतात आणि त्यांच्याकडून मिळणाऱ्या रकमेचा पर्याप्त संभाषण केल्यामुळे हेतू साध्य होतो. जर ग्राहकाला मतभेद असल्या विविध स्थानिक पातळीवर तक्रार करुन संबंधित कार्यालयाकडे जात आहेत. या तक्रारी क्षेत्रीय कार्यालयाकडून लक्ष दिले जाते आणि तपसणीनंतर बिलामध्ये चूक आढळल्यास त्या दुरुस्त करण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्राहकाला दिलेलं विज बिल हेच कर्जदाराकडून शिल्लक असल्याची पुष्टी आहे. कर्जाच्या बाबतीत, वित्तीय संस्था आणि बँकेकडून झालेली पुष्टी प्राप्त केली जाते. शिवाय बहुतेक प्रकरणामध्ये वीज खरेदी कर्जदाराकडून एकतर पुष्टी प्राप्त केली जाते किंवा ताळमेळ घातला जातो. हे लेखांवरील टिपामध्ये टीपा क्र. ३१.४ मध्ये तसे सूचित केले आहे.<br>शासनाकडून देय रकमेच्या बाबतीत कंपनीशी झालेला पत्रव्यवहार हेच शासनाकडे असलेल्या शिलकीची पुष्टी आहे. तसेच शिलकीची पुष्टी मिळविण्याची वर्तमान पद्धती अधिक बळकट केली जाईल. |
| ८. | **टपाल कार्यालये, बँक इत्यादीकडील शिलकी**<br>अ) एकात्रित वित्तिय विवरण मधील टीप क्र. १२ आणि टीप क्र. ४४.३ (ii) पहाणे. त्यात टपाल कार्यालयाचे आणि बव्हंशी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या या शाखा यांच्याकडील शिलकी कायम करण्याची माहिती उपलब्ध | पोस्ट ऑफिस आणि डीसीसी बँकेच्या शिलकीचा ताळमेळ घालण्याचे काम वित्तीय वर्ष २०१७-१८ मध्ये सुरु करण्यात येईल. |

<table>
<tr>
<td></td>
<td>नाही. ती खालीलप्रमाणे (रु. लाखांत)<br>
<table>
<tr><th>तपशील</th><th>३१/३/२०१७ रोजी लेखा वह्यांप्रमाणे एकूण डेबिट बॅलन्स</th><th>३१/३/१७ रोजी लेखा वह्यांप्रमाणे क्रेडिट बॅलन्स</th></tr>
<tr><td>टपाल कार्यालये</td><td>१३,१४२.९१</td><td>४७३७.११</td></tr>
<tr><td>जि.म.स.बँका</td><td>६,८४७.४२</td><td>५,०१२.७२</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>१९,९९०.३३</td><td>९,७४९.८३</td></tr>
</table>
शिलकी कायम केल्याची माहिती नसल्याने, त्याचे वित्तिय विवरण पत्रावर होणाऱ्या परिणामांचा आम्हास अंदाज करता येत नाही.</td>
<td></td>
</tr>
<tr>
<td>ब</td>
<td>एकत्रित वित्तिय विवरण पत्राची टीप क्र. ४४.५ पहावी : विविध विभाग व मंडळ कार्यालयाच्या बँक मेळपत्रकात बऱ्याच नोंदी ग्राहकांनी जमा केलेले पण बँकांनी नाकारलेले चेक्स या बाबीच्या असून त्या लेखा वह्यात उलट फिरविलेल्या नाहीत आणि त्याचा मेळ प्रलंबित आहे. याशिवाय बँक मेळ पत्रकात इतर काही बाबींचा मेळ केलेला नाही. यामध्ये प्रारंभी अपलोड केलेल्या शिलकींच्या नोंदी असून त्यांचा मेळ करावयाचा राहिला आहे. त्याच्या वि.वि. पत्रावरील परिणामावर आम्हास मत देता येत नाही.</td>
<td>राष्ट्रीयकृत बँकांमध्ये वापरात असलेल्या आणि वापरात नसलेल्या बँक खात्याचे सर्व क्षेत्रीय कार्यालयातील लेखा विभागाने ताळमेळ घातलेला आहे. तथापि, माहितीच्या अभावामुळे आणि जुनी माहिती उपलब्ध नसल्यामुळे लेखा पुस्तकात योग्य नोंदी घेण्याकरीता काही बाबींचा ताळमेळ घालण्यास विलंब झाला आहे. बँकेने धनादेश नाकारल्यामुळे बँक शुल्क इत्यादी बाबींचे योग्य प्रकारे नोंदी घेण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांना योग्य सूचना देण्यात आल्या आहेत. उर्वरित ताळमेळ घालण्यास विलंब झालेल्या बाबींचा वित्तीय वर्ष २०१७-१८ मध्ये पूर्ण करण्यात येईल.</td>
</tr>
<tr>
<td>९)<br><br>अ)</td>
<td>मत्ता व दायित्वे यांचे चालू / चालू नसलेल्या यात वर्गीकरण:-<br>
कंपनीने खालील लेखाशीर्षातील दायित्वाचे ‘चालू’ व चालू नसलेले असे वर्गीकरण केलेले नाही.<br>
टीप क्र. २७- इतर चालू नसलेली दायित्वे - चालू दायित्वे पहावी.<br>
१) देयकांची रक्कम जमा करण्यासाठी खाजगी संस्थांकडून घेतलेल्या अनामती-रु. ५,९०३.१३ लाख</td>
<td>वित्तीय वर्षाच्या समाप्तीनंतर १ वर्षाच्या आत संकलक संस्थाच्या ठेवींची रक्कम परत करण्याचे अंदाज केले जाते. त्यामुळे चालू असल्याचा विचार केला गेला आहे.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | २) पुरवठादार/कंत्राटदारांच्या ठेवून घेतलेल्या रकमा रु. २,४१,०८७.४६ लाख | पुरवठा कंत्राटदाराकडून धारणा पैसा हा कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार असतो. वित्तीय वर्षाच्या समाप्तीनंतर १ वर्षाच्या आत परतावा करण्याचे अंदाज केले जातात त्याला चालू असे समजले जाते. |
| | ३) इतरांकडील अनामती/रु. २३,७७३.२९ लाख | वित्तीय वर्षाच्या समाप्तीनंतर १ वर्षाच्या आत परत करण्यास संभाव्य आहेत. त्यामुळे चालू असल्याचा विचार केला गेला आहे. |
| ब | **टीप क्र. २१ :** इतर वित्तीय दायित्वे - चालू नसलेली पहावी यामध्ये विद्युतीकरण सेवा जोडणीचा रक्कम रु. १,२९२.१५ लाख समाविष्ट आहे. ही प्रकरणे कायद्याच्या शेड्युल्ड - ३ प्रमाणे नाहीत. | विद्युतीकरणाच्या ठेवीच्या संदर्भात ग्राहकाकडून सेवा कनेक्शन ही दीर्घकालीन स्वरुपाची असते. जी एक वर्षापेक्षा अधिक काळ टिकते किंवा जोपर्यंत ग्राहक महावितरण कंपनीच्या सेवेचा लाभ घेतो. त्यामुळे अशा रकमा चालू नसलेल्या भत्ता/दायित्वे म्हणून मानली जाते. |
| १०) अ) | **वीज खरेदी :-** महावितरणच्या प्रकरणी एकात्रित वित्तिय विवरण पत्राची टीप क्र. ३७.१ (iii) (अ) पहावी. कंपनीने दि. ३१/३/१७ रोजी विलंब शुल्क आकारासाठी महानिर्मितीस देय रु. २,९९,२३६ लाख आणि महापारेषणास देय रु. १,२४,४२१ लाख अशा तरतुदी केल्या. यामध्ये वर्ष २०१६-२०१७ च्या रु. ६६,३३० लाखांचा समावेश होता. परिणामी कंपनीच्या तोट्याचे रु. ६६,३३० लाखाने कमी विवरण झाले. तर इतर समभाग (संचित तोटे) आणि चालू दायित्वे यांचे रु. ४२३६५७/- लाखाने कमी विवरण झाले. | महावितरणच्या गणनेनुसार महानिर्मिती व महापारेषणसाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी विलंब देयक शुल्काची गणना करण्यात आली आहे. परंतु कंपन्यांनी केलेल्या विलंब देयक शुल्काचा दावा महावितरण कंपनीने केलेल्या गणनेपेक्षा वेगळा आहे. महावितरणने त्यांना विलंब देयक शुल्काची रक्कम सोडून देण्याची विनंती केली आहे. पुढे ही बाब महाराष्ट्र शासनाकडे दायित्वाचे निर्वहन करण्यासाठी आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी पुढे घेऊन गेले होते. म्हणूनच ६६३३० कोटी रुपये फरक आकस्मिक दायित्व मानला जातो. हे आमच्या लेख्यांवरील टिपण्या क्र. ३१.१. (iii) मध्ये सादर रक्कम नमूद केली आहे. |
| ब) | एकात्रित वित्तिय विवरण पत्रात महावितरणच्या संबंधी टीप क्र. ३७.१ (iii) (ब) पहावी. कंपनीने स्वतंत्र वीज निर्मात्यांना देय असलेल्या विलंब भरणा आकार यासाठीची तरतूद | रिझर्व बँकेने पीएलआर प्रणालीच्या जागी घार दर प्रणाली दि. ०१.०७.२०१० पासून सुरुवात केली आहे. म्हणून कंपनीने ०२.१२.२०१६ रोजी माननीय महाराष्ट्र |

| | | |
|---|---|---|
| | वीज खरेदी कराराप्रमाणे एस बी आयचा प्राईम लेडिंग दर अधिक २ टक्के याऐवजी बेस रेटच्या आधारे केली आहे. कंपनीला ३१-३-२०१६ पर्यंत रु.८२५२ लाखाच्या तरतूदी निर्लीदीत आहेत. कंपनीने ३१/३/१६ रोजीची तरतूद उलट फिरविली. याशिवाय कंपनीने २०१६-२०१७ साठी अल्प तरतूद रु. ९.३०१ लाख आणि संचित अल्प तरतूद रु. ४३,०१६.१३ लाख दि. ३१/३/१७ पर्यंत केली. परिणामी कंपनीच्या वर्षाच्या तोटयाचे रु. १७,५५३.०६ लाखाने तसेच इतर समभाग (संचित तोटा) आणि चालू दायित्वे यांचे रु. ४३,०१६.१३ लाखाने कमी विवरण झाले. | विद्युत नियामक आयोगाकडे याचिका डीपीएसच्या गणनेच्या प्रयोजनार्थ पीपीए अंतर्गत आयपीपीमध्ये प्रवेश केलेल्या आधार दर/एमसीएलआरच्या जागी पीएलआरचा विचार करण्यासाठी आदेशासाठी आरक्षित असलेल्या २०१७ च्या प्रकरण २४ द्वारे दाखल केली आहे. वरील लक्षात घेता महावितरणने वेळोवेळी लागू आधार दर/एमसीएलआरच्या आधारावर आयपीपीच्या डीपीएमची दायित्वाची पूर्णगणना केली आहे. याप्रमाणे मार्च, २०१६ पर्यंत पूर्वीच्या वर्षासाठी प्रदान केलेल्या डीपीएसच्या देय रक्कमेसाठी रु. ८२५२ लाख रुपयांची रक्कम उलटवली गेली आहे. पीएलआर दरानुसार आयपीपी डीपीएसचा दावा करत आहेत. म्हणूनच डीपीएस दाव्यांच्या रकमेच्या ४३०१६ लाख रुपयांचा फरक आहे. ज्यास आकस्मिक उत्तरदायित्व मानले जाते. |
| क) | एकात्रित वित्तिय विवरण पत्रातील महावितरणच्या टीप क्र. ३७.१ (iii) (क) पहावी. कंपनीने ३१ मार्च, २०१७ रोजी विलंब भरणा आकार रु. २०५०० लाख यासाठी तरतूद केली नाही. त्यामुळे कंपनीच्या इतर (संचित तोटे) याचे रु. २०,५०० लाखाने कमी विवरण झाले. | पवन ऊर्जा निर्मिती करणाऱ्यांना देय अदा करण्यात विलंब झाला आहे. ऊर्जा खरेदी करारा (ईपीए) मध्ये विलंब देयकासाठी विलंब देयक शुल्क देण्याची तरतूद आहे. महावितरणद्वारा देय रक्कम भरणा करण्याचे आश्वासन देऊन विलंब देयक शुल्क सोडून देण्याची विनंती केली आहे आणि ती विचाराधीन आहे. मार्च, २०१७ पर्यंत २०,५०० लाख रुपयांच्या जवळपास विलंब देय शुल्काची दायित्वे वित्तीय वर्ष २०१६-१७ मध्ये लेखा पुस्तकात तरतूद केली नाही आणि त्याची आकस्मिक दायित्वे म्हणून नोंद घेण्यात आली. |
| ११)<br>अ) | **विविध खर्चासाठी तरतुदी नाहीत :**<br>एकात्रित वित्तिय विवरण पत्रातील टीप क्र. ४४.१ पहावी. यामध्ये मुळा प्रवरा सदसंस्थेला वापर संस्थेला वापर आकारासाठी द्यावयाचे रु. ३९,४१९ लाख महाराष्ट्र विज नियामक आयोगाकडे जमा केले असून ते नफा-तोटा पत्रकात वजा केलेले नाहीत आणि 'सुरक्षा अनामत' असे | माननीय विजेसाठीचे लवाद न्यायाधीकरण यांच्या दि. ६ मे २०१६ च्या आदेशाप्रमाणे कंपनीने ३९४१९ लाख रुपये महाराष्ट्र विज नियामक आयोगाकडे मुळ मूल्यासह वापरण्यासाठीचा खर्च जमा केला आहे. एमपीईसीएसला वापरकर्ता शुल्क भरणा करण्यासंदर्भात आणि मालमत्तेचे मूल्यमापन |

| | | |
|---|---|---|
| | दाखविले आहे. त्यामुळे कंपनीच्या तोट्याचे रु. ३९,४१९ लाखाने कमी विवरण झाले. तर मत्तांचे तेवढेच जादा विवरण झाले. | करण्याबाबतची बाब न्यायप्रविष्ट आहे. म्हणून त्याची नोंद नफा तोटा विवरण पत्रकात वापरकर्ता खर्चाऐवजी न्यायालय आणि इतर प्राधिकाऱ्याकडील ठेव म्हणून हिशोब नोंदवला गेला आहे. |
| ब) | एकात्रित वित्तिय विवरण पत्रातील टीप क्र. ३७.१ (iii) (ड) यात नमूद केले की, कंपनीने नव्या कोळसा वितरण धोरणामुळे मे. अदानी पॉवर महाराष्ट्र ली आणि मे. रतन इंडिया पॉवराले. यांना देय रक्कम सुमारे ३,९१,२१६ लाखांच्या भरपाईच्या दायित्वाची तरतूद केली नाही. यामुळे कंपनीच्या तोट्याचे व दायित्वाचे रु. ३,९१,२१६ लाखाने कमी विवरण झाले. | महावितरणने माननीय महाराष्ट्र विज नियामक आयोगाच्या २०.०८.२०१४ च्या आदेशामध्ये मंजुरी दिलेल्या सूचक परफेड इंधन खर्चाच्या विरोधात याचिका दाखल केली आहे. ज्यामध्ये कोस्टल गुजरात पॉवर मर्यादित या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या अशा तत्सम प्रकरणाच्या आधारावर दिलेल्या निकालामुळे विजेसाठीचे लवाद न्यायाधीकरणाने हे प्रकरण महाराष्ट्र विज नियामक आयोगाकडे नव्याने सुनावणीसाठी त्यांच्याकडे परत पाठविले आहे. हे प्रकरण महाराष्ट्र विज नियामक आयोगाकडे सुनावणीसाठी प्रलंबित आहे.<br>म्हणून आर्थिक परिणामांचा परिणाम रु. ३,९१,२१६/- लाख अंदाजे आकस्मिक दायित्व मानले जाते. |
| क) | एकात्रित वित्तिय विवरण पत्रातील टीप क्र. ३७ (१) (iii) (ई) यात नमूद केले की, कंपनीने रत्नागिरी गॅस पॉवर कंपनीस स्थिर आकार रु. २,६८,८१७ लाख या (यात वर्षाचे रु. ६,४०० लाख समाविष्ट) दि. ३१/३/१७ पर्यंत देय असलेल्या रकमेची तरतूद केली नाही. या कंपनीस दिलेले रु. १८,१०१ लाख 'अग्रिम' असा दाखविला. परिणामी, कंपनीच्या तोट्याचे रु. ६४०० लाखांनी कमी विवरण झाले. तसेच इतर समभाग (संचित तोटा) याचे रु. २,६८, ८१७ लाखाने चालू दायित्वे याचे रु. २,५०,७१६ लाखाने अल्प कमी विवरण झाले. अल्प चालू नसलेल्या दायित्वाचे रु. १८,१०१ लाखाने जादा विवरण झाले. | केजी बेसीनकडून गॅस पुरवठा कमी केला आहे आणि म्हणूनच आरजीपीपीएलने इतर इंधनावर म्हणजे आरएलएनजी वर विज पुरवठा केला आहे. तथापि, उच्च दरामुळे महावितरणने आरजीपीपीएल कडून विज विकत घेण्यास नकार दिला. तसेच विज खरेदी करारानुसार निश्चित स्थिर खर्चही दिला नाही. शेवटी विज खरेदी करार रद्द करण्यात आला. आरजीपीपीएलने केंद्रीय विज नियंत्रण विनियम यांच्याकडे याचिका दाखल केली. आणि केंद्रीय विज नियंत्रण विनियमने आरजीपीपीएलला निश्चित शुल्क दावा करण्यास मुभा दिली. महावितरणने विजेसाठीचे लवाद न्यायाधिकरणाकडे याचिका दाखल केली परंतु ती निलंबित करण्यात आली.<br>महावितरणने २२.०४.२०१५ रोजीच्या विजेसाठीचे |

| | | |
|---|---|---|
| | | लवाद न्यायाधीकरणाच्या आदेशाच्या विरोधात भारताच्या सर्वोच्च न्यायालयात (२०१५ चे प्रकरण क्र. १४५९९) याचिका दाखल केली आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने सदर याचिका सुनावणीसाठी दाखल करून घेतली नाही. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला या न्यायालयात जर आवश्यकता भासल्यास पुन्हा एकदा न्यायालयात याचिका दाखल करण्यास मुभा दिली आहे.<br><br>जर हा आदेश महावितरणच्या बाजूने नसेल तर मग महावितरणला २६८८१७ लाख रुपये (मार्च २०१७ पर्यंत) भरावे लागतील, ज्यामध्ये वित्तीय वर्ष २०१६-१७ चे निश्चित शुल्क आणि इतर शुल्काचे ६४०० लाख रुपयांचा समावेश आहे. तथापि, महावितरणचे १८१०१ लाख रुपये आगाऊ दिलेले आहेत. म्हणून २५०७१६ लाख रुपये निव्वळ रक्कम आकस्मिक दायित्व म्हणून मानली जाते. |
| १२. | **भारतीय लेखा मानक ३७:-** आकस्मिक दायित्वे मत्ता व तरतुदी एकात्रित वित्तिय विवरण पत्राच्या टिपा क्र.३७.१ यात महावितरणच्या आकस्मिक दायित्वांचे प्रमाणाचे परिक्षण व पडताळणी करण्यासाठी आम्हाला योग्य तपशील व कागदपत्रे न मिळाल्याने त्यावर मत देता येत नाही. | महावितरणने प्रकरणांची यादी ठेवली आहे. ज्यामध्ये रक्कम सामी असलेल्या आकस्मिक दायित्वाच्या संदर्भात असलेल्या खटल्याची तपशीलवार यादी तयार केली आहे. |
| १३. | **नियामक दायित्व आकार परत करणे**<br>वित्तिय वर्ष २००३ ते २००६ पर्यंत नियामक दायित्व आकार हे ग्राहकांकडून जमा केले जात. महाराष्ट्र विज नियामक आयोगाने आदेश दिला की, रु. ३,२२,७०० लाख ग्राहकांना परत करावे. परिणामी कंपनीने ३१/३/२०१७ पर्यंत रु. ३,११,९७४ लाख परत केले. उर्वरित रु. १०,७२६ लाख | कंपनीद्वारे पात्र ग्राहकांना नियामक दायित्व शुल्क परत दिले आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | देण्यासाठी कंपनीने तरतूद केलेली नाही. त्यामुळे कंपनीचा या वर्षाच्या तोट्याचे रु. १०,७२६ लाखाने तसेच चालू दायित्वाचे तेव्हढेच कमी विवरण झाले आहे. | |
| १४. अ) | **इतर बाबी**<br>कंपनीने जीआरआयआर याचा निपटारा करख्यासाठी आणि कामे व देखभाल आणि पुरवठादार यांच्या दायित्व रु. अनुक्रमे रु. १,२५,६७९ लाख आणि रु. ५४,७९५ लाख दाखविले आहे. या शिलकी डेबीट बॅलन्समधील आहेत. लेखापरिक्षणात्मक पाठपुरावा नसल्याने याचा कंपनीच्या मत्ता व दायित्वे यावरील परिणामांचा अंदाज करणे आम्हास शक्य झाले नाही. | वित्तीय वर्ष २०१७-१८ मध्ये त्याचा ताळमेळ घालण्यात येईल आणि समायोजनाच्या नोंदी घेण्यात येतील. |
| **ब)** | एफ बी एम एस कॉपर्समध्ये अमानतीमध्ये रु. ६,२४८.७४ लाख भरण्यात आले. एकात्रित वित्तिय विवरण च्या टीप क्र. ७ (अ) याप्रमाणे ही रक्कम 'इतरांकडील सुरक्षा अनामती' यात समाविष्ट आहे. मात्र आमची सर्वतोपरी माहिती व आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यानुसार ही यापूर्वीच परत मिळालेली आहे. तरीसुद्धा तीचा लेखावहीमध्ये योग्य लेखा केलेला नाही आणि ती 'येणे' म्हणून दाखविलेली आहे. यामुळे चालू नसलेल्या मत्ता व दायित्वात तेवढे जादा विवरण झाले आहे. | वित्तीय वर्ष २०१७-१८ मध्ये आवश्यक नोंदी घेण्यात येतील. |
| क) | भारतीय लेखा मानक २० नुसार शासकीय अनुदानांना कालावधीच्या नफा व तोटा पत्रकात रीतसर तत्वानुसार मान्यता दिली जाते. ज्या हेतूकरिता अनुदाने मिळतात, त्यांच्या संबंधित खर्चाची कर्जफेडीची तरतूद त्या कालावधीत केली जाते. कंपनी गृहित धरते की, मिळालेली सर्व अनुदाने त्याचवर्षात वापरली जातात आणि त्यांचे भांडवलीकरण केले जाते. योग्य व पुरेसे लेखापरिक्षणात्मक पुरावे नसल्याने यांचा कंपनीच्या वित्तिय विवरण पत्रावर होणारे परिणाम यावर आम्ही अभिप्राय देऊ शकत नाही. | यासंबंधीची लेखा धोरणे 'महत्वपूर्ण लेखा धोरणे मध्ये टिपा क्र. २ मुद्दा क्र.८ मध्ये नमूद केले आहेत. मालमत्ता विकत घेणे, साधने व उपकरणे खरेदी करण्यासंबंधी शासकीय अनुदानाचे वित्तीय विवरणामध्ये भांडवली अनुदान म्हणून सादर केले आहे. आणि संबंधित मालमत्तेच्या अपेक्षित जीवनमानावर पद्धतशीरपणे नफा व तोटा म्हणून जमा केले जातात आणि त्याचे इतर प्रवर्तनातून उत्पन्न या सदराखालील दर्शविले आहे. |

<table>
<tr><td>ड)</td><td>रु. ३,६०१.१७ लाख ही रक्कम ओळख नसलेली वीज खरेदी शिल्लक अशी दर्शविली आहे. आणि ती व्यापारी देणी वीज खरेदीची चालू दायित्व याप्रमाणे एकात्रित वित्तिय विवरण च्या टीप क्र. २६ मध्ये दिली आहे. त्यासंबंधी पडताळणी करण्यासाठी संस्था-निहाय तपशील आम्हास मिळाला नाही. परिणामी या दायित्वाचे अस्तित्व आणि त्याचे वित्तिय विवरण पत्रावरील परिणाम यावर भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत.</td><td>सर्वसाधारणपणे अनुदानाचा भत्ता निर्माण करण्यासाठी ताबडतोब वापर केला जातो.<br>वित्तीय वर्ष २०१७-१८ मध्ये त्याचा ताळमेळ घालण्यात येईल आणि समायोजनाच्या नोंदी घेण्यात येतील.</td></tr>
<tr><td>इ)</td><td>कंपनी आणि तिच्या समुहातील कंपन्या यांच्या थकबाकीच्या शिलकीत याच्या दि. ३१/३/२०१७ रोजी लेखा वह्यांप्रमाणे खालील फरक दिसतात. त्याचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.<br>रु. लाखांत
<table>
<tr><th>कंपनीचे नाव</th><th>स्वरुप</th><th>महावितरणनु-सार शिल्लक</th><th>कंपनी समूहानु-सार शिल्लक</th><th>फरक</th></tr>
<tr><td>म.रा.वीज निर्मिती कंपनी लि.</td><td>कर्जे व अग्रिमे</td><td>४६,८३५.९७</td><td>४६,७८२.५०</td><td>५३.४७</td></tr>
<tr><td>म.रा.विद्युत पारेषण कंपनी लि.</td><td>कर्जे व अग्रिमे</td><td>२४,१८३.२८</td><td>२४,५१६.९३</td><td>(३३३.६६)</td></tr>
<tr><td>महाराष्ट्र विघूत विकास महामंडल मर्यादित</td><td>कर्जे व अग्रिमे</td><td>२४६.७३</td><td>२३०.५६</td><td>१६.१७</td></tr>
<tr><td>औरंगाबाद वितरण कंपनी लि. (महावितरणची उपकंपनी)</td><td>कर्जे व अग्रिमे</td><td>१२१.११</td><td>१४२.७९</td><td>(२१.६८)</td></tr>
<tr><td>मराविमं सुत्रधारी कं.लि.</td><td>इतर चालू दायित्वे</td><td>४,०६,०३०.७९</td><td>३,८३,०१४.९४</td><td>२३०१५.८६</td></tr>
</table>
मेळ केला नसल्याने याचा वित्तिय विवरण पत्रावरील परिणामाचा आम्हास अंदाज करता येत नाही.</td><td>वित्तीय वर्ष २०१७-१८ मध्ये त्याचा ताळमेळ घालण्यात येईल आणि समायोजनाच्या नोंदी घेण्यात येतील.</td></tr>
<tr><td>फ)</td><td>एकात्रित वित्तिय विवरण पत्राचे टीप क्र. ४४.१३- हा सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजक ओळखणे व त्यांना देय व्याजाची तरतूद करणे यासंबंधी आहे. कंपनीने या दायित्वाचे</td><td>सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योजकासंबंधीचे लेखा निश्चित करुन त्यांना वर्षाअखेर किती रक्कम दिलेल्या नाहीत व त्याचे देय/दिलेले व्याज याची एमएसएमई</td></tr>
</table>

सांख्यिकीकरण केलेले नाही. त्यामुळे त्यांचे (जर काही) व्याज देय असेल तर त्याचा अंदाज करता येत नाही. तसेच त्याचा या काळातील तोट्यावरचा परिणाम निश्चित करता येत नाही. अशा उद्योजकांची ओळख नसल्याने त्यासंबंधीच्या सांविधिकाची तरतूद कंपनीने केली नाही.

उपरोक्त वर्णन केलेल्या बाबींचे भारतीय लेखा मानक विवरणपत्रातील मूलतत्वांप्रमाणे योग्य निश्चिती / सांख्यिकीकरण खालीलप्रमाणे करता येईल.

(रक्कम रु. लाखांत)

| लेखा शिर्षक | जादा विवरण | कमी विवरण |
|---|---|---|
| **इतर समभाग (संचित तोटे)** | - | १,०७५, ८४२.०७ |
| **खर्च** | - | - |
| विलंब भरणा आकार | - | १०४,३८३.०६ |
| वीज खरेदी | - | ६,४००.०० |
| म.वि.नि. आयोगानुसार परत करणे | | १०,७२६.०० |
| **चालू दायित्व** | - | |
| व्यापारी देणी | ६२.४८.७४ | ११२९१०५.१३ |
| इतर चालू दायित्वे | | १०७२६.०० |
| **चालू नसलेल्या मत्ता** | | |
| सुरक्षा अनामती | ४५,६६७.७४ | |
| अग्रिमे | १८१०१.०० | |

कायदा २००६ नुसार द्यावी याची माहिती देण्याचे काम बहुवाही व अवघड आहे. त्यामुळे प्रकट करता आले नाही.

अ) **महानिर्मितीच्या बाबत :**

या कंपनीने महावितरण कंपनी सोबत केलेल्या करारानुसार विलंब भरणा आकारावरील व्याजाचे रु. १,५०६.६७ कोटी यास 'ग्राहकांकडील अधिभाराचे उत्पन्न' या लेखाशिर्षांतर्गत वर्षातील उत्पन्न म्हणून मान्यता दिली होती. महाविरणने ३१ मार्च, २०१७ रोजी असा अधिभार रु. ५,२४७.३३ कोटी भरला नव्हता. त्यात मागील वर्षाचे उपार्जित उत्पन्नसुद्धा आहे. महावितरणने देयके स्वीकारली नसल्याने तिच्याकडून या थकीत रकमांची वसूली होण्याची खात्री नाही.

विज निर्मिती खरेदी कराराच्या उभय संमत अटीप्रमाणे महानिर्मितीने अधिभाराची देयक महावितरणला दिली असून ती महावितरणला बंधनकारक आहे. हे कंत्राटी प्राप्य आहे. महानिर्मितीने महावितरण बरोबर ताळमेळ घातला असून तसे लेखा परिक्षकांनासुद्धा अहवाल वर्षात कळविले आहे.

| | | |
|---|---|---|
| ब) | कर्जे, अग्रिमे, ठेवी आणि व्यापारी देणी यांच्या शिलकी, त्यांच्या प्रकरणानुसार संबंधिताकडून कायम होणे/मेळ करणे याच्या अधिन आहेत. हे काम प्रलंबित असल्याने त्यानुसार समायोजने केलेली नाहीत. याशिवाय कर्जे व अग्रिमे यांच्या काही शिलकी प्रमाणाबाहेर प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असून काही विशिष्ट खात्यांचे समायोजन करण्यासाठी आवश्यक रक्कम निश्चित करता येणार नाही. यामुळे याशिलकीची स्थिती आणि वर्षभरातील कंपनीचा तोटा यावरच्या परिणामांचा आम्हास अंदाज करता येत नाही. | कंपनीने सॅप प्रणाली अंमलात आणली असून त्यामुळे विक्रेतेनिहाय, ग्राहकनिहाय, कर्मचारीनिहाय देणी व येणी इत्यादींची माहिती उपलब्ध होते. खूप मोठ्या प्रमाणावरील व्यवहारामुळे कंपनीला अनेक मोठ्या विक्रेत्याबरोबर मोठ्या व्यवहाराच्या संख्या असलेला करार करावे लागतात. कंपनीने ताळमेळ घालण्याचे काम हाती घेतले असून त्याची प्रक्रिया चालू आहे. तथापि, कंपनी केवळ एकाच कारणामुळे नव्हे तर विक्रेत्याद्वारे बिले पाठवण्यास विलंब, शिल्लक, पुष्टीकरण विनंतीला कोणताही प्रतिसाद न मिळणे, विक्रेत्याकडून चुकीचा तपशील देणे, दावे/प्रति दावे इत्यादी यांच्या बाबत कोणतीही प्रतिक्रिया नसल्यास अशा विविध कारणामुळे काही विक्रेत्यांशी ताळमेळ आणि समायोजन या प्रकरणात वेळ लागतो.<br><br>या वर्षी कंपनीने जुन्या अनोळखी विक्रेत्याच्या शिलकीची ओळख करुन दिली आहे. कोळशासाठी दिलेल्या आगाऊ रकमेची तरतूद आणि उपकंपन्यांना नियमित आगाऊ रकमे अधिक दिलेली आगाऊ रक्कम कमी करण्याचा ताळमेळ/समायोजनाचे कार्य चालू आहे. |
| १ | **पात्रतेचे मत :**<br>**महानिर्मिती बाबत :**<br>निम्नलिखित परिच्छेद (i) आणि (ii) यातील प्रकरणी यांच्या अधीन राहून आमच्या मते आणि आमची सर्वतोपरी उत्तम माहिती व आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यानुसार निवेदन करण्यात येते की, उपरिनिर्दिष्ट भारतीय लेखा मानकांनुसार केलेली स्वायत्ता वित्तिय विवरण पत्रे भारतात सर्वसामान्य स्वीकृत लेखातत्वे आणि भारतीा लेखा मानके याला सुसंगत प्रकारे या कंपनी समूहाच्या दि. ३१ मार्च, २०१७ रोजीच्या व्यवहारांच्या स्थितीचे (वित्तीय स्थिती) आणि त्या तारखेस संपलेल्या वर्षाचा तोटा (इतर सर्वंकष उत्पन्नासह वित्तीय | |

कार्य) रोकडता प्रवाह आणि समभागातील बदल यांचे सत्य व वास्तव दर्शन घडवितात. महानिर्मितीसंबंधी वरील पात्र मतांचा आधार, या (अ) परिच्छेद विचारात घेऊन नमूद केले जाते की, जर विलंब भरणा आकाराचे व्याज यास अधिभार म्हणून उपार्जित केले नसता तर अपेक्षित पतहानीच्या भरपाईची तरतूद करावी लागली नसती. तसेच मागील वर्षातील विलंब भरण्याची अधिभार वसूल संभाव्य असण्याचे थांबले असल्याने त्याचे लेखावहीत खर्च म्हणून नोंद करता आली असती त्याचे सोबतच्या वित्तीय विवरणपत्राच्या मूलतत्वावर होऊ शकणारे परिणाम खालील तक्त्यात निश्चित/ सांख्यिकीकरण केले आहे.

**रक्कम रु. कोटीत**

| क्र. | लेखा शीर्षक | गट | जादा विवरण | कमी विवरण |
|---|---|---|---|---|
| १ | विलंब भरणा आकार-इतर प्रवर्तन महसूल | उत्पन्न | १,५०६.६७ | - |
| २ | मागील वर्षातील विलंब भरण्याची वसूली संभावनीय नसल्याने ती उलट करणे | खर्च | - | ३,७४०.६६ |
| ३ | व्यापारी येणी | चालू नसलेल्या मत्ता | ५,२४७.३३ | - |
| ४ | अपेक्षित पतहानीसाठी भरपाई | खर्च | ६९६.३२ | - |
| ५ | चालू नसलेल्या व्यापारी येण्यात कपात | चालू नसलेली व्यापारी येणी | - | ६९६.३२ |
| ६ | ठेवून घेतलेल्या मिळकतीवर परिणाम | इतर समभाग | ४,५५१.०१ | ४,५५१.०१ |

**आणि**

(२) वरील (अ) विचारात घेऊन, महानिर्मितीच्या संदर्भात पात्र मत्तांचा आधार याप्रमाणे वर्षाचा तोटा यावरील परिणाम आणि ३१ मार्च, २०१७ रोजीचा निव्वळ मत्तांचा अंदाज करता येत नाही.

आमच्या मते आणि आमची सर्वतोपरीची माहिती व दिलेले स्पष्टीकरण याप्रमाणे वरील 'पात्र मत्तांचा आधार' या परिच्छेदातील वर्णन केलेले विषय ज्याचे सहवाचन 'भर देण्याचे विषय' या परिच्छेदात वर्णन केलेल्या बाबींसोबत होते, यात वगळलेले परिणाम वगळता, उपरीनिर्दिष्ट भारतीय लेखा मानकांनुसार तयार केलेले वित्तीय विवरणपत्रके, कायद्यानुसार आवश्यक माहिती त्यातील विहित पद्धतीने देतात. तसेच ती कंपनीच्या दि. ३१ मार्च, २०१७ रोजीच्या व्यवहारांचे सत्य व रास्त दर्शन भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या लेखातत्वानुसार आहेत. तसेच ३१ मार्च, २०१७ रोजीचा या कंपनीचा एकूण तोटा, एकूण सर्वंकष उत्पन्न, रोकडता प्रवाह व समभागातील बदल यांची माहिती त्याला सुसंगत आहे.

**जोडपत्र - २**

# भारताचे लेखा नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (बी) यानुसार मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड च्या दि. ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणापत्रावर दिलेले अभिप्राय :

म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी लिमिटेड, मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाची, कंपनी अधिनियम २०१३ यात विहीत केलेल्या आकृतीबंधानुसार एकल वित्तीय विवरणपत्रके तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखा नियंत्रक व महा लेखापरिक्षक यांनी कायद्याच्या कलम १३९ (५) नुसार नियुक्त केलेले सांविधिक लेखापरिक्षक हे या कायद्याच्या कलम १४३ नुसार स्वतंत्र आणि कायद्याच्या कलम १४३ (१०) यात विहित केलेल्या लेखापरिक्षणाच्या मानकांनुसार या वित्तीय विवरणपत्रावर अभिप्राय व्यक्त करण्यास जबाबदार आहेत. त्यांनी तसे केल्याचे त्यांच्या दि. १५ नोव्हेंबर, २०१७ च्या लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेले आहे.

मी, भारताचे लेखानियंत्रक व महालेखा निरीक्षक यांच्यावतीने मराविमं सूत्रधारी कंपनी लिमिटेडच्या दि. ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रकाचे पूरक लेखापरिक्षण, कायद्यातील कलम १४३ (६) (अ) नुसार केले. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे आणि सांविधिक लेखापरिक्षक यांचेकडील कागदपत्रे न मिळविता करण्यात आलेले आहे. ते प्रामुख्याने सांविधिक लेखापरिक्षक यांचेकडे व कंपनीच्या कर्मचारी वृंदाकडे विचारणा करणे आणि लेख्यांच्या निवडक दस्तऐवजांचे परिक्षण करणे या मर्यादेत करण्यात आलेले आहे.

माझ्या लेखापरिक्षणाच्या आधारानुसार, सांविधिक लेखापरिक्षकांचे अहवालावर अभिप्राय देणे उद्‌भवले किंवा त्यास पूरक ठरेल असे काहीही महत्वाचे माझ्या माहितीमध्ये आढळून आलेले नाही.

**भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्यावतीने,**
**सही/-**
**पी. माधवी**
**महालेखापाल (लेखापरिक्षण - तीन)**

स्थळ : मुंबई
दिनांक : २८ डिसेंबर, २०१७

**जोडपत्र - ३**

## भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (ब) ज्याचे सहवाचन याच कायद्याच्या कलम १२९ (४) सोबत होते ; त्यानुसार मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेडच्या दि. ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरणापत्रावर दिलेला अभिप्राय :

मराविमं सूत्रधारी कंपनी लिमिटेड या कंपनीच्या दि. ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाची एकत्रित वित्तीय विवरण पत्रके कंपनी अधिनियम २०१३ यात विहित केलेल्या आकृतीबंधानुसार तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी कलम १३९ (५) चे सहवाचन कलम १२९ (४) प्रमाणे नियुक्त केलेल्या सांविधिक लेखापरिक्षक हे कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ चे सहवाचन कलम १२९ (४) सोबत होते, आणि कलम १४३ (१०) च्या लेखापरिक्षणाच्या मानकांनुसार, त्यांनी केलेल्या स्वतंत्र लेखापरिक्षणाच्या आधारे, या एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर अभिप्राय व्यक्त करण्यास जबाबदार आहेत. त्यांनी ते काम पार पाडल्याचे त्यांचा लेखापरिक्षण अहवाल दि. १५ नोव्हेंबर, २०१७ यात नमूद केलेले आहे.

मी भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्यावतीने या कायद्याचे कलम १४३ (६) (अ) ज्याचे सहवाचन कलम १२९ (४) सोबत होते, त्यानुसार मराविमं सूत्रधारी कं.लि. च्या दि. ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रकाचे पूरक लेखापरिक्षण केले. आम्ही संपलेल्या वर्षाच्या तारखेला मराविमं सूत्रधारी कं.लि. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. मर्या, महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कं.मर्या. आणि महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या. (जोडपत्रकानुसार) त्यांच्या वित्तीय विवरणपत्रकांचे पूरक लेखापरिक्षण केले. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे व सांविधिक लेखापरिक्षक यांच्याकडील कामांसंबंधीचे कागदत्र न मिळविता करण्यात आले. आणि ते प्रामुख्याने सांविधिक लेखापरिक्षक व कंपनीचा कर्मचारी वृंद यांच्याकडे विचारणा व चौकशी करणे व लेख्यांच्या काही दस्तऐवजांचे निवडक परिक्षण करणे या मर्यादेत केले आहे.

माझ्या लेखापरिक्षणात अभिप्राय व्यक्त करण्याजोगी तसेच पूरक लेखा परिक्षणाच्या अहवालावर भाष्य करावे असे काहीही महत्वाचे माझ्या निदर्शनास आलेले नाही.

भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे करिता

सही/-

**पी.माधवी**

**महालेखापाल (लेखापरिक्षण - तीन)**

स्थळ : मुंबई

दिनांक : २८ डिसेंबर, २०१७

जोडपत्र - ४

## फॉर्म नं. एम्.आर - ३

### सेक्रेटरीयल ऑडीस रिपोर्ट
### ३१ मार्च २०१७ रोजीचे कलम २०४ (१) आणि कंपनीज (व्यवस्थापकीय कर्मचारी वृंदांच्या नेमणुका व परिश्रमिक नियमावली २०१४ यातील नियम क्र.९ यानुसार)

प्रति,
मा सदस्य,
म. रा. वि. मं. सूत्रधारी कंपनी मर्या,
हांगकॉग बॅक इमारत, ३ रा व ४ था माळ,
महात्मा गांधी, रोड, फोर्ट, मुंबई-४००००१
महाराष्ट्र, भारत

|---|---|---|---|---|---|
| जमीन भाडेपट्टीची | २ | ७.१० | २,०४५९,३४,४६८ | १,७१२,२६२,७७६ | विलेख हस्तांतरित करण्यासाठी कंपनीने कायदेशिर सोपस्कार पूर्ण करण्यासाठी योग्य कृती सुरू केली आहे. |
| जमीन मालकीची | ४ | १.८९ | ७०८,८८०,००० | ७०८,८८०,००० | |
| इमारत व रचना | १३ | उपलब्ध नाही | ११,८०५,२९९,९०४ | ८,७६९,१६१,६४६ | |

२. आम्हास दिलेली माहीती व स्पष्टिकरणे यानुसार यावर्षी कंपनी फक्त भाडेपट्टीच्या कामात गुंतलेली होती. त्यामुळे कंपनीने कोणत्याही वस्तूमाल सूची तयार केली नाही. परिणामी खंड (२) कंपनीला लागू होत नाही.

३. आम्हास दिलेली माहीती व स्पष्टिकरणे यानुसार, कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८९ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत समाविष्ट केलेल्या कंपन्या, फर्म्स किंवा इतर व्यक्ती संस्था यांना मराविम सुत्रधारी कंपनीने कोणतीही प्रतीभूती असलेली किंवा अप्रतीभूती असलेली कर्जे दिलेली नाहीत. त्यामुळे त्या संबधित खंड -३ (अ) व (ब) कंपनीस लागू नाहीत.

४. या कंपनीने, कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८५ आणि १८६ यात समाविष्ट असल्याप्रमाणे कोणतेही कर्जे किंवा हमी आणि प्रतिभूती दिलेली नाही. तसेच उपकंपन्यातील गुंतवणुकीसाठी कंपनी अधीनियम २०१३ च्या कलम १८५ व १८६ तील तरतुदींच्या पूर्तता या कंपनीने केलेली आहे.

५. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यानुसार कंपनीने जनतेकडून कोणत्याही ठेवी स्वीकारलेल्या नाहीत. म्हणून भारतीय रिझर्व बँकेचे निर्देश तसेच कंपनी अधिनियम २०१३ ची कलमे ७३ ते ७६ यातील किंवा अन्य कोणत्याही तरतुदी आणि त्या अंतर्गत तयार केलेल्या नियमावली लागू नाहीत. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यानुसार कंपनी कायदे किंवा राष्ट्रीय कंपनी लवाद कायदा किंवा भारतीय रिझर्व बँक किंवा अन्य कोणत्याही न्यायालय किंवा लवाद मंडळ यांनी यासंबधी कोणतेही आदेश या कंपनीवर बजावलेला नाही.

६. ही कंपनी उत्पादन, प्रक्रिया, निर्मिती आणि / किंवा तात्सम कार्ये यामध्ये गुंतलेली नसल्याने कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४८ यातील उपकलम (१) नुसार खर्चाचे अभिलेखन जतन करण्यासाठी शासनाने विहित केलेली नियमावली या कंपनीस लागू नाही. परिणामी संबधीत आदेशाचे खंड ३ (६) लागू होत नाही.

७. (अ) आम्हास दिलेली माहीती व स्पष्टिकरणे तसेच लेखा वह्याचे आमचे परिक्षण या आधारे ही कंपनी ज्याचा वाद नाही अशी सांविधिक देणी योग्य त्या प्रधिकाऱ्याकडे नियमीतपणे जमा करीत आहे. या देण्यांमध्ये पुढील बाबींचा समावेश होतो. भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर, विक्रीकर, सेवाकर, सिमा शुल्क, उत्पादन शुल्क, मूल्यवर्धीत कर, उपकर, लागू होणारी संविधिक देणी.

(ब) कंपनीचे अभिलेख आणि आम्हास दिलेली माहीती व स्पष्टिकरणे यानुसार दि. ३१ मार्च २०१७ रोजी कंपनीला देय असलेली वादग्रस्त आयकर, विक्रीकर, सेवाकर, सीमा व उत्पादन शुल्क किंवा मूल्यवर्धीत कर यांची माहीती खालील तक्त्यात दिली आहे :

| अनु क्र | सांविधिक देण्याचे | देण्याचे स्वरुप | रक्कम (रु.) मध्ये | देण्याचा कालावधी | वाद प्रलंबित असलेल्या मंचाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | आयकर कायदा १९६१ | दंड | ८४,७६,५२,८४७ | निर्धारण वर्ष २००७-०८ | आयकर आयुक्त (अपील्स) |
| २ | आयकर कायदा १९६१ | दंड | १,०३४,८१५,२०७ | निर्धारण वर्ष २००९-१० | आयकर आयुक्त (अपील्स) |
| ३ | आयकर कायदा १९६१ | कर व व्याज | ३९,६०१,५४० | निर्धारण वर्ष २०१०-११ | आयकर आयुक्त अपिल लवाद |
| ४ | आयकर कायदा १९६१ | कर व व्याज | ८,२४,९०,९१० | निर्धारण वर्ष २०११-१२ | आयकर आयुक्त अपिल लवाद |
| ५ | आयकर कायदा १९६१ | कर व व्याज | ७,२५,२५,०२० | निर्धारण वर्ष २०१२-१३ | आयकर आयुक्त (अपील्स) |
| ६ | आयकर कायदा १९६१ | कर व व्याज | ११,५८,९८,५६० | निर्धारण वर्ष २०१३-१४ | आयकर आयुक्त (अपील्स) |

८. कंपनीने वित्तीय संस्था किंवा बँकाकडून कोणतीही कर्जे घेतलेली नाहीत. तसेच ऋणपत्रे दिली नाहीत. मात्र, पूर्वीच्या म.रा.वि. मंडळाने काढलेल्या ऋणपत्राच्या बाबत हंगामी हस्तांतरण योजनेनुसार कंपनीला मिळालेल्या दायित्वाची निश्चिती कायम करण्यासाठी कंपनीच्या लेखा पुस्तकात नोंद नाही.हंगामी हस्तांतरण योजनेचे अंतिमीकरण दि. ३१ मार्च २०१६ रोजी शासन निर्णय क्र. रिफार्म २०१०/प्र.क्र. ११७/ ऊर्जा नुसार झाले. यात काही कसूर असेल तर त्यावर अभिप्राय आम्हास देता येत नाही.

९. आमच्या मते व आम्हास दिलेली माहीती व स्पष्टिकरणे यानुसार कंपनीने प्रारंभिक पब्लीक ऑफर व्दारे किंवा त्यानंतरच्या पब्लीक ऑफर व्दारे सार्वजनिकरित्या कोणताही निधी किंवा मुदतीची कर्जे उभारलेली नाहीत. परिणामी यासंबधीचा आदेश यातील खंड ३ (९) कंपनीला लागू नसल्याने अभिप्राय दिलेला नाही.

१०. लेखापरिक्षणाची सामान्यपणे स्वीकारलेल्या मानंकानुसार आम्ही लेखा वह्याचे परिक्षण केले त्या काळात तसेच आम्हाला दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यानुसार आम्हाला यावर्षी कोणतीही लबाडीची घटना निदर्शनास आली नाही. कंपनीनेही तसे कळविलेले नाही.

११. कंपनी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार, यांची अधिसूचना क्रमांक जी एस आर ४६३ (इ) दि. ५ जून, २०१५ यानुसार कायद्यातील कलम १९७ कंपनीस लागू नाही. त्यामुळे संबंधित आदेशाचे खंड ३ (११) कंपनीस लागू होत नसल्याने त्याविषयी अभिप्राय दिलेला नाही.

१२. आमच्या मते ही कंपनी 'निधी कंपनी' नाही. म्हणून निधी कंपनीसाठी असलेल्या आदेशातील खंड ३ (१२) यातील तरतुदी कंपनीस लागू होत नसल्याने त्यावर अभिप्राय दिलेला नाही.

१३. आम्ही पालन केलेली लेखापरिक्षणाची कार्यपध्दती आणि आम्हास दिलेली माहीती आणि स्पष्टिकरणे यानुसार कंपनी अधिनियम २०१३ यातील संबधित नातलग व्यक्ती व संस्था सोबत व्यवहार विषयीचे कलम १७७ व १८८ यांच्या तरतुदी जर लागू होत असतील तर त्याचे अनुपालन कंपनीने केले आहे. लागू होणाऱ्या भारतीय लेखा मानकांनुसार, नातलग व्यक्ती - संस्था सोबतच्या व्यवहाराविषयी तपशील कंपनीने वित्तीय विवरण पत्रकांमध्ये प्रकट केला आहे.

१४. आम्हाला देण्यात आलेल्या माहीती व स्पष्टीकरणानुसार आणि ताळेबंदाच्या आमच्या संपूर्ण परिसणाच्या आधारवर, कंपनीने आढाव्या वर्षामध्ये वाटप किंवा समभागाचे खाजगी वाटप केले आहे. कंपनीने आढाव्या वर्षामध्ये पूर्णत: किंवा अंशता परिवर्तनीय रोख्याचे अधिमान्य वाटप किंवा खाजगी वाटप केलेले नाही. कंपनीने अधिनियमातील कलम ४२च्या अवश्यकतांची पूर्तता केली आहे. आणि ज्या हेतूसाठी निधीच्या केला गेला त्यासाठी त्या रकमेचा वापर गेला आहे.

१५. आमच्या लेखापरिक्षणाची कार्यपध्दतीच्या आधारे आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यावरुन कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १९२ यात समाविष्ट केलेले संचालक किंवा यांच्यासोबतच्या व्यक्तीबरोबर कंपनीने कोणतेही विना रोखीचे व्यवहार केलेले नाहीत.

१६. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यानुसार रिझर्व बँक ऑफ इंडिया कायदा १९३४ चे कलम ४५ - आयए यानुसार कंपनीची नोंदणी करणे आवश्यक नसल्याने संबधित आदेशाचे खंड ३ (१६) कंपनीस लागू नाही.

**डुगर ॲड असोशिएट्स करिता**
सनदी लेखापाल - फर्म क्र. ०००५६१एन

सही /-
**मुकेश गोयल**
भागीदार
सदस्य क्र. ०८१८१०

स्थळ : मुंबई
दिनांक : १५/११/२०१७

# स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालाचे 'जोडपत्र क'

## कंपनी अधिनियम २०१३ (कायदा) यातील कलम १४३ चे उपक्रम ३ अंतर्गत खंड (१) नुसार अंतर्गत वित्तीय नियंत्रणे याबाबत अहवाल

आम्ही मराविमं सुत्रधारी कंपनी लि. या कंपनीचे दि. ३१ मार्च २०१७ या तारखेला संपलेल्या वर्षाय्या भारतीय लेखा मानकांनुसार लेखापरिक्षण करीत असताना त्या सोबत वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचेही लेखे परिक्षण पार पाडले.

**अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी :**

भारतीय सनदी लेखापाल शिक्षण संस्थेने वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणचे घटक नमूद केलेले आहेत. त्याचा विचार करून कंपनीने वित्तीय अहवाल देण्याचे निकष निश्‍चित केले असतात. त्याच्या आधारे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित करून प्रभावीरित्या त्यांचे संचालन करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असते. या जबाबदारीमध्ये पुढील कार्यांचा समावेश होतो :- अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे संकल्प चित्र तयार करणे, त्याची अंमलबजावणी करून प्रभावीरित्या त्यांचे प्रवर्तन करणे आणि त्यातून कंपनीच्या व्यावसायिक कृती शिस्तबद्ध रितीने व कार्यक्षमरित्या चालविणे आणि त्याचवेळी कंपनीच्या धोरणांना धरून वर्तन करणे, तिच्या मत्तांचे रक्षण करणे, लबाडी व चुका शोधणे व त्याला प्रतिबंध करणे, दस्तऐवज अचूक व परिपूर्ण ठेवणे आणि कंपनी अधिनियम २०१३ च्या आवश्यकतेप्रमाणे विश्वासार्ह वित्तीय माहिती वेळेवर तयार करणे.

**लेखा परिक्षकांची जबाबदारी :**

कंपनीच्या वित्तीय माहिती देण्यासाठी तिच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधी, आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे, मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. भारतीय सनदी लेखापाल शिक्षण संस्था यांनी अंतर्गत लेखा परिक्षणाची मार्गदर्शक टिपा आणि कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (१०) यात विनिर्देशित केलेली लेखा मानके यांचे दोन्हीचे विवरण केले आहे. ते कंपनीस ज्या मर्यादित लागू होते त्याप्रमाणे परिक्षण केले जातो. आम्ही नैतिक गरजेचे अनुपालन होईल अशा प्रकारे आमच्या लेखा परिक्षणाचे नियोजन करून कार्य पार पाडावे, जेणे करून त्यातून अंतर्गत वित्तीय नियंत्रणे ही वित्तीय माहितीसाठी योग्य व पुरेशी असल्याबद्दल आणि त्यांचे कार्य परिणामकारकरित्या चालू असल्याची खात्री मिळेल.

खाली 'अस्वीकार बाबतेची मत' या परिच्छेदात वर्णन केलेल्या मजकूराच्या कारणास्तव, आम्ही कंपनीच्या वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे याविषयी लेखापरिक्षणाचे मत देण्यासाठी आधार देतील असे योग्य व पुरेसे लेखापरिक्षणात्मक पुरावे आम्ही मिळवू शकलो नाही.

**वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यांचा अर्थ -**

कंपनीचे वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गतज वित्तीय नियंत्रणे या प्रक्रियेची रचना वित्तीय विश्वासार्हतेचे प्रमाणबद्ध - हमी मिळविण्यासाठी आहे. तसेच सर्वसाधारणपणे स्वीकारलेली लेखा तत्वे यांना सुसंगत अशी आणि बाह्य हेतूसाठी वित्तीय विवरणपत्रे तयार करणे हे सुद्धा यात अंतर्भूत आहे. कोणत्याही कंपनीचे वित्तीय माहिती देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यामध्ये पुढील बाबी समाविष्ट

असतात. १) अभिलेख योग्य तपशीलासह जतन करणे व त्यातून कंपनी मत्तांचे व्यवहार, विल्हेवाट इ. चे अचूक व रास्त दर्शन घडविणे. २) सर्वसाधारण स्वीकारलेल्या लेखा तत्वानुसार वित्तीय विवरणे तयार करण्यासाठी मान्यता देण्यासाठी आवश्यक असतील अशा प्रकारे व्यवहाराची नोंदणी करण्यात येते आणि कंपनीच्या प्राप्ती व खर्च हे व्यवस्थापनाने व संचालकांची प्राधिकृत केल्याप्रमाणेच होत आहेत याची हमी देणे आणि ३) वित्तीय विवरणपत्रात प्रत्यक्ष बाधक ठरू शकतील असे कंपनीच्या मत्तेच्या संबंधीच्या कृती - म्हणजे संपादन वापर किंवा विल्हेवाट इत्यादींना प्रतिबंध केला जातो किंवा ते वेळीच शोधता येतात याबद्दल योग्य हमी देणे.

**मत्तांचा अस्वीकार :**

आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने भारतीय लेखापाल संस्थेने वित्तीय माहिती देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे याविषयाच्या मार्गदर्शक टिपणीस नमूद केलेल्या निकषाचे किंवा आवश्यक घटकांच्यानुसार अंतर्गत वित्तीय नियंत्रणे अद्याप स्थापित केलेली नाही.

या कारणास्तव कंपनीमध्ये अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे आहेत किंवा कसे? आणि अशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे दि. ३१ मार्च २०१७ रोजी प्रभावीरित्या कार्यरत होती किंवा कसे? या विषयावर माझे / आमचे मत व्यक्त करण्यासाठी पुरेसे योग्य लेखा परिक्षणात्मक पुरावे आम्हास मिळवत आले नाहीत.

आम्ही दिलेले अस्वीकार विधान आम्ही विचारात घेऊन लेखापरिक्षणाचे स्वरूप, वेळ आणि मर्यादा निश्चित केल्या. आमच्या लेखा परिक्षणात्मक कसोट्या लागू करून कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्राचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे आणि हे अस्वीकार विधान कंपनीच्या एकच वित्तीय विवरणपत्रावरील आमच्या मतांना बांधक होत नाही.

**डुगर अँड असोशिएटस् करिता,**
सनदी लेखापाल
फर्म क्र.०००५६१एन

सही/-
**मुकेश गोयल**
भागदार
सदस्य क्र. ०८१८१०

स्थळ : मुंबई
दिनांक : १५.११.२०१७

# जोडपत्र ब - अहवालातील परिच्छेह ८.२ यांत संदर्भ दिल्याप्रमाणे, कंपनी अधिनियमाचे कलम १४३ यातील उपक्रम (५) नुसार आमच्या नियंत्रक आणि भारतातील महालेखापरिक्षकाने दिशानिर्देश केलेल्या निर्देशांवर आमचा अहवाल

कायदयाच्या कलम १४३ च्या उपकलम ५ नुसार भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षकाने दिलेले निर्देश आणि कंपनीच्या पुस्तके आणि नोंदी अशा तपासणीच्या आधारावर आपण योग्य मानले आणि त्यानुसार आम्हाला दिलेली माहिती आणि स्पष्टीकरण, आम्ही दिलेल्या निर्देशांमध्ये नमुद केलेल्या गोष्टींवर एक निवेदन देतो.

**कंपनी अधिनियमाचे कलम १४३ यांतील उपक्रम (५) नुसार निर्देश**
**लेखा परिक्षकांचे अभिप्राय**

| अ.क्र. | निर्देश | उत्तरे |
|---|---|---|
| १ | पूर्ण मालकीच्या व भाडेपट्टीच्या जमिनीच्या नावाच विलेखे / करार कंपनीकडे आहेत किंवा कसे ? असा विलेख भाडेपट्टी करार नावांवर नसल्यास अनुक्रमे मालकीच्या व भाडेपट्टीच्या जमिनीचे क्षेत्रफळ नमूद करावे. | आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यानुसार कंपनीच्या अचल संपत्तीचे नामकरणाचे विलेख अद्याप कंपनीकडे नाहीत. कारण अशा मत्ता हंगामी हस्तांतरण योजनेद्वारे कंपनीकडे हस्तांतरीत झाल्या होत्या. या योजनेचे अंतिमीकरण, शासन निर्णय क्र. रिफार्म / २०१०/ प्र. क्र.११७/उर्जा नुसार दि.३१ मार्च २०१६ रोजी झाले. ज्या मालकीच्या व भाडेपट्टी वरील जमिनीच्या क्षेत्रफळाचा तपशील उपलब्ध नाही. त्याचा तपशील सोबतच्या जोडपात्र १ मध्ये (खाली) दिलेला आहे. |
| २ | कर्जे / ऋणे / व्याज इ. सोडून देण्याची /निर्लेखित करण्याची काही प्रकरणे आहेत. किंवा कसे ? असल्यास त्यांची कारणे व त्यांच्या रकमा यांची माहिती द्यावी. | आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहीती व स्पष्टकरणे यानुसास कर्जे / ऋण / उसनवारी / व्याज र. सोडणे / निर्लेखित करणे या विषयीची अन्य कोणतीही प्रकरणे नाहीत. |
| ३ | तिसऱ्या पक्षाकडे असलेल्या वस्तू सूची / माल यांचे योग्य अभिलेख जतन केले आहेत काय किंवा कसे? तसेच शासन किंवा अन्य प्राधिकारी संस्थाकडून मत्ता भेट / अनुदानाच्या स्वरुपात मिळाल्या त्याचे अभिलेख आहेत का? | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टिकरणे यानुसार तिसऱ्या पक्षांकडे कोणताही वस्तूमाल ठेवलेला नाही. तसेच शासन किंवा अन्य प्राधिकाऱ्याकडून कोणतीही मत्ता, भेटी / अनुदानाच्या स्वरुपात मिळालेल्या नाहीत. |

## जोडपत्र - १ (जोडपत्र 'ब' च्या परिच्छेद क्र. १ यानुसार)

**(रक्कम रु. मध्ये)**

| मत्तेचे वर्णन | प्रकरणांची सरता | क्षेत्रफळ एकरमध्ये | ३१/०३/१७ रोजीचा ठोक गट (रु) | ३१/०३/१७ रोजी निव्वळ गट (रु) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| जमीन भाडेपट्टीची | २ | ७.१० | २,०४५,९३४,४६८ | १,७१२,२६२,७७६ | विलेख हस्तांतरित करण्यासाठी कंपनीने कायदेशीर सोपस्कार पूर्ण करण्यासाठी योग्य कृती सुरू केली आहे. |
| जमीन मालकीची | ३ | १.८९ | ७०८,८८०,००० | ७०८,८८०,००० | |
| इमारत व रचना | १३ | उपलब्ध नाही | ११,८०५,२९९,९०४ | ८,७६९,१६१,६४६ | |

## जोडपत्र 'ब' विभागांसाठी निश्चित 'उप' निदेश

| | लेखापरिक्षकांचे अभिप्राय | |
|---|---|---|
| अ.क्र. | उप निदेश | उत्तरे |
| १ | मिळालेल्या व्यापारी येण्यातील शिल्लकी, देय रकमा, मुदतीच्या ठेवी, बँकखाती व रोखप्राप्ती या कायम केल्याबद्दल अभिप्राय द्यावेत. | खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे |
| २ | केंद्र / राज्य शासन यांच्याकडून तसेच काही विशिष्ट कामासाठी इतर संस्थाकडून मिळालेली अनुदाने /अर्थसहाय्य यांच्या विचलनाच्या प्रकरणांची माहिती द्यावी. | चालु वर्षी कंपनीला केंद्र / राज्य शासन यांच्याकडुन तसेच काही विशिष्ठ कामासाठी इतर संस्थांकडुन कोणतेही अनुदान मिळालेले नाही. मात्र मागील काही वर्षाकरिता रु. ५७,४६,१७० (व्याजासह) अद्याप देय आहेत. आम्हास दिलेल्या माहितीनुसार याचा दावा करणारे सापडत नसल्याने त्या रक्कम अद्याप देय आहेत. |

# अनुक्रमांक १ मध्ये उल्लेख केलेल्या माहितीचा तक्ता

| अ.क्र. | तपशील | मिळालेली निश्चित (% टक्केवारी मध्ये) |
|---|---|---|
| १ | व्यापारी येणी | ०.००% |
| २ | व्यापारी देणी (आंतर कार्यालयीन देण्याव्यतिरिक्त) | ०.००% |
| ३ | व्यापारी देणी (आंतर कार्यालयीन देणी) | ०.००% |
| ४ | मुदतीच्या ठेवी | १००% |
| ५ | बँक खाती (चालू खाती) | १००% |

**डुगर अँड असोशिएट्स करिता,**
सनदी लेखापाल
फर्म क्र. ०००५६१ एन

सही /-
**मुकेश गोयल**
भागीदार
सदस्य क्र. ०८१८१०

स्थळ : मुंबई
दिनांक :१५.११.२०१७

# भारताचे लेखा नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (बी) यानुसार मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड च्या दि. ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणापत्रावर दिलेले अभिप्राय :

म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी लिमिटेड, मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाची, कंपनी अधिनियम २०१३ यात विहीत केलेल्या आकृतीबंधानुसार एकल वित्तीय विवरणपत्रके तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखा नियंत्रक व महा लेखापरिक्षक यांनी कायद्याच्या कलम १३९ (५) नुसार नियुक्त केलेले सांविधिक लेखापरिक्षक हे या कायद्याच्या कलम १४३ नुसार स्वतंत्र आणि कायद्याच्या कलम १४३ (१०) यात विहित केलेल्या लेखापरिक्षणाच्या मानकांनुसार या वित्तीय विवरणपत्रावर अभिप्राय व्यक्त करण्यास जबाबदार आहेत. त्यांनी तसे केल्याचे त्यांच्या दि. १५ नोव्हेंबर, २०१७ च्या लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेले आहे.

मी, भारताचे लेखानियंत्रक व महालेखा निरीक्षक यांच्यावतीने मराविमं सूत्रधारी कंपनी लिमिटेडच्या दि. ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रकाचे पूरक लेखापरिक्षण, कायद्यातील कलम १४३ (६) (अ) नुसार केले. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे आणि सांविधिक लेखापरिक्षक यांचेकडील कागदपत्रे न मिळविता करण्यात आलेले आहे. ते प्रामुख्याने सांविधिक लेखापरिक्षक यांचेकडे व कंपनीच्या कर्मचारी वृंदाकडे विचारणा करणे आणि लेख्यांच्या निवडक दस्तऐवजांचे परिक्षण करणे या मर्यादेत करण्यात आलेले आहे.

माझ्या लेखापरिक्षणाच्या आधारानुसार, सांविधिक लेखापरिक्षकांचे अहवालावर अभिप्राय देणे उद्‌भवले किंवा त्यास पूरक ठरेल असे काहीही महत्वाचे माझ्या माहितीमध्ये आढळून आलेले नाही.

**भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्यावतीने,**
**सही/-**
**पी. माधवी**
**महालेखापाल (लेखापरिक्षण - तीन)**

स्थळ : मुंबई
दिनांक : २८ डिसेंबर, २०१७

# मराविमं सुत्रधारी कंपनीच्या दि. ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाचा ताळेबंद (स्वायत्त)

**(रक्कम रु. मध्ये)**

| | तपशील | टिपा क्र. | ३१मार्च २०१७ रोजी | ३१मार्च २०१६ रोजी | ३१मार्च २०१५ रोजी |
|---|---|---|---|---|---|
| | **मत्ता** | | | | |
| (१) | **चालू नसलेला मत्ता** | | | | |
| a | मालमत्ता, कारखाना व यंत्रसामग्री | ७ | २,४८६,९९७,१२५ | २,५२१,१७२,७६६ | २,५५४,२३५,२७९ |
| b | प्रगतीपथांवरील भांडवली कामे | ७ | - | १०,६७३,६७३ | १७,२२६,११४ |
| c | मालमत्तेमध्ये गुंतवणूक | ८ | ८,७६९,१६१,६४६ | ९,१७८,८०७,२१८ | ९,५९६,५८३,५२५ |
| d | ख्याति मुल्य | | - | - | - |
| e | इतर अमूर्त मत्ता | | - | - | - |
| f | विकसनशील अमूर्त मत्ता | | - | - | - |
| g | जैविक मत्ता, यंत्रसंच वगळून | | - | - | - |
| h | वित्तिय मत्ता | | - | - | - |
| | (i) गुंतवणूक | ९ | ८१०,२९७,३५७,६३९ | ८०३,३५९,४६४,२५० | ७९२,५२९,७६४,२६२ |
| | (ii) व्यापारीयेणी | | | - | - |
| | (iii) कर्जे | | | - | - |
| | (iv) इतर (निर्दिष्ट करणे) | | | - | - |
| i | स्थगित कर मत्ता (निव्वळ) | | | - | - |
| j | इतर चालू नसलेल्या मत्ता | १० | ३८,६०१,११३,९३८ | ३८,६३४,०९२,४८३ | ४०,२७७,६००,९०१ |
| (२) | **चालू मत्ता** | | | | |
| a | वस्तू सूची | | - | - | - |
| b | वित्तिय मत्ता | | | | |
| | (i) गुंतवणूक | - | - | - | |
| | (ii) व्यापारीयेणी | ११ | २,३५२,२०१,३२४ | २,०९६,२८४,७०५ | २,११४,१४३,७०९ |
| | (iii) रोख व रोखी सममूल्य | १२ | ३८९,१९८,९४७ | ४६९,६११,४०० | ५५,१४८,१४४ |
| | (iv) बँकेतील शिल्लक वरील (iii) वगळून | | - | - | - |
| | (v) कर्जे | | - | - | - |
| | (vi) इतर | | - | - | - |
| c | चालू कर मत्ता (निव्वळ) | | - | - | - |
| d | इतर चालू मत्ता | १३ | १२,६२३,४९८ | १६,४७२,४७६ | १७,८८६,६८५ |
| | विक्री योग्य मत्ता/विक्रीसाठी आयोजित विनियोग वर्गवारी मध्ये अंतर्गत करण्यात आलेली मत्ता | | - | - | - |
| | **एकुण मत्ता** | | **८६२,९०८,६५४,११७** | **८५६,२८६,५७८,९७१** | **८४७,१६२,५८८,६१९** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **समभाग व दायित्वे** | | | | |
| | **समभाग** | | | | |
| a | समभाग भांडवल | १४ | ८७३,९२७,५२०,६३० | ८६२,९९७,७२०,६३० | ८४८,७१०,०५७,६३० |
| b | इतर समभाग | १५ | -१४,०७९,१९७,८७० | -९,७६३,८९०,०८३ | -६,०९१,८७६,१०१ |
| | **दायित्वे** | | | | |
| (१) | **चालू नसलेली दायित्वे** | | | | |
| a | वित्तिय दायित्वे | | | | |
| | (i) उसनवारी | | - | - | - |
| | (ii) व्यापारी देणी | १६ | २२,८२३ | २२,८२३ | २२,८२३ |
| | (iii) इतर वित्तिय दायित्वे रकाना (b) मध्ये दर्शविलेल्या व्यतिरिकत | | - | - | - |
| b | तरतूदी | १७ | ४४,७९४,९४० | ५६,९२७,२२६ | ५८,२१७,१२५ |
| c | स्थगित कर दायित्वे (निव्वळ) | १८ | - | - | १०९,१४४,४३३ |
| d | इतर चालू नसलेली मत्ता | | - | - | |
| (२) | **चालू दायित्वे** | | | | |
| a | वित्तिय दायित्वे | | | | |
| | (i) उसनवारी | - | - | - | |
| | (ii) व्यापारी देणी | | - | - | - |
| | (iii) इतर वित्तिय दायित्वे रकाना (c) मध्ये दर्शविलेल्या व्यतिरिकत | | - | - | - |
| b | इतर चालू दायित्व | १९ | २,९७८,०१०,९८२ | २,९७६,०३९,०२९ | ४,३५४,२५४,४९९ |
| c | तरतूदी | २० | ३७,५०२,६१२ | १९,७५९,३४६ | २२,७६८,२१० |
| d | इतर चालू दायित्वे | | | | |
| | विक्रीसाठी वर्गवारी केलेली दायित्वे / विक्रीसाठी आयोजित विनियोग वर्गावारी मध्ये अंतभूर्त करण्यात आलेली दायित्वे | | - | - | - |
| | **एकूण दायित्वे व समभाग** | | **८६२,९०८,६५४,११७** | **८५६,२८६,५७८,९७१** | **८४७,१६२,५८८,६१९** |
| | महत्वाची लेखा धोरणे व लेख्यावरील टीपा | १-६ | | | |
| | लेख्यावरील टीपा | ७-३७ | | | |

आमच्या समान तारखेच्या अहवालानूसार

| | | |
|---|---|---|
| **डुगर अँड असोशिएट्स करिता,** | **जयकुमार श्रीनिवासन** | **अरविंद सिंह** |
| सनदी लेखापाल | संचालक (वित्त) व | व्यवस्थापकीय संचालक |
| संस्था नोंदणी क्रमांक ०००५६१ एन | मुख्य वित्त अधिकारी | |
| सही /- | **पंकज शर्मा** | **सुबोध झारे** |
| **मुकेश गोयल** | मुख्य महाव्यवस्थापक (वि.) | कंपनी सेक्रेटरी |
| **भागीदार** | | |
| सदस्यता क्र. ०८१८१० | | |

ठिकाण : मुंबई
दिनांक : १५/११/२०१७

# ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा तोटा पत्रक

**(रक्कम रु. मध्ये)**

| | तपशील | टिपा | ३१मार्च २०१७ रोजी | ३१मार्च २०१६ रोजी |
|---|---|---|---|---|
| | **प्रवर्तनापासूनचा महसूल** | | - | - |
| (ii) | इतर उत्पन्न | २१ | ४२७,७५१,७८४ | ४१२,२१८,६३७ |
| | **एकुण महसूल (i) + (ii)** | | **४२७,७५१,७८४** | **४१२,२१८,६३७** |
| | | | | |
| | **खर्च** | | | |
| (i) | वापरलेल्या साहित्याचे खर्च | | - | - |
| (ii) | व्यापारातून माल खरेदी | | - | - |
| (iii) | तयारमालाची वस्तूसूची, प्रगतीपथावरील कामे व साठयातील बदल | | - | - |
| (iv) | कर्मचारी लाभ | २२ | ७०,९१२,१६७ | ६८,८९५,५५२ |
| (v) | वित्तिय खर्च | | - | - |
| (vi) | घसारा व ऋणमुक्ती खर्च | २३ | ४६०,८०१,९७६ | ४६०,५३९,९३८ |
| (vii) | इतर खर्च | २४ | २५०,१२७,२३३ | २६७,४३०,५९१ |
| II | **एकुण खर्च (I ते vii)** | | **७८१,८४१,३७६** | **७९६,८६६,०८१** |
| III | **नफा / (तोटा) असाधारण बाबी व कर यापूर्वीचा (II-I)** | | -३५४,०८९,५९२ | -३८४,६४७,४४४ |
| IV | असाधारण बाबी | | | |
| V | **नफा / (तोटा) करपूर्व (III - IV)** | | **-३५४,०८९,५९२** | **-३८४,६४७,४४४** |
| VI | कर खर्च: | | | |
| | (१) चालू कर | | | ९३,६३१,५६० |
| | (२) स्थगित कर | | | -१०९,१४४,४३३ |
| | (३) मागील वर्षाचा कर | | ३३,९८७,६५९ | - |
| VII | **नफा / (तोटा) प्रवर्तन सूरु असलेल्या काळासाठी (V-VI)** | | **-३२०,१०१,९३३** | **-३६९,१३४,५७१** |
| VIII | **नफा / (तोटा) प्रवर्तन बंद झालेल्या काळासाठी** | | - | - |
| IX | बंद झालेल्या प्रवर्तनावरील कर खर्च | | - | - |
| X | **नफा / (तोटा) प्रवर्तन बंद झाल्यापासून करोत्तर (VII-IX)** | - | - | - |
| **XI** | **नफा (तोटा) या कालावधीतील** | | **-३२०,१०१,९३३** | **-३६९,१३४,५७१** |
| XII | **इतर सर्वसमावेशक उत्पन्न** | | | |
| (A) | (i) नफा किंवा तोटया मध्ये पूर्नवर्गीकरण न केलेल्या बाबी | | | - |
| | (ii) बाबीवरील आयकर ज्याचे नफा किंवा तोटा पत्रकत | | | |
| | पूर्नवर्गीकरण केलेले नाही | | | |
| | **उपबेरीज (अ)** | | | **-** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (B) | (i) नफा किंवा तोटा पत्रकात पुर्नवर्गीकण करण्यात आलेल्या बाबी | | -३,२९९,२४३ | ५,६७७,१८१ |
| | (ii) नफा किंवा तोटा पत्रकात पुर्नवर्गीकरण केलेल्या बाबीवरील आयकर | | | |
| | **उपबेरीज (ब)** | | **-३,२९९,२४३** | **५,६७७,१८१** |
| XIII | **इतर सर्वसमावेशक उत्पन्न (A+B)** | | **-३,२९९,२४३** | **५,६७७,१८१** |
| XIV | **या कालावधीतील एकुण सर्वसमावेशक उत्पन्न (XI + XIII)** | | **-३२३,४०१,१७६** | **-३६३,४५७,३९०** |
| XV | **प्रतिभाग मिळकत (प्रर्वतन सूरु असलेल्या काळातील)** | | | |
| | मूळ (रु.) | | -०.००४ | -०.०४ |
| | सौम्यकृत (रु.) | | -०.००४ | -०.०३ |
| | **प्रतिभाग मिळकत (प्रवर्तन बंद असलेल्या कालावधीतील)** | | - | - |
| | मूळ (रु.) | | - | - |
| | सौम्यकृत (रु.) | | - | - |
| | **प्रतिभाग मिळकत (प्रवर्तन सुरु आणि बंद असलेल्या कालासाठीं)** | | | |
| | मूळ (रु.) | | -०.००४ | -०.००४ |
| | सौम्यकृत (रु.) | | -०.००४ | -०.००४ |
| | महत्वाची लेखाधोरणे | | १-६ | |
| | लेख्यांवरील टीपा | | ७-३७ | |

आमच्या समान तारखेच्या अहवालानूसार

**डुगर अँड असोशिएट्स करिता,**
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रमांक ०००५६१ एन

सही /-
**मुकेश गोयल**
**भागीदार**
सदस्यता क्र. ०८१८१०

ठिकाण : मुंबई
दिनांक : १५/११/२०१७

**जयकुमार श्रीनिवासन**
संचालक (वित्त) व
मुख्य वित्त अधिकारी

**अरविंद सिंह**
व्यवस्थापकीय संचालक

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (वि.)

**सुबोध झारे**
कंपनी सेक्रेटरी

# ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाचे रोकडता प्रवाह विवरणपत्र

**(रक्कम रु. मध्ये)**

| तपशील | २०१६-१७ | | २०१५-१६ | |
|---|---|---|---|---|
| **अ) प्रवर्तन कार्यापासूनचा रोकड प्रवाह** | | | | |
| करपूर्व निव्वळ नफा | | (३५४,०८९,५९२) | | (३८४,६४७,४४४) |
| **समायोजन खालील बाबींची:** | | | | |
| घसारा | ४६०,८०१,९७६ | | ४६०,५३९,९३८ | |
| व्याजाचे उत्पन्न | ३३,९२९,८५५ | | (२७,६४७,५७६) | |
| मागील वर्षाचेकर | ३३,९८७,६५९ | | | |
| व्याज खर्च | - | ५२८,७१९,४९० | - | ४८८,१८७,५१४ |
| खेळात्या भांडवलातील बदलापूर्वीचा प्रवर्तनापासूनचा नफा | | १७४,६२९,८९८ | | १०,३५,४०,०७० |
| **समायोजनाच्या बाबी :-** | | | | |
| राखीव मध्ये वाढ/(घट) | -३,२९९,२४३ | | ५४,९८३,५८९ | |
| इतर दीर्घ मुदती दायित्वांची वाढ/(घट) | - | | - | |
| दीर्घ मुदतीच्या तरतुदींची वाढ/(घट) | (१२,१३२,२८६) | | (१,२८९,८९९) | |
| इतर चालू दायित्वातील वाढ/(घट) | १,९७१,९५३ | | (१,३७८,२१५,४७०) | |
| अल्प मुदतीच्या तरतुदींची वाढ/(घट) | १७,७४३,२६६ | | (३,००८,८६४) | |
| स्थगित कर दायित्वातील वाढ/(घट) | - | | - | |
| इतर चालू नसलेल्या मत्तांची वाढ/(घट) | ३२,९७८,५४५ | | १,६४३,५०८,४१८ | |
| अल्प मुदतीची कर्जे व अग्रीमे यांत वाढ/(घट) | - | | - | |
| इतर चालु मत्ता यामधील वाढ/(घट) | ३,८४८,९८३ | | १,४१४,२०९ | |
| व्यापारी येणी यात वाढ/(घट) | (२५५,९१६,६१९) | (२१४,८०५,४०१) | १७,८५९,००४ | ३३५,२५०,९८७ |
| **प्रवर्तनातून रोकड निर्मिती** | | **(४०,१७५,५०३)** | | **४३८,७९१,०५७** |
| वजा - भरलेले कर (परतावे - निव्वळ) | | | (९३,६३१,५६०) | |
| | | - | | (९३,६३१,५६०) |
| असाधारण बाबीपुर्वी रोकडता प्रवाह | | (४०,१७५,५०३) | | ३४,५१,५९,४९७ |
| अधिक / वजा असाधारण बाबी- | | | | |
| **प्रवर्तनाच्या कार्यापासूनची नक्त रोकड (अ)** | | **(४०,१७५,५०३)** | | **३४,५१,५९,४९७** |
| **(ब) गुंतवणूक कार्यातून रोकड प्रवाह** | | | | |
| स्थीर मत्ता खरेदी व प्रगतीपथावरील भांडवली | (६,३०७,०९५) | | (३,१४८,६७७) | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कामातील भर | | | | |
| स्थीर मत्ता विक्री | - | | - | |
| चालू नसलेल्या गुंतवणूकीची खरेदी | (६,९३७,८९३,३८९) | | (१०,८२९,६९९,९८८) | |
| मिळालेले व्याज (टीडीएसचे निव्वळ) | (३३,९२९,८५५) | | (२७,६४७,५७६) | |
| मुदत पूर्ण झालेल्या ठेवी | - | | - | |
| **गुंतवणूक कार्यासाठी वापरलेली रोकड (ब)** | | (६,९७८,१३०,३३९) | | (१०,८६०,४९६,२४१) |
| **(क) वित्तीय कार्यापासूनची रोकड प्रवाह** | | | | |
| (वाटप प्रलंबित असणाऱ्या शेअर ॲप्लीकेशन पासूनचे प्राप्ती) | - | ६,९३७,८९३,३८९ | | |
| वाटपासाठी प्रलंबित असलेला भाग अर्जनिधी | | | १०,९२९,८००,००० | |
| भरलेले व्याज | - | | - | |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या व्याजात वाढ | | | | |
| नफा व तोटा पत्रकातील आकारलेले व्याज | | | - | |
| व्याजामुळे इतर चालू दायित्वातील घट | - | | - | |
| | - | | - | |
| **वित्तीय कार्यापासूनची रोकड (क)** | | - | | १०,९२९,८००,००० |
| **रोख व रोख सममूल्य यातील निव्वळ वाढ (अ+ब+क)** | | **(८०,४१२,४५३)** | | **४१४,४६३,२५६** |
| **मुदतीच्या आरंभीची रोकड व रोकड सममूल्य** | | **४६९,६११,४००** | | **५५,१४८,१४४** |
| **मुदतीच्या अखेरीस रोकड व रोकड सममूल्य** | | **३८९,१९८,९४७** | | **४६९,६११,४००** |

**तळटिप :**

१) भारतीय लेखामानक - ७ - रोकडता प्रवाह विवरण पत्र - यातील अप्रत्यक्ष पद्धतीनुसार रोकडता प्रवाह तयार केला आहे.

२) वित्तीय विवरणपत्रात समावेश असणाऱ्या रोख व रोख सममुल्य खालीलप्रमाणे

| रोख व रोख सममुल्य | ३१.०३.२०१७ रोजी | ३१.०१.२०१६ रोजी |
|---|---|---|
| - चालु खात्यातील शिल्लक | ३०७,०७२ | ५६८,९६९ |
| - हातातील धनादेश | - | - |
| - मुदतीच्या ठेवींमधील शिल्लक (३ महिन्यापेक्षा कमी) | - | - |
| - मुदतीच्या ठेवींमधील शिल्लक (३ महिन्यापेक्षा जास्त पण १२ महिन्यापेक्षा कमी) | ३८८,८९१,८७५ | ४६९,०४२,४३१ |
| **एकूण** | **३८९,१९८,९४७** | **४६९,६११,४००** |

आमच्या समान तारखेच्या अहवालानूसार

**डुगर अँड असोशिएट्स करिता,**
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रमांक ०००५६१ एन

**जयकुमार श्रीनिवासन**
संचालक (वित्त) व
मुख्य वित्त अधिकारी

**अरविंद सिंह**
व्यवस्थापकीय संचालक

सही /-
**मुकेश गोयल**
**भागीदार**
सदस्यता क्र. ०८१८१०

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (वि.)

**सुबोध झारे**
कंपनी सेक्रेटरी

ठिकाण : मुंबई
दिनांक : १५/११/२०१७

# मरविमं सुत्रधारी कंपनी मर्यादित
## समभाग बदलाचे विवरणपत्र
## भाग-१-ताळेबंद - ३१मार्च, २०१७ या कालावधीसाठी समभाग बदलाचे विवरणपत्र
### अ. समभाग भांडवल

| तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|
| १ एप्रिल २०१५ रोजी | ८३,८५२,९५९,००० |
| वित्तिय पुनर्रचने मूळे वाटप केलेले भाग भांडवल | ७६४,८५७,०९८,६३० |
| १ एप्रिल, २०१५ रोजी पुनर्रचित शिल्लक | ८४८,७१०,०५७,६३० |
| भाग भांडवल वाटप | १४,२८७,६६३,००० |
| ३१ मार्च २०१६ रोजी | ८६२,९९७,७२०,६३० |
| भाग भांडवल वाटप | १०,९२९,८००,००० |
| ३१ मार्च २०१७ रोजी | ८७३,९२७,५२०,६३० |

### ब. इतर समभाग
### ३१ मार्च २०१६ रोजी

| तपशील | वाटपासाठी प्रलंबित असलेला भाग अर्ज निधी | समभाग घटकासाठी जोड वित्तिय साधने | राखीव व आधिक्य | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | भांडवली राखीव | प्रतिभूती अधिमूल्य राखीव | इतर राखीव | राखून ठेवलेली कमाई |
| **१ एप्रिल २०१५ रोजीची शिल्लक** | **९६,८२९,१८९,२४०** | - | **२,६५०,२२८,९६८** | - | **१,६४०,३०३** | **-४१,१०४,५८४,७४८** |
| लेखा धोरण बदल / पूर्व कालावधी त्रुटीमध्ये बदल | ६८२,३१५,५७२,३९० | - | -२,६५०,२२८,९६८ | - | -१,६४०,३०३ | २०,७२५,०४५,६४७ |
| वर्षा दरम्यान वाटप केलेले समभाग | ७६४,८५७,०९८,६३० | | | | | |
| अहवाल कालावधीच्या सुरुवातीस पूर्वस्थित शिल्लक | १४,२८७,६६३,००० | - | - | - | - | -२०,३७९,५३९,१०१ |
| वर्षासाठी नफा | - | - | - | - | - | -३१९,८२८,१६३ |
| वर्षासाठी इतर व्यापक उत्पन्न | - | - | - | - | - | ५,६७७,१८१ |
| लाभांश | - | - | - | - | - | - |
| राखुन ठेवलेली कमाईचे हस्तांतर | - | - | - | - | - | - |
| वर्ष कालावधीमध्ये प्राप्त भाग अर्ज निधी | १०,९२९,८००,०००.०० | | | | | |
| वर्षामध्ये वाटप केलेले भाग | १४,२८७,६६३,०००.०० | - | - | - | - | - |
| **३१ मार्च २०१६ रोजी शिल्लक** | **१०,९२९,८००,०००** | - | - | - | - | **-२०,६९३,६९०,०८३** |

परिभाषित लाभ योजकांचे पुनर्मोजणी आणि नफा किंवा तोटा द्वारे वाजवी मुल्यानुसार नियुक्त केलेल्या वित्तिय दायित्वाचे स्वत:च्या पत जोखीमीशी संबंधित निष्पक्ष मुल्य बदल टिपा-३ मधील संबंधित रकमेसह अशा वस्तुंच्या वेगवेगळ्या प्रकटनासह कायम राखल्या जाण्याऱ्या कमाईचा एक भाग म्हणून ओळखले जाईल.

## ३१ मार्च २०१७ वर्षासांठी

| तपशील | समभाग वाटप प्रलंबित असलेला भाग अर्ज निधी | संमिश्र वित्तीय साधनांचा समभाग घटक | राखीव अधिपत्र | | | राखून ठेवलेली |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | भांडवली राखीव | प्रतिभूती अधिक राखीव | इतर राखीव (गुणधर्म निर्दिष्टकरीता) | |
| **१ एप्रिल २०१६ रोजीची शिल्लक** | **१०,९२,९८,००,०००** | - | - | - | - | **-२०,६९,३६,९०,०८३** |
| लेखा धोरणातील बदल / पूर्व काळातील त्रुटी | - | - | - | - | - | - |
| अहवाल कालावधीच्या सुरूवातीस तात्पुरते संतुलन | - | - | - | - | - | -२०,६९,३६,९०,०८३ |
| वर्षासाठीचा नफा | - | - | - | - | - | -३२,०१,०१,९३३ |
| इतर सर्व समावेशक उत्पन्न वर्षासाठी | - | - | - | - | - | -३२,९९,२४३.०० |
| लाभांश | - | - | - | - | - | - |
| वर्षादरम्यान प्राप्त झालेला भाग अर्ज निधी | ६,९३,७८,९३,३८९ | - | - | - | - | - |
| वर्षामध्ये वाटप केलेले समभाग | १०,९२,९८,००,००० | - | - | - | - | - |
| **३१ मार्च २०१७ रोजीची शिल्लक** | **६,९३,७८,९३,३८९** | - | - | - | - | **-२१,०१,७०,९१,२५९** |

२. विद्युत अधिनियम २००३ च्या अध्याय XII नुसार मरावि मंडळाच्या पुनर्रचनेसाठी महाराष्ट्र राज्य शासनाच्या निर्णयानुसार ३१.०५.२००५ पासून मराविमं सुत्रधारी कंपनी मर्यादितची स्थापना करण्यात आली. तिच्या ३ उपकंपन्या असून त्यांची नावे अशी, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं.मर्या, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.मर्या. व महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्या. ६ जून २००५ पासून महाराष्ट्र शासनाच्या ''हंगामी हस्तांतरण योजने''च्या अनुसार कंपनीने आपले कामकाज सुरू केले. ''हंगामी हस्तांतरण योजना'' ही एक अशी योजना होती ज्या अंतर्गत सर्व ३ उपकंपन्या आणि त्या कंपन्या पूर्वीच्या मरावि मंडळापासून अस्तित्वात आल्या. ह्या योजनेला अंतिम स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ३१ मार्च २०१६ रोजी वित्तीय पुनर्रचना योजनेला मंजुरी देऊन हंगामी हस्तांतरण योजनेला अंतिम स्वरूप देण्यात आले, तसे अधिसूचना क्र. २०१०/प्र.क्र.११७/उर्जा-३ नुसार अधिसूचित करण्यात आली. ही योजना वित्तीय वर्ष २०१६ मध्ये ५ जून २००५ पासून पूर्वलक्षी प्रभावाने अंमलात आणली.

**वित्तीय पुनर्रचना योजनेची ठळक वैशिष्ट्ये :**

अ) महाराष्ट्र शासनाने राखून ठेवलेल्या अधिकाराचा वापर करून मूळ हंगामी हस्तांतर योजना अंतिम करण्यासाठी खालील समायोजन केले.

१) आतापर्यंत मरावि मंडळाच्या अखत्यारित असलेल्या मालमत्ता व दायित्वाचे ४ जून २००५ रोजीच्या अधिसूचना क्र. रिफॉर्म/१००५/सीआर-९०६१/उर्जा - ५ नुसार महाराष्ट्र शासनाला हस्तांतरण केले व ५ जून २००५ रोजी सदर मत्ता व दायित्वे हस्तांतरणकर्त्यांना प्रचलित बाजार मूल्यानुसार हस्तांतर करण्यात आल्या. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्र. रिफॉर्म/२०१०/प्र.क्र.११७/उर्जा - ३ नुसार ५ जून २००५ रोजी उत्तराधिकारी कंपन्यांना निव्वळ स्थिर मत्तांचे मूल्य एकंदर आधारित ६२,६०० कोटी रुपयाने वाढवून मिळाल्या.

५ जून २००५ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीसाठी वित्तीय पुनर्रचना अंमलात आणल्यामुळे मत्ताच्या मूल्यामध्ये वाढ होऊन २२७३८९९४५२ एवढा घसारा ३१ मार्च २०१६ च्या नफा तोटा पत्रकात पूर्व काळातील घसारा खर्च म्हणून दर्शविण्यात आला. तथापि, भारतीय लेखा मानकांच्या अनुपालन करण्याच्यादृष्टीने १ एप्रिल २०१५ रोजी राखून ठेवलेली उत्पन्नामध्ये समायोजन करण्यात आले. त्याप्रमाणे २०१५-१६ या कालावधीच्या नफा तोटा पत्रकात आणि १ एप्रिल २०१५ रोजीच्या ताळेबंद पत्रकात पुर्नसंचित करण्यात आली.

२) यापुढे अधिसूचना क्र. १००५/सी.आर.९०६१/(२)/उर्जा-५ नुसार पूर्वीच्या मरावि मंडळाच्या खाली नमूद केलेल्या दायित्वाच्या बदल्यात मराविम सुत्रधारी कंपनीच्या समभागाचे शासनाने स्वीकार केला.

**(रु. कोटीमध्ये)**

| **तपशील** | **५ जून २००५ रोजीचे दायित्वे** |
|---|---|
| राज्य शासन कर्ज | ३०९८ |
| केंद्रीय योजना वाटप | ६०३ |
| सीपीएसयू कोळसा देणी | ५६७ |
| सीपीएसयू वीज खरेदी देणी | ४५१ |
| शासन कर्ज | ९१२ |
| एकूण | ५६३२ |

वित्तीय पुनर्रचना योजनेला मंजुरी मिळाल्यानंतर शासन कर्जाच्या बदल्यात समभागाचे शासनाने स्वीकार केला परंतु ५ जून २००५ ते ३१ मार्च २०१५ पर्यंत शासन कर्जावर लेखा पुस्तकात तरतूद केलेले रु. २८३७७६९३९४० व्याजाचा शासनाने स्वीकार केला नाही, त्याचे निर्लेखन कलम ३१ मार्च २०१६ रोजी लेखा पुस्तकात अपवादात्मक उत्पन्न म्हणून दर्शविण्यात आले. त्याप्रमाणे १ एप्रिल २०१५ रोजीच्या ताळेबंदामध्ये पुर्नसंचित करण्यात आले.

आमच्या समान तारखेच्या अहवालानूसार

**डुगर अँड असोशिएट्स करिता,**
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रमांक ०००५६१ एन

सही /-
**मुकेश गोयल**
**भागीदार**
सदस्यता क्र. ०८१८१०

स्थळ : मुंबई
दिनांक : १५/११/२०१७

**जयकुमार श्रीनिवासन**
संचालक (वित्त) व
मुख्य वित्त अधिकारी

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (वि.)

**अरविंद सिंह**
व्यवस्थापकीय संचालक

**सुबोध झारे**
कंपनी सेक्रेटरी

## टीप १ :-

**सांघिक माहिती :**

महाराष्ट्र शासनाने विद्युत अधिनियम २००३ चे प्रकरण - १३ यानुसार पूर्वीच्या मरावि मंडळ या संस्थेची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मराविमं सुत्रधारी कंपनी लि. स्थापित करण्यात आली. तिच्या पुढील तीन उपकंपन्या आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी (महानिर्मिती), महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी लि. (महापारेषण) आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण) मराविमं सुत्रधारी कं.लि. तिचे कार्य दि. ६ जून २००५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या हंगामी हस्तांतर योजना याप्रमाणे सुरू केले. ही हंगामी हस्तांतरण योजनेनुसार कंपनी आणि तीन उपकंपन्या पूर्वीच्या मरावि मंडळातून अस्तित्वात आल्या. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. रिफॉर्म.२०१०/प्र.क्र.११७/उर्जा ३ अधिसूचित करून दि. ३१ मार्च २०१६ पासून वरील हंगामी हस्तांतर योजनेचे अंतिमीकरण पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे ५ जून २००५ पासून केले. त्यासाठी वित्तीय पुनर्रचना योजना मंजूर केली.

## टीपा २ :

**तयार करण्याचा आधार**

भारतीय लेखा मानकांनुसार (येथे भारतीय लेखा मानके म्हणून उल्लेख केल्यानंतर) कंपनी कायदा २०१३ (अधिनियम) च्या कलम १३३ अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या सर्व वित्तीय बाबींमध्ये (कंपन्या भारतीय लेखा मानके) नियम २०१५ आणि कायद्याचे इतर संबंधित तरतुदींची पूर्तता करण्यासाठी भौतिक पैलूंचा विचार करून एकल वित्तीय विवरण पत्र तयार करण्यात आले.

३१ मार्च २०१६ पर्यंत वित्तीय विवरण पत्र भारतीय लेखा मानकांनुसार कंपनी (लेखा मानके) नियम २००६ (दुरूस्ती) आणि इतर संबंधित तरतुदीनुसार तयार करण्यात आले. परंतु ३१ मार्च २०१७ या संपलेल्या वर्षासाठी नवीन भारतीय लेखा मानकांनुसार वित्तीय विवरण पत्र तयार करण्यात आले. भारतीय लेखा मानके १०१ ''भारतीय लेखा मानकांचा प्रथम स्वीकार'' याबद्दलची प्रकरणे टीपा क्र. ३२ मध्ये दिली आहेत. कंपनीने घेतलेला प्रथम अवलंब सवलतींचा तपशील टिपा क्र. ३ मध्ये दिला आहे.

लेखा धोरणे वित्तीय विवरणामध्ये सादर केलेल्या सर्व कालावधीसाठी सातत्याने लागू केल्या जातात, त्यामध्ये १ एप्रिल २०१५ रोजीच्या लेखा मानकांप्रमाणे आरंभीचा ताळेबंद तयार करण्यासाठी लेखा मानके बदलाच्या तारखेसह.

वित्तीय विवरण तयार करताना व्यवस्थापनाला काही अंदाज व गृहितके करावी लागतात. या अंदाजानुसार वास्तविक परिणाम भिन्न असू शकतात. वित्तीय अंदाजाचे बदलाचा परिणाम त्या वर्षाकरिता किंवा त्यांच्या बदलाच्या वर्षी आणि पुढील अनेक वर्षा करिता, जर बदलाचा परिणाम वर्तमान व भविष्यकाळासाठी असेल तर वित्तीय अंदाज हे बदल केलेल्या वर्षातच ओळखले जातील.

(महत्वपूर्ण लेखा निर्णय, अंदाजपत्रक व गृहितकांवरील टीपा क्र. ४ पहावी.)

खाली दिलेल्या लेखा धोरणामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, प्रत्येक अहवाल कालावधीच्या शेवटी विशिष्ट आर्थिक मत्ता व दायित्वे उचित किंमतीवर मोजल्या गेल्यास (वित्तीय साधनांशी संबंधित लेखा धोरणे पहावी) वित्तीय विवरण ऐतिहासिक किंमतीच्या आधारावर तयार करण्यात आल्या आहेत.

वित्तीय विवरण भारतीय रुपये ('भारतीय रुपये' किंवा 'रुपये' किंवा 'रु.') मध्ये सादर केले जातात जे कंपनीचे कार्यात्मिक चलन आहे.

## टीपा ३ :

**प्रथम वेळी स्वीकार करण्यातील बंधनकारक अपवाद आणि पर्यायी सवलती -**

**एकूण तत्वे :**

कंपनीने भारतीय लेखा मानके पद्धती स्वीकारली असून त्यासाठीची संक्रमण तारीख दि. ०१/०४/२०१५ रोजी ठरवून त्या तारखेस आरंभीचे ताळेबंद पत्रक तयार केले त्यासाठी,

**अ)** भारतीय लेखा मानकांच्या आवश्यकतानुसार ज्यांना मान्यता देणे आवश्यक आहे; अशा सर्व मत्ता व दायित्वे यांची मान्यता मिळविली आहे.

**ब)** भारतीय लेखा मानकांची परवानगी नसणाऱ्या मत्ता व दायित्वांची मान्यता नष्ट करणे.

**क)** पूर्वी भारतात सर्वसामान्यपणे स्वीकारल्या जाणाऱ्या लेखा तत्वांऐवजी भारतीय लेखा मानके या पद्धतीसाठी विविध बाबींचे पुनर्वर्गीकरण करणे.

**ड)** मान्यता प्राप्त मत्ता आणि दायित्वे यासाठी भारतीय लेखा मानकांचे मापने लागू करणे. मात्र या तत्वांमध्ये काही अपवाद आहेत. तसेच काही पर्यायी सवलती असून त्यांचा कंपनीने खालीलप्रमाणे लाभ घेतला आहे.

**अ) मालमत्ता, कारखाने आणि साधने, गुंतवणुकीच्या मालमत्ता आणि अमूर्त मत्ता यांचे मानीव खर्च**

कंपनीने तिच्या सर्व मालमत्ता, कारखाने आणि साधने, गुंतवणुकीच्या मालमत्ता आणि अमूर्त मत्ता यांना त्यांच्या पूर्वीच्या सर्व साधारणपणे स्विकारलेले लेखा तत्वे नुसार असलेल्या मोजणीला संक्रमण तारीख दि. ०१ एप्रिल २०१५ रोजी मान्यता द्यावी आणि त्या संक्रमण तारखेस त्यांचे प्रचलित, विद्यमान मूल्य यालाच मानीव खर्च मानावे व ते चालू ठेवावे असे ठरविले आहे.

वित्तीय पुनर्रचना योजना यांच्या समायोजनांचा विचार करुन दि. १ एप्रिल २०१५ रोजीचे प्रचलित मूल्य दि. ०५/०६/२००५ पासून पूर्वलक्षी प्रभावाने घेण्यात आली व त्याची अंमलबजावणी ३१ मार्च २०१६ पासून करण्यात आली.

**ब) उपकंपन्या व सहयोगी कंपन्यांतील गुंतवणुकी :**

कंपनीने उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त साहन कंपनी यांच्यातील गुंतवणुकी समभागाचे विलेख यांना त्यांच्या किंमतीखर्चाप्रमाणे मान्यता देण्याचा पर्याय स्वीकारला.

## टीपा ४ :

**'चालू व चालू नसलेली' असे वर्गीकरण करणे**

ही कंपनी ताळेबंदातील मत्ता व दायित्वे यांचे चालू आणि चालू नसणाऱ्या असे वर्गीकरण करुन त्या सादर करते. मत्तांना चालू मानण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

- नेहमीच्या कार्यचक्रात ज्या मत्तांतून अपेक्षित वसुली होणे किंवा त्यांना विक्री योग्यता असते किंवा त्याचा वापर करता येतो.
- त्या प्रामुख्याने व्यापारी हेतुसाठी धारण केल्या जातात.
- अहवालाच्या मुदतीनंतर बारा महिन्यांत त्यांची वसुली अपेक्षित असते.
- किंवा अहवाल वर्षानंतर किमान बारा महिन्यांनंतर त्यातून रोख किंवा रोख समतूल्य मिळू शकते (जर देवघेवीची बंदी असल्यास)

- किंवा एखादे दायित्व चुकते करण्यासाठी वापर करता येणे या व्यतिरिक्त उर्वरित सर्व मत्तांचे वर्गीकरण 'चालू नसलेल्या मत्ता' असे करण्यात येते.

  दायित्वाचे खालील परिस्थितीत चालू दायित्व यात वर्गीकरण होते.
- नेहमीच्या कार्यचक्रात ते चुकते केले जाणे अपेक्षित असल्यास
- ते प्रामुख्याने व्यापारी हेतुसाठी धारण केले असल्यास
- अहवाल वर्षानंतर बारा महिन्यात ते देय होते किंवा
- अहवाल वर्षानंतर बारा महिन्यानंतर दायित्वे चुकते किंवा स्थगित न करणे, स्थगित कर मत्ता/ दायित्व यांचे वर्गीकरण निव्वळ तत्वावर 'चालू नसलेली' असे केले आहे.
- उर्वरित इतर सर्व दायित्वे यांचे चालू नसलेली असे वर्गीकरण केले जाते.

**टीपा ५ :**

**महत्वाचे लेखा न्यायनिर्णय, अंदाज व गृहीते :-**

कंपनीची वित्तीय विवरणपत्रे तयार करताना कंपनीच्या अहवालात द्यावयाच्या रकमा, खर्च, मत्ता व दायित्वे यांच्यावर परिणाम करणाऱ्या बाबी तसेच त्यासोबत प्रकटने करण्यासाठी आणि आकस्मिक दायित्वे प्रकट करण्यासाठी व्यवस्थापनासस काही न्यायनिर्णय, अंदाज व गृहीते योजावी लागतात. ही गृहीते व अंदाज यांच्या अनिश्चित स्वरुपामुळे ती भविष्यातील मत्ता किंवा दायित्वे यांना बाधक होऊ शकतात.

भविष्यातील अनिश्चित अंदाज आणि इतर गृहीते यांच्यामुळे अहवालाच्या तारखेपर्यंत मोठ्या जोखीमा उद्‌भवतात. त्यासाठी पुढील वित्तीय वर्षासाठी मत्ता व दायित्वे यांच्या पुढे नेलेल्या रकमांच्याबाबत मोठी समायोजने करावी लागतात. त्याची माहिती खाली दिलेली आहे. कंपनीने वित्तिय विवरण पत्रके तयार करण्याच्या वेळी जे मापदंड उपलब्ध होते त्या आधारे काही गृहीते व अंदाज करण्यात आले. विद्यमान परिस्थिती आणि भविष्यातील घडामोडी यामध्ये तसेच बाजारातील चढउतारामुळे किंवा ज्यावर कंपनीचे नियंत्रण नाही अशा परिस्थितीमुळे बदल होऊ शकतात असे बदल गृहीत धरावे लागतात व ते दाखविले जातात.

वित्तिय विवरण पत्रातील मान्यता दिलेल्या रकमांवर ज्यांचे सर्वात मोठे लक्षवेधक परिणाम होतात त्या अंदाज व न्यायनिर्णयाची माहिती खाली दिली आहे.

- मालमत्ता, कारखाने, साधने आणि अमूर्त मत्ता यांचे उपयुक्त आयुष्य व उर्वरित मूल्य.
- वित्तीय विलेखांचे रास्त मूल्य.
- वित्तीय नसलेल्या इतर मत्ता कमी करणे.
- व्याख्यांकित लाभ बंधने, महत्वाची विमा गणिती गृहीते यांचे मापन
- तरतुदी आणि आकस्मिकता
- स्थगित कर मत्ता वसुलीचे पूनर्मूल्यांकन
- महसूल मान्यता

## टिपा क्र. ६

### इतर महत्वाची लेखा धोरणे

### १) मालमत्ता, कारखाने व साधने

**मराविमं सुत्रधारी कंपनी संबंधी :-**

मालमत्ता, कारखाने व साधने या खर्च, संचित घसाऱ्याची निव्वळ आणि संचित कमी करण्याचे तोटे, जर काही असले तर, यानुसार नमूद केले जातात. कारखान्यात एखादा भाग व साधन बदलण्याचा खर्च, आणि दीर्घ मुदतीच्या बांधकाम प्रकल्पासाठीचे कर्जाचे खर्च यांनी मान्यतेचे निकष पूर्ण केले तर त्यांना खर्चात समाविष्ट केले जाते. जेव्हा पीपीइ मधील महत्वाचे भाग ठराविक कालावधीनंतर वारंवार बदलणे आवश्यक असेल तर कंपनी मत्तांच्या अशा घटकांना त्यांचे निश्चित उपयुक्त आयुष्य अशी मान्यता देते. तसेच त्यांच्या उपयुक्त आयुष्यानुसार घसारा देते. नंतरचे खर्च मत्तांच्या पुढे नेलेल्या रकमांत समाविष्ट केल्या जातात. किंवा अशा घटकाचे भविष्यातील आर्थिक लाभ कंपनीला मिळणार असल्यास आणि अशा घटकांच्या खर्चाचे विश्वासाने मापन करता येत असेल तर कंपनी अशा घटकांना वेगळी मत्ता म्हणून मान्यता देते. बदलेल्या घटकांची पुढे नेलेली रक्कम अमान्य केली जाते. दुरुस्ती व देखभालीचे सर्व इतर खर्च, नफा किंवा तोटयात मान्य केले जातात.

प्रगतीपथावरील भांडवली कामे यामध्ये विकसीत होणाऱ्या/स्थापनेचे काम चालू असलेल्या मालमत्ता, कारखाने व साधनांचे खर्च समाविष्ट असतात. ते ताळेबंदाप्रमाणे धरले जातात.

संशोधन व विकासासाठी मूर्त मत्तांवर केलेल्या भांडवली खर्चाचे वर्गीकरण मालमत्ता, कारखाने व साधनांमध्ये केले जाते व मालमत्ता, कारखाने व साधनांमध्ये त्यांचा घसारा आकारला जातो.

मालमत्ता, कारखाने व साधने निवृत्त किंवा काढून टाकल्यामुळे होणारी प्राप्ती किंवा हानी यांची निश्चिती विल्हेवाटीची निव्वळ मिळकत आणि मत्तांची पुढे नेलेली रक्कम यांच्या फरकानुसार करुन तिला निवृत्ती / विल्हेवाटीच्या तारखेला नफा किंवा तोटयात मान्यता दिली जाते.

मत्तांचा घसारा त्यांच्या अंदाजे उपयुक्त आयुष्यासाठी सरळ रेषा पद्धतीने उर्वरित आयुष्यासाठी केला जातो. मत्तांचे मूल्य व उपयुक्त आयुष्य यांचा आढावा प्रत्येक वित्तीय वर्षाअखेरीस किंवा जेव्हा आढाव्याची चिन्हे दिसतील तेव्हा करुन त्याचे प्रक्षेपाने समायोजन केले जाते.

**भाड्याच्या मत्ता :-**

भाड्याच्या जमिनीच्या परतफेडीची तरतूद भाडेपट्टीच्या मुदतीसाठी केली जाते. भाडेपट्टीच्या जमिनीवर उभारलेल्या इमारतींचा घसारा हा कंपनी कायदा २०१३ चे वेळापत्रक दोन यात विनिर्देशित केलेल्या तरतुदीनुसार केली जाते. (जर जमिनीची भाडे मुदत इमारतीच्या आयुष्यापेक्षा जास्त असेल तर)

इतर प्रकरणी भाडेपट्टीच्या जमिनीवरील इमारतींसाठी जमिनीच्या प्राथमिक भाड्यावर परतफेडीची तरतूद केली जाते. मालकीच्या जमिनीवर घसारा आकारला जात नाही. मत्तांचे उपयुक्त आयुष्य खालीलप्रमाणे मानले जाते.

| **मत्तांचे स्वरुप** | **वर्षे** |
|---|---|
| भाडेपट्टीची जमीन | ०१ ते ८० |
| इमारती | ०१ ते ६० |
| कारखाने व साधने | ०१ ते १५ |
| फर्निचर व जोडण्या | ०१ ते १० |
| वाहने | ०१ ते ०८ |
| संगणक | ०१ ते ०३ |

ज्या मत्तांचा खर्च रु. पाच हजार किंवा त्याहून कमी आहे त्यांचा पूर्ण घसारा वापरण्यास उपलब्ध होण्याच्या तारखेपासून बारा महिन्यासाठी केला जातो.

**भारतीय लेखा मानक पद्धतीत संक्रमण :-**

भारतीय लेखा मानक पद्धतीत संक्रमण करताना, मराविमं सुत्रधारी कंपनीने केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या कंपन्यांचे (लेखा मानक) नियमावली २००६ मध्ये विनिर्देशित केलेले सामान्यपणे स्वीकृत केलेली लेखातत्वे आणि कंपनी अधिनियम अधिनियम १९५६ यातील इतर तरतुदी यानुसार मापन केलेल्या आणि १ एप्रिल २०१५ रोजी मान्य करुन पुढे नेलेली मालमत्ता, कारखाने व साधने यांची मूल्ये चालू ठेवण्याचा पर्याय स्वीकारला आहे.

०५/०६/ २००५ रोजीच्या पूर्वलक्षी प्रभावाने अमलात आलेल्या ३१ मार्च २०१६ रोजीच्या वित्तिय पुनर्रचना योजनची समायोजने लक्षात घेऊन १ एप्रिल २०१५ रोजीचे धारण मुल घेतले आहे.

## २) गुंतवणूक मालमत्ता :

गुंतवणूक मालमत्तांमध्ये मालकीची जमिनी आणि दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टीची उत्पन्न आणि / किंवा भांडवल वाढीसाठी धारण केलेल्या कार्यालयीन इमारती यांचा समावेश होतो. गुंतवणूक मालमत्ता प्रारंभि खर्चानुसार मान्य केल्या जातात. नंतर इमारती समाविष्ट असलेल्या मालमत्ता या त्याच्या विद्यमान खर्च वजा संचित घसारा आणि संचित कमी करण्यातील तोटे अशाप्रकारे त्यांना मान्यता दिली जाते.

खर्च यामध्ये भाग बदलण्याचे खर्च, मान्यतेचे निकष पूर्ण झाल्यास दीर्घ मुदतीचे प्रकल्पाचे कर्ज खर्च समाविष्ट असतात. जेव्हा गुंतवणुकीच्या मालमत्तेचे महत्वाचे भाग काही कालांतर ठेवून बदलावयाचे असतात. तेव्हा कंपनी त्यांच्या उपयुक्त आयुष्याच्या आधारे घसारा आकारते. इतर सर्व दुरूस्ती व देखभालीचे खर्च यांना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

इमारतींच्या घसाऱ्यासाठी कंपनी अधिनियम २०१३ चे अनुसूचि २ यात विनिर्देशित केल्याप्रमाणे इमारतींचा घसारा अंदाजित उपयुक्त आयुष्यासाठी दिला जातो. उर्वरित मूल्य, उपयुक्त आयुष्य आणि घसारा यांचा आढावा घेऊन भावी काळासाठी योग्य ठरतील अशी समायोजने प्रत्येक वित्तिय वर्षाच्या अखेरीस केली जातात. या आढाव्याचे परिणामामुळे उद्भवलेले बदल नफा- तोटा पत्रकात

दाखविले जातात.

कंपनी जरी गुंतवणूक मालमत्तेचे मापन, खर्च आधारित मोजपट्टी वापरुन करीत असली तरी, गुंतवणूक मालमत्तेचे रास्त मूल्य टीपांमध्ये प्रकट केल्या आहेत.

जेव्हा गुंतवणूक मालमत्ता काढून टाकल्या जातात किंवा ती वापरातून कायमची काढून घेतली जाते आणि तिचे विल्हेवाटीपासून कोणतेही आर्थिक लाभ अपेक्षित नसतील तेव्हा तिची मान्यता काढून घेतली जाते. विल्हेवाटीची मिळकत आणि मत्तांची विद्यमान रक्कम यातील फरकाला नफा-तोटा पत्रकात घसाऱ्याच्या मुदतीमध्ये मान्यता दिली जाते.

**भारतीय लेखा मानक पद्धतीत स्थानांतरण :**

महाविमं सुत्रधारी कंपनी लि. ने भारतीय लेखा मानक पद्धतीत संक्रमण करताना केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या (लेखा मानके २००६) यामध्ये विनिर्देशित केलेल्या तसेच कंपनी अधिनियम १९५६ यातील इतर तरतुदी यानुसार जुन्या साधारणपणे स्वीकृत लेखाशीर्ष नुसार सर्व गुंतवणूक मालमत्तांचे मोजणी केलेले विद्यमान मूल्य पुढे चालू नेण्याचे ठरविले आहे.

०५/०६/ २००५ रोजीच्या पूर्वलक्षी प्रभावाने अमलात आलेल्या ३१ मार्च २०१६ रोजीच्या वित्तिय पुनर्रचना योजनची समाोजने लक्षात घेऊन १ एप्रिल २०१५ रोजीचे धारण मुल्य घेतले आहे.

**३) अमूर्त मत्ता -**

महाविमं सुत्रधारी कं.लि. ज्या अमूर्त मत्तांची ओळख निश्चिती झाली आहे; आणि कंपनीचे त्यावर नियंत्रण असून भविष्यात त्यांचे आर्थिक लाभ कंपनीमध्ये प्रवाहित होणे संभवनीय आहे; तसेच त्यांची मोजणी विश्वासार्ह रितीने करता येते, अशा अमूर्त मत्तांना मान्यता देण्यात येते.

प्रारंभी, स्वतंत्रपणे संपादन केलेल्या मत्ता त्यांच्या खर्चानुसार मान्य केल्या जातात. ज्या अमूर्त मत्ता व्यवसायाच्या संमिश्रणात संपादित केलेल्या असतात; त्यांचे खर्च हेच संपादन तारखेचे रास्त मूल्य असते. प्रारंभीच्या मान्यतेनंतर, अमूर्त मत्तांचे खर्च वजा संचित कर्जफेडीच्या तरतुदी आणि मत्ता करण्याचे संचित तोटे जर असतील तर ते वजा करून येणाऱ्या रक्कम प्रमाणे पुढे नेले जातात.

अमूर्त मत्ता वापरण्याच्या उपलब्ध होण्याच्या तारखेपासून त्यांच्या कर्जफेडीच्या तरतुदींना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. त्यांच्या अंदाजित उपयुक्त आयुष्याकरिता ती सरळ रेषा पद्धतीने मान्य केली जाते. सदिच्छा / ख्याती मूल्य व्यतिरिक्त अन्य अमूर्त मत्ता यांच्या कर्जफेडीची मुदत व पद्धत याचा प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस आढावा घेतला जातो.

मत्तांच्या अपेक्षित उपयुक्त आयुष्यातील बदल किंवा मत्तांमध्ये संनिविष्ट केलेले भविष्यातील आर्थिक बदलाच्या लाभाच्या वापराचे बदल यांचा लेखा कर्जफेडीची मुदत किंवा पद्धत यात योग्य बदल करून केला जातो. आणि त्याला 'लेखा अंदाजातील बदल' मानले जाते.

**अ) ख्याती मूल्य**

ख्याती मूल्य (सदिच्छा) यास प्रारंभी खर्चानुसार मान्यता दिली जाते नंतर ते खर्च हानी किंवा अन्य संचित कमी होण्याचे तोटे याप्रमाणे मान्य केले जाते.

**ब) सॉफ्टवेअर :**

सॉफ्टवेअर संपादन वापराचा परवाना या खर्चाचे भांडवलीकरण केले जाते व परवान्याच्या कालावधीसाठी (बहुदा ३ वर्षापेक्षा जास्त नाही.) कर्जफेडीची तरतूद केली जाते.

**क) परवाने (अनुज्ञाप्ती) :**

संपादित परवाने प्रथम खर्चानुसार मान्य केले जातात. त्यानंतर परवान्यांचे मापन खर्च वजा संचित कर्जफेडीची तरतूद आणि जर ते कमी करण्याचा खर्च असेल तर त्याप्रमाणे केले जाते. कर्जफेडीला सदर परवान्याच्या मुदत संपण्यापूर्वीच्या कालावधीसाठी नफा-तोटा पत्रकात सरळ रेषा पद्धतीने मान्यता देण्यात येते. त्यांचे प्रकटन 'घसारा व कर्जफेड' या शीर्षकात केले जाते. व्यवसाय संमिश्रणात संपादन केलेल्या परवान्यांसंबंधीची कर्जफेड तरतूद प्रामुख्याने उर्वरित परवाना कालावधीनुसार निश्चित केली जाते.

**ड). इतर संपादित अमूर्त मत्ता:**

इतर अमूर्त मत्तांना प्रारंभी खर्चानुसार मान्यता दिली जाते.व्यवसाय संमिश्रणात संपादित अमूर्त मत्तांची कर्जफेड तरतूद त्यांच्या वापर तारखेपासून अंदाजित उर्वरित आयुष्यासाठी केली जाते.

ज्या अमूर्त मत्तांचे उपयुक्त आयुष्य अनिश्चित असते (उदा. ख्यातिमूल्य), आणि ज्या अमूर्त मत्ता वापरण्यास अद्याप प्रारंभ झालेला नसतो, त्या कर्जफेडीच्या तरतूदीशी अधीन नसतात. तसेच त्याचे दरवर्षी कमी करण्यासाठी परिक्षण होत नसते. ज्या मत्ता घसारा व कर्जफेडीच्या अधीन नसतात, त्यांचा कमी करण्यासाठी आढावा घेतला जातो. जरी परिस्थितीत बदल करणारे घटना प्रसंग घडले आणि ते महत्वाचे, मर्यादेमध्ये नसले किंवा महसूलात किंवा मिळकतीत सातत्याने घट झाली आणि आर्थिक पर्यावरणात विपरीत परिणाम झाले, तर त्यासाठी आढावा घेतला जातो.

**४. वित्तीय नसलेल्या मत्ता कमी करणे -**

ही कंपनी तिच्या प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला कोणती मत्ता कमी करण्यास योग्य आहे याचा आढावा घेते तसेच मागील काळात कमी करण्याच्या मत्तांबाबत उलट काही करण्याची चिन्हे आहेत किंवा कसे हे पाहते. तशी चिन्हे असली किंवा कमी करण्याच्या वार्षिक परिक्षणाची गरज असली तर कंपनी वसूली योग्य रक्कम निश्चित करते आणि मत्ता चालू ठेवण्याची रक्कम तिच्या वसूली योग्य रकमेपेक्षा जास्त असेल तर कमी करण्याच्या तोटयाला मान्यता देते. वसुली योग्य रक्कम ही रास्त मूल्य वजा विक्री खर्च आणि वापरमूल्य यातून नक्की केले जाते. वापरातील मूल्य निर्धारणासाठी भविष्यातील अंदाजित रोकडता प्रवाह त्यांच्या विद्यमान मूल्याइतके कमी केले जातात. त्यासाठी पैशाचे वेळेनुसार मूल्याप्रमाणे, बाजाराचे निर्धारण दर्शविणारा करपूर्व सवलत दर वापरला जातो. तसेच मत्ता विषयीच्या जोखीमा विचारात घेतल्या जातात. रास्त मूल्य वजा विल्हेवाट खर्च निश्चित करण्यासाठी सध्या बाजारातील व्यवहारांचा विचार केला जातो. जर असे व्यवहार ओळखता येत नसतील तर, एखादे योग्य मूल्यांकन नमुना वापरला जातो. ही मोजणी बहुविध मूल्यांकने, जाहीर शेअर व्यापार करणाऱ्या कंपन्यांच्या शेअर्सची उद्‌धृत प्रक्रिया किंवा रास्त मूल्याचे उपलब्ध निदर्शक यांचा उपयोग केला जातो.

चालू प्रवर्तनातील कमी करण्याचे तोटे, (यामध्ये वस्तूसूची कमी करणे, समाविष्ट असते) यांना नफा-तोटा पत्रकातील योग्य विभागात मान्यता दिली जाते. मात्र यामध्ये ज्या मालमत्तांचे 'इतर सर्वंकष उत्पन्न यामधील पूनर्मूल्यांकनानुसार पूर्वी मूल्यांकन केले होते

त्यांना वगळले जाते. अशा मालमत्तांचे मूल्य कमी करण्यासाठी त्याचे अन्य कोणत्याही मागील पूनर्मूल्यांकनातील ओसीआयपर्यंतच्या रकमेप्रमाणे मान्यता दिली जाते.

## ५) रोख व रोख सममूल्य :

रोख व रोख सममूल्य यामध्ये बँकेतील शिल्लक तसेच अल्पमुदतीसाठी ठेवलेली हातातील रक्कम, ज्यांचे रोखीत लवकर परिर्वतन करता येईल आणि मूल्यातील बदलांचा ज्यांना नगण्य स्वरूपाचा धोका आहे अशा गुंतवणुकी यांचा समावेश होतो. वित्तीय स्थितीच्या विवरणपत्रात चालू दायित्वे यामध्ये उसनवारी स्वरूपाचे थकीत स्वरूपाचे बँकांचे ओव्हरड्राफ्ट दाखविले जातात. आणि ते कंपनीच्या रोख व्यवस्थापनाचे एकात्मिक भाग मानले जातात.

## ६) महसूल मान्यता :

जेव्हा महसूलाचे आर्थिक लाभ कंपनीमध्ये प्रवाहित होण्याची शक्यता असेल आणि त्याची विश्वासार्ह मोजणी करणे शक्य असेल तरच त्या महसूलाला मान्यता दिली जाते. महसुलाची मोजणीसाठी मिळालेल्या/मिळणाऱ्या बाबींचा वाटप, कपात आणि व्हॅट व सेवा कर किंवा शुल्के वगळून विचारात घेतली जातात. कंपनी विशिष्ट निकषानुसार तिच्या महसूल व्यवस्थेचे निर्धारण करते. म्हणजे वस्तू विक्री किंवा सेवा यातील महत्वाचे धोके व मोबदले लक्षात घेणे, त्याद्वारे तेथे मुख्य किंवा दलालामार्फत होत आहे किंवा कसे हे निश्चित केले जाते.

**अ) व्याजाचे उत्पन्न :-**

भारतीय लेखा मानक - १८ मधील परिच्छेद -९, १४ (सी) व (डी), १८,२०, २२, २३ आणि २६ यानुसार महसूलाच्या मान्यतेसाठी पुढील बाबी आवश्यक आहेत. : जेव्हा एखाद्या व्यवहाराचे आर्थिक लाभ अस्तित्वातील संस्थेला मिळतात. तेव्हाच फक्त महसुलाला मान्यता देता येते. भारतीय लेखा मानके १८ चा सारांश आहे की, जेव्हा वसुली निश्चित होणार असेल तरच महसूल मान्य करता येईल.

जेव्हा रास्त निश्चितीने अंतिमत: जमा होण्याच्या शक्यतेचे नसेल, तर अशी मागणी करताना, महसुलाची मान्यता अनिश्चितीच्या मर्यादेपर्यंत पुढे ढकलावी.

कंपनीने आता डीपीसीचे उत्पन्न म्हणून उपार्जन तत्वावर नोंद केली आहे. त्यासाठी संबंधित घटक/वितरणाचे परवानाधारक यांचेकडून वसूली होण्याची खातरजमा/आश्वासन यांचेशिवाय केलेली आहे. म्हणून ते चालू वर्षाच्या लेख्यात अनिश्चित उत्पन्न अशा स्वरुपाचे आहे. यामुळे खालील परिणाम झालेले आहेत.

**दि. वर्ष २०१६-१७ च्या महसूलात रु. ८५,४९९ लाखांचे जादा विवरण**

करपूर्व निव्वळ तोटा रु. ७६,६६३.९७ लाख याचे (या डी.पी.सी. उत्पन्नाचा लेखा करण्यापूर्वी हिशेब करणे) रु. ८८३५.०३ लाख एवढा कर पूर्व नफा यामध्ये रुपांतर करणे. (डीपीसी उत्पन्नाचा लेखा करणे)

ज्याची वसुली नक्की नाही अशा रु. ८५४९९.०० लाख या रकमेने वित्तिय वर्ष २०१६-१७ च्या ऋणकोंना मान्यता देणे.

## २. लेखाशीर्षातील शिलकी :

१) किरकोळ ऋणको - (जी एल कोड २६००४०, २६००६०)

२) किरकोळ धनको - (संलग्नपणे मेडा प्रकल्प खाजगी विकासकांना देण्यासाठी देय रकमा यात संलग्न आहेत.) (जीएल १३१०१०, १३२०१०, १३३०१०, १३४०१०, १३१०३०)

३) निकामी मालसाठा (भंगार समाविष्ठ) जीएल कोड २५६०१०)

४) चौकशी प्रलंबित असल्याने मालाची हानी (जीएल कोड २५५०२०)

५) बांधकाम चालू असलेल्या मत्ता (जीएल कोड २३००४०- ७०, २३००९०, २३२०१०, २३७०१०, २३७०२०, २३७०३०)

६) कंत्राटदार/पुरवठादारांना अग्रिमे (जीएल कोड २९००१०)

७) प्रकल्पांकरता भांडवली अग्रिमे (जीएल कोड २९००२०)

८) संकीर्ण कर्जे व अग्रिमे (जीएल कोड २९३०५०)

९) विक्रेत्यांकडून वसूली योग्य खर्च (जीएल कोड २९६०५०, २९६०६०)

१०) भांडवली कामांसाठी तरतुदी (जीएल कोड १५००१०)

११) जॉब कामाची सुरक्षा अनामत (१२३०४०)

१२) मराविमं सुत्रधारी व सहकारी उप कंपन्या

१३) इतर अनामती (जीएल कोड २९७०२०)

१४) ओआरसी अनामती (यात मेडा प्रकल्पांसाठी खाजगी विकासकांना देण्यासाठी मिळालेल्या रकमा समाविष्ट) (जीएल कोड १२३१००)

लेखाशिर्षातील शिलकी खात्री होणे व मेळ केल्यानंतर समायोजने करणे यांच्या अधीन आहेत. जुन्या थकीत रकमांचा समायोजने, मेळ आणि समझोते आणि थकबाकीची वसूली न होणे किंवा अपुरी होणे यांच्या परिणामांचा अंदाज करता येत नाही.

**महावितरणच्या प्रकरणी :**

आम्ही खाली वर्णन केल्या बाबींवर लक्ष वेधू इच्छितो. काही व्यक्तिगत किंवा एकत्रितपणे झालेल्या गैर विवरणे, तसेच काही प्रकरणात पुरेसे योग्य लेखा परिक्षणाचे पुरावे मिळविणे आम्हास शक्य झालेले नसल्याने भारतीय लेखा मानके वित्तीय विवरणपत्रकावर झालेले/होऊ शकणारे परिणाम परिणाम खाली दिले आहेत. ते प्रत्यक्ष असले तरी सर्वव्यापी नाहीत.

**१. मालमत्ता, कारखाने व साधने :**

अ) वित्तीय विवरणपत्राची टीप क्र. ४४.४ यात नमूद केल्याप्रमाणे कामे पूर्ण केल्याचे योग्य व पूर्ण अहवाल उपलब्ध नसल्याने मालमत्ता, कारखाने व साधने यांचे भांडवलीकरण झालेले नसणे/अपूर्ण असणे अशी काही प्रकरणे निदर्शनास आली. भांडवलीकरणाच्या विलंबामुळे त्या विलंब काळातील घसाऱ्यावर परिणाम झाला.

ब) महावितरण ''महत्वाची लेखा धोरणे'' या विषयाची टीप क्र.१(ग) (४) पहावी. या कंपनीने वर्षभरातील कर्मचारी खर्च, कार्यालय व प्रशासन खर्च रक्कम रु. ४१,१३१.६८ लाख यांचे भांडवलीकरण हंगामी तत्वावर प्रगतीपथावरील भांडवली कामे याच्या १५ टक्के दराने भर करुन केले आहे. परंतु 'प्रगतीपथावरील भांडवली कामे यांचे किंवा स्थिर मत्ता संपादण्याचे असे खर्च निश्‍चितपणे ओळखणे किंवा त्यात भर घालणे याची पद्धती या कंपनीमध्ये नाही. म्हणून ही कृती ''भारतीा लेखा मानक क्र. १६ - मालमत्ता - कारखाने व साधने याच्याशी सुसंगत नाही. लेखा परिक्षणाचे सुयोग्य व पुरेसे पुरावे नसल्याने आम्हाला त्याच्या अचूकतेबद्दल मत व्यक्त करता येत नाही.

क) महावितरणच्या संबंधी 'महत्वाची लेखा धोरणे' यातील टीप क्र. १(ग) (४) पहावी. प्रगतीपथावरील भांडवल कामे यात भर घालण्याची उसनवारी खर्चाची रक्कम रु. २५१५.३९ लाख ही ११.४२ दराने दिली आहे. (मागील वर्षाच्या वेटेडसरासरी व्याज दराने हिशेब केला आहे.) मात्र त्यासाठी पात्र मत्ता किंवा व्यत्यय आलेले प्रकल्प निश्‍चित केलेले नाहीत ही बाबत 'भारतीय लेखा मानके २३ उसनवारी खर्च' याला अनुसरुन नाही. याशिवाय प्रगतीपथावरील भांडवली

कामांचा पुढे नेलेल्या शिलकीवरील आवश्यक व्याजाचे भांडवलीकरण केलेले नाही. ही पात्र होणारी मत्ता आहे. पुरेशा व योग्य पडताळणी अभावी जर काही तिचा वित्तीय विवरणपत्रांवर होऊ शकणारे परिणाम असल्यास त्याचा अंदाज करता येत नाही.

**ड)** व्यवस्थापनाने यावर्षी मूर्त मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. प्रत्यक्ष पडताळणीचा जर काही वित्तीय विवरणपत्रांवर परिणाम होणार असल्यास त्याचे अंदाज करता येत नाही.

## २. भारतीय लेखा मानके यानुसार वित्तीय विवरणपत्रे सादर करणे.

**अ)** एकत्रित वित्तिय विवरणपत्रांवरील टिपा क्र. ४४(६) (बी) (i) यात नमूद केल्याप्रमाणे भारतीय लेखा मानक १०९, व्यापारी येणी अंतर्गत अपेक्षित पत हानी यासाठी तरतूद केलेली नाही. त्याचा हिशेबासाठी कंपनीने ग्राहकांकडून मिळालेली अनामती रकमा वजा करुन व्यापारी येणी विचारात घेतली. ह्या अनामती लागू होणाऱ्या व्यापारी येण्यांच्या ऐवजी त्यांच्या गटातील व याच्या प्रमाणातील मूल्याच्या प्रमाणात वितरित केल्या आहेत. त्यामुळे काही श्रेणीतील ग्राहकांकरिता दिलेली अनामत रक्कम थकीत शिलकीपेक्षा जास्त असल्याने त्या श्रेणींना इसीएलची तरतूद केलेली नाही. वरील कारणाच्या कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रावर होणारे संभाव्य परिणामावर आम्ही पत देऊ शकत नाही. शिवाय इसीएलच्या हिशेबासाठी कंपनीने व्यापारी येणी व सुरक्षा यांच्या आय.टी. डेटाबेस मधील थकीत रकमा विचारात घेतल्या; लेखा वह्यातल्या घेतल्या नाहीत. या दोन्हीकडील शिलकीत खालीलप्रमाणे फरक आहे.

| तपशील | ३१/३/१७ रोजीची शिल्लक लेखा वह्यांमधील (अ) | ३१/३/२०१७ रोजीची शिल्लक आयटी डेटा बेसप्रमाणे (ब) | फरक (अ-ब) |
|---|---|---|---|
| व्यापारी येणी | ३२,७६,८४७ | ३६,१६,०८९ | (३,३९,२४२) |
| सुरक्षा रक्कम | ६,४४,५०९ | ६,४२,८८९ | १,६१८ |

याविषयी लेखा परिक्षणात्मक योग्य व पुरेसे पुराव्यांच्या अभावी आम्हास मत व्यक्त करता येत नाही.

**ब)** टीप क्र. ७ चालू नसलेल्या वित्तीय मत्ता - याकडे लक्ष वेधण्यात येते.

भारतीय लेखा मानके १०९ प्रमाणे, संबंधित व्यक्तींना दिलेले बिनव्याजी कर्ज रु. ७१,३४७.१० लाख हे त्याच्या विद्यमान मूल्याने पुढे नेले पाहिजे. परंतु कंपनीने अशी कर्ज खर्चाप्रमाणे पुढे नेली. ही कृती भारतीय लेखा मानकांच्या आवश्यकतेनुसार नाही. योग्य माहितीच्या अभावी त्यांचे वि.विवरणपत्रावरील संभाव्य परिणामांवर मत व्यक्त करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

## ३) घसारा :

आमच्या निदर्शनास आलेली काही प्रकरणी मत्ता, कारखाने व साधने यांचा घसारा योग्य प्रमाणे मोजलेला नाही. कारण विविध मत्ता वापरात घेण्याच्या तारखेबाबत विसंगत/फरक आहे. लेखापरिक्षणासाठी योग्य पाठपुरावा नसल्याने त्याचा

घसाऱ्यावरील परिणाम व नंतर वित्तीय विवरणपत्रांवर होणाऱ्या परिणामांचे सांख्यीकरण करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

## ४) व्यापारी येणी :

**अ)** टीप क्र. १ सी (एफ) महत्वाची लेखा धोरणे पहावी. यात म्हटले आहे की, कंपनीने व्यापारी येण्याचे आणि इतर मत्तांचे ई.सी.एल. यांना वेळेवरची पतहानी ही तरतुदीच्या मेट्रीक्सच्या आधारे काढण्यात आली आहे. मात्र तरतुदीचा मेट्रिक्स तयार करताना कंपनीने ग्राहकांच्या वर्तनाचे भविष्यकालीन स्वरुप या विषयी कोणताही अंदाज बांधणारी माहिती ठरविलेली नाही. तरतुदीचा मेट्रिक्स तयार करताना ग्राहकांच्या वर्तनाचा विचार केलेला नसणे आणि शास्त्रीय पद्धतीचा वापर नसणे यामुळे अपेक्षित पत हानीसाठी केलेल्या तरतुदी पुरेशा आहेत. किंवा कसे यावर आम्हाला मत देण्यात येत नाही.

**ब)** एकत्रित वित्तिय विवरणपत्राची टीप क्र. ४४.६ (बी) (आय) ए - यांच्या म्हटल्याप्रमाणे दि. ३१/३/२०१७ रोजी व्यापारी येण्याच्या शिलकी लेखा वह्या आणि आयटी डेटा बेस यांच्याकडे आकडेवारीत रु. ३,३९,२४२ लाखांचा फरक असून त्याचा मेळ करणे प्रलंबित आहे.तसेच वित्तिय वर्ष २०१५-१६ चे रु. ३,०१,२१३ लाख आहेत. योग्य मेळाच्या अभावामुळे त्याचा वि.विवरणपत्रावर होणाऱ्या परिणामाचा अंदाज करता येत नाही.

**क)** व्यापारी येण्याची रक्कम रु. ३६,२२,०७५.८० लाख (इ.सी एल समायोजने वगळता) ही पत शिल्लक रु. ५,५६,११८.९२ लाख यातील निव्वळ आहे. व्यक्तिगत ग्राहकांच्या पतशिलकीसंबंधी योग्य तपशील नसल्याने त्याच्या वित्तीय विवरणपत्रावर होणाऱ्या परिणामांचे अंदाज आम्ही करु शकत नाही.

**ड)** एकत्रित वित्तिय विवरण पत्राची टीप क्र. ११ यात नमूद केल्याप्रमाणे विविध ग्राहकांकडून मिळालेल्या सुरक्षा अनामतीची रक्कम रु. ४,१३,७६९.७५ लाख ही प्रतिभूत ऋणको यांची असे दर्शविले आहे. मात्र त्यासाठी सुरक्षा अनामतीचा ग्राहकनिहाय नकाशा तयार केलेला नाही. परिणामी प्रतिभूत ऋणको रकमेचे, दि. ३१ मार्च, २०१७ रोजी ज्या ग्राहकांची थकबाकी सुरक्षा रकमेपेक्षा कमी आहे अशा ग्राहकांकडून मिळालेल्या अनामतीला मर्यादेपर्यंत जादा विवरण झाले आहे.

**इ)** एकत्रित वित्तिय विवरण पत्राची टीप क्र. ४४.९ यात म्हटल्याप्रमाणे मे.ग्लोबल टॉवर लि. यांच्याकडील व्यापारी येणे रु. १३,६२१.२२ लाख या अंतिम चुकती करण्याच्या अधिन आहे. याशिवाय थकित शिलकीसाठी इ.सी.एल. ची तरतूद नाही. यामुळे व्यापारी येण्याची पर्याप्तता आणि त्याचा कंपनीच्या वित्तिय विवरण वरील परिणाम यावर आम्हास मत व्यक्त करता येत नाही.

## ५) ग्राहकांकडील सुरक्षा अनामती : -

एकत्रित वित्तिय विवरण पत्राची टीप क्र. ४४.६ (बी) (१) यात म्हटल्याप्रमाणे लेखा वह्या व आयटी डेटा बेस यातील सुरक्षा रकमांच्या शिलकीत रु. १,६१८ लाखांचा फरक आहे. त्याचा मेळ प्रलंबित आहे. योग्य मेळाव्या अभावी त्याचा वित्तिय विवरण पत्रावर होऊ शकणाऱ्या परिणामाचा आम्हास अंदाज करता येत नाही.

## ६) लेख्यांची उपार्जनपद्धती :-

वित्तिय विवरण पत्राची टीप क्र. १ (एफ) - ''महत्वाची लेखा धोरणे'' पहावीत. आमच्या लेखापरिक्षणात आम्हास

काही खर्च विशेषत: दुरुस्ती व देखभालीचे खर्च ज्यांचे लेखे उपार्जन/वाणिज्य तत्वांवर करण्याऐवजी रोख तत्वांवर केले. असे करणे मूलभूत लेखा गृहिते आणि कंपनीचे लेखे धोरण यानुसार नाही. लेखापरिक्षणाचा पाठपुरावा नसल्याने, याबाबीचा एकत्रित वित्तिय विवरण पत्रांवर होणाऱ्या परिणामाचा आम्हास अंदाज करता येत नाही.

## ७) शिलकी कायम करणे :-

एकत्रित वित्तिय विवरण पत्राची टीप क्र. ४४.३ विषय - ''व्यापारी येणी, कर्जे व अग्रिमे यांच्या व ग्राहकांची पत शिलकी'' टीप पहावी. यामध्ये पुढील बाबींचे संबंधितांकडून कायम करणे, मेळ व गरज असल्यास समायोजन करणे प्रलंबित आहे. त्याअशा - व्यापारी येण्यांच्या शिलकी, कर्जे व अग्रिमे, काही बँकातील शिलकी, काही अकाऊंटींग युनिटसाठी टपाल कचेऱ्यात गोळा रकमा इ. तिसऱ्या पक्षाकडील शिलकी कायम करण्यासाठी कंपनीची विद्यमान पद्धत अधिक बळशाली करण्याची गरज आहे. याविषयी योग्य अभिलेख/तपशील नसल्यामुळे असे मेळ केल्यानंतर व जुन्या बाकीच्या समझोत्यांनंतर / चूक त्या केल्यानंतर जी समायोजने करावी लागतील. तसेच ही थकबाकी वसूल झाली नाही किंवा अंशत: झाली आणि दायित्वे चुकती झाली नाही तर त्याचे परिणामांचा अंदाज आम्हास करता येत नाही.

## ८. टपाल कार्यालये, बँक इत्यादीकडील शिलकी

**अ)** एकत्रित वित्तिय विवरण मधील टीप क्र. १२ आणि टीप क्र. ४४.३ (ii) पहाणे. त्यात टपाल कार्यालयाचे आणि बव्हंशी जि.म.स. बँकांच्या शाखा यांच्याकडील शिलकी कायम करण्याची माहिती उपलब्ध नाही. ती खालीलप्रमाणे

**(रु. लाखांत)**

| तपशील | | ३१/३/२०१७ रोजी लेखा वह्यांप्रमाणे एकूण डेबिट बॅलन्स | ३१/३/१७ रोजी लेखा वह्यांप्रमाणे क्रेडिट बॅलन्स |
|---|---|---|---|
| १ | टपाल कार्यालये | १३,१४२.९१ | ४७३७.११ |
| २ | जि.म.स.बँका | ६,८४७.४२ | ५,०१२.७२ |
| ३ | एकूण | १९,९९०.३३ | ९,७४९.८३ |

शिलकी कायम केल्याची माहिती नसल्याने, त्याचे वित्तिय विवरण पत्रावर होणाऱ्या परिणामांचा आम्हास अंदाज करता येत नाही.

**ब)** **एकत्रित वित्तिय विवरण पत्राची टीप क्र. ४४.५ पहावी :** विविध विभाग व मंडळ कार्यालयाच्या बँक मेळपत्रकात बऱ्याच नोंदी ग्राहकांनी जमा केलेले पण बँकांनी नाकारलेले चेक्स या बाबीच्या असून त्या लेखा वह्यात उलट फिरविलेल्या नाहीत. आणि त्याचा मेळ प्रलंबित आहे. याशिवाय बँक मेळ पत्रकात इतर काही बाबींचा मेळ केलेला नाही. यामध्ये प्रारंभी अपलोड केलेल्या शिलकींच्या नोंदी असून त्यांचा मेळ करावयाचा राहिला आहे. त्याच्या वित्तिय विवरण पत्रावरील परिणामावर आम्हास मत देता येत नाही.

## ९) मत्ता व दायित्वे यांचे चालू / चालू नसलेल्या यात वर्गीकरण :-

कंपनीने खालील लेखाशीर्षातील दायित्वाचे 'चालू' व चालू नसलेले असे वर्गीकरण केलेले नाही.

**अ)** टीप क्र. २७- इतर चालू नसलेली दायित्वे - चालू दायित्वे पहावी.

**१)** देयकांची रक्कम जमा करण्यासाठी खाजगी संस्थांकडून घेतलेल्या अनामती-रु. ५,९०३.१३ लाख

**२)** पुरवठादार/कंत्राटदारांच्या ठेवून घेतलेल्या रकमा रु. २,४१,०८७.४६ लाख

**३)** इतरांकडील अनामती/रु. २३,७७३.२९ लाख

**ब)** टीप क्र. २१ : इतर वित्तीय दायित्वे - चालू नसलेली पहावी

यामध्ये विद्युतीकरण सेवा जोडणीचा रक्कम रु. १,२९२.१५ लाख समाविष्ट आहे. ही प्रकरणे कायद्याच्या शेड्युल्ड - ३ प्रमाणे नाहीत.

## १०) वीज खरेदी :-

**अ)** महावितरणच्या प्रकरणी एकत्रित वित्तिय विवरण पत्राची टीप क्र. ३७.१ (iii) (अ) पहावी. कंपनीने दि. ३१/३/१७ रोजी विलंब शुल्क आकारासाठी महानिर्मितीस देय रु. २,९९,२३६ लाख आणि महापारेषणास देय रु. १,२४,४२१ लाख अशा तरतुदी केल्या. यामध्ये वर्ष २०१६-२०१७ च्या रु. ६६,३३० लाखांचा समावेश होता. परिणामी कंपनीच्या तोट्याचे रु. ६६,३३० लाखाने कमी विवरण झाले. तर इतर समभाग (संचित तोटे) आणि चालू दायित्वे यांचे रु. ४,२३,६५७ लाखाने कमी विवरण झाले.

**ब)** एकत्रित वित्तिय विवरण पत्रात महावितरणच्या संबंधी टीप क्र. ३७.१ (iii) (ब) पहावी. कंपनीने स्वतंत्र वीज निर्मार्त्यांना देय असलेल्या विलंब भरणा आकार यासाठीची तरतूद वीज खरेदी कराराप्रमाणे एस बी आयचा प्राईम लेडिंग रेट अधिक २ टक्के याऐवजी बेस रेटच्या आधारे केली आहे. कंपनीला ३१/३/१६ पर्यंत रु. ८,२५२ लाखाच्या तरतूदी निर्लेखित आहेत. कंपनीला ३१/३/१६ रोजीची तरतूद उलट फिरविली. याशिवाय कंपनीने २०१६-२०१७ साठी अल्प तरतूद रु. ९,३०१ लाख आणि संचित अल्प तरतूद रु. ४३,०१६.१३ लाख दि. ३१/३/१७ पर्यंत केली. परिणामी कंपनीच्या वर्षाच्या तोट्याचे रु. १७,५५३.०६ लाखाने तसेच इतर समभाग (संचित तोटा) आणि चालू दायित्वे यांचे रु. ४३,०१६.१३ लाखाने कमी विवरण झाले.

**क)** एकत्रित वित्तिय विवरण पत्रातील महावितरणच्या टीप क्र. ३७.१ (iii) (क) पहावी. कंपनीने ३१ मार्च, २०१७ रोजी विलंब भरणा आकार रु. २०,५०० लाख यासाठी तरतूद केली नाही. त्यामुळे कंपनीच्या इतर (संचित तोटे) याचे रु. २०,५०० लाखाने कमी विवरण झाले.

## ११) विविध खर्चासाठी तरतुदी नाहीत :

**अ)** एकत्रित वित्तिय विवरण पत्रातील टीप क्र. ४४.१ पहावी. यामध्ये मुळा प्रवरा सहसंस्थेला वापर संस्थेला वापर आकारासाठी द्यावयाचे रु. ३९,४१९ लाख महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे जमा केले असून ते नफा-तोटा पत्रकात वजा केलेले नाहीत आणि 'सुरक्षा अनामत' असे दाखविले आहे. त्यामुळे कंपनीच्या तोट्याचे रु. ३९,४१९ लाखाने कमी विवरण झाले. तर मत्तांचे तेवढेच जादा विवरण झाले.

**ब)** एकत्रित वित्तिय विवरण पत्रातील टीप क्र. ३७.१ (iii) (ड) यात नमूद केले की, कंपनीने नव्या कोळसा वितरण धोरणामुळे मे. अदानी पॉवर महाराष्ट्र लि. आणि मे. रतन इंडिया पॉवर लि. यांना देय रक्कम सुमारे ३,९१,२१६ लाखांच्या भरपाईच्या दायित्वाची तरतूद केली नाही. यामुळे कंपनीच्या तोट्याचे व दायित्वाचे रु. ३,९१,२१६ लाखाने कमी विवरण झाले.

**क)** एकत्रित वित्तिय विवरण पत्रातील टीप क्र. ३७ (१) (iii) (ई) यात नमूद केले की, कंपनीने रत्नागिरी गॅस पॉवर कंपनीस स्थिर आकार रु. २,६८,८१७ लाख या (यात वर्षाचे रु. ६, ४०० लाख समाविष्ट) दि. ३१/३/१७ पर्यंत देय असलेल्या रकमेची तरतूद केली नाही. या कंपनीस दिलेले रु. १८,१०१ लाख 'अग्रिम' असा दाखविला. परिणामी, कंपनीच्या तोट्याचे रु. ६४०० लाखांनी कमी विवरण झाले. तसेच इतर समभाग (संचित तोटा) याचे रु. २,६८, ८१७ लाखाने चालू दायित्वे याचे रु. २,५०,७१६ लाखाने अल्प कमी विवरण झाले. अल्प चालू नसलेल्या दायित्वाचे रु. १८,१०१ लाखाने जादा विवरण झाले.

## १२. भारतीय लेखा मानक ३७ आकस्मिक दायित्वे, मत्ता तरतुदी

एकत्रित वित्तिय विवरण पत्राच्या टिपा क्र.३७.१ यात महावितरणच्या आकस्मिक दायित्वांचे प्रमाणाचे परिक्षण व पडताळणी करण्यासाठी आम्हाला योग्य तपशील व कागदपत्रे न मिळाल्याने त्यावर मत देता येत नाही.

## १३. नियामक दायित्व आकार परत करणे

वित्तिय वर्ष २००३ ते २००६ पर्यंत नियामक दायित्व आकार हे ग्राहकांकडून जमा केले जात. महाराष्ट्र विज नियामक आयोगाने आदेश दिला की, रु. ३,२२,७०० लाख ग्राहकांना परत करावे. परिणामी कंपनीने ३१/३/२०१७ पर्यंत रु. ३,११,९७४ लाख परत केले. उर्वरित रु. १०,७२६ लाख देण्यासाठी कंपनीने तरतूद केलेली नाही. त्यामुळे कंपनीचा या वर्षाच्या तोट्याचे रु. १०,७२६ लाखाने तसेच चालू दायित्वाचे तेव्हढेच कमी विवरण झाले आहे.

## १४. इतर बाबी

**अ)** कंपनीने जीआरआयआर याचा निपटारा करण्यासाठी आणि कामे व देखभाल आणि पुरवठादार यांच्या दायित्व अनुक्रमे रु. १,२५,६७९ लाख आणि रु. ५४,७९५ लाख दाखविले आहे. या शिलकी डेबीट बॅलन्समधील आहेत. लेखापरिक्षणात्मक पाठपुरावा नसल्याने याचा कंपनीच्या मत्ता व दायित्वे यावरील परिणामांचा अंदाज करणे आम्हास शक्य झाले नाही.

**ब)** एफ बी एम एस कॉपर्समध्ये अमानतीमध्ये रु. ६,२४८.७४ लाख भरण्यात आले. एकत्रित वित्तिय विवरण च्या टीप क्र. ७ (अ) याप्रमाणे ही रक्कम 'इतरांकडील सुरक्षा अनामती' यात समाविष्ट आहे. मात्र आमची सर्वतोपरी माहिती व आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यानुसार ही यापूर्वीच परत मिळालेली आहे. तरीसुद्धा तीचा लेखावहीमध्ये योग्य लेखा केलेला नाही आणि ती 'येणे' म्हणून दाखविलेली आहे. यामुळे चालू नसलेल्या मत्ता व दायित्वात तेवढे जादा विवरण झाले आहे.

**क)** भारतीय लेखा मानके २० नुसार शासकीय अनुदानांना कालावधीच्या नफा व तोटा पत्रकात रीतसर तत्वानुसार मान्यता दिली जाते. ज्या हेतूकरिता अनुदाने मिळतात, त्यांच्या संबंधित खर्चाची कर्जफेडीची तरतूद त्या कालावधीत केली

जाते. कंपनी गृहित धरते की, मिळालेली सर्व अनुदाने त्याचवर्षात वापरली जातात आणि त्यांचे भांडवलीकरण केले जाते. योग्य व पुरेसे लेखापरिक्षणात्मक पुरावे नसल्याने यांचा कंपनीच्या वित्तिय विवरण पत्रावर होणारे परिणाम यावर आम्ही अभिप्राय देऊ शकत नाही.

**ड)** रु. ३,६०१.१७ लाख ही रक्कम ओळख नसलेली वीज खरेदी शिल्लक अशी दर्शविली आहे. आणि ती व्यापारी देणी वीज खरेदीची चालू दायित्व याप्रमाणे एकत्रित वित्तिय विवरण च्या टीप क्र. २६ मध्ये दिली आहे. त्यासंबंधी पडताळणी करण्यासाठी संस्था-निहाय तपशील आम्हास मिळाला नाही. परिणामी या दायित्वाचे अस्तित्व आणि त्याचे वित्तिय विवरण पत्रावरील परिणाम यावर भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

**इ)** कंपनी आणि तिच्या समुहातील कंपन्या यांच्या थकबाकीच्या शिलकीत याच्या दि. ३१/३/२०१७ रोजी लेखा वह्यांप्रमाणे खालील फरक दिसतात. त्याचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.

**(रु. लाखांत)**

| क्र. | कंपनीचे नाव | स्वरुप | महावितरणनुसार शिल्लक | कंपनी समूहानुसार शिल्लक | फरक |
|---|---|---|---|---|---|
| १ | म.रा.वीज निर्मिती कंपनी लि. | कर्जे व अग्रिमे | ४६,८३५.९७ | ४६,७८२.५० | ५३.४७ |
| २ | म.रा.विद्युत पारेषण कंपनी लि. | कर्जे व अग्रिमे | २४,१८३.२८ | २४,५१६.९३ | (३३३.६६) |
| ३ | महाराष्ट्र विद्युत विकास महामंडळ मर्यादित | कर्जे व अग्रिमे | २४६.७३ | २३०.५६ | १६.१७ |
| ४ | औरंगाबाद वितरण कंपनी लि. (महावितरणची उपकंपनी) | कर्जे व अग्रिमे | १२१.११ | १४२.७९ | (२१.६८) |
| ५ | मराविमं सुत्रधारी कं.लि. | इतर चालू दायित्वे | ४,०६,०३०.७९ | ३,८३,०१४.९४ | २३,०१५.८६ |

मेळ केला नसल्याने याचा वित्तिय विवरण पत्रावरील परिणामाचा आम्हास अंदाज करता येत नाही.

**फ)** एकत्रित वित्तिय विवरण पत्राचे टीप क्र. ४४.१३- हा सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजक ओळखणे व त्यांना देय व्याजाची तरतूद करणे यासंबंधी आहे. कंपनीने या दायित्वाचे सांख्यिकीकरण केलेले नाही. त्यामुळे त्यांचे (जर काही) व्याज देय असेल तर त्याचा अंदाज करता येत नाही. तसेच त्याचा या काळातील तोट्यावरचा परिणाम निश्चित करता येत नाही. अशा उद्योजकांची ओळख नसल्याने त्यासंबंधीच्या सांविधिकाची तरतूद कंपनीने केली नाही.

उपरोक्त वर्णन केलेल्या बाबींचे भारतीय लेखा मानक विवरणपत्रातील मूलतत्वांप्रमाणे योग्य निश्चिती /सांख्यिकीकरण खालीलप्रमाणे करता येईल.

**(रक्कम रु. लाखांत)**

| अनु.क्र. | लेखा शिर्षक | जादा विवरण | कमी विवरण |
|---|---|---|---|
| १ | इतर समभाग (संचित तोटे) | - | १,०७५, ८४२.०७ |
| २ | खर्च | - | - |
| | विलंब भरणा आकार | - | १०४,३८३.०६ |
| | वीज खरेदी | - | ६,४००.०० |
| | म.वि.नि. आयोगानुसार आरएलसी परत करणे | - | १०,७२६.०० |
| ३ | चालू दायित्व | - | - |
| | व्यापारी देणी | ६,२४८.७४ | १,१२९,१०५.१३ |
| | इतर चालू दायित्वे | - | १०७२६.०० |
| ४ | चालू नसलेल्या मत्ता | - | - |
| | सुरक्षा अनामती | ४५,६६७.७४ | - |
| | अग्रिमे | १८,१०१.०० | - |

**महानिर्मितीच्या बाबत :**

**अ)** या कंपनीने महावितरण कंपनी सोबत केलेल्या करारानुसार विलंब भरणा आकारावरील व्याजाचे रु. १,५०६.६७ कोटी यास 'ग्राहकांकडील अधिभाराचे उत्पन्न' या लेखाशिर्षांतर्गत वर्षातील उत्पन्न म्हणून मान्यता दिली होती. महाविरणने ३१ मार्च, २०१७ रोजी असा अधिभार रु. ५,२४७.३३ कोटी भरला नव्हता. त्यात मागील वर्षाचे उपार्जित उत्पन्नसुद्धा आहे. महावितरणने देयके स्वीकारली नसल्याने तिच्याकडून या थकीत रकमांची वसूली होण्याची खात्री नाही.

**ब)** कर्जे, अग्रिमे, ठेवी आणि व्यापारी देणी यांच्या शिलकी, त्यांच्या प्रकरणानुसार संबंधिताकडून कायम होणे/मेळ करणे याच्या अधिन आहेत. हे काम प्रलंबित असल्याने त्यानुसार समायोजने केलेली नाहीत. याशिवाय कर्जे व अग्रिमे यांच्या काही शिलकी प्रमाणाबाहेर प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असून काही विशिष्ट खात्यांचे समायोजन करण्यासाठी आवश्यक रक्कम निश्चित करता येणार नाही. यामुळे याशिलकीची स्थिती आणि वर्षभरातील कंपनीचा तोटा यावरच्या परिणामांचा आम्हास अंदाज करता येत नाही.

**पात्रतेचे मत :**

१) **महानिर्मिती बाबत :**

निम्नलिखित परिच्छेद (i) आणि (ii) यातील प्रकरणी यांच्या अधीन राहून आमच्या मते आणि आमची सर्वतोपरी उत्तम माहिती व आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यानुसार निवेदन करण्यात येते की, उपरिनिर्दिष्ट भारतीय लेखा मानकांनुसार केलेली स्वायत्ता वित्तिय विवरण पत्रे भारतात सर्वसामान्य स्वीकृत लेखातत्वे आणि भारतीा लेखा मानके याला सुसंगत प्रकारे या कंपनी समूहाच्या दि. ३१ मार्च, २०१७ रोजीच्या व्यवहारांच्या स्थितीचे (वित्तीय स्थिती) आणि त्या तारखेस संपलेल्या वर्षाचा तोटा (इतर सर्वंकष उत्पन्नासह वित्तीय कार्य) रोकडता प्रवाह आणि समभागातील बदल यांचे सत्य व वास्तव दर्शन घडवितात.

महानिर्मितीसंबंधी वरील पात्र मतांचा आधार, या (अ) परिच्छेद विचारात घेऊन नमूद केले जाते की, जर विलंब भरणा आकाराचे व्याज यास अधिभार म्हणून उपार्जित केले नसता तर अपेक्षित पतहानीच्या भरपाईची तरतूद करावी लागली नसती. तसेच मागील वर्षातील विलंब भरण्याची अधिभार वसूल संभाव्य असण्याचे थांबले असल्याने त्याचे लेखावहीत खर्च म्हणून नोंद करता आली असती त्याचे सोबतच्या वित्तीय विवरणपत्राच्या मूलतत्वावर होऊ शकणारे परिणाम खालील तक्त्यात निश्चित/सांख्यिकीकरण केले आहे.

**रक्कम रु. कोटीत**

| क्र. | लेखा शीर्षक | गट | जादा विवरण | कमी विवरण |
|---|---|---|---|---|
| १ | विलंब भरणा आकार-इतर प्रवर्तन महसूल | उत्पन्न | १,५०६.६७ | - |
| २ | मागील वर्षातील विलंब भरण्याची वसूली संभावनीय नसल्याने ती उलट करणे | खर्च | - | ३,७४०.६६ |
| ३ | व्यापारी येणी | चालू नसलेल्या मत्ता | ५,२४७.३३ | - |
| ४ | अपेक्षित पतहानीसाठी भरपाई | खर्च | ६९६.३२ | - |
| ५ | चालू नसलेल्या व्यापारी येण्यात कपात | चालू नसलेली व्यापारी येणी | - | ६९६.३२ |
| ६ | ठेवून घेतलेल्या मिळकतीवर परिणाम | इतर समभाग | ४,५५१.०१ | ४,५५१.०१ |

**आणि**

(२) वरील (अ) विचारात घेऊन, महानिर्मितीच्या संदर्भात पात्र मत्तांचा आधार याप्रमाणे वर्षाचा तोटा यावरील परिणाम आणि ३१ मार्च, २०१७ रोजीचा निव्वळ मत्तांचा अंदाज करता येत नाही.

आमच्या मते आणि आमची सर्वतोपरीची माहिती व दिलेले स्पष्टीकरण याप्रमाणे वरील 'पात्र मत्तांचा आधार' या परिच्छेदातील वर्णन केलेले विषय ज्याचे सहवाचन 'भर देण्याचे विषय' या परिच्छेदात वर्णन केलेल्या बाबींसोबत होते, यात वगळलेले परिणाम वगळता, उपरीनिर्दिष्ट भारतीय लेखा मानकांनुसार तयार केलेले वित्तीय विवरणपत्रके, कायद्यानुसार आवश्यक माहिती त्यातील विहित पद्धतीने देतात. तसेच ती कंपनीच्या दि. ३१ मार्च, २०१७ रोजीच्या व्यवहारांचे सत्य व रास्त दर्शन भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या लेखातत्वानुसार आहेत. तसेच ३१ मार्च, २०१७ रोजीचा या कंपनीचा एकूण तोटा, एकूण सर्वंकष उत्पन्न, रोकडता प्रवाह व समभागातील बदल यांची माहिती त्याला सुसंगत आहे.

## भर देण्याचे विषय :-

**मराविमं सुत्रधारी प्रकरणी विषयी :**

**आम्ही वित्तिय विवरण पत्राच्या टिपांमधील खालील बाबींकडे लक्ष वेधतो -**

**१)** टीप क्र. ४३ (२) पहावी. त्यात कंपनीने अग्रिम कर रु. १३८.५८ कोटी कर तरतुदीची निव्वळ दाखविली आहे. लेखा वहीत रु. ४०.०७ कोटी दिली आहे. आणि आयकर अभिलेखाप्रमाणे असे दायित्व नाही. कारण ही प्रकरणे अपिलात

गेली आहेत. कंपनीने स्वत:च्या न्यायबुद्धीने लेखावहीत ही तरतुदीची रक्कम नोंदली आहे.

२) टीप क्र. ४३ (३) पहावी. तेथे उपकंपन्यांकडील मालमत्ता भाड्याची थकित रक्कम रु. २३५.२२ कोटी (मा.वर्षी रु. २०९.६३ कोटी) प्रदीर्घ काळापासून थकित आहे.

३) टीप क्र. ३७ (३) पहावी. त्यात कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागास पत्राने कळविले की, राज्य शासनास कंपनीने दिलेल्या शेअरचे मुद्रांक शुल्क माफ करावे.

**महावितरण प्रकरणी :-**

१) एकत्रित वित्तिय विवरण पत्राची टीप क्र. ७ मध्ये म्हटले आहे की, कंपनीने भारतीा लेखा मानके १०९ अंतर्गत मिळू शकणारी इतर कर्जे रु. ९,६८७.४५ या थकित शिलकीसाठी संक्रमण तारीख दि. १/४/२०१५ रोजी नुसार अपेक्षित पतहानीची (वेळ हानी) तरतूद केली आहे. कारण त्याच्या मूळ तारखेवर करणे अव्यवहार्य झाले असते.

२) भारतीय लेखा मानकांनुसार वित्तिय विवरण पत्रे तयार करण्यासाठी कंपनीने खालील दि. ३१/३/१६ च्या दायित्वाचे दि. १/४/१५ रोजी पुर्नवर्गीकरण केले. (भारतीय जी ए पी पी) मध्ये चालू नसलेली दायित्वांचे चालू (भारतीय लेखा मानकात) पुर्नवर्गीकरण केले. मात्र त्याचे भारतीय लेखा मानके १०१ नुसार योग्य प्रकटन व कारण याचे अनुपालन झालेले नाही.

**(रक्कम कोटी मध्ये)**

| क्र. | तपशील | ३१/३/१६ रोजी | १/४/१५ रोजी |
|---|---|---|---|
| १ | विद्युतीकरण, सेवा जोडणी इ.च्या अनामती | ७,०४५.८९ | ६,२९२.६५ |
| २ | कर्मचारी कल्याण निधीची अनामत | ५,५८७.१६ | ४४२४.८० |
| ३ | देयके जमा करणाऱ्या संस्थेकडून सुरक्षा अनामत | ५,०९७.०१ | ४६१४.२० |
| ४ | रोजगार हमी योजना अंतर्गत कृषि पंप ऊर्जीकरणाची अनामत | ४४८.७१ | ३९२.७० |
| ५ | परवानाधारकांचे देणे | ४९३.६९ | ४९३.६९ |
| ६ | पुरवठादार व कंत्राटदारांकडील जमा व ठेवून घेतलेल्या रक्कम | १,५७,४९०.४९ | १,४४,९६२.८४ |
| ७ | नॉन डीडीएफ स्कीमअंतर्गत परत करणे | ७,२१९.०२ | ६,६५७.५३ |
| ८ | भांडवली पुरवठा/कामे यांचे दायित्व | ४,६९४.२९ | १,१४५.३७ |

३) एकत्रित वित्तिय विवरण पत्रांची टीप क्र. ४४.२६ यात नमूद केल्याप्रमाणे भारतीय लेखा मानकांचा परिणाम देताना, मालमत्ता, कारखाने, साधने चे दि. १/४/१५ चे मूल्य करण्यापूर्वी एफआरपी योजनेअंतर्गत पुर्नमूल्यांकनाचा विचार केला. (ही योजना शासन निर्णय क्र. रिफॉर्म २०१०/प्र.क्र./११७/ऊर्जा-३ दि. ३१ मार्च, २०१६ यानुसार आहे.) त्याचा प्रभाव भारतीय जीएपीपी नुसार ३१/३/१६ रोजीच्या वित्तिय विवरण पत्रामध्ये दिला होता. दि. ३१/३/१५ पर्यंतचा संचित घसाऱ्याचे दि. १/४/१५ रोजी संचित मिळकतीसोबत समायोजन करण्यात आले. हे समायोजन सुत्रधारी कंपनीच्या

दखलीप्रमाणे केले आहे.

**४)** टीप क्र. ४४.२४ पहावी. यात महाराष्ट्र विज नियामक आयोगाच्या सूचनेनुसार, कंपनीस प्रत्येक वर्षी मागील वर्षी निर्माण केलेल्या आकस्मिक राखीवच्या सममूल्य रकमेची गुंतवणूक करणे आवश्यक आहे. मात्र कंपनीने ३१/३/१७ रोजी आकस्मिक राखीव रु. ६८,५०० लाख असताना रु. १८,५२२.२९ लाख गुंतवणुकीसाठी ठेवले आहेत.

## महानिर्मिती प्रकरणी -

**आम्ही खालील टिपांकडे लक्ष वेधू इच्छितो**

**सुत्रधारी कंपनी :- महानिर्मिती कं.लि.**

**अ)** महानिर्मिती संबंधीची टीप क्र. ३९ (ब) पहावी. भविष्य निर्वाह निधीचे अंशदान यांच्या आधारे काही तूट/जादा असल्यास त्याचे लेखे करणेबाबत ही टीप आहे. त्याची आवश्यक माहिती, देतायेत नाही.

ब) महानिर्मिती संबंधी टीप क्र. ३८ पहावी. विविध जलविद्युत निर्मितीच्या सुविधांसाठी महाराष्ट्र शासनासोबत करार करणे या विषयी असून त्याची कार्यवाही व्हायची आहे.

**उपकंपनी :- महागूज कोलायरीज लि.**

**क)** आम्ही लेख्यांच्या टिपा यात 'महत्वाची लेखा धोरणे' याकडे लक्ष वेधू इच्छितो. भारतीय लेखा मानके प्रमाणे वित्तिय विवरण पत्रे कंपनी सतत कार्यरत राहणारी संस्था आहे, याप्रमाणे तयार केले आहेत. मात्र या कंपनीला वित्तिय वर्ष २०१६-१७ मध्ये रु. ८७,०४,१७०/- इतका तोटा झाला. तिचे ऋणचिन्ह युक्त राखीव रु. २,०७,३८,५९९/- असून ते भाग भांडवलापेक्षा जास्त आहेत. आता ३१ मार्च, २०१७ रोजी पूर्णपणे क्षतिग्रस्त आहे. याचा आधार कंपनीला भारत सरकारच्या, कोळसा मंत्रालयाकडून खाणीची जागा (ब्लॉक) नव्या उद्योजकांना पुन: मिळणे यावर अवलंबून आहे. यासाठी 'मच्छा कारा' महानवी कोळसा ब्लॉक (पूर्वी कंपनीच्या प्रवर्तकांना दिलेला) याचे कागदपत्र हस्तांतरण करणे, हक्क देणे, भौगोलिक अहवाल, खाण योजना, खाण बंद करण्याची पद्धती, इ. साठी भारत सरकारचे कोळसा मंत्रालयानंतर भरपाई देणे इ.

## उपकंपनी धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड :

**अ)** व्यवस्थापनाने ही कंपनी बंद करण्याचा निर्णय घेतल्याने तिचे लेखे, चालू असलेली संस्था या तत्वानुसार केले नाहीत. कंपनीने भांडवली कामे - प्रगती व सल्लागार आकराचा अग्रिम यासाठी वर्ष २०१५-१६ मध्ये तोट्यासाठी रु. ८,२९,००,७३८/- ची तरतूद केली. याविषयी महत्वाच्या लेखा धोरणाचा सारांश याकडे लक्ष वेधण्यात येते. त्यात या प्रकरणी तपशीलवार स्पष्टीकरण सादर केले आहे.

## वरील प्रकरणी आमचे मत पात्रतेनुसार नाही

**इतर विषय :-**

**१)** सुत्रधारी आणि तिच्या उपकंपन्या यांची अनुक्रमे ३१ मार्च, १६ रोजी संपलेल्या वर्षाची विवरणे आणि संक्रमण तारीख १ एप्रिल १५ रोजीची वित्तिय विवरणपत्रे व आरंभीचा ताळेबंद यांचा समावेश भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या वित्तीय

विवरणपत्रात केला आहे. ती यापूर्वी ३१ मार्च १६ व ३१ मार्च १५ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाच्या पूर्वी लेखापरिक्षण केलेल्या वित्तिय विवरण पत्रांवर आधारित आहे. ही वित्तिय विवरण पत्रे कंपन्यांची (लेखा मानके) नियमावली २००६ (दुरुस्त केल्याप्रमाणे) तयार केली होती व त्याचे २०१५-१६ वर्षासाठीचे लेखापरिक्षण आम्ही केले होते. आणि २०१४-१५ वर्षासाठी पूर्वी लेखापरिक्षकांनी लेखापरिक्षण केले होते. त्यावर अनुक्रमे ३ सप्टेंबर २०१६ व २३ सप्टेंबर २०१५ रोजी सुधारित मत अहवालाद्वारे दिले होते. कंपनी समुहाने भारतीय लेखा मानके स्वीकारल्याने वित्तिय विवरण पत्रातील फरकासाठी काही समायोजने करण्यात आली. त्याचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे.

२) तिन्ही उपकंपन्यांची वित्तिय विवरण पत्रे / वित्तीय स्थिती यांचे लेखापरिक्षण आम्ही केलेले नाही. त्यातील एकूण मत्ता रु. १८,२८४,७४२.६७ लाख, महसूल रु. ८,१४३,४४९.८९ लाख यांचा विचार एकत्रित वित्तिय विवरण पत्रात केला आहे. उपकंपन्या वित्तिय विवरण पत्राचे लेखापरिक्षण अन्य लेखापरिक्षकांनी केले आहे. त्यांचे अहवाल व्यवस्थापनाकडून आम्हास देण्यात आले. एकत्रित वित्तिय विवरण पत्रावरील आमच्या अहवालात उपकंपन्यांच्या ज्या रकमा व प्रकटने यांच्यावर आम्ही मते व्यक्त केली आहेत ती पूर्णपणे अन्य लेखापरिक्षकांच्या अहवालावर आधारित आहेत. तसेच ती उपकंपन्यांच्यासंबंधी कायद्याचे कलम १४३(३) व (११) यानुसार आहेत.

**वरील प्रकरणात आमचे मत पात्र केलेले नाही.**

**इतर कायदेविषयक आणि नियमनाच्या आवश्यकता :**

१) कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(५) यातील आवश्यकतेनुसार आम्ही ''जोडपत्र ब'' यामध्ये भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांच्या सूचनांच्या निवेदनातील 'लेखा परिक्षणाची कार्यपद्धती' याचे अनुपालन, त्याची अंमलबजावणी आणि कंपनी त्याचे एकत्रित वित्तिय विवरणपत्रे आणि लेखे यावरील परिणाम दिलेले आहेत.

**२) कायद्याचे कलम १४३ (३) यातील आवश्यकतानुसार आम्ही खालीलप्रमाणे अहवाल देत आहोत -**

**अ)** आम्ही, 'पात्र मत्तांचा आधार' या परिच्छेदातील मजकूराचे संभाव्य परिणाम वगळता आमचे सर्वोतपरी ज्ञान आणि विश्वास यादृष्टीने लेखापरिक्षणास आवश्यक असणाारी सर्व माहिती व स्पष्टीकरणे मिळविली आहेत.

**ब)** आमच्या मते, 'पात्र मत्तांचा आधार' या परिच्छेदातील मजकूराचे 'संभाव्य परिणाम' वगळता, सुत्रधारी कंपनी आणि तिच्या उपकंपन्यांनी कायद्याप्रमाणे आवश्यक अशी लेखा नोंदीच्या वह्यांचे व्यवस्थितरित्या जतन केलेल्या आहेत. असे आमच्या लेखापरिक्षणात दिसून आले.

**क)** या अहवालाशी संबंधित असलेले एकत्रित ताळेबंद, एकत्रित नफा तोटा पत्रक, एकत्रित रोकडता प्रवाह विवरण पत्र आणि एकत्रित समभागातील बदलांचे निवेदन ही सर्व कागदपत्रे लेख्या वह्यांशी सुसंगत आहेत.

**ड)** 'पात्र मत्तांचा आधार' यातील आमच्या निरिक्षणांच्या अधीन राहून आमच्या मते, भारतीय लेखा मानके नुसार तयार केलेली वरील एकत्रित वित्तीय विवरणपत्रे ही कायद्याचे कलम १३३ यात विहित केलेल्या भारतीय लेखा मानके यांचे अनुपालन करतात.

**ड)** ही शासकीय कंपनी असल्यामुळे भारत सरकारची दिलेली अधिसूचना क्र. जीएसआर ४६३(इ) दि. ५ जून २०१५ यात विहित केल्याप्रमाणे कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १६४ (२) यातील तरतुदी या कंपनीला लागू नाहीत.

**फ)** कंपनीचे वित्तीय अहवालासंबंधीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची उपयुक्तता आणि अशा नियंत्रणांच्या अंमलबजावणीतील प्रभाव याविषयी आमचा स्वतंत्र अहवाल 'जोडपत्र अ' येथे दिला आहे. आणि

**ग)** कंपनीचे (लेखा परिक्षण व लेखा परीक्षक) नियमावली २०१४ यातील नियम क्र. ११ यानुसार लेखा परिक्षणात ज्या इतर बाबी समाविष्ट करण्यात येतात, त्यावर आमच्या मते आता आमचे सर्वोत्तम ज्ञान व आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यानुसार खालीलप्रमाणे निवेदन देण्यात येते.

**१)** भारतीय लेखा मानके नुसार या एकत्रित वित्तिय विवरण पत्रामध्ये ज्या प्रलंबित कायदेशीर प्रकरणांचा कंपन्यांच्या वित्तीया स्थितीवर परिणाम होऊ शकेल ती प्रकरण या एकत्रित वित्तिय विवरण सोबतची टीपा क्र. ३७ मध्ये दिली आहेत.

**२)** भविष्यकाळासाठी ज्यासाठी तरतूद करावी लागेल अशा मोठ्या स्वरुपाचे हानीकारक दीर्घमुदतीचे कंत्राटी करार या कंपनी समूहामध्ये नाहीत. कंपनीने डेरिव्हेटीव्ह कंत्राटे केली नाहीत.

**३)** या कंपनी समुहातर्फे 'गुंतवणूकदार प्रशिक्षण व रक्षण निधी' यात स्थानांतरित करावी अशी कोणतीही रक्कम नाही.

**४)** भारतीय लेखा मानके  च्या एकत्रित वित्तिय विवरणपत्रातील टीप क्र. ४२ चा भाग म्हणजे कंपनीने ८ नोव्हेंबर १६ ते ३० डिसेंबर १६ या काळात विशिष्ट बँक तोटा बँकेत जमा करणे, राखून ठेवणे किंवा त्याचे व्यवहार करणे, या विषयी केलेली प्रकटने कंपनी व तिच्या उपकंपन्या यांच्या लेखा वह्यांनुसार होती. इतर प्रकटने म्हणजे आरंभीची शिल्लक, परवानगी दिलेल्या प्राप्ती व देणी  आणि त्याचे अखेरच्या शिलकीवरील संभाव्य परिणाम यांची पडताळणी करता आली नाही. कारण 'एस बी एन आणि इतर मूल्याची तोटा अशी चलनी नोटांची विभागणीला आधार देतील असे समाधानकारक पुरावे/कागदपत्रे सुत्रधारी कंपनीमध्ये नव्हती.

**डुगर ॲण्ड असोसिएटस्**

सनदी लेखापाल फर्म नोंदणी क्र. ०००५६१ एन

सही/-

**मुकेश गोयल**

भागीदार, सदस्य क्र. ०८१८१०

स्थळ : मुंबई

दि. १५/११/२०१७

## स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र 'अ'

**कंपनी अधिनियम २०१३ (कायदा) यातील कलम १४३ चे उपकलम ३ यामधील खंड-१ यानुसार सुत्रधारी कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर अहवाल :**

आम्ही मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड (यापुढे ''सुत्रधारी कंपनी'') आणि तिच्या उपकंपन्या यांची दि. ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाकरिता भारतीय लेखा मानकांप्रमाणे तयार करण्यात आलेली एकत्रित वित्तीय विवरणपत्रांचे लेखापरिक्षण करतानाच त्यासोबत दि. ३१ मार्च, २०१७ रोजी सुत्रधारी कंपनीच्या वित्तीय अहवालात द्यावयाची अंतर्गत वित्तीय विवरणे यांचे सुद्धा लेखापरिक्षण केले आहे. तसेच उपकंपन्यांच्या लेखा परिक्षकांनी दि. ३१ मार्च, २०१७ रोजीच्या वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण केले आहे.

## अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी :-

भारतीय सनदी लेखापाल संस्थेने वित्तीय अहवालाच्या संबंधीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यांचे लेखापरिक्षण या विषयावर मार्गदर्शक सूचना करणारी एक टिप्पणी प्रस्तृत केलेली आहे. (मार्गदर्शक सूचना) तयामध्ये वित्तीय अहवालाच्या संबंधात अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे निकष दिले असून त्यानुसार अंतर्गत नियंत्रणाचे महत्वाचे घटकांचा विचार करुन त्याच्या आधारे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे कंपनीत स्थापित करणे व ती व्यवस्थितरित्या कार्यरत ठेवणे यासाठी सुत्रधारी कंपनी व तिच्या उपकंपन्यांचे संबंधित संचालक मंडळ जबाबदार असते. या जबाबदाऱ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे संकल्प चित्र तयार करणे, ते अंमलात आणणे आणि ते सतत कार्यरत ठेवणे आदिंचा समावेश आहे. तसेच त्यातून कंपनीच्या उद्योग व्यवसायाचे वर्तन शिस्तबद्ध व कार्यक्षम पद्धतीने होण्यासाठी वित्तीय नियंत्रणे प्रभावी असली पाहिजेत. त्यातून कंपन्यांच्या मत्तांचे रक्षण करणे, लबाड्या आणि चुका यांना आळा घालणे, लेखांचे दस्तऐवज अचूक व परिपूर्ण ठेवणे आणि विश्वासार्ह माहिती वेळेवर तयार करणे आदी जबाबदाऱ्या असून त्यांच्या आवश्यकता कंपनी अधिनियम २०१३ यात दिल्या आहेत.

## लेखापरिक्षकांची जबाबदारी

अशाप्रकारे कार्यरत असलेल्या वित्तीय अहवालासाठीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाबाबत आमच्या लेखा परिक्षणाच्या आधारे मत व्यक्त करणे ही आम्हा लेखापरिक्षकांची जबाबदारी असते. वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यावरील उपरोक्त मार्गदर्शक सूचनांनुसार आम्ही लेखापरिक्षण केले. तसेच कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (१०) यात विहित केलेली लेखा मानके ज्या मर्यादेत अंतर्गत वित्तीय नियंत्रणांना लागू होतात, त्याप्रमाणे लेखा परिक्षण करण्यात आले. ही लेखा मानके आणि मार्गदर्शक सूचना यांची आवश्यकता अशी आहे की, आम्ही लेखा परिक्षणात नैतिक गरजांची पूर्तता करावी आणि वित्तीय अहवाल देण्यासाठीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी आहेत किंवा कसे आणि त्याचे सर्वोतपरी प्रभावीरित्या त्यांची कार्यवाही होते किंवा नाही याविषयी रास्त हमी मिळण्याच्यादृष्टीने आम्ही लेखापरिक्षणाचे नियोजन करावे व ते अंमलात आणावे.

आम्ही वित्तीय अहवालासाठीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे योग्य व परिणामकारक असल्याबद्दल लेखापरिक्षणातून पुरावे मिळवावे या हेतूने आम्ही लेखापरिक्षणाचे कार्य करतो. वित्तीय अहवाल देण्याकरिता अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यांच्या योग्यतेबाबत समाधान व्हावे असेही त्यात समाविष्ट आहे. त्यासाठी प्रणालीतील अस्तित्वात असलेले प्रत्यक्ष दुबळ्या

जागांचे धोके ओळखले, आणि त्यांच्या आधारे अंतर्गत वित्तीय कार्यपद्धतीचे परिक्षण व मूल्यमापन केले जाते. यासाठी लेखापरिक्षकांच्या न्यायबुद्धीवर आधारित कार्यपद्धती निवडली जाते. त्यात या भारतीय लेखा मानकानुसार तयार केलेली वित्तीय नियंत्रणे ही चुक किंवा लबाडी यामुळे होणाऱ्या गैर विवरणच्या धोक्याची तपासणी केली जाते.

आमचा विश्वास आहे की, या सुत्रधारी कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा योगय आधार शोधण्याच्यादृष्टीने व योग्य पुरावे मिळविण्यासाठी आम्ही आमचे लेखापरिक्षण पूर्ण केले.

**सुत्रधारी कंपनी :**

आम्ही येथे खालील मत्तांबाबत अस्वीकार या परिच्छेदात वर्णन केलेल्या कारणांमुळे आम्ही कंपनीच्या वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यासाठी योग्य व पुरेसे आधार देणारे लेखापरिक्षणाचे पुरावे शोधण्यास अयशस्वी झालो.

**उपकंपन्या :**

वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची उपयुक्त असल्याबद्दल लेखापरिक्षणातून कागदोपत्री पुरावे मिळविले. या हेतूने उपकंपन्यांचे लेखापरिक्षण करण्यात येते. आमच्या लेखापरिक्षणात आम्ही वित्तीय अहवाल देण्याकरिता अंतर्गत वित्तीय नियंत्रण पोत दुर्बल जागांचे धोके ओळखले व त्या धोक्यांचे परिक्षण व मूल्यमापन करणे परिणामकारकता तपासणे हे हेतू असतात. यासाठीची कार्यपद्धती लेखापरिक्षकांच्या निर्णय शक्तीवर अवलंबून असते. यात वित्तीय विवरणपत्रे, लबाडी किंवा चुका यामुळे होणाऱ्या गैरविवरणाच्या धोक्याचे मूल्यमापन केले जाते. उपकंपन्यांचे लेखापरिक्षकांचा विश्वास आहे की, त्यांनी उपकंपन्यांच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे अहवाल देण्यासाठी त्यांनी योग्य व पुरेसे पुरावे मिळविले आहेत.

## वित्तीय अहवालांसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अर्थ :

कोणत्याही कंपनीच्या वित्तीय अहवाल देण्याकरिता अंतर्गत वित्तीय नियंत्रणे असणे ही एक प्रक्रिया असून तिची रचना वित्तीय अहवालाची विश्वासार्हतेची हमी देण्यासाठी केलेली दिसते. तसेच बाह्य हेतूंसाठी तयार केलेली वित्तीय विवरणपत्रे सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या लेखातत्वानुसार असल्याबद्दल खात्री द्यावी लागते. कंपनीच्या वित्तीय अहवालासाठी असलेल्या अंतर्गत वित्तीय विवरण पद्धतीमध्ये खालील धोरणे व कार्यपद्धतींचा समावेश असतो.

१) **अभिलेख जतन करणे संबंधी :-** त्यात योग्य तपशील असावा तसेच ते अचूक असावेत आणि त्यात कंपनीच्या मत्तांसंबंधी व्यवहाराचे व विल्हेवाटीबाबतचे कृतीचे दर्शन व्हावे.

२) सर्वसाधारणपणे स्वीकृत लेखातत्वांशी सुसंगत असे व्यवहार नोंदणी केली असून त्यातील आवश्यकतेप्रमाणे वित्तीय विवरणपत्रे तयार केली आहेत. तसेच कंपनीला होणारी प्राप्ती व केले जाणारे खर्च हे कंपन्यांचे व्यवस्थापन व संचालक मंडळ यांच्या मंजुरीनंतर केले असल्याची ग्वाही मिळावी.

३) वित्तीय विवरणपत्रावर प्रत्यक्ष परिणाम करतील असे अनधिकृत मत्तांचे व्यवहार, संपादन, वापर याला आळा घालणे आणि तशा कृती वेळेवर शोधून काढले.

## मराविमं सुत्रधारी कं.लि. च्या प्रकरणी :-

**मतांचा अस्वीकार :**

भारतीय सनदी लेखापाल संस्थेने वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे लेखा परिक्षण यावर प्रस्तुत केलेल्या मार्गदर्शक टिपणीत अंतर्गत नियंत्रणाचे अत्यावश्यक घटक यांचा विचार करुन या कंपनीने वित्तीय अहवालासाठीची अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणाली स्थापन केलेली नाही, असे आम्हास दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणवरुन दिसते यामुळे कंपनीमध्ये दि. ३१ मार्च २०१७ रोजी वित्तीय अहवालांसाठी पुरेशी अंतर्गत वित्तीय यंत्रणा नियंत्रण प्रणाली अस्तित्वात असल्याबद्दलचे योग्य मत तयार करण्यासाठी पुरेसे पुरावे मिळविण्यास आम्ही समर्थ ठरलो. त्याम्फळे मी/आम्ही मत व्यक्त करु शकत नाही.

या कंपनीचे वित्तीय विवरणपत्रांचे लेखापरिक्षणाच्या चाचण्यांचे स्वरुप, वेळ आणि मर्यादा निश्चित करताना वरील मतांचा दावा नसल्याबद्दलची कारणे विचारात घेतली आहे. आणि त्यामुळे कंपनीला वित्तीय विवरणपत्रावरील आमच्या अभिप्रायांना बाधा येत नाही.

## उपकंपनी :

**महापारेषण कं.संबंधी :**

**वित्तीय अहवालासंबंधीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या अंगभूत मर्यादा :**

वित्तीय अहवालासंबंधीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणामध्ये काही अंगभूत मर्यादा असतात. यामध्ये नियंत्रणे वरचढ होण्याच्या प्रकारांचे अयोग्यरित्या व्यवस्थापन होणे, चुका किंवा लबाडी यामुळे गैर विवरणे वेळेवर शोधलेली नसणे, आदिंचा समावेश होतो. तसेच भविष्य काळासाठी केलेले प्रक्षेप परिस्थितीतील प्रत्यक्ष बदलामुळे गैर लागू होण्याची शक्यता असते. त्यामुळे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे व वित्तीय विवरण पत्रके त्या धोक्याच्या अधीन असतात. व ती नियंत्रणे अपुरी ठरतात किंवा त्याप्रमाणात धोरणांची किंवा कार्यपद्धतीची अंमलबजावणी यांची पूर्तता कमी होते.

**मत:-** आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे याआधारे असे दिसून आले की, या कंपनीत दि. ३१ मार्च, २०१७ रोजी आयसीएफआय यांनी प्रस्तृत केलेल्या टिपणीत नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणाचे अत्यावश्यक घटक विचारात घेऊन तयार केलेल्या वित्तीय अहवालांसाठीची अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणाली प्रभावीपणे सर्वतोपरी कार्यरत होती.

**उपकंपनी : औरंगाबाद पॉवर कं.लि.**

**वित्तीय अहवालासंबंधीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या अंगभूत मर्यादा :**

वित्तीय अहवालासंबंधीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणामध्ये काही अंगभूत मर्यादा असतात. यामध्ये नियंत्रणे वरचढ होण्याच्या प्रकारांचे अयोग्यरित्या व्यवस्थापन होणे, चुका किंवा लबाडी यामुळे गैर विवरणे वेळेवर शोधलेली नसणे, आदिंचा समावेश होतो. तसेच भविष्य काळासाठी केलेले प्रक्षेप परिस्थितीतील प्रत्यक्ष बदलामुळे गैर लागू होण्याची शक्यता असते. त्यामुळे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे व वित्तीय विवरण पत्रके त्या धोक्याच्या अधीन असतात. व ती नियंत्रणे अपुरी ठरतात किंवा त्याप्रमाणात धोरणांची किंवा कार्यपद्धतीची अंमलबजावणी यांची पूर्तता कमी होते.

**मत:-** आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे याआधारे असे दिसून आले की, या कंपनीत दि. ३१ मार्च, २०१७ रोजी आयसीएफआय यांनी प्रस्तृत केलेल्या टिपणीत नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणाचे अत्यावश्यक घटक विचारात घेऊन तयार केलेल्या वित्तीय अहवालांसाठीची अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणाली प्रभावीपणे सर्वतोपरी कार्यरत होती.

## महानिर्मिती कंपनी संबंधी:

### वित्तीय अहवालासंबंधीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या अंगभूत मर्यादा :

वित्तीय अहवालासंबंधीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणामध्ये काही अंगभूत मर्यादा असतात. यामध्ये नियंत्रणे वरचढ होण्याच्या प्रकारांचे अयोग्यरित्या व्यवस्थापन होणे, चुका किंवा लबाडी यामुळे गैर विवरणे वेळेवर शोधलेली नसणे, आदिंचा समावेश होतो. तसेच भविष्य काळासाठी केलेले प्रक्षेप परिस्थितीतील प्रत्यक्ष बदलामुळे गैर लागू होण्याची शक्यता असते. त्यामुळे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे व वित्तीय विवरण पत्रके त्या धोक्याच्या अधीन असतात. व ती नियंत्रणे अपुरी ठरतात किंवा त्याप्रमाणात धोरणांची किंवा कार्यपद्धतीची अंमलबजावणी यांची पूर्तता कमी होते.

**मत :-** आमचा मते आणि आम्हास दिलेले माहिती व स्पष्टीकरणे या आधारे असे दिसून आले की, या कंपनीत दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी यांनी प्रस्तुत केलेल्या टिपणी नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणाचे घटक विचारात घेऊन तयार केलेल्या वित्तिय अहवालासाठीची वित्तिय नियंत्रण प्रणाली प्रभावीपणे सर्वतोपरी कार्यरत होती.

## पात्र मत्तांचा आधार/मत्तांचा अस्वीकार :-

**अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार तसेच आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे आम्हास दि. ३१ मार्च, २०१७ रोजी महानिर्मिती या सुत्रधारी (मुख्य) कंपनीमध्ये खालील महत्वाच्या दुर्बल स्थाने लक्षात आली.**

१) कंपनीमध्ये स्थित मत्तांचे वेळेवर भांडवलीकरण करणे, आज स्थित मत्तांच्या लेखे करताना परिसमापनातील नुकसानीचे समायोजन करणे याबद्दल प्रभावी अंतर्गत नियंत्रण नव्हते. या मोठ्या दुर्बलतेमुळे कंपनीच्या स्थित मत्ता, प्रगतीपथावरील भांडवली कामे, घसारा व खर्च यांचे प्रत्यक्ष गैर विवरण होण्याचा संभव होता.

२) कंपनीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुढील विषयात प्रभावीरित्या कार्यरत नव्हती. साहित्याचे प्रापण व लेखन, उपकंपन्यांचे कर्मचारी व भांडार माला संबंधीचे अभिलेख, पुरवठादारांना दिलेल्या अग्रिमाचे वेळेवर समायोजन दायित्वाची तरतूद करणे यामध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांचाही समावेश आहे. कोळसा पुरवठादारांसोबत उशीरा माल पोचवणे व कमी पुरवठ्यासाठी दंड करणे याचा हिशेब व लेखा करणे अपुरे आहे. या प्रत्यक्ष दुर्बल जागांमुळे कंपनीची दायित्वे व मत्ता यांचे सदोष मूल्यांकन होऊ शकते.

३) या कंपनीतील वस्तू माल सूचीचे जतन व मूल्यमापन करणे तसेच त्याच्या वित्तीय लेजर सोबत मेळ करणे याबाबत अंतर्गत वित्तीय नियंत्रणे परिणामकारक नव्हती. या प्रत्यक्ष दुर्बलतेमुळे वस्तू सूचीचे मूल्यांचे गैर विवरण होऊ शकते.

अंतर्गत वित्तीय नियंत्रणात प्रत्यक्ष मोठी दुर्बलता ही एक किंवा अनेक उणीवांचे मिश्रण आहे. त्यामुळे कंपनीच्या किंवा अंतरीम वित्तीय विवरणपत्रात मोठी गैरविवरणे होऊ शकतात. त्या शोधणे किंवा त्यांना आळा घालणे शक्य होत नाही.

**ब) अन्य उपकंपनीचे लेखापरिक्षण आम्ही केलेले नाही. ते अन्य लेखापरिक्षकांनी केलेले आहे. त्यांचे प्रकरणे:-**

आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे या कंपनीने भारतीय सनदी लेखापाल संस्थेने या विषयी वितरीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील अंतर्गत नियंत्रणाचे अत्यावश्यक घटक याचा विचार करुन किंवा त्यातील निकषांवर आधारित अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित केलेली नाहीत.

या कारणांमुळे या कंपनीमध्ये ३१ मार्च, २०१७ रोजी वित्तीय अहवाल देण्यसाठी पुरेशी अंतर्गत नियंत्रणे होती किंवा कसे यावर अभिप्राय व्यक्त करण्यासाठी पुरेसे व योग्य लेखापरिक्षण पुरावे मिळविणे आम्हास शक्य झालेले नाही.

**पात्र मत :** सदर सुत्रधारी कंपनी ही एक शासकीय उपक्रमाची संस्था आहे. त्यामुळे तिची वित्तीय अहवाल देण्यासाठीची अंतर्गत नियंत्रण प्रक्रिया, ही वेळोवेळी दिलेल्या विविध प्रकारची सूचना पुस्तिका, नियमावली परिपत्रके, सूचना, आदेश इत्यादि आधारे तयार केलेली असते. त्यामुळे वित्तीय अहवालासाठीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यावरील आमचे मत त्यातील व्याख्यांनुसार आधारलेले आहे. आमच्या लेखापरिक्षणाच्या काळात वित्तीय विवरणपत्राच्या संबंधित तपासणी करताना प्रायोगिक चाचण्यांच्या आधारे केले आहे. आणि अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा आढावा घेतला आहे. त्यातून नियंत्रणाच्या पद्धतीचा अपुरेपणा आणि प्रभाव याबाबत ज्या काही त्रुटी आढळल्या त्याबाबत आम्ही वरील पात्र मतांच्या आधार या परिच्छेदात निवेदन केले आहे. आमचे मत व्यक्त करताना आम्ही वरिल परिच्छेदातील निवेदनातील बाबींचा अपकार केला आहे. तसेच 'पात्र मतांचा आधार' या परिच्छेदात वर्णन केलेल्या महत्वाच्या दुर्बल जागा वगळल्या आहेत. हे अपवाद वगळल्यास सुत्रधारी कंपनीने वित्तीय अहवालासाठी अंतर्गत नियंत्रणे ही सर्वोतपरी व्यवस्थित अंमलात आणली आहेत. आणि अशी नियंत्रणे दि. ३१ मार्च, २०१७ रोजी परिणामकारकरित्या कार्यरत होती, असे आमचे मत आहे. सुत्रधारी कंपनीला भारतीय सनदी लेखापाल संस्थेने याविषयी दिलेल्या मार्गदर्शन, टिपणीला, अंतर्गत नियंत्रणांच्या अत्यावश्यक घटकांचा विचार करुन अंतर्गत नियंत्रणांच्या अत्यावश्यक घटकांचा विचार करुन याविषयाचे निकष औपचारकरित्या स्थापित करावयाचे आहेत.

**महागूज कोलायरीज लि. या उपकंपनीच्या प्रकरणी परिच्छेद 'ब' यातील कारणांच्या संदर्भात मतांचा अस्विकार यावर त्या कंपनीच्या लेखापरिक्षकांनी खालीलप्रमाणे निवेदन दिले आहे;**

''या कंपनीमध्ये दि. ३१ मार्च, २०१७ रोजी वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रभावीरित्या कार्यरत होती. किंवा कसे याबाबत पुरेसे आणि योग्य असे लेखापरिक्षणात्मक पुरावे आम्हाला मिळविता आलेले नाहीत. त्यामुळे त्यावर मत देता आले नाही.''

आम्ही या कंपनीचे लेखापरिक्षण करण्यासाठी तिचे स्वरुप, वेळ व मर्यादा निश्चित करताना वरील मतांचा अस्वीकार विचारात घेतला आहे आता त्यामुळे कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रावरील आमच्या मताला बाधा येत नाही.

'धोपावे कोस्टल पॉवर लि. या अन्य एका उपकंपनीच्या प्रकरणी लेखापरिक्षकांनी खालीलप्रमाणे मत दिले आहे.

## वित्तीय अहवालासंबंधीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या अंगभूत मर्यादा :

वित्तीय अहवालासंबंधीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणामध्ये काही अंगभूत मर्यादा असतात. यामध्ये नियंत्रणे वरचढ होण्याच्या प्रकारांचे अयोग्यरित्या व्यवस्थापन होणे, चुका किंवा लबाडी यामुळे गैर विवरणे वेळेवर शोधलेली नसणे, आदिंचा समावेश होतो. तसेच भविष्य काळासाठी केलेले प्रक्षेप परिस्थितीतील प्रत्यक्ष बदलामुळे गैर लागू होण्याची

शक्यता असते. त्यामुळे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे व वित्तीय विवरण पत्रके त्या धोक्याच्या अधीन असतात. व ती नियंत्रणे अपुरी ठरतात किंवा त्याप्रमाणात धोरणांची किंवा कार्यपद्धतीची अंमलबजावणी यांची पूर्तता कमी होते.

आम्ही या कंपनीचे लेखापरिक्षण करण्यासाठी तिचे स्वरुप, वेळ व मर्यादा निश्चित करताना वरील दुर्बल जागा विचारात घेतल्या व भारतीय लेखा मानकांप्रमाणे तयार केलेल्या एकत्रित वित्तीय विवरण पत्राचे आमचे ३१ मार्च, २०१७ रोजीचे लेखा परिक्षणात चाचण्या लागू केल्या. आमच्या मुख्य लेखापरिक्षण अहवालातील सुधारणांच्या अधीन राहून आम्ही अभिप्राय देतो की, भारतीय लेखा मानकाप्रमाणे तयार केलेल्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रावरील आमच्या पात्र मतात वरील दुर्बल जागा बाधा आणीत नाहीत.

## महावितरण कंपनी - या उपकंपनी प्रकरणी

### वित्तीय अहवालासंबंधीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या अंगभूत मर्यादा :

वित्तीय अहवालासंबंधीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणामध्ये काही अंगभूत मर्यादा असतात. यामध्ये नियंत्रणे वरचढ होण्याच्या प्रकारांचे अयोग्यरित्या व्यवस्थापन होणे, चुका किंवा लबाडी यामुळे गैर विवरणे वेळेवर शोधलेली नसणे, आदिंचा समावेश होतो. तसेच भविष्य काळासाठी केलेले प्रक्षेप परिस्थितीतील प्रत्यक्ष बदलामुळे गैर लागू होण्याची शक्यता असते. त्यामुळे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे व वित्तीय विवरण पत्रके त्या धोक्याच्या अधीन असतात. व ती नियंत्रणे अपुरी ठरतात किंवा त्याप्रमाणात धोरणांची किंवा कार्यपद्धतीची अंमलबजावणी यांची पूर्तता कमी होते.

**मतांचा अस्वीकार:** आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आणि आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे असे दिसते की, या कंपनीने भारतीय सनदी लेखापाल संस्थेने वित्तीय अहवाल लेखनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण या विषयावर वितरीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणाचे अत्यावश्यक घटक याचा किंवा निकषांचा विचार करत अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची प्रणाली स्थापित केकेली नाही. या कारणामुळे या कंपनीमध्ये दि. ३१ मार्च, २०१७ रोजी वित्तिय अहवालासाठी अंतर्गत वित्तिय नियंत्रणे पुरेशा प्रमाणात व प्रभावीरित्या कार्यरत होती किंवा कसे याबाबत पुरेसे व योग्य असे लेखापरिणात्मक पुरावे मिळविण्यात आम्ही असमर्थ ठरलो.

मात्र आमच्या लेखापरिक्षणाच्या काळात आम्ही केलेल्या मर्यादित कार्यपद्धतीमध्ये कंपनीच्या वित्तीय अहवालासाठीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रण पद्धतीमध्ये दि. ३१ मार्च, २०१७ रोजी आम्हाला खालील दुर्बल जागा आढळल्या

१. या कंपनीमध्ये मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या खर्चाचे भांडवलीकरण करुन ओव्हड हेडस् निश्चित करण्यसाठी योग्य अंतर्गत नियंत्रण प्रणाली नाही. त्यामुळे मालमत्ता, कारखाने व साधने यांचे कमी/जादा/विलंबाने भांडवलीकरण होण्याची शक्यता असते. त्याचा संलग्न परिणाम घासारा आकारणी आणि प्रवर्तनातील फले यावर होऊ शकतो.

२. कंपनीमध्ये मालमत्ता, कारखाने व साधने यांचे योग्यवेळी भांडवलीकरणाची योग्य अंतर्गत नियंत्रण प्रणाली नाही. ती जेव्हा वापरण्यास तयार होतात तेव्हाच भांडवलीकरण न केल्याने त्यास विलंब होतो. अभियांत्रिकी विभागाकडून काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र मिळण्यास किंवा खरेदी केलेल्या बाणींची पावत्या संबंधित विक्रेत्यांकडून मिळाल्यास विलंब होतो. यामुळे मालमत्ता, कारखाने आणि साधने यांचे कमी भांडवलीकरण होण्याची शक्यता असते व त्यांचे संलग्न परिणाम प्रवर्तनाच्या फलांवर होतो.

३. कंपनीमध्ये कर्मचारी, कार्यालयीन व प्रशासनातील खर्च यांचे भांडवलीकरणाचे योग्य अंतर्गत नियंत्रण प्रणाली नाही. या बाबीचे भांडवलीकरण तदर्थ तत्वावर १५ टक्के दराने भर करणे किंवा भांडवली मत्ता/प्रकरण/प्रगतीपथावरील भांडवली कामे यांना लागलेले खर्च निश्चित न करता वर्षभरातील प्रगतीपथावरील भांडवली कामे अशाप्रकारे केले जाते. याशिवाय भांडवलीकरणाची खरी तारीख कोणतीही असली तरी आणि त्यात काही व्यत्ययाचा कालावधी असला तरी भांडवलीकरणाचा दर संपूर्ण वर्षासाठी लावला जातो.

४. कंपनीच्या मत्ता, कारखाने व साधने यांतील विविध डिव्हीजन्स, सर्कल आणि मुख्यालय येथे असून तेथे त्यांचे योग्य कालावधीनंतर त्यातील वस्तूमालाचे प्रत्यक्ष पडताळणी करण्याची आणि त्यामध्ये काही विसंगती असल्याचे त्याचे समायोजन करण्याची योग्य नियंत्रण व्यवस्था नाही.

५. कंपनीमधील डिव्हीजन, सर्कल येथे असलेल्या मालसाठा / वस्तू सूची यांची वेळेवर पडताळणीसाठी प्रभावी अंतर्गत नियंत्रण व्यवस्था नाही. त्याची वित्तीय लेजरमधील शिलकीसोबत मेळ केला नाही. तसेच त्यातील विचलनांच्या कारणांचे विश्लेषण केले नाही व त्या विसंगतीवर योग्य उपाययोजना केली नाही.

६. या कंपनीमध्ये मालाचा पुरवठा व सेवा देणारे विक्रेते / कंत्राटदार यांच्या देयकांची प्रलंबित प्राप्तीची तरतुदीची हमी देणारी योग्य अंतर्गत नियंत्रणप्रणाली नाही. वर्षाच्या अखेरीस योग्य खर्चाचे प्रत्यक्ष मिळालेली देयके/बीजके प्रत्यक्ष दिल्यावर त्यांच्यावर उलटी प्रक्रिया व लेखे करण्याची खातरजमा केली पाहिजे. अन्यथा त्याचा चुकीचे लेखा होऊ शकतो.

७. कंपनीमध्ये एकात्मिक इआरपी/सॅप प्रणाली नाही. कंपनीत वेगवेगळी सॉफ्टवेअर्स वापरुन नंतर ती एकमेकांसमवेत जोडण्याचे काम सॉफ्टवेअर लिंकद्वारे किंवा मानवी बळाने हस्तक्षेप करुन केले जाते. यामध्ये काही बाबी राहून जाऊ शकतात. यामुळे वित्तीय अहवालात काही उणीवा राहण्याची शक्यता असते.

८. या कंपनीमध्ये विक्रेते / कंत्राटदार / अन्य व्यापारी प्राप्ती यांच्या रकमांच्या मेळ करणे / कायम करणे यासाठी तसेच कर्जे व अग्रिमांच्या शिलकी, यामध्ये कंपनी समूहातील उपकंपन्याकडील शिलकी यांच्या समायोजनाची योग्य नियंत्रण प्रणाली नाही. त्यामुळे वित्तीय विवरणात काही बदल होणे संभवनीय आहे.

९. या कंपनीत सांविधिक देणी म्हणजे सेवा कर, कंत्राट कामांचा कर, स्त्रोतापाशी कर कपात, टीसीएस आदींच्या योग्य कपाती आणि जमा करणे यासाठी योग्य अंतर्गत नियंत्रण प्रणाली नाही. त्यामुळे कपात न करणे किंवा कमी प्रमाणात करुन ती विलंबाने शासकीय प्राधिकाऱ्यांमध्ये जमा करणे असे प्रकार होऊ शकतात. त्याचे परिणाम वित्तीय विवरण पत्रावर होतात. तसेच न्यायालयीन खटले, दंडाची कारवाई आणि व्याजदर वसूली आदि समस्यांना कंपनीस तोंड द्यावे लागू शकते.

१०. या कंपनीने बाहेरचे पात्र सनदी लेखापालांच्या मदतीने अंतर्गत लेखा परिक्षणाची कार्यपद्धती अंमलात आणली आहे. मात्र सर्व दुर्बल क्षेत्रांचा समावेश त्यात करता येईल एवढी ती व्यापक नाही. कंपनीतील डिव्हीजन व सर्कल स्तरावर अंतर्गत लेखापरिक्षणाच्या निरिक्षणांवर पूर्तता करणे, बंद करणे यासाठी प्रभावी कार्यप्रणाली नाही. यामुळे अपुरी तपासणी व शिल्लक करणे तसेच वित्तीय अनियमिता, दोष व अहवाल न देणे असे प्रकार होणे संभवनीय आहे. त्यामुळे कंपनीच्या वित्तीय अहवालात उणीवा राहू शकतात आणि अंतर्गत नियंत्रणाकडे प्रशासनाची जबाबदारी असणाऱ्यांचे दुर्लक्ष होऊ शकते.

११. कंपनीमध्ये आयकर, सेवाकर, टीडीएस, टीसीएस, कंत्राटावरील अन्य कर इ. चा विविध कर लेखांचा कागदपत्रांसमवेत

मेळ करण्याची अंतर्गत नियंत्रण यंत्रणा नाही. त्यामुळे संबंधित कराचे अभिलेख तयार करुन परतावे मिळविण्यात समस्या निर्माण होऊ शकतात. यातून वित्तीय विवरणपत्रात संबंधित रकमा कमी किंवा जास्त प्रमाणात नोंदल्या जाऊ शकतात.

१२. कंपनीची जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, टपाल कार्यालये येथे खाती आहेत. तेथील शिलकी कायम व त्यांचा मेळ करुन वेळेवर अचूक लेखे करणे यासाठी कंपनीमध्ये अंतर्गत नियंत्रणे नाहीत. त्यामुळे वित्तीय अहवालात कमतरता दिसू शकते.

१३. बँकातील रकमांची विवरण पत्रे आणि कंपनीच्या लेखा वह्यातील नोंदी यांची वेळोवेळी फरक असल्यस वेळेवर त्याचा मेळ करणे, यासाठी कंपनीमध्ये अंतर्गत नियंत्रणे नाहीत. यामध्ये ग्राहकांची बँकरने नाकारलेले चेक्ससुद्धा आहेत. त्याचे लेखे केलेले नाहीत किंवा त्या रकमा उलट फिरविलेल्या नाहीत.

१४. जी आर आय आर यांचा आणि पुरवठादारांच्या लेखा दायित्व यांचे निपटारे करणारी पुरेशी अंतर्गत नियंत्रणे या कंपनीत नाहीत. यामुळे वित्तिय विवरणपत्रात अशी दायित्वे कमी प्रमाणात नोंदली जाऊ शकतात.

१५. समूहातील अन्य कंपन्यांकडे असलेल्या शिलकीचा मेळ करणारी अंतर्गत नियंत्रणे या कंपनीत नसल्याने वित्तिय विवरण पत्रात अशा शिलकी कमी/जादा प्रमाणात नोंदल्या जाऊ शकतात.

अंतर्गत नियंत्रणामध्ये ''प्रत्यक्ष महत्वाच्या दुर्बल जागा'' यामध्ये एक किंवा जास्त उणीवा असू शकतात. त्यामुळे वित्तीय अहवाल देताना कंपनीच्या वार्षिक किंवा अंतरिम वित्तिय विवरण पत्रात मोठे गैर विवरण होण्याची शक्यता असते. ते वेळेवर शोधून त्याला प्रतिबंध केला जात नाही.

आम्ही अशा दुर्बल जागांच्या निश्चित करुन त्या विचारात घेतल्या. आम्ही कंपनीच्या वित्तिय विवरण पत्रांचे लेखापरिक्षण करताना या दुर्बल जागांचे स्वरुप, वेळ आणि चाचण्या विचारात घेतल्या. वरील दुर्बल जागांमुळे भारतीय लेखा मानकांप्रमाणे तयार केलेल्या कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रांवरील आमच्या मतांवर त्याचा परिणाम झाला आहे. आणि आम्ही या भारतीय लेखा मानकानुसार वित्तिय विवरण पत्रांवर पात्रतेचे मत दिले आहे.

**डुगर ॲण्ड असोसिएटस्**

सनदी लेखापाल फर्म नोंदणी क्र. ०००५६१ एन

सही/-

**मुकेश गोयल**

भागीदार, सदस्य क्र. ०८१८१०

स्थळ : मुंबई

दि. १५/११/२०१७

**जोडपत्र 'ब' :- भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी अधिनियमाचे कलम १४३ वे मधील उपकलम (५) नुसार दिलेले आदेश/उप आदेश यावर अहवाल :**

भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी अधिनियमचे कलम १४३ यामधील उपकलम (५) नुसार काही आदेश दिले. त्याप्रमाणे व कंपनीच्या लेखा वह्या व अभिलेख यांच्या तपासणीच्या आधारे आणि आम्हास योग्य वाटलेले तसेच आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार सदर आदेशात विनिर्देशित केलेल्या विषयावर आम्ही पुढीलप्रमाणे निवेदन देत आहोत.

## मराविमं सुत्रधारी कं.लि.च्या प्रकरणी :-

**१. अधिनियमाचे कलम १४३ मधील उपकलम (५) नुसार आदेश**

| अनु.क्र. | आदेश | उत्तर |
|---|---|---|
| १. | या कंपनीमध्ये मालकीच्या आणि भाड्याच्या जागेसंबंधी सुस्पष्ट नावानुसार विलेख अनुक्रमे केले आहेत किंवा जर नसले तर कृपया मालकीचे /भाड्याचे विलेख नसतील अशी क्षेत्रे स्पष्ट करा. | आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार अचल मालमत्तांचे मालकीचो नांवो विलेख कंपनीने तिच्या नांवे धारण केलेले नाहीत. कारण अशा सर्व मत्ता हंगामी हस्तांतरण योजनेनुसार या कंपनीकडे हस्तांतरित केल्या होत्या. आता या योजनेचे अंतिमीकरण दि. ३१ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णय क्र. रिफॉर्म/२०१०/प्र.क्र.११७/ऊर्जा यानुसार केले आहे. मालकीच्या आणि भाड्याच्या ज्या जागांचे विलेख उपलब्ध नाहीत त्याचा तपशील येथे **खालील परिशिष्ट-१ मध्ये दिसत आहे.** |
| २. | कर्जे/ऋणे/व्याज इ. सोडून देण/निर्लेखित करणे अशी काही प्रकरणे आहेत किंवा कसे? असल्यास त्याची कारणे व रकमा. | आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कर्जे/ऋणे/व्याज इ. सोडून दिल्याची प्रकरणे नाहीत. |
| ३. | तिसऱ्या पक्षाकडे असलेल्या वस्तू सूचीचे योग्य अभिलेख आहेत काय? शासन विंवा अन्य प्राधिकरणांकडून काही मत्ता भेट देणगी अनुदान स्वरुपात मिळाल्या असल्यास त्याचे अभिलेख आहेत का? | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार तिसऱ्या पक्षांकडे कुठलेही वस्तुमाल ठेवलेला नाही. तसेच शासन किंवा अन्य प्राधिकरणे यांचेकडून कोणत्याही मत्ता देणगी/अनुदान स्वरुपात मिळाल्या नाहीत. |

## परिशिष्ट - १

| मत्तांचे वर्णन | प्रकरणांची संख्या | क्षेत्रफळ | ३१/३/२०१७ रोजी ठोक गट (रु. कोटीं) | ३१/३/२०१७ रोजी निव्वळ गट (रु. कोटीत) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| जमीन -भाडेपट्टी | २ | ७.१ | २०४.५९ | १७१.२३ | नावावर करण्यासाठी कंपनी कायदेशी बाबी पूर्ण करण्याकरिता उचित पाय योजित आहे. |
| जमीन-मालकीची | ३ | १.८९ | ७०.८९ | ७०.८९ | |
| इमारती व बांधकामे | १३ | उपलब्ध नाही | ११८०.५३ | ८७६.९२ | |

### ब) विषयानुसार उप आदेश : लेखा निरिक्षकांचे अभिप्राय

| अनु.क्र. | उप आदेश | उत्तरे |
|---|---|---|
| १ | व्यापारी येणी, देणी, मुदतीच्या ठेवी, बँक खाती व रोकड प्राप्ती यांच्या शिलकी कायम होण्यावर अभिप्राय | खालील तक्त्यानुसार |
| २ | काही कार्ये करण्यासाठी केंद्रीय/राज्य शासन किंवा इतर संस्थांकडून मिळालेली अनुदाने / अर्थसहाय अन्यत्र वळविली असल्यास त्याचा अहवाल | चालू वर्षी कंपनीस केंद्र/राज्य शासनाने किंवा अन्य संस्थां-कडून कोणतीही अनुदाने / अर्थसहाय्य मिळाली नव्हती. मात्र मागील काही वर्षांतील रु. ०.५७ कोटी (व्याजासह) देणे आहे. आम्हास दिलेल्या स्पष्टीकरणानुसार संबंधित देणी ज्यांच्या देणे आहे त्या व्यक्ती सापडल्या नाहीत. |

| अनु.क्र. | तपशील | कायम केल्याची माहिती % |
|---|---|---|
| १ | **व्यापारी येणी** | ०.००% |
| २ | व्यापारी येणी (आंतरयुनीट देण्यांशिवाय) | ०.००% |
| ३ | व्यापारी येणी (आंतरयुनीट देणी) | ०.००% |
| ४ | मुदतीच्या ठेवी (F.D) | १००.००% |
| ५ | बँक खाती (चालू खाती) | १००.००% |

## २. महानिर्मिती कंपनीच्या प्रकरणी :

१) जर कंपनीची निर्गुंतवणुकीसाठी निवड झाली असल्यास, मत्तांचे मूल्यांकन (अमूर्त मत्ता व जमिनीसह) आणि दायित्वे (बांधिलकी व सामान्य राखीव यासह) यांच्या संपूर्ण स्थितीचे परिक्षण करावे. (निर्गुंतवणुकीचा सध्याचा टप्पा व पद्धतीसह)

**सुत्रधारी कंपनी : महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं.लि. (महानिर्मिती)**

या कंपनीची निवड निर्गुंतवणुकीसाठी झाली नाही. म्हणून मागवलेली माहिती या कंपनीला लागू नाही.

**उपकंपनी : महागूज कोलायरीज लि.**

कंपनीला निर्गुंतवणूकीसाठी निवडले गेले नाही, त्यामुळे मालमत्तेचे मुल्यांकन (अमूर्त मालमत्तेचे आणी जमिनीसह) आणि दायित्वे (वचनबद्ध व सामान्य राखीव) निर्गुंतवणूक प्रक्रियामध्ये वर्तमान स्थिती व पद्धतीचा समावेश कंपनीला लागू आहे.

**उपकंपनी : धोपावे कोस्टल पॉवर लि.**

नाही, ही कंपनी निर्गुंतवणुकीसाठी निवडलेली नाही.

**उपकंपनी : महाजनको राख व्यवस्थापन सेवा लि.**

नाही, ही कंपनी निर्गुंतवणुकीसाठी निवडलेली नाही.

२. कर्जे/ऋणे/व्याज इ. सोडणे / निर्लेखन करणे याची प्रकरणे असल्याच त्याचे अहवाल देणे. जर होय असेल तर त्याची कारणे व त्यातील रकमा यांची माहिती द्यावी.

**सुत्रधारी कंपनी : महानिर्मिती**

या कंपनीच्या लेखापरिक्षणाच्या काळात आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने दि. वर्ष २०१६-१७ मध्ये कर्जे, ऋणे, व्याज इ. सोडलेले किंवा निर्लेखित केलेले नाही. मागील वर्षी २०१५-१६ मध्ये कंपनीस मराविमं सुत्रधारी कंपनी (पालक कंपनी) कडून एक पत्र मिळाले. त्यात मराविमं कंपनीच्या लेखा वह्यात नोंदलेल्या पूर्वी मराविमं कंपनीत मालकीच्या काही काल्पनिक मत्ता व दायित्वे महानिर्मितीकडे स्थानांतरित करण्यात आल्या असून त्यांना मान्यता द्यावी असे सांगितले होते. पालक कंपनीने अशा काल्पनिक मत्ता/दायित्वे सर्व सहीदर उपकंपन्यामध्ये एक विशिष्ट प्रमाणात स्थानांतरित केलेल्या त्याची कारण मीमांसा पात्र दिलेला नाही. पालक कंपनी ने कळविलेली, या काल्पनिक मत्ता दायित्वे निर्लेखित करावीत / पुनर्लिखित करावी. अशा शिलकीमध्ये भांडवली राखीवची रक्कम रु. २६० कोटी समाविष्ट आहे. (त्यात या कंपनीचा वाटा रु. ३९ कोटी आहे.) कंपनीने या ओळख निश्चिती न झालेल्या मत्ता/दायित्वे यांना अद्याप मान्यता दिलेली नाही. (निव्वळ दायित्वे रु. ८६ कोटी) आणि आम्हास व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार कंपनीने याविषयी अधिक माहिती पालक कंपनीकडून मागविली आहे.

**उपकंपनी :- महागूज कोलायरीज लि.**

या कंपनीच्या लेखापरिक्षणाच्या कालावधीत कर्जे, ऋणे/व्याज इ. सोडणे/निर्लेलिखत करणे याच्या कोणतेही प्रकरण नव्हते.

**उपकंपनी :- धोपावे कोस्टल पॉवर लि.**

या कंपनीच्या लेखापरिक्षणाच्या कालावधीत कर्जे, ऋणे/व्याज इ. सोडणे/निर्लेलिखत करणे याच्या कोणतेही प्रकरण नव्हते.

**उपकंपनी :- महाजनको ॲश मैनेजमेण्ट सर्विसेस लिमिटेड**

या कंपनीच्या लेखापरिक्षणाच्या कालावधीत कर्जे, ऋणे/व्याज इ. सोडणे/निर्लेलिखत करणे याच्या कोणतेही प्रकरण नव्हते.

३. तिसऱ्या पक्षाकडे असलेल्या वस्तू सूची आणि शासन किंवा अन्य प्राधिकरणांकडून देणगी म्हणून मिळालेलया मत्तांचे योग्य अभिलेख ठेवले आहेत किंवा करु.

**सुत्रधारी कंपनी :- महानिर्मिती**

कंपनी तिची वस्तू सूचीतील साहित्य तिसऱ्या पक्षाकडे केवळ देखभालीची कामे किंवा जोडणी करणे यासाठी पाठविते. आम्हास दिलेल्या माहितीनुसार अशा वस्तू सूचीचे योग्य अभिलेख ठेवले आहेत. तसेच आम्हास सांगण्यात आले की, कंपनीस शासन किंवा अन्य प्राधिकरणे यांचेकडून कुठल्याही मत्ता देणगी स्वरुपात मिळाल्या नाहीत.

**उपकंपनी : महागूज कोलायरीज**

तिसऱ्या पक्षाकडे कुठलीही वस्तू सूची नाही. शासन/अन्य प्राधिकरणाकडून कोणत्याही मत्ता देणगी म्हणून मिळालेल्या नाहीत.

**उपकंपनी : धोपावे कोस्टल लि.**

लागू नाही

**उपकंपनी : महाजनको  राख व्यवस्थापन सेवा लि.**

लागू नाही. कोणतीही वस्तू सूची नाही.

४. प्रलंबित न्यायालयीने वाद / न्यायाधिकरण यांचा वर्षनिहाय अहवाल द्यावा. त्यामध्ये प्रलंबित असण्याची कारणे द्यावीत. तसेच कायदेविषयक प्रकरणांच्या खर्चावर लक्ष देणारी यंत्रणा अस्तित्वात असल्यास तिच्या प्रभावी उपयोगासंबंधीची माहिती द्यावी. सर्व (परदेशी व स्थानिक) न्यायलयीन खटल्यांसंबंधी माहिती द्यावी.

**सुत्रधारी कंपनी : महानिर्मिती**

कंपनीने न्यायालयातील / लवादातील एकूण २९८ प्रकरणांची माहिती खालील तक्त्यात दिली असून त्यांचे आकस्मिक दायित्व म्हणून प्रकटन केले आहे.

| प्रकरणांची वर्षे | प्रकरणांची संख्या |
|---|---|
| १ वर्षापेक्षा कमी | ३४ |
| १ ते २ वर्षे | ३७ |
| २ ते ३ वर्षे | १६ |
| ३ ते ५ वर्षे | ३७ |
| ५ वर्षांपेक्षा जास्त | १६४ |
| इतर हजेरी न लागलेली | १० |
| एकूण | २९८ |

ही सर्व प्रकरणे कोणत्या कारणांमुळे प्रलंबित आहेत याची योग्य माहिती उपलब्ध नसल्यामुळे न्यायालयीन प्रकरणांवरील खर्चावर लक्ष देणाऱ्या यंत्रणेची परिणामकारकता व प्रलंबित असल्याची कारणे यावर भाष्य करण्यास आम्ही समर्थ आहोत.

**उपकंपनी : महागूज कोलायरीज लि.**

प्रलंबित कायदेशीर वाद/ लवादाची प्रकरणे यांची वर्षनिहाय विश्लेषणे, प्रलंबनाची कारणे व अशा प्रकरणांवरील खर्चाचे नियंत्रक प्रणालीचे अस्तित्व, प्रभाव याचा अहवाल येणे आहे.

**उपकंपनी : धोपावे कोस्टल लि.**

लागू नाही

**उपकंपनी : महाजनको राख व्यवस्थापन सेवा लि.**

लागू नाही

**कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (५) यातील उप आदेश यावर अभिप्राय :**

५. **कंपनीने मागविलेल्या कोळशाची संख्या/दर्जा याचा मेळ करण्यासाठी कंपनीकडे योग्य यंत्रणा आहे काय? आणि कोळसा/ ओलसरपणा आणि विलंब आकार इ. यांच्या योग्य नोंदी लेख्यांच्या वह्यात केल्या जातात किंवा कसे?**

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. लि. :**

होय, कंपनीकडे तिने मागणीचा आदेश दिलेल्या कोळशाची संख्या व त्याची प्राप्ती यांचा मेळ करण्याची यंत्रणा आहे. मात्र विद्यमान कार्यप्रक्रिया अधिक प्रभावी करण्याची गरज आहे. सप्टेंबरच्या पहिल्या सप्ताहापर्यंत कोळशाचा दर्जा घसरणे याबाबतचे दावे, तांत्रिक विश्लेषक आणि पुरवठादारांचे प्रतिनिधी यांचेकडून कोळसा भरण्याच्या ठिकाणी, कोळसा खाणीने दिलेल्या दर्जाच्या तुलनेत संयुक्त निरिक्षण करुन केले जात होते. त्यानंतर कंपनीने 'सेंट्रल इन्स्टिटयुट ऑफ मायनींग ॲण्ड फ्युएल रिसर्च'' (सी आय एम एफ आर) या मान्यताप्राप्त कोळसा विश्लेषक कंपनीची नियुक्ती

केली आहे. ही संस्था कोळसा कंपनीच्या माल भरण्याच्या जागांवर तांत्रिक विश्लेषण करते. या संस्थेने केलेल्या पृथक्ककरणाच्या अहवालाच्या आधारे, अधीक्षक अभियंता कोळसा, यांचे कार्यालय बीजकामधील दर्जा व अहवालातील दर्जा यांचा मेळ करते. आणि त्यानुसार कोळसा कंपन्यांकडे दर्जा घसरला असल्याबद्दल दावे करते. वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या तारखांना ही कार्यपद्धती सुरु करण्यात आली.

याशिवाय महानिर्मिती कंपनीने करारानुसार कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्यासाठी केलेल्या दाव्याची रक्कम दि. ३१ मार्च, २०१७ रोजी रु. १०३५.६७ कोटी झाली होती. मात्र एक पुरवठादार मे. वेस्टर्न कोल फिल्ड लि. (WCL) यांनी कंपनीकडून कमी माल उचलल्याबद्दल रु. १६७.४१ कोटींची मागणी केली. याविषयी कागदोपत्री पुरावे उपलब्ध नसल्याने कोणत्याही बाजूच्या मागणीची अचूकता तपासून निष्कर्ष काढता येणे अवघड आहे. कंपनीने कोळसा पुरवठ्याचा दावा आकस्मिक दायित्व म्हणून प्रकट केला आहे. याच कोळसा पुरवठादाराने मागणी केलेले कार्यक्षमतेच्या प्रोत्साहनांचे लेखे कंपनीने अद्याप केलेले नाहीत.

**उपकंपनी : महागुज कोलायरीज लिमिटेड**

लागू नाही

**उपकंपनी : महाजनको राख व्यवस्थापन सेवा लि.**

लागू नाही

**६. राज्य शासनाला देय असलेल्या विनामूल्य विजेचा वाटा किती आहे?**

स्वीकृत लेखे प्रमाणकांनुसार व करारतील अटीनुसार त्याचे हिशेब करुन ते लेख्यांमध्ये दाखविले जातात किंवा कसे?

**सुत्रधारी कंपनी : महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि.**

कंपनीने आम्हास दिलेल्या माहितीनुसार कोणत्याही करारात राज्य शासनाला विनामूल्य विजेचा वाटा देणे नाही.

**उपकंपनी : महागुज कोलायरीज लि.**

ही कंपनी कार्यरत नसल्याने लागू नाही.

**उपकंपनी : धोपावे कोस्टल पॉवर लि.**

लागू नाही

**उपकंपनी : महाजनको राख व्यवस्थापन सेवा लि.**

लागू नाही

**७. वसतू सूचीमध्ये भंगार, निकामी साहित्य इ. चे त्यांच्या मूल्यावर योग्य वर्गीकरण केले आहे किंवा कसे?**

**सुत्रधारी कंपनी : महाराष्ट्र राज विज निर्मिती कंपनी लि.**

होय, आम्ही योजलेल्या लेखा परिक्षण पद्धतीच्या आधारे, या कंपनीकडे वस्तू सूचीचे मूल्यांकनाची योग्य प्रणाली कार्यरत आहे.

**उपकंपनी - महागुज कोलायरीज लि.**

लागू नाही

**उपकंपनी - धोपावे कोस्टल पॉवर लि.**

ही कंपनी कार्यरत नसल्याने लागू नाही.

**उपकंपनी - महाजनको राख व्यवस्थापन सेवा लि.**

लागू नाही

८. **लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेला नफा/तोटा हा कंपनीच्या नफा व तोटयांच्या लेख्यांप्रमाणे आहे किंवा कस?**

**सुत्रधारी कं. - महाराष्ट्र राज वीज निर्मिती कंपनी लि.**

होय, लेखापरिक्षणात नमूद केलेला तोटा हा कंपनीच्या नफा-तोटा लेख्यांनुसारच आहे. फक्त वरील परिच्छेद ४ मध्ये नमूद केलेल्या बाबींचे कायम करणे व मेळ यानंतर समायोजन केले तर त्याप्रमाणात आणि आमच्या लेखापरिक्षण अहवालाच्या परिच्छेद - ५ मध्ये नमूद केलेले उत्पन्नाचे अधिभार मान्य केल्यानंतर त्याप्रमाणात काही परिणाम होऊ शकतो.

**उपकंपनी - महागुज कोलायरीज लि.**

लेखापरिक्षण अहवालातील तोटा हा या कंपनीच्या नफा-तोटा लेख्याप्रमाणे आहे.

**उपकंपनी - धोपावे कोस्टल पॉवर कं.लि.**

होय

**उपकंपनी : महाजनको राख व्यवस्थापन सेवा लि.**

होय

९. **जलविद्युत प्रकल्पांच्या प्रकरणी, पाणी सोडण्याची कृती ही राज्य शासनाने जैविक विविधता जपण्यासाठी दिलेल्या मार्गदर्शक सूचना/धोरणे यानुसार आहे का? तसे केलेले नसल्यास काही दंड भरला/देय असल्यास त्याचा अहवाला द्यावा.**

**सुत्रधारी कं. महाराष्ट्र राज वीज निर्मिती कंपनी लि.**

पाणी सोडण्याची कृती राज्य शासनाच्या जलसंसाधन विभागातर्फे अनुशासित केली जाते. आणि दिलेल्या माहितीनुसार या कृतीमध्ये कंपनीला काहीही भूमिका नसते. पाणी सोडण्याबद्दल कोणताही दंड दिला/देय नाही.

**उपकंपनी - महागुज कोलायरीज लि.**

लागू नाही

**उपकंपनी - धोपावे कोस्टर पॉवर लि.**

कंपनी कार्यरत नसल्याने लागू नाही.

**उपकंपनी - महाजनको राख व्यवस्थापन सेवा लि.**

लागू नाही

१०. **कंपनीत कंत्राटातील अटीनुसार कंपनीत महसूलाची वसुलीची प्रभावी यंत्रणा आहे का? आणि लागू होणाऱ्या लेखा मानकांप्रमाणे लेखा वह्यांमध्ये महसूलाची योग्य नोंद केली जाते काय?**

**सुत्रधारी कंपनी - महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि.**

लागू नाही

**उपकंपनी - महागुज कोलायरीज लि.**

लागू नाही

**उपकंपनी - धोपावे कोस्टर पॉवर लि.**

होय

**उपकंपनी - महाजनको राख व्यवस्थापन सेवा लि.**

होय यामध्ये फक्त अल्प गुंतवणुकीचे व्याज एवढेच उत्पन्न आहे.

११. **नवे प्रकल्प स्थापन करण्यासाठी भूसंपादन केले का? या कृतीमधील सर्व प्रकरणी देणी लवकरच आणि पारदर्शक पद्धतीने दिली का? विचलनाच्या प्रकरणांचा तपशील द्यावा.**

**सुत्रधारी कंपनी - महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि.**

लागू नाही

**उपकंपनी - महागुज कोलायरीज लि.**

लागू नाही

**उपकंपनी - धोपावे कोस्टर पॉवर लि.**

लागू नाही, कारण कंपनी कार्यरत नाही.

**उपकंपनी - महाजनको राख व्यवस्थापन सेवा लि.**

लागू नाही

१२. **मागणी केलेल्या कोळशाची संख्या/गुणवत्ता यांचा मेळ करण्याची योग्य व्यवस्था कंपनीमध्ये आहे का? कोळशाचा दर्जा/ओलसरपणा/खराब इ. चा दर्जा लेखा वह्यात नोंदला जातो का?**

**सुत्रधारी कंपनी - महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि.**

लागू नाही

**उपकंपनी - महागुज कोलायरीज लि.**

लागू नाही

**उपकंपनी - धोपावे कोस्टर पॉवर लि.**

लागू नाही

**उपकंपनी - महाजनको राख व्यवस्थापन सेवा लि.**

लागू नाही

**३. महापारेषण कंपनीच्या प्रकरणी**

**कर्जे/ऋणे/व्याज इ. सोडून देणे / निर्लेखित करणे याची प्रकरणी आहेत किंवा कसे यावर अहवाल देणे असल्यास त्याची कारणे व रकमा सांगणे**

(१) महापारेषण कंपनीची एकूण व्यापारी येणी रु. २६७९३३.०६ लाख दि. ३१/३/२०१७ रोजी होती. याचा मोठा वाटा महावितरण कंपनीचा आहे.

महावितरणचे येणे दोन भागात आहे.

- दि. ३१/३/२०१७ रोजी पारेषण आकाराद्वारे सुमारे रु. १७६६५३.२८ लाख असून ही कंपनी त्याची वसूली एस टी यू - राज्य प्रेषण संस्थेमार्फत करते. ही महावितरणकडील येणी चांगली मानली जातात. याप्रकरणी वाईट (बुडीत) कर्जे/येणी यासाठी तरतूद केली नाही. महावितरणची देणी भागश: पण नियमित असतात..
- इंटर युनिट ट्रॅन्झॅक्शन कारणामुळे वसूल करावयाची देणी ३१/३/२०१७ रोजी रु. १९६८४.१८ लाख होती. आययुटी शिलकींचा पूर्ण मेळ होईपर्यंत ती निर्लिखीत करता येत नाहीत.
- महावितरणची डी.पी.सी. रु. ७५४७६.५७ लाख आहेत. (एकूण नोंदलेली डी पी सी रु. ८५४९९.०० लाख आहे) महाराष्ट्र विज नियामक आयोगाच्या आदेश क्र. ३१ वर्ष २०१६ नुसार ३१/३/२०१७ रोजी त्याचा लेखा उपार्जन तत्वावर लेखा केला आहे. मात्र महावितरण व डीपीसीची वसुलीला दायित्व म्हणून मान्यता देत नाही. व तयाचा परिणामकारक खर्च म्हणून लेखा केलेला नाही.
- महावितरणकडून एकूण वसुलीची रक्कम एकूण येण्यापैकी ९४.१० टक्के आहे.(आययूटीला वसुली योग्य येणे वगळून)

२) असे निरिक्षण आहे की ही कंपनी कंत्राटदार / विक्रेते यांनी माल पोचवणीचे वेळपत्रकाचे किंवा अन्य अटी व शर्थींचे पालन केले नाही तर त्यांच्या देण्यातून ‘लिक्वीडेटेड डॅमेजेस कापते. एल.डी. रकमेचा लेखा इतर चालू नसलेली वित्तीय दायित्वे ठेवून घेतलेला पैसा या अंतर्गत ताळेबंदाच्या दायित्वात नोंदली जाते. या एलडीचा काही भागाचा उत्पन्न म्हणून लेखा केला जातो. आणि उर्वरित रक्कम संबंधित विक्रेता/कंत्राटदाराला त्यांच्या प्रकरणाप्रमाणे देयकाचे अंतिमीकरण केल्यावर दिली जाते. ताळेबंदाच्या दायित्वाच्या बाजूने एल.डी.ची एकूण रक्कम ३१/३/२०१७ रोजी रु. ८६९१.५१ लाख होती. त्यातील उत्पन्नाचा भाग रु. ४८९.६६ लाख होता. कंपनीने वित्तिय विवरण पत्रांच्या लेखा टिपांमधील लेखा धोरणात स्पष्ट केले आहे की, असे एलडी आकाराचे लेखे ‘इतर उत्पन्न’ यामध्ये फक्त वसुलीच्या तत्वावर केले जातील.

कंपनीला येणे असलेल्या बाबींमध्ये पुरवठादार/ उप कंत्राटदार यांना कंपनीने दिलेली अग्रिमे समाविष्ट असून त्याचे काटेकोरपणे विश्लेषण/आढावा घेतला जातो. आमच्या लेखापरिक्षणाच्या काळात आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरुन वित्तिय वर्ष २०१६-१७ मध्ये कंपनीकडून कर्जे/व्याज इ. सोडणे / निर्लेखित करणे यांची अन्य प्रकरणे नव्हती

**तिसऱ्या पक्षाकडे असलेल्या वस्तू मालाचे आणि शासन/अन्य प्राधिकरणे यांच्याकडून देणगीने मिळालेल्या मत्ता यांचे योग्य अभिलेख जतन केले आहे काय?**

आम्हास व्यवस्थापनाने दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरुन भांडार माल किंवा सुटे भाग यातील कोणत्याही वस्तू या वर्षात कोणत्याही वेळा तिसऱ्या पक्षाकडे दिल्या नव्हत्या. त्याशिवाय शासन किंवा अन्य प्राधिकरणे यांना वित्तिय वर्ष २०१६-१७ मध्ये कोणत्याही मत्ता कंपनीत देणगी स्वरुपात दिलेल्या नाहीत.

**प्रलंबित न्यायालयीन वाद/न्यायाधीकरण येथील खटले यांचा वर्षनिहाय अहवाल द्यावा. त्यात खटले प्रलंबित असल्याची कारणे द्यावी. तसेच कायदेविषयक खर्चावर लक्ष ठेवणारी यंत्रणा असल्यास तिच्या प्रभावी उपयोगाची माहिती द्यावी. सर्व परदेशी व स्थानिक न्यायालयीन खटल्यांची माहिती पुरवावी.**

या कंपनीच्या कामाचा व्याप संपूर्ण महाराष्ट्र राज्यात असून कामाच्या सोयीसाठी कंपनीचे ७ परिमंडळात विभागणी केली आहे.

सर्व प्रलंबित / लवादातील ज्या प्रकरणांचा व्यक्तीश: खर्च रु. १० लाखांपेक्षा आहे; त्याची माहिती वित्तिय वर्ष २०१६-१७ च्या लेखांच्या टिपा यातील ताळेबंदाची टीप क्र. ३७ यामध्ये ‘आकस्मिक दायित्व’ या शीर्षकाखालील दिली आहे.

याशिवाय दिलेल्या माहितीनुसार ज्या दाव्यांचा खर्च प्रत्येकी रु. १० लाखापेक्षा कमी आहे अशी एकूण ७४ प्रलंबित दाव्यांचे दायित्व ‘आकस्मिक’ स्वरुपाचे आहे.

कायदेविषयक बाबींवर जेव्हा आणि जसा खर्च केला जातो तेव्हा त्याचा लेखा वाणिज्यिक तत्वावर ‘‘कायदेशीर व व्यावसायिक शुल्क’’ अशाप्रकारे ‘‘इतर खर्च’’ या शीर्षकांतर्गत वेगळा केला जातो व त्याची माहिती नफा-तोटा लेख्यांच्या टीप क्र. ३१ मध्ये दिली आहे. चालू वर्षी कायदेविषयक खर्च रु. ४८८.५४ लाख (मा. २०१५-१६ यावर्षी रु. ९७९.१७ लाख) करण्यात आला.

या कायदेविषयक खर्चास मंजुरी घेण्यात आली होती. तो देण्यात आला तसेच त्याचा लेखा इतर प्रशासन खर्च अशाप्रकारे नेहमीच्या पद्धतीने केला.

**जर कंपनीची निर्गुंतवणुकीसाठी निवड झाली असेल तर मत्तांचे मूल्यांकन (अमूर्त मत्ता व जमिनींसह) आणि दायित्वे (बांधिलकी व सामान्य राखीव यासह) यांच्या संपूर्ण स्थितीचे परिक्षण करावे.**

**(निर्गुंतवणुकीचा सध्याचा टप्पा व पद्धती यासह)**

या कंपनीची निर्गुंतवणुकीसाठी निवड झालेली नाही म्हणून याची माहिती देणे या कंपनीस लागू नाही.

**वस्तूसूचीच्या मूल्याचे योग्य वर्गीकरण केले आहे काय? त्यात भंगार, निकामी इ. चे मूल्य घेतले आहे काय किंवा कसे?**

आमच्या लेखा परिक्षणाच्या दरम्यान आम्हास आढळले की, या कंपनीत वस्तू माल सूचीचे योग्य वर्गीकरणाची प्रणाली अस्तित्वात आहे. जी एल कोड्स आणि त्यांची दि. ३१/३/२०१७ रोजीची थकीत शिल्लक यांचा सॅपमध्ये दिलेला तपशील खालीलप्रमाणे आहे

| जी एल कोड | वस्तू सूची वर्णन | ३१/३/२०१७ रोजी शिल्लक (रक्कम रु. लाखात) |
|---|---|---|
| २५०० १० | पोलाद | १,११६.१० |
| २५०० २० | सिमेंट | - |
| २५०० ३० | ट्रान्स्फॉर्मर | ५,६२०.५५ |
| २५०० ४० | मिटरींगची व वीज उपकेंद्रांची साधने | ९,३९३.७५ |
| २५०० ५० | केबल्स व कंडक्टर्स | ७,४४२.२६ |
| २५०० ६० | पोल्स खांब | - |
| २५०० ७० | सेवा जोडणी व वीज फिटींगचे साहित्य | - |
| २५०० ८० | सुटे भाग | ९४७.०६ |
| २५०० ९० | इतर | २५३८.०१ |
| २५५० १० | तपासणी प्रलंबित असलेले साहित्य | १.११ |
| २५५० २० | तपसणी प्रलंबित असल्याने हानी | २०२.८४ |
| २५५० ३० | स्पे. जी एल स्टोअर इन्व्हेंटरी एफ. | - |
| २५५० ४० | मासा स्टॉक रेक्टीफिकेशन | ६२.७० |
| २५६० १० | निकामी मालाचा साठा (भंगारासहीत) | (५२.८४) |
| २५६० २० | खराब/नाकरलेले सामान | - |

आमच्या लेखापरिक्षणा दरम्यान वस्तूमाल सूचीचा लेखे योग्य पद्धतीने केले जातात व त्याची पडताळणी करण्यात येते असे आढळले. यातील अपवादात्मक बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) जी एल कोड २५६०१० :- निकामी सामान**

यामध्ये असे दिसून आले की, ज्यांचा मेळ झाला नाही अशा शिलकी बऱ्याच वर्षांपासून पडून आहेत. असे समजण्यात येते की असा मेळ होत नसलेले जुनाट शिलकीतील विविध वस्तूंचे संबंधित भांडाराकडे यापूर्वीच दिल्या पण त्यांच्या किंमतीत बदल झाला. आमच्या मते या लेख्यांचे नामकरण ‘निकामी सामान’ असे करणे चुकीचे आहे. वस्तू मालातील किंमतीतील फरकामुळे नंतरच्या तारखेस समायोजन केले आहे. असा गैरसमज होतो. तसेच या जीएल कोडमध्ये निगेटीव्ह बॅलन्स (म्हणजे क्रेडीट बॅलन्स) शिलकी विविध नफा कॅडात आहेत.

**ब) जी एल कोड २५५०२०/१५००७० - प्रलंबित चौकशीमुळे मालाचे नुकसान**

ज्यामध्ये जूने शिलकी भागाच्या खूप वर्षापासून प्रलंबित आहेत.

**क) जी एल कोड २५५०४० - मासा स्टॉक रेक्टीफिकेशन**

यामध्ये मेळ न झालेल्या शिलकी बऱ्याच वर्षांपासून दाखविल्या जातात. कंपनीने लवकर त्याचा मेळ करावा किंवा वरील जीएल कोडस्मधील लेखी नोंदी सोडून द्याव्यात, असे जोरदारपणे सूचविण्यात येते.

कंत्राटासाठी अग्रिमे अंतर्गत नकारात्मक शिलकीचे विश्लेषण करुन त्यावर कारणांसह व त्यांचा वित्तीय विवरणपत्रावरील परिणाम यासह अभिप्राय द्यावा.

**'कंत्राटासाठी अग्रिमे' अंतर्गत नकारात्मक शिलकीचे विश्लेषण करुन त्यावर कारणांसह व त्यांचा वित्तीय विवरण पत्रावरील परिणाम यासह अभिप्राय द्यावा.**

ही कंपनी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात वीज पारेषणाच्या व्यवसायात आहे या पारेषणासाठी कंपनीला वीज उपकेंद्रे उभारावी लागतात व पारेषणाच्या तारा वापराव्या लागतात आणि संबंधित कंत्राटी कामे / रचनात्मक कार्ये करावी लागतात. कंपनीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कंपनीकडे चांगली माहिती देणारी व सुस्थापित ''कंत्राट व्यवस्थापन प्रणाली'' आहे. कंपनीचे सर्व कंत्राटदार/पुरवठादार / विक्रेते यांना एक ''युनिक कोड'' देण्यात आला आहे. त्यामुळे सॅपमध्ये त्या विक्रेत्यांना व्यक्तिगत ओळख मिळाली आहे.

कंपनीने तिच्या कंत्राटदार/पुरवठादार/विक्रेते यांना दिलेल्या अग्रिमांची लेखा नोंद खालील जी एल कोडस्‌मध्ये होते.

**रक्कम (रु. लाखांत)**

| जीएल कोड | वर्णन | १/४/२०१६ रोजी आरंभीची शिल्लक | वर्षभरातील भर/नि-पटारा/समायोजन | ३१/३/२०१७ रोजी अखेरची शिल्लक |
|---|---|---|---|---|
| **२९००१०** | कंत्राटदार/पुरवठादार यांचा दिलेला अग्रिम | २३५९.०७ | ८९१.४५ | ३२५०.५२ |
| **२९००२०** | प्रकल्पांचा भांडवली अग्रिम | ६८२४.५७ | -४२५१.४३ | २५७३.१४ |

वरील दोन जी एल कोडस्‌मध्ये ज्यांच्या शिलकी दिसतात त्या सर्व नोंदणीकृत विक्रेत्यांची माहितीचा व्यक्तीश: पडताळणी करण्यात आली. ज्या प्रकरणी (विक्रेत्यांकडे) ३१/३/२०१७ रोजी ''नकारात्मक शिलकी'' आहेत ते निश्चित केले. अशा सर्व विक्रेत्यांचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.

| तपशील | संख्या |
|---|---|
| ज्या विक्रेते / कंत्राटदारांकडे आरंभीच्या व अखेरच्या शिलकीत धनचिन्हांकित शिलकी (डेबीट बॅलन्स) आहेत म्हणजेच अग्रिमे चालू आहेत. | २०१ |
| ज्या विक्रेते / कंत्राटदारांकडील आरंभीचा डेबीट बॅलन्स व अखेरची रक्कम निरंक आहे | १७ |
| **ज्या विक्रेते / कंत्राटदारांकडे आरंभीची डेबीट बॅलन्स रक्कम शिल्लक होती पण अखेरची रकमेमध्ये क्रेडीट बॅ लन्स होता (विपरित शिल्लक** | **६<br>(क्रेडीट बॅलन्स रु. ८९२.८२ लाख, ३१/३/१७ रोजी** |
| **ज्या विक्रेते / कंत्राटदारांकडे आरंभीची व अखेरची रक्कम यात विपरित शिल्लक आहे (क्रेडीट बॅलन्स)** | **७२<br>(क्रेडीट बॅलन्स रु. ५५७८.४६ लाख ३१/३/१६ रोजी** |

वरील माहितीच्या विश्लेषकावरुन दिसते की, कंपनीने दि. ३१/३/२०१७ रोजी दिलेल्या एकूण अग्रिमात विपरित/ नकारात्मक शिल्लक नाही. मात्र ज्यांच्याकडे व्यक्तिश: नकारात्मक शिल्लक ३१/३/२०१७ रोजी क्रेडीट बॅलन्स आहेत अशी ७८ प्रकरणे आहेत.

या ७८ प्रकरणांतील विसंगतीची खालील कारणे असावीत.

१) जी.एल. कोड चुकीचा असेण २) सॅप प्रणालीच्या (३४ लेगसी डेटा) अंमलबजावणीच्या वेळी जुनी माहिती आली असावी. यासाठी मेळ घालण्याची प्रक्रिया चालू आहे.

**लेखा परिक्षण अहवालात नमूद केलेला नफा/टोटा हा कंपनीच्या नफा टोटा लेख्या प्रमाणे आहे काय?**

स्वतंत्र लेखा परिक्षक अहवालतील परिच्छेद VII (क) मध्ये विशेषता संबोधले की, ताळेबंद, नफा टोटा पत्रक व रोकडता प्रवाह अहवालातील संबंधीत लेखा पुस्तकाशी सहमत आहेत.

**वीज निर्मिती कंपन्यांकडील पारेषणासाठी उपलब्ध होणाऱ्या विजेचे बाहेर नेण्यासाठी प्रणाली सुसंगत आहे किंवा कसे?**

कंपनीच्या पायाभूत सुविधा पुरेशा आहेत. त्यामध्ये ६५२ उपकेंद्रे, ट्रान्सफॉर्मर्स, पारेषण तारा इ. असून ती निर्माण केलेली वीज महाराष्ट्रात सर्वत्र पाठविण्यासाठी पुरेश आहे. महापारेषणचे पारेषण जाळ्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| व्होल्टेज स्तर | इएचव्ही उपकेंद्र | पारेषण सम (एमव्हीए) | इ एच व्ही लाईन्स (सर्कीट कि.मी) |
|---|---|---|---|
| ७६५ केव्ही | १ | ३०००.०० | - |
| ५०० केव्ही | २ | ३,५८२.०० | १५०४.००० |
| ४०० केव्ही | ३० | २७,२१०.०० | ८,४१५.४९१ |
| २२० केव्ही | २१९ | ५१,६१०.०० | १६,७२९.४२७ |
| १३२ केव्ही | ३१५ | २७,८५४.५० | १४,९१३.३१० |
| ११० केव्ही | ३६ | २,३०५.०० | १,७५९.३६५ |
| १०० केव्ही | ३८ | २,७९८.०० | ७०१.३५६ |
| ६६ केव्ही | ११ | ८५३.०० | ६८२.१९७ |
| **एकूण** | **६५२** | **११९२१२.५०** | **४४७१६.१५०** |

## वीज प्रणालीची उपलब्धता आणि हानी यांची सद्यस्थिती आणि त्यासाठी महाराष्ट्र विज नियामक आयोगाचे मापदंड खालीलप्रमाणे

**एच व्ही ए सी प्रणाली (महाराष्ट्र विज नियामक आयोगाचा मापदंड ९८%)**

| वर्ष | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|
| उपलब्धता | ९९.७२% | ९९.६३% |

**एच. व्ही. डी. सी. प्रणाली (महाराष्ट्र विज नियामक आयोगाचा मापदंड ९५%)**

| वर्ष | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|
| उपलब्धता | ९४.५३% | ९७.००% |

या कंपनीने भविष्यातील विजेच्या सतत वाढत्या गरजा पूर्ण करण्याच्या हेतुने आपल्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, शक्तीशाली करण्याचे काम सातत्याने व नेहमी चालू ठेवले आहे.

यावर्षी विहित प्रमाणकांपेक्षा किती जास्त पारेषण हानी झाली? आणि त्याची लेखावहीत योग्य नोंद केली किंवा कसे? म.वि.नि. आयोगाचा पारेषण हानीचा मापदंड ४.८५% दिला आहे. वित्तिय वर्ष २०१६-१७ मध्ये महापारेषण कंपनीची महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या मोजणीप्रमाणे झालेली पारेषण हानी खालील तक्त्यात दिली आहे.

आंतरराज्य पारेषण प्रणालीतील वर्ष २०१६-१७ मधील वीज जाळ्यातील हानी

| महिना | ऊर्जा निविष्टी इनपुट इंट्रा एस टी एस दशलक्ष यूनिटमधे | ऊर्जा आऊटपूट इंट्रा एस टी एस दशलक्ष यूनिटमधे | पारेषण हानी टक्केवारी % |
|---|---|---|---|
| **एप्रिल १६** | १२,५१५.५२ | १२,०४८.५१ | ३.७३% |
| **मे १६** | १२,७६३.४८ | १२,३३८.८० | ३.३३% |
| **जून १६** | ११,५००.२२ | ११,०८९.८१ | ३.५७% |
| **जुलै १६** | १०,३४३.९८ | ९,९६०.३२ | ३.७१% |
| **ऑगस्ट १६** | ११,१३९.७७ | १०,७२९.९८ | ३.६८% |
| **सप्टेंबर १६** | १०,९८६.६९ | १०,५८४.९० | ३.६६% |
| **ऑक्टोबर १६** | ११,७०७.४२ | ११,२७७.२१ | ३.६७% |
| **नोव्हेंबर १६** | १२,१९१.७६ | ११,७३२.११ | ३.७७% |
| **डिसेंबर १६** | १२,५०१.९४ | १२,०७५.०० | ३.४२% |
| **जानेवारी १७** | १२,३८३.०८ | ११,९४४.१३ | ३.५४% |
| **फेब्रुवारी १७** | १२,०३२.४२ | ११,५९०.१० | ३.६८% |
| **मार्च १७** | १३,७६२.४९ | १३,२४२.२२ | ३.७८% |
| **एकूण** | १,४३,८२८.७७ | १,३८,६१३.०९ | ३.६३% |

वरील तक्त्याचे अवलोकन वरुन स्पष्ट होईल की, महापारेषणची पारेषण हानी ३.६३ टक्के असून ती म.वि.नि. आयोगाच्या मापदंडापेक्षा खूपच कमी आहे. दुसऱ्या लेख्यांच्या भाषेत सांगावयाचे तर ही हानी ''नेहमीची -मान्य हानी'' अशा स्वरुपाची आहे. त्यामुळे त्यासाठी लेखा वह्यात वेगळी नोंद करणे आवश्यक नाही. तरीही वर्षभरात कंपनीने ऊर्जेची योग्य लेखा नोंदी केल्याबद्दल लेखा परिक्षणात पडताळणी करण्यात आली.

**महापारेषणने इतर संस्थांच्यावतीने काही मत्तांची उभारणी पूर्ण करुन त्या त्यांच्याकडे सुपूर्द केल्या किंवा कसे? त्यांच्या योग्य लेखा नोंदी लेखा वहीत केल्या का?**

कंपनीने क्षेत्रातील कामाची वाटणी वेगळ्या सात परिमंडळात केली आहे. ''विजेचे पारेषण करणे'' हे कंपनीचे मुख्य काम आहे. काही वेळा कंपनी इतर संस्थासाठी छोटी उप केंद्रे उभारणे, मनोरे, कारखाने इ. ची उभारणी करुन देते. ही कामे ''कार्यादेशाच्या तत्वावरील विनिर्देशित कामे'' असतात. त्याला कंपनी 'ओआरसी वर्क' असे संबोधले व त्या ओर आर सी कामाच्या कार्यवाहीच्या खर्चाव्यितिरिक्त जादा रक्कम ''सर्वेक्षण शुल्क'' आकारते. त्याला कंपनीचे उत्पन्न म्हणून मान्यता दिली जाते.

**कंपनीने आम्हास दिलेल्या माहितीनुसार वेगवेगळ्या परिमंडळाच्या ओ आर सी कामांचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.**

| अनु. क्र. | परिमंडळ | ०१/०४/२०१६ रोजी ओ आर सी कामे | वर्षभरात ओ आर सी कामातील भर | वर्षभरात पूर्ण केलेली ओ आर सी कामे | ३१२/०३/२०१७ रोजी उरलेली ओ आर सी कामे |
|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | १ | ० | ० | १ |
| २ | औरंगाबाद | १२ | ७ | ५ | १४ |
| ३ | कराड | ६ | १ | ० | ७ |
| ४ | नागपूर | २९ | ११ | ३ | ३७ |
| ५ | नाशिक | १० | १ | ० | ११ |
| ६ | पुणे | ४५ | ३३ | ३ | ७५ |
| ७ | वाशी | ४१ | ० | ० | ४१ |
| | **एकूण** | **१४४** | **५३** | **११** | **१८६** |

वित्तिय वर्ष २०१६-१७ दरम्यान ओ आर सी वर्क यासाठीचे 'पर्यवेक्षण आकाराची' रक्कम रु. १३७९.०३ लाख आहे.

ओ आर सी कामाच्या कार्यवाहीसाठी संबंधित संस्थांकडून अनामती घेण्यात आल्या. त्याचा लेखा जी एल कोड १२३१०० मध्ये केला. त्यात शिल्लक रु. २७०७१.९५ लाख आहे. या लेजरमध्ये काही मेळ न केलेल्या काही शिलकी दिसून आल्या. त्याचा तपशील संबंधित नफा केंद्रात नव्हता.

महापारेषण कंपनी अपारंपरिक स्त्रोतातून निर्माण केलेल्या विजेच्या प्रकल्पाबाबत कार्यवाही करते. लेखा धोरण २.१६ (बी)नुसार अशा प्रकल्पातील वीज बाहेर काढण्याच्या खर्चापैकी ५० टक्के खर्च महापारेषण कंपनी उचलते. आणि उर्वरित ५० टक्के खर्चाची

पूनपूर्ती मेडातर्फे संबंधित खाजगी विकासकांना केली जाते. (१) संबंधित विकासक प्रकल्पाच्या कार्यवाहीची संपूर्ण रक्कम कंपनीला ओ आर सी अनामत म्हणून देतो आणि कंपनी प्रकल्पाच्या कार्यवाहीनंतर ५० टक्के रक्कम सदर प्रकल्पकर्त्याला देते व तेवढ्या मूल्याची मत्ता निर्माण करते. आणि उर्वरित ५० टक्के रक्कम मेडाकडून प्रकल्पकर्त्याला दिली जाते. (२) सदर प्रकल्पकर्ता स्वत:च प्रकल्पाची कार्यवाही करतो आणि त्यानंतर कंपनी त्याला ५० टक्के देते आणि उर्वरित ५० टक्केची पूनपूर्ती मेडा करते.

कंपनीची प्रकल्प विकासक/विक्रेता याला देय असलेली रक्कम ही जी.एल.कोड १३१०१० मध्ये नोंदली जाते. असे निरिक्षण आहे की, अशी दोन जी एल कोडस् (१२३१०० आणि १२३०१०) यांचा मेळ केला नव्हता. मेडाच्या अनुदानाच्या अशा प्रकल्यांची माहिती सहजपणे कंपनीकडे नव्हती. त्यामुळे अशा मेडा प्रकल्पाच्या मत्तांचे भांडवलीकरण अचूक नाही.

**महावितरणच्या प्रकरणी :**

| क्र. | आदेश | लेखापरिक्षकांचे अभिप्राय |
|---|---|---|
| १. | कर्जे/ऋणे/व्याज इ. सोडणे/निर्लेखित करण्याची प्रकरणे असल्यास त्याची कारणे व रक्कम यासह महिती देणे | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे याप्रमाणे या कंपनीने पी.डी.ॲमनेस्टी आणि पेयजल योजनांची अंमलबजावणी करुन त्यानुसार ग्राहकांकडील थकबाकीचे व्याज व विलंब भरणा आकार सोडून दिला/निर्लेखित केला आहे. या योजनेंतर्गत सोडलेल्या २०१६-१७ मधील रकमा अशा :<br>१) पेयजल योजना : रु. १,७२३.५१ लाख<br>२) पी.डी. ॲमनेस्टी : रु. ४,२९०.५७ लाख<br>एकूण : रु. ६,०१४.०८ लाख<br>ज्या पी.डी. व पेयजल थकीत रकमांचा वसुली सोडल्या/निर्लेखित केल्या त्या ग्रामीण भागातील सार्वजनिक पाणी पुरवठा योजना आहे. |
| २. | तिसऱ्या पक्षाकडे असलेल्या मत्ता आणि शासन व इतर प्राधिकरणाकडे देणगी मिळालेल्या रकमांचे योग्य नोंदी ठेवल्या आहेत किंवा कसे? | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनी गरजा व विनिर्देशित प्रमाणके यानुसार वस्तूमाल खरेदी करते. व्यवस्थापनाने प्रमाणित केले की, तिसऱ्या पक्षाकडे मत्ता ठेवलेल्या नाहीत. तसेच शासन किंवा अन्य प्राधिकरणांनी कुठल्याही मत्ता देणगी म्हणून दिल्या नाहीत. |

<table>
<tr>
<td>३.</td>
<td>प्रलंबित न्यायालयीन वाद / न्यायाधिकरणे याचा वर्षनिहाय अहवाल द्यावा. त्यात प्रलंबित असल्याची कारणे द्यावी. तसेच कायदेविषयक प्रकरणावरील खर्चाच्या वर लक्ष देणारी यंत्रणा असल्यास तिच्या प्रभावाची माहिती द्यावी. सर्व (परदेशी व स्थानिक) खटल्यांची माहिती द्यावी.</td>
<td>आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार प्रलंबित न्यायालयीन/लवादातील खटल्यांची वयानुसार माहिती खालीलप्रमाणे आहे:-<br>
(रक्कम लाखांत)
<table>
<tr><th>खटल्यांचे वय</th><th>खटल्यांची संखा</th></tr>
<tr><td>५ वर्षांपर्यंत</td><td>४,३७३</td></tr>
<tr><td>५ वर्षांपेक्षा जास्त - १० वर्षांपर्यंत</td><td>९८२</td></tr>
<tr><td>१० वर्षांपेक्षा जास्त - १५ वर्षांपर्यंत</td><td>२६६</td></tr>
<tr><td>१५ वर्षांपेक्षा जास्त</td><td>१४८</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>५,७६९</td></tr>
</table>
दिलेल्या माहितीनुसार प्रलंबनाची कारणे अशी आहेत:<br>
१. जे खटले ५ वर्षांपेक्षा प्रलंबित आहेत ते खालील विविध कारणांमुळे प्रलंबित आहेत. (अ) विविध न्यायालयात प्रलंबित खटल्याचा मोठा अनुशेष आहे. (ब) अंतरिम आदेशावर अपील केल्यामुळे मुख्य दाव्यातील कामकाज अपीलांच्या निर्णयावर अवलंबून असते. (क) समन्स संबंधी व्यक्तीचा पत्ता नसल्याने ती बजावता येत नाहीत. (ड) अंमलबजावणीचे अर्ज दाखल केले तरी विविध कारणांमुळे वॉरंट संबंधितांवर बजावता येत नाही. त्याची कारणे : कारखाने बंद असणे, पत्ता बदलणे, नवा पत्ता सापडत नसणे, व्यक्तीचे ठाव ठिकाणा नसणे, निकाल दिलेल्या कर्जदाराच्या मालमत्तांचा तपशील नसणे इ. (इ) उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले जाणे. त्यामुळे प्रलंबनाचा अनुशेष वाढतो.<br>
(फ) मा. उच्च न्यायालयाचे प्रकरणे दाखल करतात व त्यावर तहकूबी येते. खटले यादीवर सुनावणीसाठी घेतले जातात. मात्र त्यावर निर्णय कार्यवाही केवळ मा. उच्च न्यायालयानुसार होते.<br>
आम्हीस दिलेल्या माहितीनुसार कंपनी व तिचे अधिकारी यांच्यावतीने नेमलेल्या वकिलांचे शुल्क मान्यताप्राप्त परिपत्रकाप्रमाणे केले जाते. तसेच परदेशातील न्यायालयात कंपनीची कोणतीही प्रकरणे प्रलंबित नाहीत असे सांगण्यात आले.</td>
</tr>
<tr>
<td>४.</td>
<td>कंपनीची निर्गुंतवणुकीसाठी निवड झाली असल्यास मत्तांच्या (अमूर्त व जमिनीसह) मूल्यमापनाचा अहवाल द्यावा आणि दायित्वे (बांधिलकीसह) इ. परिक्षण करुन सद्यस्थिती विशद करावी.</td>
<td>आम्हास दिलेल्या माहितीनुसार कंपनीची निर्गुंतवणुकीसाठी निवड झालेली नाही म्हणून हा खंड लागू नाही.</td>
</tr>
</table>

| ब - | उप आदेश | लेखापरिक्षकांचे अभिप्राय |
|---|---|---|
| १. | निवडक क्षेत्रात वीज वितरण करणे व महसूल वाटून घेणे यासाठी कंपनीने फ्रँचायजीज सोबत करार केले आहेत आणि महसूल वाटप करारात कंपनीचे वित्तीय हितांचे पुरेसे रक्षण होते का? | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार यावर्षी कंपनीने वीज वितरणासाठी कोणत्याही फ्रँचायजी सोबत करार केला नाही. मात्र कंपनी काही जुन्या फ्रँचायजींना निवडक क्षेत्रात सरासरी खरेदी खर्चापेक्षा कमी नसलेल्या दराने वीज पुरवठा करते. |
| २. | निर्मिती, वितरण व पारेषण कंपन्यासोबत देणी व घेणी यांचा मेळ पूर्णपणे केला का? फरकाच्या कारणांचे परिक्षण करावे. | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार वीज निर्मिती, पारेषण व वितरण कंपन्यांसोबत देणी व येणी यांच्या शिलकीचा योग्य मेळ ३१ मार्च २०१७ रोजी लेखा वह्यांसोबत केला आहे. फक्त तमीळनाडू कोस्टल, पो सो को, डब्ल्यू आर पी सी रिॲक्टीव्ह चार्जेस, अकालतारा पॉवर कं., टाटीया आंध्रप्रदेश, ओरीसा पॉवर ट्रान्स.कॉर्पो, अदानी पॉवर महाराष्ट्र लि., इ एम सी ओ लि. आणि अपारंपारिक ऊर्जा विकासक यांच्या शिलकीचा मेळ करण्याचे राहिले आहे.<br>मेळ करण्यातील मुख्य बाबींमध्ये डीपीसीचा लेखा, रिबेट, कायद्यातील बदलामुळे आकार, क्षमता आकार, ऊर्जा देयके, एफ एसी विल्स, उरण गॅस टीपीएची पूरक देयके, इंडियन पॉवर चंद्रपूर युनीट ८ व ९, महावितरणने एच टी ग्राहकांकडून केलेली परंतु महानिर्मितीकडे हस्तांतरित व केलेली वसूली तसेच आंतर कंपनी शिलकींच्या फरकांसंबंधी लेखापरिक्षण अहवालातील परिशिष्ट अ याचा परिच्छेद क्र. १५ (जी) पहावा. |
| ३. | यावर्षी टॅरिफ रोल बॅक सबसिडीज् किती करण्यास परवानगी मिळाली? त्याचा प्रतिपूर्ती राज्यशासनाकडून नियमितपणे मिळते का? जर तूट असल्यास त्यावर मत द्यावे. | आम्ही दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार ग्राहकांच्या काही श्रेणींचा वीज दरात महाराष्ट्र शासन काही सवलती देते. यावर्षी कंपनीला ग्राहकांच्या सवलतीच्या दरासाठी खालीलप्रमाणे अर्थसहाय्य मंजूर केले आहे. |

**(रु.लाखांत)**

| वर्ष | २०१६-१७ |
|---|---|
| वि.वर्ष २०१६-१७ साठी मंजूर अर्थसहाय्य | ८,२७,१२२ |
| ०१/०४/२०१६ रोजी आरंभीची शिल्लक | १,६८,०३३ |
| वि.वर्ष २०१६-१७ मध्ये अर्थसहाय्याचा लेखा | ७,७८,०८१ |
| वि.वर्ष २०१६-१७ पर्यंत प्राप्त/समायोजित अर्थसहाय्य | ६,२३,०८८ |
| महाराष्ट्र शासनाकडून वि.वर्ष २०१७-१८ चे येणे | ३,२३,०२६ |
| २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून प्राप्ती | २,०१,८३२ |

| | | |
|---|---|---|
| ४. | कंपनीमधील देयके व महसूल जमा करण्याच्या पद्धतीची कार्यक्षमता यावर अहवाल द्यावा. सर्व ग्राहकांना बिघाड मुक्त मिटर्स दिली का? नसल्यास देयकांची अचूकता याचे परिक्षण करावे. | **१)** आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार देयकांच्या प्रणालीची व महसूल जमा करणे याविषयी अहवाल देण्यात येतो. कंपनी महसूल जमा विषयी दरमहा अहवाल गोळा करते आणि देयकांसोबत जमेची तुलना करते नंतर क्षेत्रीय कार्यालयांसोबत थकीत रकमेच्या वसुलीचा पाठपुरावा करते.<br>दि. ३१ मार्च २०१७ रोजी एकूण थकीत येणी रु. २८,४९,६२० लाख आहे.<br>**२)** बिघाड मुक्त मिटर्स स्थापन करण्यासंबंधी आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार महावितरणमध्ये सुमारे २८४ लाख ग्राहक आहेत. त्या-पैकी २३३ लाख ग्राहक मिटरधारक आहेत. सुमारे १५ लाख ग्राहक शेती श्रेणीतील असून त्याना मीटर नसते.<br>तसेच व्यवस्थापनाच्या प्रमाणपत्रानुसार सर्व मीटरधारक ग्राहकांना बिघाड मुक्त मिटर्स दिली आहेत.<br>**३)** विनामीटर व एल टी वीज घेणाऱ्या कृषि ग्राहकांना खालील पद्धतीने देयके दिली जातात.<br>i) तिमाहीच्या अखेरीस आय टी सेक्शन सबडिव्हीजननुसार के डब्ल्यू एच/ एच पी इंडायसेस चा हिशेब करतात.<br>ii) के डब्ल्यू एच / एच पी नॉर्मचा हिशेब करताना फक्त ज्या ग्राहकांना नॉर्मल मिटर स्टेटस असून पुढे जाणारे रिडींग आहे. ते विचारात घेतले जातात.<br>iii) निगेटीव्ह व शून्य वापर वगळला जातो.<br>iv) ज्या ग्राहकांचा वापर २२४/के डब्ल्यू एच/ एच पी/ दरमहा/असेल त्यांना त्या श्रेणीत केले जाते.<br>V) २२४/के डब्ल्यू एच / एच पी/ दरमहा यात करण्याची कारणामीमांसा खालीलप्रमाणे आहे :-<br>कमाल ३००० चालू तास प्रतिवर्ष आणि ३०० दिवसाचे प्रवर्तन =३००० / ३०० = १० तास प्रतिदिन.<br>०.७४६ के डब्ल्यू (१ एच पी) × १० तास × ३० दिवस = २२४ के डब्ल्यू एच / एच पी/ मंथ (महिना)<br>vi) सब डिव्हीजन निहाय के डब्ल्यू एच / एच पी इंडेक्स याची मोजणी उपविभागातील मिटर नसलेल्या शेती ग्राहकांसाठी वापरली जाते.<br>**ही पद्धत महाराष्ट्र विज नियामक आयोगाने मान्य केली आहे.** |

| | | |
|---|---|---|
| ५. | लेखा परिक्षण अहवालातील नफा-तोटा हा कंपनीच्या नफा-तोटा पत्रकाप्रमाणे आहे किंवा कसे? | आमची सर्वतोपरी माहिती व विश्वास यानुसार लेखापरिक्षण अहवालातील नफा व तोटा हा कंपनीच्या नफा व तोटा पत्रकाप्रमाणे आहे. |
| ६. | कंपनी इंधन व वीज खरेदी समायोजन खर्च वसूल करते का? आणि महाराष्ट्र विज नियामक आयोगाने मंजूर केल्याप्रमाणे याचा लेखा करण्यात येतो का? | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनी दर महिन्याला इंधन समायोजन खर्चाचा हिशेब करते तो ग्राहकांच्या देयकातून वसूल करते. त्याचा लेखा ग्राहकांकडून महसूल अशाप्रकारे केला जातो. या इंधन व वीज खरेदी समायोजन खर्चाचा हिशेब प्रत्येक तिमाहीला आयोगाकडे मंजुरीसाठी पाठविला जातो. कंपनीने ऑगस्ट २०१६ पर्यंत त्याची कार्योत्तर मंजुरी मिळविली होती. |
| ७. | उदय (उज्ज्वल डिस्कॉम ॲश्युरन्स योजना) अंमलात आणल्यामुळे उद्भवलेली दायित्वे व इतर वित्तीय परिणाम यांचे लेखे निर्दोषपणे करण्याचे परिक्षण करावे. | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आणि आम्ही केलेल्या परिक्षणानंतर असे दिसून आले की, उदय योजनेची अंमलबजावणी केल्यानंतर उद्भवलेली दायित्वे आणि वित्तीय परिणाम यांचे लेखे निर्दोषरित्या केलेले आहेत. तसेच उदय योजनेच्या लेख्यांसंबंधी वित्तीय विवरणपत्राची टीप क्रमांक ३१.७४ पहावी. |

**डुगर ॲण्ड असोसिएटस्**

सनदी लेखापाल फर्म नोंदणी क्र. ०००५६१ एन

सही/-

**मुकेश गोयल**

भागीदार, सदस्य क्र. ०८१८१०

स्थळ : मुंबई

दि. १५/११/२०१७

# भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (ब) ज्याचे सहवाचन याच कायद्याच्या कलम १२९ (४) सोबत होते ; त्यानुसार मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेडच्या दि. ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरणापत्रावर दिलेला अभिप्राय :

मराविमं सूत्रधारी कंपनी लिमिटेड या कंपनीच्या दि. ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाची एकत्रित वित्तीय विवरण पत्रके कंपनी अधिनियम २०१३ यात विहित केलेल्या आकृतीबंधानुसार तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी कलम १३९ (५) चे सहवाचन कलम १२९ (४) प्रमाणे नियुक्त केलेल्या सांविधिक लेखापरिक्षक हे कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ चे सहवाचन कलम १२९ (४) सोबत होते, आणि कलम १४३ (१०) च्या लेखापरिक्षणाच्या मानकांनुसार, त्यांनी केलेल्या स्वतंत्र लेखापरिक्षणाच्या आधारे, या एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर अभिप्राय व्यक्त करण्यास जबाबदार आहेत. त्यांनी ते काम पार पाडल्याचे त्यांचा लेखापरिक्षण अहवाल दि. १५ नोव्हेंबर, २०१७ यात नमूद केलेले आहे.

मी भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्यावतीने या कायद्याचे कलम १४३ (६) (अ) ज्याचे सहवाचन कलम १२९ (४) सोबत होते, त्यानुसार मराविमं सूत्रधारी कं.लि. च्या दि. ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रकाचे पूरक लेखापरिक्षण केले. आम्ही संपलेल्या वर्षाच्या तारखेला मराविमं सूत्रधारी कं.लि. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. मर्या, महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कं.मर्या. आणि महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या. (जोडपत्रकानुसार) त्यांच्या वित्तीय विवरणपत्रकांचे पूरक लेखापरिक्षण केले. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे व सांविधिक लेखापरिक्षक यांच्याकडील कामांसंबंधीचे कागदत्र न मिळविता करण्यात आले. आणि ते प्रामुख्याने सांविधिक लेखापरिक्षक व कंपनीचा कर्मचारी वृंद यांच्याकडे विचारणा व चौकशी करणे व लेख्यांच्या काही दस्तऐवजांचे निवडक परिक्षण करणे या मर्यादेत केले आहे.

माझ्या लेखापरिक्षणात अभिप्राय व्यक्त करण्याजोगी तसेच पूरक लेखा परिक्षणाच्या अहवालावर भाष्य करावे असे काहीही महत्वाचे माझ्या निदर्शनास आलेले नाही.

सही/-
**पी.माधवी**
**महालेखापाल (लेखापरिक्षण - तीन)**

स्थळ : मुंबई
दिनांक : २८ डिसेंबर, २०१७

## भाग - १ ताळेबंद

### मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड

### ३१ मार्च २०१७ रोजी एकत्रित ताळेबंद

(रक्कम कोटींमध्ये)

| | तपशील | टीपा क्र. | ३१ मार्च २०१७ रोजी | ३१ मार्च २०१६ रोजी | १ एप्रिल २०१७ रोजी |
|---|---|---|---|---|---|
| | **मत्ता** | | | | |
| १) | चालू नसलेली मत्ता | | | | |
| अ) | मालमत्ता, साधने व उपकरणे | २ | ११७,६५४.५४ | १०१,५५५.४० | ९४,६५६.०८ |
| ब) | भांडवली प्रगती पथावरील कामे | २अ | ७,५०५.९९ | २३,०५८.५१ | २५,९४०.०७ |
| स) | मालमत्तेमधील गुंतवणूक | ३ | ८७६.९२ | ९१७.८८ | ९५९.६६ |
| ड) | ख्याती मूल्य | | - | - | - |
| इ) | इतर अमूर्त मत्ता | २ ब | ३६.८६ | ५६.४६ | ६५.२१ |
| फ) | अविकसित अमूर्त मत्ता | | १२९.७७ | १२०.७८ | - |
| जी) | उपकंपनी/सहयोगी व संयुक्त उपक्रम कंपनी मधील गुंतवणूक | ४ | -४०.३२ | -६.२० | १०.१२ |
| एच) | वित्तीय मत्ता | | - | - | |
| | i) गुंतवणूक | ५ | ६०६.३७ | ६४१.४६ | ६२४.९९ |
| | ii) व्यापारी येणी | ६ | ३,२३१.५८ | ३,४५३.९० | २,७०१.३९ |
| | iii) कर्जे | ७ | १,५०६.८१ | १,०५९.५९ | १,२७०.४६ |
| | iv) इतर (निर्दिष्ट करणे) | | | | |
| य) | स्थगित कर मत्ता (निव्वळ) | | - | - | |
| ज) | इतर चालू नसलेल्या मत्ता | ८ | २,१९८.७० | २,१२५.४८ | ६,२३९.०४ |
| २) | **चालू मत्ता** | | | | |
| अ) | वस्तू सूची | ९ | २,३३९.८६ | २,७१९.५७ | २,१२५.४६ |
| ब) | वित्तीय मत्ता | | | | |
| | i) गुंतवणूक | १० | ८५.८१ | ५९.६३ | ७५.७८ |
| | ii) व्यापारी येणी | ११ | १८,४१६.३३ | १२,४००.९८ | ३०,०२१.८७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | iii) रोख व रोख सममूल्य | १२ | १,५३१.६८ | ७७२.१७ | ५५४.९७ |
| | iv) बँकेतील शिल्लक<br>वरील iii) व्यतिरिक्त | | - | - | - |
| | v) कर्जे | १३ | २२९.१७ | ८८३.७५ | ८०६.११ |
| | vi) इतर | १४ | २,३९१.८० | १,४११.७१ | ९८४.०४ |
| क) | **चालू कर मत्ता (निव्वळ)** | | - | - | - |
| ड) | इतर चालू मत्ता | १५ | ३,०९८.०४ | ३,६२७.४६ | ७,०४४.७४ |
| | विक्रीसाठी असलेली मत्ता/विक्रीसाठी मत्ता विल्हेवाट समुहामध्ये अंतर्गत | १६ | ३२८.६१ | १७८.२३ | २१५.४९ |
| | करण्यात आलेल्या मत्ता | | | | |
| | नियामक मत्ता | १७ | २,३१५.०० | २,५२४.०० | २२४.०० |
| | **एकूण मत्ता** | | **१६४,४४३.५२** | **१५७,५६०.७६** | **१७४,५१९.४८** |
| | **समभाव व दायित्वे** | | | | |
| | **इक्वीटी** | | | | |
| अ) | भाग भांडवल | १८ | ८७,३९२.७७ | ८६,२९९.७९ | ८४,८७१.०३ |
| ब) | इतर समभाग | १९ | -३८,४७०.५७ | -३२,८९३.५४ | -२९,६५०.८९ |
| | **दायित्वे** | | | | |
| (१) | **चालू नसलेली दायित्वे** | | | | |
| अ) | वित्तीय दायित्वे | | | | |
| | i) ऊसनवारी | २० | ५०,०१७.७१ | ४०,४२७.८८ | ४१,७२२.६९ |
| | ii) व्यापारी देणी | | | | |
| | iii) इतर वित्तीय दायित्वे (ब) मध्ये निर्दिष्ट केल्या व्यतिरिक्त | २१ | ८,०००.५८ | ७,९०७.५५ | ११,४५८.६६ |
| ब) | तरतुदी | २२ | ५,१४५.१७ | ४,९०७.१४ | ४,८५०.७५ |
| क) | स्थगित कर दायित्वे (निव्वळ) | २३ | ३,३४६.८६ | ३,६३६.१३ | ३,५५९.१९ |
| ड) | इतर चालू नसलेली दायित्वे | २४ | ५,९९८.०१ | ४,७८६.४८ | ३,६१५.५३ |
| (२) | चालू दायित्वे | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ) | वित्तीय दायित्वे | | | | |
| | i) ऊसनवारी | २५ | १६,१५४.४४ | १७,२२०.७६ | ९,६८२.६९ |
| | ii) व्यापारी देणी | २६ | ४,९०७.२७ | ४,४२२.१५ | २३,४३८.०१ |
| | iii) इतर वित्तीय दायित्वे (बाबी 'क' मध्ये निर्देशित केलेले वगळून) | २७ | १६,८३७.२५ | १७,६८०.८७ | १६,९०५.७९ |
| ब) | इतर चालू दायित्वे | २८ | ३,१५६.४० | ९९१.३९ | ६८१.६२ |
| क) | तरतुदी | २९ | १,९५७.६२ | २,१७४.१५ | ३,३८४.४० |
| ड) | चालू कर दायित्वे (निव्वळ) | | - | - | ०.०२ |
| | विक्रीसाठी असलेली दायित्वे/विक्रीसाठी दायित्वाची विल्हेवाट समुहामध्ये अंतर्गत करण्यात आलेली दायित्वे | | | | |
| | एकूण दायित्व व समभाग | | १६४४४३.५२ | १५७,५६०.७६ | १७४,५१९.४९ |
| | महात्वाची लेखा धोरणे | १ | | | |
| | लेखा वरील टिपा | २ ते ५१ | | | |

**वित्तीय विवरणावरील सोबत जोडलेल्या टिपा पहाव्या**

आमच्या समान तारखेच्या अहवालानुसार
**डूगर अँड असोसिएटस्  करिता**
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रमांक - ०००५६१ एन
सही/-

**मुकेश गोयल भागीदार**
सदस्यता क्र. ०८१८१०
स्थळ : मुंबई
दिनांक : १५/११/२०१७

**जयकुमार श्रीनिवासन**
संचालक (वित्त) व मुख्य
वित्त अधिकारी

**अरविंद सिंह**
व्यवस्थापकीय
संचालक

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (वि)

**सुबोध झारे**
कंपनी सेक्रेटरी

## भाग - २ नफा तोटा पत्रक

**मराविमं सुत्रधारी कं. मर्यादित**

**३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षासाठी नफा तोटा पत्रक** **(रक्कम कोटींमध्ये)**

| | तपशील | टिपा | ३१ मार्च २०१७ | ३१ मार्च २०१६ |
|---|---|---|---|---|
| **(i)** | **प्रवर्तनापासून महसूल** | ३० | **५८,२५७.६७** | **५५,६५०.६६** |
| **(ii)** | **इतर उत्पन्न** | ३१ | **२,७२९.३१** | **३,३८३.१८** |
| **I** | **एकूण उत्पन्न (i) + (ii)** | | **६०,९८६.९८** | **५९,०३३.८४** |
| | **खर्च** | | | |
| (i) | वापरलेले सामग्रीचा खर्च | ३२ | ४०,५१७.१६ | ३९,३६१.३९ |
| (ii) | व्यापारातून माल खरेदी | | - | - |
| (iii) | तयार मालाच्या वस्तुसूची प्रगतीपथावरील कामे व्यापारी साठ्यातील बदल | | - | - |
| (iv) | कर्मचारी लाभ खर्च | ३३ | ६,३२८.४० | ६,१९९.७० |
| (v) | वित्तीय खर्च | ३४ | ६,८४४.६० | ५,४८३.६८ |
| (vi) | घसारा व कर्ज परतफेडीच्या तरतूदीचा खर्च | ३५ | ६,०९३.२२ | ५,५०७.१० |
| (vii) | इतर खर्च | ३६ | ७,२३९.८४ | ४,९२९.८१ |
| **II** | **एकूण खर्च (i) to (vii)** | | **६७,०२३.२२** | **६१,४८१.६८** |
| III | नफा/तोटा अपवादात्मक बाबी व कर या पूर्वीचा (I-II) | | **-६,०३६.२४** | **-२,४४७.८४** |
| IV) | अपवादात्मक बाबी | | | |
| V) | नफा/तोटा करपूर्व (III-IV) | | **-६,०३६.२४** | **-२,४४७.८४** |
| VI) | कर खर्च | | | |
| | (१) चालू कर | | -१४.२१ | ५५.८७ |
| | (२) स्थगित कर | | २६०.५३ | १०६.२२ |
| | (३) मागील वर्षाचे कर | | ३.४० | -१६४.६३ |
| **VII)** | **नफा / (तोटा) चालू प्रवर्तन कालावधीतील** | | **-५,७८६.५२** | **-२,४४५.२९** |
| **VIII)** | **नफा / (तोटा) चालू नसलेल्या प्रवर्तनातून करपूर्व** | | - | - |
| IX) | कर खर्च चालू नसलेल्या प्रवर्तनाचे | | - | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| X) | नफा/(तोटा) चालू नसलेल्या प्रवर्तनातून (करोत्तर) (VIII - IX) | | - | - |
| **XI** | **नफा/ (तोटा) या कालावधीसाठी** | | **-५,७८६.५२** | **-२,४४५.२९** |
| **XII** | **इतर व्यापक उत्पन्न** | | | |
| अ) i) | नफा किंवा तोटामध्ये वर्गीकरण न करता येणाऱ्या बाबी | | -२६०.६६ | -२०१.५७ |
| ii) | नफा किंवा तोट्यामध्ये वर्गीकरण न करता येणाऱ्या बाबी संबंधित आयकर | | २८.७३ | २९.२७ |
| | **उपबेरीज (अ)** | | -२३१.९३ | -१७२.२९ |
| ब) i) | नफा किंवा तोट्यामध्ये वर्गीकरण करता येणाऱ्या बाबी | | | |
| ii) | नफा किंवा तोट्यामध्ये वर्गीकरण करता येणाऱ्या बाबी संबंधित आयकर | | | |
| | **उपबेरीज (ब)** | | | |
| XIII | एकूण व्यापक उत्पन्न (अ+ब) | | -२३१.९३ | -१७२.२९ |
| XIV | कालावधीतील एकुण व्यापक उत्पन्न (XI+XIII) | | -६,०१८.४५ | -२,६१७.५९ |
| XV | समभागाची प्रतिभाग मिळकत (चालू व्यवहारासाठी) | | -६,०१८.४५ | -२,६१७.५९ |
| | मुळ | | -०.६९ | -२.७३ |
| | सौम्यकृत | | -०.६९ | -२.४५ |
| | महत्वाची लेखा धोरणे | १ | | |
| | लेखावरील टिपा | २ ते ५१ | | |

**वित्तिय विवरणावर दिलेल्या टीपा पहावी**
आमच्या समान तारखेच्या अहवालानुसार
डूगर अँड असोसिएटस् करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रमांक - ०००५६ आयएन
सही/-
**मुकेश गोयल भागीदार**
सदस्यता क्र. ०८१८१०
स्थळ : मुंबई
दिनांक : १५/११/२०१७

**जयकुमार श्रीनिवासन**
संचालक (वित्त) व मुख्य वित्त अधिकारी

**अरविंद सिंह**
व्यवस्थापकीय संचालक

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (वि)

**सुबोध झारे**
कंपनी सेक्रेटरी

## मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड

**३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाकरिता एकत्रित रोकडता प्रवाह विवरणपत्र** **(रक्कम कोटीं मध्ये)**

| तपशील | २०१६-१७ | | २०१५-१६ | |
|---|---|---|---|---|
| **अ व्यवहार कार्यातून रोकडता प्रवाह** | | | | |
| **करपूर्व नफा** | | **(६,०३६)** | | **(२,४४७)** |
| समायोजने | | | | |
| घसारा | ६,०९३ | | ५५०७ | |
| मागील वर्षाचे कर | ३ | | ० | |
| गुंतवणुकीवर प्रिमियमचे किरकोळ आकारणे | ० | | ० | |
| व्याज उत्पन्न | (१४) | | (१४) | |
| अपेक्षित पत तोट्यासाठी तरतूद | १,०९९ | | १३१७ | |
| वित्त खर्च | ६,९७६ | | ५६५९ | |
| विनिमय दरातील वसुल न झालेला फरक | (४७) | | ० | |
| निकामी वस्तुमालासाठी तरतूद | (७१) | | -१४ | |
| खेळत्या भांडवलातील बदलापूर्वीचा प्रवर्तनातील नफा | | १४,०३९ | | १२४५५ |
| | | **८,००३** | | **१०,००८** |
| **खेळत्या भांडवलातील बदल** | | | | |
| **कार्यरत मत्तांमध्ये (वाढ) / घट करण्यासाठी समायोजने** | | | | |
| वस्तुसूचीमध्ये वाढ/(घट) | ४५१ | | (६१४) | |
| राखीवमध्ये वाढ / (घट) | ० | | ५ | |
| दीर्घ मुदतीच्या तरतुदींमध्ये वाढ / (घट) | २६ | | (१,२०७) | |
| इतर चालू नसलेल्या दायित्वांमध्ये वाढ/ (घट) | १,३८३ | | ११७८ | |
| इतर चालू नसलेल्या वित्तीय दायित्वांमध्ये वाढ / (घट) | - | | २४९ | |
| इतर चालू दायित्वांमध्ये वाढ / (घट) | २,१८२ | | (९४२) | |
| अल्प मुदतीच्या तरतुदींमध्ये वाढ / (घट) | (१५३) | | ० | |
| दीर्घ मुदतीची कर्जे व अग्रीमे मध्ये वाढ / (घट) | (१,१६६) | | ० | |
| अल्प मुदतीची कर्ज व अग्रीमेमध्ये वाढ / (घट) | २० | | ० | |
| इतर चालू वित्तीय मत्तांमध्ये वाढ / (घट) | २७९ | | १७४ | |
| नियामक मत्तांमध्ये वाढ / (घट) | २०९ | | (२,३००) | |
| इतर चालू वित्तीय दायित्वांमध्ये वाढ / (घट) | ५,०२२ | | (६४१) | |
| इतर चालू गुंतवणुकींमध्ये वाढ / (घट) | (२१) | | ० | |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इतर चालू नसलेल्या मत्तांमध्ये वाढ / (घट) | ३२ | | ३७४ | |
| इतर चालू मत्तांमध्ये वाढ / (घट) | ९२१ | | ३३४४ | |
| चालू कर मत्तांमध्ये वाढ / (घट) | ३८१ | | ० | |
| व्यापारी देण्यांमध्ये वाढ / (घट) | (३,०४८) | | ३४०१ | |
| व्यापारी येण्यांमध्ये वाढ / (घट) | (४,६७९) | | (४,९०२) | |
| आयकराचा परतावा | (३४६) | | (४) | |
| प्रवर्तनातून निर्माण केलेली रोकड | | १,४९३ | | (१,८८५) |
| | | | | |
| वजा : दिलेला कर (परतावा निव्वळ) | (२) | | (९) | |
| अधिक : मागील वर्षातील आयकर | - | | | |
| | | (२) | | (९) |
| **प्रवर्तन कार्यातून निव्वळ रोख** | | **९,४९३** | | **८,११४** |
| | | | | |
| **ब) गुंतवणूक कार्यातून रोकडता प्रवाह**<br>स्थावर मत्तेची खरेदी आणि प्रगती पथावरील भांडवली कामांमध्ये वाढ आणि वित्तीय पुनर्रचना योजना | (६,५८०) | | (९,४७८) | |
| चालू नसलेल्या गुंतवणुकीची खरेदी | (६२५) | | (१,०८७) | |
| स्थिरमत्ता आणि चालू नसलेल्या मत्तांची विक्री | - | | ४ | |
| कार्या - पूर्वीचे खर्च | (५) | | (१०) | |
| मिळालेले व्याज (निव्वळ टी डी एस) | १४ | | १४ | |
| कर्जे व अग्रीमे | (२८७) | | ५३ | |
| गुंतवणूक कार्याकरिता वापरलेली निव्वळ रोख (ब) | | **(७,४८३)** | | **(१०,५०४)** |
| | | | | |
| क) वित्तीय कार्यापासून रोकडता प्रवाह | | | | |
| समभागांच्या वितरणातून मिळणारे उत्पन्न | १,५७५ | | २०९४ | |
| चालू नसलेल्या वित्तीय दायित्वातून मिळणारे उत्पन्न | (३,७२८) | | ० | |
| इतर चालू वित्तीय दायित्वापासून मिळणारे उत्पन्न | (८८९) | | ० | |
| दिलेला लाभांश | (४) | | (१२) | |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाची परतफेड | - | | (८) | |
| दीर्घ मुदतीच्या कर्जापासून उत्पन्न | ९,५९९ | | (१,२४७) | |
| अल्प मुदतीच्या कर्जापासून उत्पन्न | ५८९ | | ७७०८ | |
| अल्प मुदतीच्या कर्जाची परतफेड | (१,६६३) | | (२६८) | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| व्याज आणि वित्त खर्च | (६,७३०) | | (५,६६०) | |
| **वित्तीय कार्यापासून निव्वळ रोख (क)** | | **(१,२५१)** | | **२६०७** |
| **रोख व रोख सममूल्यात निव्वळ वाढ (अ+ब+क)** | | **७५९** | | **२१७** |
| वर्षाच्या आरंभीचे रोख व रोख सममूल्य | | ७७२ | | ५५५ |
| वर्षाच्या अखेरीस रोख व रोख सममूल्य | | १,५३२ | | ७७२ |

**महत्वाची लेखा धोरणे - १**
**लेखावरील टीपा २ ते ५१**

**वित्तिय विवरणावर दिलेल्या टीपा पहावी**

आमच्या समान तारखेच्या अहवालानुसार
डूगर अँड असोसिएटस् करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रमांक - ०००५६१ एन
सही/-

**मुकेश गोयल भागीदार**
सदस्यता क्र. ०८१८१०
स्थळ : मुंबई
दिनांक : १५/११/२०१७

**जयकुमार श्रीनिवासन**
संचालक (वित्त) व मुख्य
वित्त अधिकारी

**अरविंद सिंह**
व्यवस्थापकीय
संचालक

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (वि)

**सुबोध झारे**
कंपनी सेक्रेटरी

# समभागामधील बदलाचे विवरण

## म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी लि.

**३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाचे समभागामधील बदलाचे विवरण**

**अ) समभाग भांडवल**

| तपशील | रक्कम |
|---|---|
| **१ एप्रिल २०१५ रोजी** | **८,३८५.३२** |
| वित्तीय पुनर्रचना योजनेमुळे वितरीत केलेले भागभांडवल | ७६,४८५,७१ |
| **१ एप्रिल २०१५ रोजी पुनर्रचित शिल्लक** | **८४,८७१.०३** |
| वितरित केलेले भाग भांडवल | १,४२८.७७ |
| **३१ मार्च २०१६ रोजी** | **८६,२९९.७९** |
| वितरित केलेले भाग भांडवल | १,०९२.९८ |
| **३१ मार्च २०१७ रोजी** | **८७,३९२.७७** |

## ब) इतर समभाग

| | वाटपासाठी प्रलंबित असलेला भागअर्ज निधी | राखीव कमाई | इतर सर्वसमावेश उत्पन्न | इतर समभाग | एकूण इतर समभाग |
|---|---|---|---|---|---|
| **१ एप्रिल २०१५ रोजी** | **९,६८२.९२** | **-२७,६८६.३८** | | **९७१.४७** | **-१७,०३१.९९** |
| वित्तीय पुनर्रचना योजनेची समायोजने | ६८,२३२ | -४,३६४.७५ | | | ६३,८६६.८१ |
| वितरित केलेले समभाग | -७६,४८६ | | | | -७६४८५.७१ |
| **०१.०४.२०१५ रोजी पुनर्रचित शिल्लक** | **१४२८.७७** | **-३२०५१.१३** | **०.००** | **९७१.४७** | **-२९६५०.८९** |
| वर्षातील नफा अधिक करुन | | -२,४४४.१६ | | | -२४४४.१६ |
| इतर सर्वसमावेशक उत्पन्न | | | -१७३.४३ | | -१७३.४३ |
| वर्षभरातील भर | १,०९३ | -४४३.३४ | | १५४.०७ | ८०३.७१ |
| वर्षभरात वितरित केलेले समभाग | -१,४२८.७७ | | | | -१४२८.७७ |
| **१/०४/२०१६ रोजी** | **१,०९२.९८** | **-३४,९३८.६३** | **-१७३.४३** | **१,१२५.५४** | **-३२८९३.५४** |
| वर्षातील नफा अधिक करुन | | -५,७८७.१८ | | | -५७८७.१८ |
| इतर सर्वसमावेशक उत्पन्न | | | -२३१.२७ | | -२३१.२७ |
| वर्षभरातील भर | ६९३.७९ | ६७६.४६ | | १६४.१५ | १५३४.४० |
| वर्षभरात वितरित केलेले भाग | -१,०९२.९८ | | | | -१०९२.९८ |
| **३१/०३/२०१७ रोजी** | **६९३.७९** | **-४०,०४९.३५** | **-४०४.७०** | **१,२८९.६९** | **-३८,४७०.५७** |

**वित्तिय विवरणावर दिलेल्या टीपा पहाव्या**

आमच्या समान तारखेच्या अहवालानुसार
डूगर अँड असोसिएटस् करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रमांक - ०००५६१ एन
सही/-

**मुकेश गोयल भागीदार**
सदस्यता क्र. ०८१८१०
स्थळ : मुंबई
दिनांक : १५/११/ २०१७

**जयकुमार श्रीनिवासन**
संचालक (वित्त) व मुख्य वित्त अधिकारी

**अरविंद सिंह**
व्यवस्थापकीय संचालक

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (वि)

**सुबोध झारे**
कंपनी सेक्रेटरी

## टीप १ :-

### सांघिक माहिती :

महाराष्ट्र शासनाने विद्युत अधिनियम २००३ चे प्रकरण - १३ यानुसार पूर्वीच्या मरावि मंडळ या संस्थेची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मराविमं सुत्रधारी कंपनी लि. स्थापित करण्यात आली. तिच्या पुढील तीन उपकंपन्या आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी (महानिर्मिती), महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी लि. (महापारेषण) आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण) मराविमं सुत्रधारी कं.लि. तिचे कार्य दि. ६ जून २०१५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या हंगामी हस्तांतर योजना याप्रमाणे सुरू केले. ही हंगामी हस्तांतरण योजनेनुसार कंपनी आणि तीन उपकंपन्या पूर्वीच्या मरावि मंडळातून अस्तित्वात आल्या. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. रिफॉर्म.२०१०/प्र.क्र.११७/उर्जा. इ अधिसूचित करून दि. ३१ मार्च २०१६ पासून वरील हंगामी हस्तांतर योजनेचे अंतिमीकरण पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे ५ जून २००५ पासून केले. त्यासाठी वित्तीय पुनर्रचना योजना मंजूर केली.

## टीपा क्र. २

### तयार करण्याचा आधार

भारतीय लेखा मानकांनुसार (येथे भारतीय लेखा मानके म्हणून उल्लेख केल्यानंतर) कंपनी कायदा २०१३ (अधिनियम) च्या कलम १३३ अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या सर्व वित्तीय बाबींमध्ये (कंपन्या भारतीय लेखा मानके) नियम २०१५ आणि कायद्याचे इतर संबंधित तर तरतुदींची पूर्तता करण्यासाठी भौतिक पैलूंचा विचार करून एकल वित्तीय विवरण पत्र तयार करण्यात आले.

३१ मार्च २०१६ पर्यंत वित्तीय विवरण पत्र भारतीय लेखा मानकांनुसार कंपनी (लेखा मानके) नियम २००६ (दुरूस्ती) आणि इतर संबंधित तरतुदीनुसार तयार करण्यात आले. परंतु ३१ मार्च २०१७ या संपलेल्या वर्षासाठी नवीन भारतीय लेखा मानकांनुसार वित्तीय विवरण पत्र तयार करण्यात आले. भारती लेखा मानके १०१ ''भारतीय लेखा मानकांचा प्रथम स्वीकार'' याबद्दलची प्रकटने टीपा क्र. ३२ मध्ये दिली आहेत. कंपनीने घेतलेल्या प्रथम सवलतीचा तपशील टीपा क्र. ३ मध्ये दिला आहे.

लेखा धोरणे वित्तीय विवरणामध्ये सादर केलेल्या सर्व कालावधीसाठी सातत्याने लागू केल्या जातात, त्यामध्ये १ एप्रिल २०१५ रोजीच्या लेखा मानकांप्रमाणे आरंभीचा ताळेबंद तयार करण्यासाठी लेखा मानके बदलाच्या तारखेसह.

वित्तीय विवरण तयार करताना व्यवस्थापनाला काही अंदाज व गृहितके करावी लागतात. या अंदाजानुसार वास्तविक परिणाम भिन्न असू शकतात. वित्तीय अंदाजाचे बदलाचा परिणाम त्या वर्षाकरिता किंवा त्यांच्या बदलाच्या वर्षी आणि पुढील अनेक वर्षी करिता, जर बदलाचा परिणाम वर्तमान व भविष्यकाळासाठी असेल तर वित्तीय अंदाज हे बदल केलेल्या वर्षातच ओळखले जातील.

खाली दिलेल्या लेखा धोरणामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, प्रत्येक अहवाल कालावधीच्या शेवटी विशिष्ट आर्थिक मत्ता व दायित्वे उचित किंमतीवर मोजल्या गेल्यास (वित्तीय साधनांशी संबंधित लेखा धोरणे पहावी) वित्तीय विवरण ऐतिहासिक किंमतीच्या आधारावर तयार करण्यात आल्या आहेत.

वित्तीय विवरण भारतीय रुपये ('भारतीय रुपये' किंवा 'रुपये' किंवा 'रु.') मध्ये सादर केले जातात जे कंपनीचे कार्यात्मिक चलन आहे.

**अ) एकत्रिकरणाची तत्वे :-** एकत्रित वित्तीय विवरणपत्र हे म. रा. वि. मं. सूत्रधारी कंपनी आणि तिच्या खालील उकंपन्यांच्या एकत्रितकरणारी संबंधति आहे

| | |
|---|---|
| महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि. (महावितरण) | म.रा.वि.मं. सुत्रधारीची १०० टक्के उपकंपनी |
| महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं.लि. (महानिर्मिती) | म.रा.वि.मं. सुत्रधारीची १०० टक्के उपकंपनी |
| महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण (महापारेषण) | म.रा.वि.मं. सुत्रधारीची १०० टक्के उपकंपनी |
| धोपावे कोस्टल पॉवर लि. | महानिर्मितीची १०० टक्के उपकंपनी |
| महाजनको अॅश मॅनेजमेंट सर्व्हिसेस लि | महानिर्मितीची १०० टक्के उपकंपनी |
| महागूज पॉवर कं. लि. | महानिर्मितीची ६० टक्के उपकंपनी |
| औरंगाबाद पॉवर कंपनी लि. | महावितरणची १०० टक्के उपकंपनी |
| जयगड पॉवर ट्रान्स्को लि. | महापारेषणची संयुक्त साहस कंपनी |
| महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रा स्ट्रक्चर लि. | महापारेषणची संयुक्त साहस कंपनी |

या समुहातील सर्व कंपन्या या कंपनी अधिनियम २०१३ यातील तरतुदीनुसार नोंदणी केलेल्या पब्लिक लिमिटेड कंपन्या आहेत. या कंपन्या विद्युत अधिनियम २००३ याचा अमलाखाली आहेत आणि जेव्हा कंपनी अधिनियम २०१३ यातील तरतुदी आणि विद्युत अधिनियम २००३ च्या तरतुदी (ज्याचे वाचन त्याअंतर्गत केलेल्या नियमावली सोबत होते) यात विसंगती निर्माण झाली तर विद्युत अधिनियम २००३ व त्याची नियमावली त्या लागू होणाऱ्या मर्यादेत अभिभावी होतील, अशी तरतूद विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १७४ मध्ये आहे.

जयगड पॉवर ट्रान्स्को लिमिटेड ही जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेड यांचे ७४ टक्के भाग (शेअर) धारणा आणि महापारेषणची २६ टक्के भागधारणा असलेली संयुक्त साहस कंपनी आहे. जयगड - नवीन कोयना दरम्यान ५४,७३९ कि.मी. लांबीचा ४०० केव्ही डबल सर्कीट पारेषण तार मार्ग आणि जयगड-कराड दरम्यान ११० कि.मी. लांबीचा ४०० केव्ही डबल सर्कीट पारेषण लाईन याची उभारणी, संचालन व देखभाल करणे या कामांसाठी ही कंपनी स्थापन करण्यात आली आहे.

महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्टक्चर लिमिटेड ही स्टरलाईट टेक्नॉलॉजीज लिमिटेड यांची ७२.१० टक्के भागधारणा आणि म.रा.ट्रान्समिशन कंपनीची (महापारेषण) या २७.९० टक्के भागधारणा असलेली संयुक्त साहस कंपनी आहे. ऑप्टीकल पॉवर ग्राऊंड वायर नेटवर्क पासून तयार केलेली तंतूमय क्षमता ठोक, किरकोळ पद्धतीने आणि कंपनी ग्राहकांना उपलब्ध करुन देणे हे या कंपनीचे मुख्य वाणिज्यिक कार्य आहे.

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीक पॉवर ट्रेडिंग कंपनी लिमिटेड ही कंपनी आदेश क्र. २४/०२/२०१४ सी एल - ३ - दि. १६/०७/२०१५ नुसार दि. ०१/०४/२०१५ रोजी मराविमं. सुत्रधारी कंपनीमध्ये विलीन करण्यात आली आहे.

ही एकत्रित वित्तीय विवरणपत्रके तयार करताना शक्य समान व्यवहार आणि इतर तत्सम परिस्थिती व एकसारखी लेखाधोरणाचा वापर केला आहे. तसेच कंपनीची वेगळी वित्तीय विवरणपत्रके समान पद्धतीने सादर केली आहेत.

लागू होणाऱ्या विद्युत कायद्यांनुसार अंतर्गत निर्माण केलेल्या मत्ता व दायित्वे त्या योग्य त्या शीर्षकाखाली दर्शविण्यात येतात.

एकत्रित उपकंपन्यांच्या निव्वळ मालमत्तांमध्ये अल्पसंख्यांकानुसार हिते ओळखण्यात आली आहेत आणि ती एकत्रित ताळेबंदात कंपनीच्या भागधारकांची दायित्वे व समभाग यापासून वेगळी दाखविली आहेत.

**क) प्रथम वेळी स्वीकार करण्यातील बंधनकारक अपवाद आणि पर्यायी सवलती -**

**एकूण तत्वे :**

कंपनीने भारतीय लेखा मानके पद्धती स्वीकारली असून त्यासाठीची संक्रमण तारीख दि. ०१/०४/२०१५ रोजी ठरवून त्या तारखेस आरंभीचे ताळेबंद पत्रक तयार केले त्यासाठी,

**अ)** भारतीय लेखा मानकांच्या आवश्यकतानुसार ज्यांना मान्यता देणे आवश्यक आहे; अशा सर्व मत्ता व दायित्वे यांची मान्यता मिळविली आहे.

**ब)** भारतीय लेखा मानकांची परवानगी नसणाऱ्या मत्ता व दायित्वांची मान्यता नष्ट करणे.

**क)** पूर्वी भारतात सर्वसामान्यपणे स्वीकारल्या जाणाऱ्या लेखा तत्वांऐवजी भारतीय लेखा मानके या पद्धतीसाठी विविध बाबींचे पुनर्वर्गीकरण करणे.

**ड)** मान्यता प्राप्त मत्ता आणि दायित्वे यासाठी भारतीय लेखा मानकांचे मापने लागू करणे. मात्र या तत्वांमध्ये काही अपवाद आहेत. तसेच काही पर्यायी सवलती असून त्यांचा कंपनीने खालीलप्रमाणे लाभ घेतला आहे.

**अ) मालमत्ता, कारखाने आणि साधने, गुंतवणुकीच्या मालमत्ता आणि अमूर्त मत्ता यांचे मानीव खर्च**

कंपनीने तिच्या सर्व मालमत्ता, कारखाने आणि साधने, गुंतवणुकीच्या मालमत्ता आणि अमूर्त मत्ता यांना त्यांच्या पूर्वीच्या जी ए ए पी नुसार असलेल्या मोजणीला संक्रमण तारीख दि. ०१ एप्रिल २०१५ रोजी मान्यता द्यावी आणि त्या संक्रमण तारखेस त्यांचे प्रचलित, विद्यमान मूल्य यालाच मानीव खर्च मानावे व ते चालू ठेवावे असे ठरविले आहे.

वित्तीय पुनर्रचना योजना यांच्या समायोजनांचा विचार करुन दि. १ एप्रिल २०१५ रोजीचे प्रचलित मूल्य दि. ०५/०६/२००५ पासून पूर्वलक्षी प्रभावाने घेण्यात आली व त्याची अंमलबजावणी ३१ मार्च २०१६ पासून करण्यात आली.

**ब) उपकंपन्या व सहयोगी कंपन्यांतील गुंतवणुकी :**

कंपनीने उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त साहन कंपनी यांच्यातील गुंतवणुकी समभागाचे विलेख यांना त्यांच्या किंमतीखर्चाप्रमाणे मान्यता देण्याचा पर्याय स्वीकारला.

**क) वित्तीय मत्ता व दायित्वे यांची मान्यता काढणे :-** संक्रमण तारीख दि. १ एप्रिल २०१५ रोजी किंवा त्यानंतर वित्तीय मत्ता व दायित्वे यांच्यातील व्यवहारांची मान्यता भावी रितीने काढून घेण्याची आवश्यकता लागू केली आहे.

**ड) कर्ज विलेखांचे वर्गीकरण :-** कंपनीने कर्जाचे विलेखांचे वर्गीकरण करताना ते कर्जफेडीच्या खर्चाचा निकष किंवा एफ व्ही टी ओ सी आय निकष पूर्ण करतात किंवा कसे या आधारे आणि संक्रमण तारखेचे वास्तव व परिस्थितीनुसार केले आहे.

**इ) इतर सर्वंकष उत्पन्नाद्वारे वित्तीय मत्तांचे रास्त मूल्य**

जर एखादी वित्तीय मत्ता बिझनेस मॉडेलमध्ये असेल आणि या मॉडेलची उद्दिष्टे कंत्राटी रोकडता प्रवाहाने आणि वित्तीय मत्तांची विक्री या दोन्ही जमा करुन साध्य केली असतील, आणि जर त्यातून वित्तीय मत्तांच्या कंत्राटातील अटीप्रमाणे एका विनिर्देशित तारखेस मूळ थकीत मुद्दल आणि त्याचे व्याज यांच्या भरण्याचा रोकडता प्रवाह निर्माण होत असेल तर त्या वित्तीय मत्तेचे इतर सर्वंकष उत्पन्न यातून मापन केले जाते.

कंपनीने सुरुवातीला मान्यता दिल्यानंतर, समभाग विलेखाच्या गुंतवणुकीच्या संबंधी इतर सर्वंकष उत्पन्न याच्या रास्त

मूल्यात झालेले बदल दाखविण्यासाठी कंपनी प्रत्येक विलेखाच्या आधारे कायम स्वरुपी निवड करते. असे करताना समभाग गुंतवणुकी वगळता, व्यापारासाठी धारण केलेले अन्य विलेख विचारात घेतले जात नाहीत. नंतर इतर सर्वंकष उत्पन्नात मान्यता दिलेले बदल आणि इतर सर्वंकष उत्पन्नातून समभाग विलेखाचे राखीव यातील बदलामुळे होणारी हानी किंवा प्राप्ती यांचेसह रास्त मूल्याने वित्तीय मत्तांचे मापन केले जाते. गुंतवणुक वाढल्यास होणारी संचित प्राप्ती किंवा तोटा यांचे नफा किंवा तोट्यात पुनर्वर्गीकरण केले जात नाही.

**फ) नफा किंवा तोटा यातून वित्तीय मत्तांचे रास्त मूल्य** :

समभागातील गुंतवणूकीच्या विलेखांचे वर्गीकरण याचे वर्गीकरण नफा व तोट्यातील रास्त मूल्य पद्धतीने केले जाते; मात्र जे समभाग विलेखांच्या व्यापारांसाठी धारण केलेले नाहीत त्यांच्या रास्त मूल्यात गुंतवणूकीतील इतर सर्वकष उत्पन्नामार्फतचे बदल मान्य करण्यासाठी रद्द होणार नाही असा पर्याय कंपनीने निवडलेला नसावा.

इतर वित्तीय मत्तांचे मापन एफ व्ही टी पी ओ एल या पद्धतीने केले जाते. मात्र प्रारंभिक मान्यतेच्या वेळी ते मापन कर्ज फेडीचा खर्च किंवा एफ व्ही टी ओ सी आय या पद्धतीने झालेले नसावे. वित्तीय मत्ता आणि दायित्वे एफ व्ही टी पी एलनुसार संपादन करताना लागू होणारा व्यवहार खर्च या नफा किंवा तोटा यात तात्काळ मान्यता दिली जाते.

ताळेबंदाच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत ज्यांची मुदत पूर्ण होते अशा व्यापारी व इतर येणी यांच्या पुढे न्यावयाच्या रकमा अशा विलेखांच्या पूर्ण मुदतीनंतरच्या रास्त मूल्या इतक्याच सुमारे असतात. म्हणून त्यांना नफा किंवा तोट्यात मान्यता मिळते.

व्याज धारण करणाऱ्या वित्तीय मत्तांसाठी इ आय आर चा हिशेब केला जात नाही.त्यांचा बाजारातील व्याजदर असतो तो वेळोवेळी पुनर्स्थापन करणे/ बदलणे याच्या अधीन असतो.

**जी) वित्तीय मत्ता कमी करणे :**

कंपनी ने अर्ज केला आहे की, तिला भारतीय लेखा मानक क्र. १०९ मधील मत्ता कमी करण्याची आवश्यकता पूर्वलक्षी प्रभावाने लागू करावी मात्र भारतीय लेखा मानक क्र. ११० यात परवानगी दिल्याप्रमाणे कंपनीने अशा योग्य व पुष्टी देणाऱ्या / उपलब्ध माहितीचा उपयोग जादा खर्च किंवा प्रयत्नाशिवाय केला. आणि ज्या तारखेस वित्तीय विलेख मान्य केले तेव्हाची व संक्रमण तारखेची पत जोखीम यांची तुलना केली. कंपनीचे भारतीय लेखा मानकात संक्रमण करावयाच्या तारखेला पत जोखीमेमध्ये पूर्वपिक्षा वाढ झाली किंवा कसे हे शोधण्यासाठी भारतीय लेखा मानक १०१ मध्ये परवानगी दिल्याप्रमाणे, अधिक व्यापक संशोधन केलेले नाही.

**म.रा.वि.मं. सुत्रधारीच्या संबंधी :-** दीर्घ मुदतीच्या व्यापारी येण्यासाठी अपेक्षित पत तोट्याची तरतूद मालमत्तेच्या भाड्याच्या आधारे केली जाते. त्यासाठी वेळेच्या मूल्यानुसार खालील टप्प्यांचा आधार घेतला जातो :-

| दिवसांची संख्या | इ.सी.एल. |
|---|---|
| ०-९० दिवस | १ टक्का |
| ९०-१८१ दिवस | ३.२५ टक्के |
| १८० आणि अधिक | ६.५ टक्के |

## महानिर्मितीच्या संबंधी

### समभागाचे विलेख - एफ व्ही टी पी एल किंवा खर्चानुसार

कंपनीने समभागातील गुंतवणुकीचे नामांकन संक्रमण तारखेच्या सत्य व परिस्थितीनुसार एफ व्ही टी पी एल पद्धतीने केले आहे. कंपनीने उपकंपन्या सहयोगी आणि संयुक्त साहसी कंपन्या यांच्यातील समभागातील गुंतवणुकींना खर्चाप्रमाणे मान्यता देण्याचा पर्याय स्वीकारला आहे.

**महावितरणच्या संबंधी :-** या कंपनीने व्यापारी येणी आणि इतर वित्तीय मत्ता यांच्या अपेक्षित पत तोटयांना मान्यता दिली आहे. या इसीएलमध्ये पुढील दोन महत्वाचे घटक आहेत.

वेळेची हानी (पैशातील हानी/तोटा आणि पत/जमा यातील तोटा) वेळेची हानी मोजण्यासाठी योग्य सवलत दर विचारात घेतला जातो. व्यवस्थापनाचा विश्वास आहे की, कर्मचारी लाभाचे विमागणिती मूल्यांकन निश्चितीसाठी वापरलेला दर हा गोळा करण्यातील विलंबामुळे होणाऱ्या तोटया इतका असतो. या दराचा वर्षातून एकदा आढावा घेण्यात येतो. पत तोटयाचा हिशेब करण्यासाठी कार्पोरेट बाँडची व्याप्ती विचारात घेतली जाते. त्यांची मुदत ताळेबंदाच्या तारखेपासून १० वर्षे असते.

**अपेक्षित मत तोटा मोजण्यासाठी व्यापारी येण्यांची पाच श्रेणींमध्ये विभागली केली जाते :-**

**१)** शासकीय प्राधिकारी/संस्था **२)** कायमचा वीज पुरवठा खंडित झालेले वीजग्राहक **३)** शेती ग्राहक **४)** नियमित (चांगले, त्यांची २ वर्षांपेक्षा जास्त काळाची थकबाकी, त्या श्रेणीतील ग्राहकांच्या एकूण थकबाकीच्या २० टक्के पेक्षा जास्त नाही.) **५)** नियमित (इतर) ग्राहक. सर्व श्रेणीसाठी वेळेची हानी समान मानली जाते. कार्पोरेट बाँड (एफ आय एम एम डी ए यात प्रसिद्ध झालेली) यांची व्याप्तीच्या आधारे पत तोटा यासाठी तरतूद केली जाते. त्यांचा दर्जा पतीच्या मोलाच्या आधारे केलेल्या विविध श्रेणीप्रमाणे ठरविला जातो. व्यवस्थापनाने वरील पाच गटांसाठी योग्य तो पत दर्जा दिला आहे.

कंपनीकडे ग्राहकांच्या वरील प्रत्येक गटासाठीची सुरक्षा रक्कम उपलब्ध असून ती व्यापारी येण्याच्या ठोक थकीत बाकीप्रमाणे कमी केली जाते. ठोक थकबाकीच्या वाढत्या वयानुसार ही कपात केली जाते. निव्वळ व्यापारी येणी (ठोक वजा वाटणीस आलेली सुरक्षा अनामत) याच्या अप्रतिभूत भागासाठी इसीएल तरतूद केली जाते. वीजपुरवठा कायमचा खंडित (पीडी) केलेल्या ग्राहकांसाठी तरतूद रचना तक्ता (२० ते १०० टक्के या रेंजमध्ये) व्यापारी येण्यांसाठी लावला जातो.

व्यवहार्य रितीने महाराष्ट्र शासनाची इतर येणी आणि समुहातील अन्य कंपन्यांची येणी यांच्यावर इ.सी.एल. ची तरतूद वेळेच्या हानीनुसार वित्तिय वर्ष २०१५-१६ ते वित्तिय वर्ष २०१६-१७ यासाठी त्यातील शिलकीसाठी करण्यात आली.

**एफ) एफ.व्ही.टी.पी.एल. किंवा खर्च याप्रमाणे समभागातील गुंतवणकी:**

या कंपनीने संक्रमणाच्या तारखेची सत्य व परिस्थिती याप्रमाणे समभागातील गुंतवणूकीचे नामनिर्देशन एफ.व्ही.टी.पी. एल.नुसार केले. या कंपनीने तिच्या उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त साहस कंपन्या यातील समभागाचे विलेखातील गुंतवणूकींना मान्य करण्याचा पर्याय स्वीकारला.

**जी) शासकीय अनुदाने:**

कंपनीने भारतीय लेखा मानकात संक्रमण करण्याच्या तारखेला अस्तित्वात असलेली शासकीय अनुदानांना भारतीय लेखा मानक २० यातील आवश्यकता पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात यासाठी अर्ज करण्याचा पर्याय दिला.

**एच) भाडेपट्टी व्यवस्था निश्चिती:**

भारतीय लेखा मानकात संक्रमणाच्या तारखेला भाडेपट्टीचा समावेश रचनेत होऊ शकतो काय किंवा कसे हे निश्चित करण्यासाठी भारतीय लेखा मानक १७ चे शेडयुल सी लागू केले.

**आय) महापारेषणच्या संबंधी:**

महापारेषण कंपनीने यापूर्वीच्या वर्षात डी.पी.सी. थकबाकीची 'नोंद इतर' उत्पन्न अशी केली नव्हती. कारण महापारेषण इतर उत्पन्नाची नोंद उपार्जन तत्वावर करीत असे. फक्त जेव्हा अशा उत्पन्नांच्या वसूली अशक्य असे त्याचा अपवाद केला जाई. म.वि.नि.आयोगसुद्धा पारेषण दराचे समायोजन करताना ए.आर.आर.मधुन डी.सी.पी.ची वजावट करीत नसे. मात्र म.वि.नि.आयोगाने प्र.क्र.३१ वर्ष २०१६ यात महापारेषणच्या वर्ष २०१५-१६ च्या ए.आर.आर. चा आदेश देताना डी.पी.सी.ची रक्कम रू.८५४.९९ कोटी कमी केले व त्याचा विचार दर बाह्य उत्पन्न असा केला. परिणामी महापारेषणच्या पारेषण आकाराचा ए.आर.आर. मध्ये मोठी घट झाली. वि.वर्ष २०१६-१७ मध्ये महापारेषणच्या पारेषण आकाराचा महसूल फक्त रू.१९७९.४९ कोटी होता.(पहिल्या तिमाहीसाठी रू.२२३.६६ कोटी आणि पुढील ९ महिन्यांसाठी रू.१४५.३९ कोटी होता.) तुलनेने वि.वर्ष २०१५-१६ मध्ये रू. ३१५९.२३ कोटी होता. (पहिल्या दोन महिन्यांसाठी रू.४६१.३३ कोटी आणि पुढील १० महिन्यांसाठी रू.२२३.६६ कोटी) आता म.वि.नि.आयोगाने डी.पी.सी. ला उत्पन्न (जणू काही प्राप्त) असे मानले असून वि.वर्ष २०१६-१७ साठी रू.८५४.९९ कोटीचा लेखा केला आहे.

**ड) 'चालू व चालू नसलेली' असे वर्गीकरण करणे**

ही कंपनी ताळेबंदातील मत्ता व दायित्वे यांचे चालू आणि चालू नसणाऱ्या असे वर्गीकरण करुन त्या सादर करते. मत्तांना चालू मानण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

- नेहमीच्या कार्यचक्रात ज्या मत्तांतून अपेक्षित वसुली होणे किंवा त्यांना विक्री योग्यता असते किंवा त्याचा वापर करता येतो.
- त्या प्रामुख्याने व्यापारी हेतुसाठी धारण केल्या जातात.
- अहवालाच्या मुदतीनंतर बारा महिन्यांत त्यांची वसुली अपेक्षित असते.
- किंवा अहवाल वर्षानंतर किमान बारा महिन्यांनंतर त्यातून रोख किंवा रोख समतूल्य मिळू शकते (जर देवघेवीची बंदी असल्यास) किंवा एखादे दायित्व चुकते करण्यासाठी वापर करता येणे या व्यतिरिक्त उर्वरित सर्व मत्तांचे वर्गीकरण 'चालू नसलेल्या मत्ता' असे करण्यात येते.
- दायित्वाचे खालील परिस्थितीत चालू दायित्व यात वर्गीकरण होते.
- नेहमीच्या कार्यचक्रात ते चुकते केले जाणे अपेक्षित असल्यास
- ते प्रामुख्याने व्यापारी हेतुसाठी धारण केले असल्यास
- अहवाल वर्षानंतर बारा महिन्यात ते देय होते किंवा
- अहवाल वर्षानंतर बारा महिन्यानंतर दायित्वे चुकते किंवा स्थगित न करणे, स्थगित कर मत्ता/ दायित्व यांचे वर्गीकरण निव्वळ तत्वावर 'चालू नसलेली' असे केले आहे.

उर्वरित इतर सर्व दायित्वे यांचे चालू नसलेली असे वर्गीकरण केले जाते.

**इ) ऐतिहासिक खर्च संकेत यावर टिपणी :-**

ही संस्था सतत कार्यरत असलेली कंपनी आहे या तत्वाच्या आधारे वित्तीय विवरणपत्रे तयार केली आहेत. याला खालील बाबींचा अपवाद आहे.

**अ)** काही वित्तीय विलेख

**(ब)** व्याख्यांकित लाभ योजना यांचे मापन जर प्रत्येक अहवाल कालावधीच्या अखेर रास्त मूल्याने केले जात असल्यास अपवाद केला जातो. याचे स्पष्टीकरण खाील लेखा धोरणात दिले आहे.

**फ) महत्वाचे लेखा न्यायनिर्णय, अंदाज व गृहीते :-**

कंपनीची वित्तीय विवरणपत्रे तयार करताना कंपनीच्या अहवालात द्यावयाच्या रकमा, खर्च, मत्ता व दायित्वे यांच्यावर परिणाम करणाऱ्या बाबी तसेच त्यासोबत प्रकटने करण्यासाठी आणि आकस्मिक दायित्वे प्रकट करण्यासाठी व्यवस्थापनासस काही न्यायनिर्णय, अंदाज व गृहीते योजावी लागतात. ही गृहीते व अंदाज यांच्या अनिश्चित स्वरुपामुळे ती भविष्यातील मत्ता किंवा दायित्वे यांना बाधक होऊ शकतात.

भविष्यातील अनिश्चित अंदाज आणि इतर गृहीते यांच्यामुळे अहवालाच्या तारखेपर्यंत मोठ्या जोखीमा उद्‌भवतात. त्यासाठी पुढील वित्तीय वर्षासाठी मत्ता व दायित्वे यांच्या पुढे नेलेल्या रकमांच्याबाबत मोठी समायोजने करावी लागतात. त्याची माहिती खाली दिलेली आहे. कंपनीने वित्तिय विवरण  पत्रके तयार करण्याच्या वेळी जे मापदंड उपलब्ध होते त्या आधारे काही गृहीते व अंदाज करण्यात आले. विद्यमान परिस्थिती आणि भविष्यातील घडामोडी यामध्ये तसेच बाजारातील चढउतारामुळे किंवा ज्यावर कंपनीचे नियंत्रण नाही अशा परिस्थितीमुळे बदल होऊ शकतात असे बदल गृहीत धरावे लागतात व ते दाखविले जातात.

वित्तिय विवरण  पत्रातील मान्यता दिलेल्या रकमांवर ज्यांचे सर्वात मोठे लक्षवेधक परिणाम होतात त्या अंदाज व न्यायनिर्णयाची माहिती खाली दिली आहे.

- मालमत्ता, कारखाने, साधने आणि अमूर्त मत्ता यांचे उपयुक्त आयुष्य व उर्वरित मूल्य.
- वित्तीय विलेखांचे रास्त मूल्य.
- वित्तीय नसलेल्या इतर मत्ता कमी करणे.
- व्याख्यांकित लाभ बंधने, महत्वाची विमा गणिती गृहीते यांचे मापन
- तरतुदी आणि आकस्मिकता
- स्थगित कर मत्ता वसुलीचे पूनर्मूल्यांकन
- महसूल मान्यता

**ग) इतर महत्वाची लेखा धोरणे**

**१) मालमत्ता, कारखाने व साधने**

**मराविमं सुत्रधारी कंपनी संबंधी :-**

मालमत्ता, कारखाने व साधने या खर्च, संचित घसाऱ्याची निव्वळ आणि संचित कमी करण्याचे तोटे, जर काही असले तर, यानुसार नमूद केले जातात. कारखान्यात एखादा भाग व साधन बदलण्याचा खर्च, आणि दीर्घ मुदतीच्या बांधकाम प्रकल्पासाठीचे कर्जाचे खर्च यांनी मान्यतेचे निकष पूर्ण केले तर त्यांना खर्चात समाविष्ट केले जाते. जेव्हा पीपीइ मधील महत्वाचे भाग ठराविक कालावधीनंतर वारंवार बदलणे आवश्यक असेल तर कंपनी मत्तांच्या अशा घटकांना त्यांचे निश्चित उपयुक्त आयुष्य अशी मान्यता देते. तसेच त्यांच्या उपयुक्त आयुष्यानुसार घसारा देते. नंतरचे खर्च मत्तांच्या पुढे नेलेल्या रकमांत समाविष्ट केल्या जातात. किंवा अशा घटकाचे भविष्यातील आर्थिक लाभ कंपनीला मिळणार असल्यास आणि अशा घटकांच्या खर्चाचे विश्वासाने मापन करता येत असेल तर कंपनी अशा घटकांना वेगळी मत्ता म्हणून मान्यता देते. बदलेल्या घटकांची पुढे नेलेली रक्कम अमान्य केली जाते. दुरुस्ती व देखभालीचे सर्व इतर खर्च, नफा किंवा तोटयात मान्य केले जातात.

प्रगतीपथावरील भांडवली कामे यामध्ये विकसीत होणाऱ्या/स्थापनेचे काम चालू असलेल्या पीपीइचे खर्च समाविष्ट असतात. ते ताळेबंदाप्रमाणे धरले जातात.

संशोधन व विकासासाठी मूर्त मत्तांवर केलेल्या भांडवली खर्चाचे वर्गीकरण पीपीइमध्ये केले जाते व पीपीइप्रमाणे त्यांचा घसारा आकारला जातो.

पीपीइ निवृत्त किंवा काढून टाकल्यामुळे होणारी प्राप्ती किंवा हानी यांची निश्चिती विल्हेवाटीची निव्वळ मिळकत आणि मत्तांची पुढे नेलेली रक्कम यांच्या फरकानुसार करुन तिला निवृत्ती / विल्हेवाटीच्या तारखेला नफा किंवा तोटयात मान्यता दिली जाते. मत्तांचा घसारा त्यांच्या अंदाजे उपयुक्त आयुष्यासाठी सरळ रेषा पद्धतीने उर्वरित आयुष्यासाठी केला जातो. मत्तांचे मूल्य व उपयुक्त आयुष्य यांचा आढावा प्रत्येक वित्तीय वर्षाअखेरीस किंवा जेव्हा आढाव्याची चिन्हे दिसतील तेव्हा करुन त्याचे प्रक्षेपाने समायोजन केले जाते.

**भाड्याच्या मत्ता :-**

भाड्याच्या जमिनीच्या परतफेडीची तरतूद भाडेपट्टीच्या मुदतीसाठी केली जाते. भाडेपट्टीच्या जमिनीवर उभारलेल्या इमारतींचा घसारा हा कंपनी कायदा २०१३ चे शेड्युल दोन यात विनिर्देशित केलेल्या तरतुदीनुसार केली जाते. (जर जमिनीची भाडे मुदत इमारतीच्या आयुष्यापेक्षा जास्त असेल तर)

इतर प्रकरणी भाडेपट्टीच्या जमिनीवरील इमारतींसाठी जमिनीच्या प्राथमिक भाड्यावर परतफेडीची तरतूद केली जाते. मालकीच्या जमिनीवर घसारा आकारला जात नाही. मत्तांचे उपयुक्त आयुष्य खालीलप्रमाणे मानले जाते.

| मत्तांचे स्वरुप | वर्षे |
|---|---|
| भाडेपट्टीची जमीन | ०१ ते ८० |
| इमारती | ०१ ते ६० |
| कारखाने व साधने | ०१ ते १५ |
| फर्निचर व जोडण्या | ०१ ते १० |
| वाहने | ०१ ते ०८ |
| संगणक | ०१ ते ०३ |

ज्या मत्तांचा खर्च रु. पाच हजार किंवा त्याहून कमीआहे त्यांचा पूर्ण घसारा वापरण्यास उपलब्ध होण्याच्या तारखेपासून बारा महिन्यासाठी केला जातो.

**भारतीय लेखा मानक पद्धतीत संक्रमण :-**

भारतीय लेखा मानक पद्धतीत संक्रमण करताना, मराविमं सुत्रधारी कंपनीने केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या कंपन्यांचे (लेखा मानक) नियमावली २००६ मध्ये विनिर्देशित केलेले सामान्यपणे स्वीकृत केलेली लेखातत्वे आणि कंपनी अधिनियम अधिनियम १९५६ यातील इतर तरतुदी यानुसार मापन केलेल्या आणि १ एप्रिल २०१५ रोजी मान्य करुन पुढे नेलेली पी पी इ यांची मूल्ये चालू ठेवण्याचा पर्याय स्वीकारला आहे.

**महानिर्मितीच्या प्रकरणी : -**

मालमत्ता, कारखाने व साधने मालकीच्या जमिनी खर्चानुसार पुढे नेण्यात आल्या. पीपीइ मधील इतर सर्व नग खर्चानुसार नमूद केले. त्यासाठी जर काही निव्वळ संचित घसारा, संचित कमी करण्याचे तोटे असल्यास ते हिशेबात घेतले आहेत.

कोणत्याही मत्तेच्या प्रारंभिक खर्चामध्ये खरेदी किंवा बांधकाम खर्च (यामध्ये आयात शुल्क, मालभाडी व परत न मिळणारे कर समाविष्ट) धरले जातात. व्यवस्थापनाच्या इच्छित हेतुसाठी एखादी मत्ता कार्यरत करण्यासाठी लागणारे प्राथमिक खर्च आणि ती मत्ता पात्र करण्याचे उसनवारीचे खर्च (म्हणजे मत्ता इच्छित हेतुसाठी वापरण्यास तयार होण्यासाठी लागणारा वेळ) यांचे खर्च समाविष्ट असतात.

खरेदी किंमत म्हणजे भरलेली एकूण किंमत आणि ती मत्ता संपादन करुन ताब्यात घेण्यासाठी केलेल्या इतर बाबींचे रास्त मूल्य होय. या खर्चामध्ये मत्ता प्रारंभिक चालविण्यासाठी केलेले खर्च आणि अन्य खर्च म्हणजे मालभाडे, स्थापना खर्च इ. समाविष्ट आहेत. बांधकाम चालू असल्यास त्याचे पुढे नेलेले खर्च विचारात घेतले आहेत. यामध्ये थेट खर्च, प्रवर्तन पूर्व प्रासंगिक खर्च आणि लागू होणारे व्याज आदी समाविष्ट आहेत.

कंपनीची मालकी ज्यावर नाही अशा पीपीइज तयार करण्यासाठीचे भांडवली खर्च अशा मत्ता तयार होईपर्यंत प्रगतीपथावरील भांडवली कामाचा भाग म्हणून दाखविले जातात आणि त्यानंतर ते ''कंपनीची मालकी नसलेल्या मालमत्तांचा भांडवली खर्च'' या लेखाशीर्षातंर्गत पीपीइमध्ये दर्शविल्या जातात. कंपनीची मालकी नसलेल्या मत्तांसाठीच्या खर्चामध्ये महसूल खर्चासाठी वाटा आणि कंपनीची सामाजिक जबाबदारी याचा खर्च यांची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जातो.

प्रगतीपथावरील भांडवली कामांमध्ये कंत्राटदारांच्या देयके चुकती करणे झाले नसेल तर त्याचे भांडवलीकरण हंगामी तत्वावर आणि अंतिम चुकती होण्याचे वर्षी करावयाच्या समायोजच्या अधीन असते.

भांडवली कंत्राटात किंमतीमध्ये बदल होण्याचे दावे कंपनीने स्वीकारले तर त्याचे लेखे केले जातात.

पीपीइमधील कोणताही नग आणि प्रारंभी वेगळी मान्यता दिलेला. पीपीइमधील एखादा महत्वाच्या भागाची विल्हेवाट लावली तर किंवा त्याचा वापर किंवा विल्हेवाट यातून भविष्यात कोणताही आर्थिक लाभ अपेक्षित नसेल तर किंवा पीपीइचे पुनर्वर्गीकरण 'विल्हेवाट योग्य' असे केले तर त्याची मान्यता काढून घेण्यात येते. ही मान्यता अमान्य केल्यानंतर होणारी प्राप्ती किंवा हानी हा नफा - तोटा पत्रकात अंतर्भूत केला जातो.

जमिनीच्या भाडेपट्टीच्या व्यवस्थांना वित्त भाडेपट्टी असे ओळखण्यात येते. त्याच्या हस्तांतरणसंबंधीचे धोके व मोदबले कंपनीकडे स्थानांतरित होऊ शकतात. मुदत ९९ वर्षांपेक्षा जास्त आहे अशा जमिनीच्या भाडेपट्ट्यांचे वर्गीकरण वित्त भाडेपट्टी यात केले जाते. जे सुटे भाग पीपीइच्या आवश्यकता पूर्ण करतात त्यांचे पीपीइ मध्ये भांडवलीकरण केले जाते. त्यासाठी एका नगाची किंमत मर्यादेपेक्षा जास्त असली पाहिजे. इतर सुटे भाग खरेदीनंतर वस्तूसूचीत सामावून घेतले जातात आणि वापरानुसार नफा तोटा पत्रकात आकारले जातात.

ज्यावर्षी यंत्राचे जुने भाग बदलण्यात येतात व ते निकामी ठरतात त्यावर्षी त्यांचे कमी झालेले मूल्य महसूलात आकारले जाते. मात्र असे जुने भाग जर दुरुस्त करुन पुन: वापरण्यास योग्य असतील तर दोन्ही प्रकारच्या भागांचा संबंधित मत्तेच्या उपयुक्त आयुष्याकरिता घसारा आकारणे चालू ठेवले जाते. जुन्या संबंधित सुट्या भागाचे दुरुस्तीचे आकार नफा-तोटा पत्रकात टाकले जातात.

जर मत्तेचे काही भाग / भांडवली सुटे भाग बदलले आणि जर मत्तांच्या अशा मूळ भागाची / भांडवली सुटे भागाची कमी केलेले मूल्य माहित नसेल तर मत्तेचा नवा भाग / नवा भांडवली सुटा भाग यांचा खर्च / निव्वळ पुस्तक मूल्य निर्लेखित केली जाते.

पीपीइची मागील जीएएपी प्रमाणे असलेले मूल्य यालाच १ एप्रिल २०१५ या भारतीय लेखा मानकात संक्रमण करायच्या तारखेपासून पुढे मानीव खर्च मानावा असे, कंपनीने ठरविले आहे.

## अमूर्त मत्ता :

अमूर्त मत्ता या संचित कर्जफेडीची तरतुदीची निव्वळ खर्च आणि जर काही संचित कमी करण्याची हानी असेल त्यानुसार पुढे नेण्यात आल्या आहेत. अंतर्गत निर्माण केलेल्या अमूर्त मत्तांचे विकास खर्च वगळता, भांडवलीकरण केले जात नाही आणि ज्या मुदतीत हा खर्च केला त्याच्या नफा-तोटा पत्रकात तो नोंदला जातो. प्रकल्पाची वाणिज्यिक व तांत्रिक सक्षमता आणि भविष्यातील आर्थिक लाभ यांचे सादरीकरण केले तर विकास खर्चाचे भांडवलीकरण केले जाते.

१) अमूर्त मत्तांचे उपयुक्त आयुष्यासाठी सरळ रेषा पद्धतीने त्यांच्या कर्जफेडीची तरतूद केली जाते. आणि अमूर्त मत्ता कमी करता येतील अशी चिन्हे दिसली तर त्याचे तसे मूल्यनिर्धारण केले जाते. अमूर्त मत्तांचे परतफेडीचे खर्च आणि कमी केल्यास झालेली हानी यांना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

२) भारतीय लेखा मानकाची संक्रमण तारीख दि. १/४/२०१५ रोजी पूर्वीच्या जीएएपीप्रमाणे असलेले मूल्य मानीव मूल्य म्हणून पुढे नेण्याचा पर्याय कंपनीने निवडला.

## प्रगतीपथावरील भांडवली कामे :

१) पीपीइ यातील नवीन प्रकल्प/विस्तार याचे संबंधित खर्च आणि ते कार्यान्वित होण्याच्या तारखेपर्यंतचे व्याज खर्च यांचे भांडवलीकरण केले जाते.

२) कंपनीने प्रकल्प व नियोजन कार्यालय यावर त्या काळात केलेल्या एकूण सर्व खर्चाचे कार्यवाहीतील प्रकल्प संबंधित प्रगतीपथावरील कामाचे भांडवलाचे लेख्यात संविभाजन केले जाते. त्यासाठी बांधकाम चालू असलेल्या मत्तांच्या संचित शिल्लक खर्चाचा आधार घेतला जातो. प्रकल्प / वीज केंद्रे यांचे प्रायोगिक तत्वावर संचलन करण्याचे खर्च आणि त्यातून मिळालेला महसूल यांचे समायोजन भांडवलीकरण करताना केले जाते.

**वित्तीय स्वरुप नसलेल्या (अवित्तीय) मत्ता कमी करणे :**

वस्तूमाल सूची व्यतिरिक्त अवित्तीय स्वरुपाच्या मत्ता / स्थगित कर मत्ता आणि विक्रीसाठी धारण केलेल्या असे वर्गीकरण केलेल्या चालू नसलेल्या मत्ता या कमी करण्यास योग्य आहेत किंवा कसे याची प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेस आढावा घेण्यात येतो.

जर कमी करण्याजोगी चिन्हे असली तर किंवा एखाद्या मत्तेसाठी कमी करण्याचे वार्षिक परिक्षण करुन त्या मत्तेमधून वसूल होऊ शकणाऱ्या रकमेचा अंदाज घेण्यात येतो. जर एखाद्या मत्तेमधून वसुली होणारी रक्कम किंवा रोख निर्मिती करणाऱ्या संस्थेचे रास्त मूल्य वजा विल्हेवाटीचा खर्च, हा तिच्या वापरातील मूल्यापेक्षा जास्त असावा. प्रत्येक मत्तेद्वारे कंपनीमध्ये रोकडता प्रवाहित होत नसेल आणि ती इतर मत्ता किंवा मत्तांचा समूह यातून वेगळी केली असेल, तर तिचे वसुली योग्य मूल्य निश्चित केले जाते.

जेव्हा मत्तेची चालू रक्कम किंवा तिच्या सीजीयूलाही रक्कम वसूल होणाऱ्या रकमेपेक्षा जास्त असते, तेव्हा ही मत्ता कमी करण्यास योग्य आहे असे ठरवून तिचे मूल्य वसुलीयोग्य रकमेइतके कमी करण्यात येते.

वापरातील मूल्य निर्धारित करताना, तिचे भविष्यातील अंदाजित रोकडता प्रवाह यांना त्याच्या विद्यमान मूल्याइतकी कसर लावली जाते. त्यासाठी पैशाचे वेळेचे मूल्य दर्शविणारे चालू बाजारातील विद्यमान निर्धारण आणि मत्तेच्या विशिष्ट जोखिमा यांचा वापर केला जातो. रास्त मूल्य वजा विल्हेवाट खर्च निश्चित करण्यासाठी बाजारातील ताजे व्यवहार विचारात घेतले जातात. जर असे व्यवहार सापडत नसतील तर, योग्य मूल्यांकन प्रारूप वापरले जाते.

**घसारा / कर्जफेडीची तरतूद :**

१) सामान्यपणे भाडेपट्टीच्या जमिनीच्या कर्जफेडीची तरतूद भाडेपट्टीच्या मुदतीसाठी केली जात असते. मात्र जमिनीतील गुंतवणुकीसाठी जमीन भाडेपट्टीने घेतलेल्या जमिनीसाठी, जागा योग्य करण्याच्या खर्चासाठी या मत्तेच्या २५ वर्षांच्या आयुष्यासाठी घसारा आकारला जातो.

**मत्ता, कारखाने व साधने :**

अ) कंपनीने पीपीइ मधील प्रत्येक नगाचे उपयुक्त आयुष्याचा अंदाज तांत्रिक - वाणिज्य मूल्यांकनाच्या आधारे केला आहे. या अंदाजात पीपीइमधील प्रत्येक नग वापरण्याची पद्धत विचारात घेतली आहे. त्यानुसार कंपनी सरळ रेषा पद्धतीने मत्तांच्या खर्चावर ९९ टक्केपर्यंत घसारा आकारते.

२) पीपीइमध्ये वर्षात होणारी भर / विल्हेवाट / काढून टाकणे या बाबींचा घसारा यथाप्रमाण पद्धतीने केला जातो. त्यासाठी अशा कृती करण्याचा महिना विचारात घेतला जातो. ग्रीनफिल्ड (हरित क्षेत्र) / ब्राऊन फिल्ड अशा प्रकल्पांचे भांडवलीकरणाच्या प्रकरणात, घसारा वाणिज्यिक प्रवर्तन सरू होण्याच्या तारखेपासून नफा-तोटा पत्रकात आकारला जातो.

३) ज्या मत्ता कार्यान्वित झाल्यानंतर त्याचा घसारा ७० टक्केपर्यंत आकारलेला नाही; (खालील परिच्छेद (४) मध्ये नमूद केलेल्या मत्ता वगळून) त्यासाठी कंपनी खालील विहित केल्याप्रमाणे घसारा आकारते. यासाठी मत्तांच्या ठोक गटांवर आणि ज्यावर्षी संचित घसारा ७० टक्के होतो त्यावर्षापर्यंत मोजला जातो. घसारा ७० टक्क्यांपर्यंत पोहोचल्यावर कंपनी उर्वरित उपयुक्त आयुष्यावर ९० टक्केपर्यंत घसारा आकारते. कंपनीने औष्णिक व वायू आधारित विज निर्मित केंद्राचे उपयुक्त आयुष्य २५ वर्षे धरले असून जलविद्युत केंद्रासाठी ३५ वर्षे धरले आहे.

| अनु. क्र. | मत्तांचा प्रकार | घसारा (%) |
|---|---|---|
| १ | जलविद्युत केंद्रातील कारखाना व यंत्रसामग्री - विजेची, स्टीम इलेक्ट्रीक आणि वायू आधारित केंद्रासाठी - कुलींग टॉवर, हायड्रॉलिक वर्क्स, ट्रान्स्फॉर्मर व इतर स्थापित साधने, पारेषण तारा, केबल नेटवर्क इ. | ५.२८% |
| २ | इमारती व इतर स्थापत्य कामे | ३.३४% |

**४) खालील मत्तांसाठी सरळ रेषा पद्धतीने मत्तांच्या ९० टक्केपर्यंत किंवा खाली दिलेल्या दराने मत्ता आकारला जातो.**

| अनु. क्र. | मत्तांचा प्रकार | घसारा (%) | उपयुक्त आयुष्य |
|---|---|---|---|
| १ | फर्निचर, जोडण्या व कार्यालयातील साधने | ६.३३ | १५ वर्षे |
| २ | वाहने | ९.५० | १० वर्षे |
| ३ | माहिती तंत्रज्ञानाची साधने | १५.०० | ०६ वर्षे |

**१)** पीपीइमधील ज्या मत्तांचे खर्च अंतिम मर्यादेपेक्षा जास्त नाहीत त्यांचा घसारा संपादनाच्या वर्षी १०० टक्के आकारला जातो. मोबाईल फोनचा घसारा महसूलात खरेदी वर्षात आकारला जातो. यासाठी त्यांची अंतिम मर्यादा विचारात घेतली जात नाही.

**२)** पीपीइमधील विशिष्ट नगासाठी असलेल्या सुट्या भागाचा घसारा संबंधित पीपीइ नगावर आधारित असतो.

**३)** मत्तांचे उपयुक्त आयुष्य, उर्वरित आयुष्य व घसारा पद्धत याचा तांत्रिक - वाणिज्यिक आढावा दरवर्षी केला जातो. ही अंदाजाची पद्धत म.वि.नि. आयोगाच्या वीज दर निश्चितीच्या (बहुवर्षीय वीज दर) नियमावलीशी सुसंगत आहे.

## महावितरणप्रकरणी :

**अ)** मालकीच्या जमिनी खर्चानुसार पुढे नेल्या जातात.

**ब)** पीपीइमधील नगाचे आर्थिक लाभ कंपनीस मिळणे संभवनीय असल्यास आणि त्याचा खर्च विश्वासार्ह रितीने मोजता येत असेल तर त्यांना मान्यता दिली जाते. पीपीइ खर्च नमूद करताना त्यासाठी जर काही कर / शुल्क यांचा लाभ घेतला असेल तर त्याची निव्वळ वजा संचित घसारा आणि संचित कमी करणे या प्रकारे नमूद केले जातात. जर संबंधित कारखाना व साधने यासाठी निश्चित तंत्रज्ञान मिळविण्यासाठी जर दिले असेल तर त्याला खर्चाचा भाग समजले जाते. खर्चामध्ये मत्तेची खरेदी किंमत आणि ती मत्ता तिच्या इच्छित वापरासाठी लागू असलेले इतर खर्च तसेच ती पात्र करण्यासाठीचे खर्च समाविष्ट असतात. कर्जाऊ खर्चाचे भांडवलीकरण कंपनीच्या लेखा धोरणानुसार केले जाते.

**क)** भारतीय लेखा मानक पद्धतीत संक्रमण करताना कंपनीने पूर्वीच्या जीएएपी प्रमाणे चालू असलेले पीपीइचे मूल्य यालाच संक्रमण तारीख १ एप्रिल २०१५चे खर्च मानले आहे.

**ड)** ज्या वस्तूसूचीचे उपयुक्त आयुष्य १ वर्षापेक्षा जास्त आहे अशा पीपीइचा लेखा भारतीय लेखा मानक १६ प्रमाणे केला आहे.

**घसारा / कर्जफेड तरतूद :**

**अ)** भाडेपट्टीच्या जमिनीची परतफेड तरतूद सामान्यत: भाड्याच्या मुदतीसाठी केली जाते.

**ब)** **मालमत्ता, कारखाने व साधने :**

**अ)** या कंपनीने पीपीइच्या प्रत्येक नगाचे उपयुक्त आयुष्याचा अंदाज तांत्रिक - वाणिज्य मूल्यांकनाच्या आधारे केला आहे. या अंदाजात पीपीइ नगाच्या वापराची पद्धत समाविष्ट आहे. त्यानुसार कंपनी सरळ रेषा पद्धतीने मत्तांच्या किंमतीने ९० टक्के पर्यंत घसारा आकारते.

**ब)** उपयुक्त आयुष्य, उर्वरित मूल्य आणि घसारा पद्धत यांचा दरवर्षी आढावा घेतला जातो. सध्याचा अंदाज हा मविनि आयोगाच्या वीज दर निश्चितीसाठीच्या एमईआरसी (बहुवर्षीय वीज दर) नियमावली २०१५ यासमान आहे.

**क)** घसाऱ्याचे दर खालीलप्रमाणे लागू केले आहेत.

| **मत्तांचा गट** | **दर (%)** |
|---|---|
| भाडेपट्टीची जमीन | ३.३४ |
| इमारती | ३.३४ |
| हायड्रॉलिक कामे | ५.२८ |
| इतर स्थापत्य कामे | ३.३४ |
| कारखाने व यंत्रसामग्री | ५.२८ |
| तारा - केबल नेटवर्क | ५.२८ |
| वाहने | ९.५० |
| फर्निचर व जोडण्या | ६.३३ |
| कार्यालयीन साहित्य | ६.३३ |
| माहिती तंत्रज्ञानाची साधने | १५.०० |

**ड)** ज्या मत्तांचा कार्यान्वित झाल्यापासून ७० टक्केपर्यंत घसारा आकारलेला नाही, त्यांचा संचित घसारा ज्यावर्षी ७० टक्केपर्यंत पोहोचतो तोपर्यंत कंपनी विहित दराने घसारा आकारते. संचित घसारा ७० टक्के झाल्यावर कंपनी मत्तेच्या उर्वरित आयुष्याच्या आधारे आणि वरिल नियमावलीच्या आवश्यकतानुसार ९० टक्केपर्यंत घसारा आकारते.

**इ)** वर्षभरातील मत्तामधील भर / कमी करणे यावर यथाप्रमाण दराने घसारा दिला जातो.

**फ)** ज्या मत्तांचा प्रत्येकी घसारा रु. ५,०००/- पेक्षा कमी आहे; त्यांचा घसारा वापराच्या वर्षात १०० टक्के आकारला जातो.

## महापारेषण कंपनी प्रकरणी :

महापारेषण कंपनीने भारतीय लेखा मानकात संक्रमण करण्याच्या तारखेस पीपीइ यांच्या पूर्वीच्या जीएपीपीप्रमाणे चालू असलेले यालाच मानीव खर्च मानण्याचे ठरविले. भारतीय लेखा मानक क्र. १०१ - भारतीय लेखा मानकाचे प्रथम स्वीकार करणे यानुसार ही निश्चिती करण्यात आली.

पीपीइचे प्रारंभिक मापन हे मत्ता संपादन / बांधकाम यांच्या खर्चाप्रमाणे केले जाते. या खर्चात ती मत्ता जागेवर आणणे आणि व्यवस्थापनाच्या उद्दिष्टाप्रमाणे ती मत्ता प्रवर्तनास प्राप्त करण्याच्या स्थितीत आणण्यासाठी करावे लागणारे खर्च समाविष्ट असतात. प्रारंभीच्या मंजुरीनंतर पीपीइ ही चालू खर्च वजा संचित घसारा / कर्जफेडीची तरतूद आणि जर काही मत्ता कमी करण्याचे संचित खर्च असतील ते वजा करून तिला मान्यता दिली जाते. नंतरच्या केलेल्या खर्चामुळे तर त्याचे भविष्यात आर्थिक लाभ कंपनीला मिळणार असतील तरच त्यांचे भांडवलीकरण केले जाते.

ज्या पीपीइ विद्यमान मत्ता बदलण्यासाठी संपादित केल्या जातात; त्यांचे भांडवलीकरण केले जाते आणि संबंधित बदललेल्या किंवा प्रत्यक्ष वापरातून काढून टाकलेल्या / निवृत्त केलेल्या मत्तांची मान्यता रद्द केली जाते. जर बदललेला भाग किंवा पूर्वीचे निरीक्षण उपलब्ध नसेल तर त्यासारख्या नव्या भागाचा अंदाजे खर्च / निरीक्षण याचा उपयोग करुन विद्यमान घटक / निरीक्षण याचा संपादनाच्यावेळी किंवा निरीक्षणाच्या वेळी अंदाजे खर्च काढला जातो.

कार्यान्वित करून घेतलेल्या मत्ता , उपकेंद्र उभारणीचा व पारेषण तारा यांच्या प्रकरणी, जर त्यांच्या कंत्राटदारांच्या देयकांचा अंतिम चुकारा झाला नसेल तर हंगामी समायोजन केले जाते. ते ज्या वर्षी अंतिम चुकारा होईल त्याच्या समायोजनेच्या अधीन असते.

जमिनीच्या खर्चात भरपाईसाठी व दिलेले पैसे / दायित्वे व संपादनाचे इतर खर्च समाविष्ट असतात. जमिनीची पातळी, स्वच्छता व दर्जा करणे यांचे जमिनी विकासाचे खर्च म्हणून भांडवलीकरण केले जाते.

ज्यांचा खर्च रु. १०,००,०००/- आणि अधिक आहे असे सुटे भाग, राखून ठेवलेली साधने आणि साधनांचा व्यवस्थित ठेवण्याचे खर्च हे जर पीपीइच्या मान्यतेच्या निकषांप्रमाणे असतील तर त्यांचे भांडवलीकरण केले जाते. इतर प्रकरणी सुटे भाग संपादनानंतर वस्तूसूचीत समाविष्ट केले जातात आणि वापरानंतर नफा-तोटा पत्रकात आकारले जातात. पीपीइमधील ज्या भागाचे वापरानंतर किंवा विल्हेवाटीनंतर कोणतेही आर्थिक लाभ भविष्यात मिळणार नाहीत, त्यांची मान्यता रद्द होते.

पीपीइमधील एखादा नग काढून टाकला / निवृत्त केला तर त्यांचा लाभ किंवा तोटा हा मत्ता विल्हेवाटीची निव्वळ रक्कम आणि प्रचलित किंमत यांच्या फरकातून निश्चित केला जातो. व त्यास त्या तारखेस नफा - तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

## घसारा / कर्जफेडीची तरतूद

पारेषण व्यवसायाशी संबंधित मत्तांचा घसारा / कर्जफेड यांच्या तरतुदी मविनि आयोगाने दर वसुलीसाठी अधिसूचित केलेले दर व पद्धतीनुसार केल्या जातात.

सॉफ्टवेअरला अमूर्त मत्ता मानून त्यानुसार ती वापरण्याच्या हक्काची कायदेशीर मुदतीसाठी किंवा ४ वर्षे यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे आणि उर्वरित मूल्य ‘निरंक’ मानून केले जाते.

मोबाईल फोन्स खरेदीच्या तारखेपासून ३ वर्षांपर्यंत आकारले जाते. वर्षभरात पीपीइमध्ये भर / घट झाल्यास त्याचा घसारा / कर्जफेड तरतूद ज्या तारखेस सदर मत्ता वापरण्यास उपलब्ध झाली / काढून टाकली त्या तारखेपासून / पर्यंत यथाप्रमाणतत्वावर आकारली जाते.

जर घसारा योग्य पीपीइ यांचा खर्च किंमतीचे समायोजन शुल्कात बदल किंवा तत्सम कारणामुळे वाढला / कमी झाला असेल आणि अशा मत्तांच्या कर्जफेड न केलेली शिलकीचा घसारा पूर्वलक्षी प्रभावाने आणि मविनि आयोगाच्या नियमावलीतील दर व पद्धत यानुसार करण्यात यावा.

सुटे भाग, आरक्षित साधने व सेवेची साधने यांचे भांडवलीकरणानंतर त्यांचा घसारा, त्यांचा वापर सुरू केल्याच्या तारखेपासून पारेषण उद्योगातील संबंधित मत्तांच्या उर्वरित उपयुक्त आयुष्यासाठी, सरळ रेषा पद्धतीने केला जातो. या मविनि आयोगाने अधिसूचित केलेले दर व पद्धत वापरण्यात येते.

प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस पारेषण व्यवसायाशी संबंध नसणाऱ्या मत्तांचे उर्वरित मूल्य, उपयुक्त आयुष्य व घसाऱ्याची पद्धत यांचा आढावा घेऊन आवश्यक तेथे समायोजने केली जातात.

रु. ५०००/- किंवा त्याहून कमी खर्चाच्या स्थिर मत्तांचा त्यांच्या संपादन वर्षात पूर्णपणे घसारा केला जातो.

**विविध श्रेणीतील मत्तांसाठी असलेले घसारा दर :**

| अनु. क्र. | तपशील | दर (%) |
|---|---|---|
| | मूर्त मत्ता - | - |
| १ | हायड्रॉलिक कामे | ५.२८ |
| २ | इमारती व इतर स्थापत्य कामे | ५.३४ |
| ३ | कारखाना व यंत्रसामग्री | ५.२८ |
| ४ | पारेषण तारा, केबल नेटवर्क इ. | ५.२८ |
| ५ | फर्निचर, जोडण्या व कार्यालयाची साधने | ५.२८ ते १५.०० |
| ६ | वाहने | ६.३३ |

## २) गुंतवणूक मालमत्ता : मराविमं सुत्रधारी कंपनी विषयी

गुंतवणूक मालमत्तांमध्ये मालकीची जमिनी आणि दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टीची उत्पन्न आणि / किंवा भांडवल वाढीसाठी धारण केलेल्या कार्यालयीन इमारती यांचा समावेश होतो. गुंतवणूक मालमत्ता प्रारंभि खर्चानुसार मान्य केल्या जातात. नंतर इमारती समाविष्ट असलेल्या मालमत्ता या त्याच्या विद्यमान खर्च वजा संचित घसारा आणि संचित कमी करण्यातील तोटे अशाप्रकारे त्यांना मान्यता दिली जाते.

खर्च यामध्ये भाग बदलण्याचे खर्च, मान्यतेचे निकष पूर्ण झाल्यास दीर्घ मुदतीचे प्रकल्पाचे कर्ज खर्च समाविष्ट असतात. जेव्हा गुंतवणुकीच्या मालमत्तेचे महत्वाचे भाग काही कालांतर ठेवून बदलावयाचे असतात. तेव्हा कंपनी त्यांच्या उपयुक्त आयुष्याच्या आधारे घसारा आकारते. इतर सर्व दुरूस्ती व देखभालीचे खर्च यांना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

इमारतींच्या घसाऱ्यासाठी कंपनी अधिनियम २०१३ चे अनुसूचि २ यात विनिर्देशित केल्याप्रमाणे इमारतींचा घसारा अंदाजित उपयुक्त आयुष्यासाठी दिला जातो. उर्वरित मूल्य, उपयुक्त आयुष्य आणि घसारा यांचा आढावा घेऊन भावी काळासाठी योग्य ठरतील

अशी समायोजने प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस केली जातात. या आढाव्याचे परिणामामुळे उद्‌भवलेले बदल नफा- तोटा पत्रकात दाखविले जातात.

कंपनी जरी गुंतवणूक मालमत्तेचे मापन, खर्च आधारित मोजपट्टी वापरुन करीत असली तरी, गुंतवणूक मालमत्तेचे रास्त मूल्य टीपांमध्ये प्रकट केल्या आहेत.

जेव्हा गुंतवणूक मालमत्ता काढून टाकल्या जातात किंवा ती वापरातून कायमची काढून घेतली जाते आणि तिचे विल्हेवाटीपासून कोणतेही आर्थिक लाभ अपेक्षित नसतील तेव्हा तिची मान्यता काढून घेतली जाते. विल्हेवाटीची मिळकत आणि मत्तांची विद्यमान रक्कम यातील फरकाला नफा-तोटा पत्रकात घसाऱ्याच्या मुदतीमध्ये मान्यता दिली जाते.

## भारतीय लेखा मानक पद्धतीत स्थानांतरण :

मराविमं सुत्रधारी कंपनी लि. ने भारतीय लेखा मानक पद्धतीत संक्रमण करताना केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या (लेखा मानके २००६) यामध्ये विनिर्देशित केलेल्या तसेच कंपनी अधिनियम १९५६ यातील इतर तरतुदी यानुसार जुन्या जीएएपी नुसार सर्व गुंतवणूक मालमत्तांचे मोजणी केलेले विद्यमान मूल्य पुढे चालू नेण्याचे ठरविले आहे.

## ३) अमूर्त मत्ता -

### मराविमं सुत्रधारी कं.लि. संबंधी

ज्या अमूर्त मत्तांची ओळख निश्चिती झाली आहे; आणि कंपनीचे त्यावर नियंत्रण असून भविष्यात त्यांचे आर्थिक लाभ कंपनीमध्ये प्रवाहित होणे संभवनीय आहे; तसेच त्यांची मोजणी विश्वासार्ह रितीने करता येते, अशा अमूर्त मत्तांना मान्यता देण्यात येते.

प्रारंभी, स्वतंत्रपणे संपादन केलेल्या मत्ता त्यांच्या खर्चानुसार मान्य केल्या जातात. ज्या अमूर्त मत्ता व्यवसायाच्या संमिश्रणात संपादित केलेल्या असतात; त्यांचे खर्च हेच संपादन तारखेचे रास्त मूल्य असते. प्रारंभीच्या मान्यतेनंतर, अमूर्त मत्तांचे खर्च वजा संचित कर्जफेडीच्या तरतुदी आणि मत्ता करण्याचे संचित तोटे जर असतील तर ते वजा करून येणाऱ्या रक्कम प्रमाणे पुढे नेले जातात.

अमूर्त मत्ता वापरण्याच्या उपलब्ध होण्याच्या तारखेपासून त्यांच्या कर्जफेडीच्या तरतुदींना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. त्यांच्या अंदाजित उपयुक्त आयुष्याकरिता ती सरळ रेषा पद्धतीने मान्य केली जाते. सदिच्छा / ख्याती मूल्य व्यतिरिक्त अन्य अमूर्त मत्ता यांच्या कर्जफेडीची मुदत व पद्धत याचा प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस आढावा घेतला जातो.

मत्तांच्या अपेक्षित उपयुक्त आयुष्यातील बदल किंवा मत्तांमध्ये संनिविष्ट केलेले भविष्यातील आर्थिक बदलाच्या लाभाच्या वापराचे बदल यांचा लेखा कर्जफेडीची मुदत किंवा पद्धत यात योग्य बदल करून केला जातो. आणि त्याला 'लेखा अंदाजातील बदल' मानले जाते.

**अ) ख्याती मूल्य**

ख्याती मूल्य (सदिच्छा) यास प्रारंभी खर्चानुसार मान्यता दिली जाते नंतर ते खर्च हानी किंवा अन्य संचित कमी होण्याचे तोटे याप्रमाणे मान्य केले जाते.

**ब) सॉफ्टवेअर :**

सॉफ्टवेअर संपादन वापराचा परवाना या खर्चाचे भांडवलीकरण केले जाते व परवान्याच्या कालावधीसाठी (बहुदा ३ वर्षापेक्षा जास्त नाही.) कर्जफेडीची तरतूद केली जाते.

**क) परवाने (अनुज्ञाप्ती) :**

संपादित परवाने प्रथम खर्चानुसार मान्य केले जातात. त्यानंतर परवान्यांचे मापन खर्च वजा संचित कर्जफेडीची तरतूद आणि जर ते कमी करण्याचा खर्च असेल तर त्याप्रमाणे केले जाते. कर्जफेडीला सदर परवान्याच्या मुदत संपण्यापूर्वीच्या कालावधीसाठी नफा-तोटा पत्रकात सरळ रेषा पद्धतीने मान्यता देण्यात येते. त्यांचे प्रकटन 'घसारा व कर्जफेड' या शीर्षकात केले जाते. व्यवसाय संमिश्रणात संपादन केलेल्या परवान्यांसंबंधीची कर्जफेड तरतूद प्रामुख्याने उर्वरित परवाना कालावधीनुसार निश्चित केली जाते.

**ड) इतर संपादित अमूर्त मत्ता:**

इतर अमूर्त मत्तांना प्रारंभी खर्चानुसार मान्यता दिली जाते.व्यवसाय संमिश्रणात संपादित अमूर्त मत्तांची कर्जफेड तरतूद त्यांच्या वापर तारखेपासून अंदाजित उर्वरित आयुष्यासाठी केली जाते.

## भारतीय लेखामानकात संक्रमण:

म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.लि.ने भारतीय लेखा मानकात संक्रमण करण्याच्या तारखेस म्हणजे दि.१ एप्रिल २०१५ रोजीची पूर्वीच्या जीएएपी मोजणी केलेल्या विद्यमान मूल्यास पुढे चालू ठेवण्याचे ठरविले. ही कृती केंद्र शासनाने अधिसूचित केलेली कंपन्यांची (लेखा मानके)नियमावली २०१६ आणि कंपनी कायदा १९५६ च्या इतर तरतूदी यात विहीत केल्यानुसार करण्यात आली आहे. ज्या अमूर्त मत्तांचे उपयुक्त आयुष्य अनिरचित असते(उदा. ख्यातिमूल्य), आणि ज्या अमूर्त मत्ता वापरण्यास अद्याप प्रारंभ झालेला नसतो, त्या कर्जफेडीच्या तरतूदीशी अधीन नसतात. तसेच त्याचे दरवर्षी कमी करण्यासाठी परिक्षण होत नसते. ज्या मत्ता घसारा व कर्जफेडीच्या अधीन नसतात, त्यांचा कमी करण्यासाठी आढावा घेतला जातो. जरी परिस्थितीत बदल करणारे घटना प्रसंग घडले आणि ते महत्वाचे, मर्यादेमध्ये नसले किंवा महसूलात किंवा मिळकतीत सातत्याने घट झाली आणि आर्थिक पर्यावरणात विपरीत परिणाम झाले, तर त्यासाठी आढावा घेतला जातो.

## महानिर्मितीच्या संबंधी:

नविन ॲप्लीकेशन खरेदी करणे, सॉफ्टवेअर बाहेरच्या तिसऱ्या पक्षाच्या सल्लागाराकडून अमलात आणणे आणि परवाने खरेदी करणे यासाठी केलेल्या खर्चाचे भांडवलीकरण केले जाते आणि त्यासाठी अंदाजित उपयुक्त आयुष्यासाठी कर्जफेडीची तरतूद केली जाते. इतर अमूर्त मत्ता त्यांच्या पुरेसे आर्थिक लाभ निर्माण करण्याच्या अंदाजित काळासाठी केले जाते.

## महावितरण कंपनीच्या प्रकरणी:

अमूर्त मत्ता त्यांच्या संचित कर्जफेड आणि जर काही संचित कमी करण्याचे तोटे असतील तर त्या खर्चाच्या निव्वळ रक्कमा पुढे चालू ठेवल्या जातात. अंतर्गत निर्माण केलेल्या अमूर्त मत्तांचे त्यांचा विकासाचा खर्च वगळून, भांडवलीकरण केले जात नाही. संबंधित खर्च, नफा-तोटा पत्रकात, त्या कालावधीत दाखविला जातो. प्रकल्पाच्या तांत्रिक व वाणिज्यिक शक्यतांचे व भावी आर्थिक लाभांचे प्रात्यक्षिक सादर केले तर, त्याचा विकास खर्चाचे भांडवलीकरण केले जाते.

अमूर्त मत्तांच्या कंत्राट किंवा वॉरंटीच्या मुदतीपैकी जे अधिक लांबीचे असेल त्यानुसार कर्जफेड तरतूद केली जाते. तसेच अशा अमूर्त मत्ता कमी करण्याची चिन्हे असल्यास त्याचे मुल्यांकन केले जाते. अमूर्त मत्तांचा कर्जफेड खर्च आणि कमी करण्याचे तोटे

यांना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

या कंपनीने भारतीय लेखा मानकात संक्रमण तारखेस म्हणजेच १एप्रिल २०१५ रोजी पूर्वीच्या जीएएपी प्रमाणे अमूर्त मत्तांचे विद्यमान मूल्यास भारतीय लेखा मानक क्र.१०१ प्रमाणे मानीव खर्च म्हणून विचारात घेण्याचा पर्याय स्वीकारला आहे.

### महापारेषणच्या प्रकरणी:

या कंपनीने भारतीय लेखा मानक संक्रमणाच्या तारखेस अमूर्त मत्तांच्या पूर्वीच्या जीएएपी नुसार असलेली विद्यमान मूल्य हेच पूढे मानीव खर्च म्हणून विचारात घेण्याचे भारतीय लेखा मानक क्र.१०१ प्रमाणे ठरविले.

अमूर्त मत्ता प्रारंभी खर्चाप्रमाणे मान्य केल्या जातात. त्यानंतर त्या पूढे त्या खर्च वजा संचित कर्जफेड तरतूद आणि संचित कमी करण्याचे खर्च याप्रकारे पुढे नेल्या जातात.

यापूर्वी भांडवलीकरण केलेल्या अमूर्त मत्ता जेव्हा भविष्यात आर्थिक लाभ वाढवून देण्याची शक्यता असते तेव्हा त्या खर्चाचे नंतरच्या खर्चाचे भांडवलीकरण केले जाते आणि त्यांच्या कर्जफेडीची तरतूद प्रक्षेपित केली जाते.

जेव्हा सॉफ्टवेअर अंतर्गत वापरासाठी संपादित केले जाते, (संबंधित हार्डवेअरचा एकात्मिक भाग नसलेले) आणि त्यातून महत्वाचे आर्थिक लाभ भविष्यात मिळणार असतात, तेव्हा या मत्ता जेव्हा वापरास सिद्ध होतात, तेव्हा त्यांचे खर्च यांना अमूर्त मत्ता म्हणून मान्यता दिली जाते.

अमूर्त मत्तांची विल्हेवाट लावल्यावर किंवा त्यांच्या वापरातून भविष्यात अपेक्षित लाभ मिळण्याची शक्यता नसते, तेव्हा त्यांची मान्यता काढून घेतली जाते. अमूर्त मत्तांची मान्यता काढून घेतल्यानंतर त्याच्या विल्हेवाटीतील निव्वळ आणि मत्तांची विद्यमान रक्कम यांच्या फरकास मत्तांची मान्यता काढल्यानंतर नफा-तोटा पत्रकात मान्य केले जाते.

### ४) प्रगतीपथावरील भांडवली कामे-

**महानिर्मिती कंपनीच्या प्रकरणी:**

१) नवे प्रकल्प / विस्तार यांच्या पीपीई बाबत आणि असे प्रकल्प/विस्तार प्रत्यक्ष कार्यान्वित होण्यापर्यंतचे खर्च व व्याज यांचे भांडवलीकरण केले जाते.

२) या काळात कंपनी अंमलबजावणीतील प्रकल्प व नियोजन, कार्यालयीन व इतर सर्व खर्च यांचे संबंधित प्रकल्पाचे प्रगतीपथावरील भांडवली कामे यामध्ये खर्चाच्या संचित शिलकी यांच्या आधारे संविभाजन केले जाते.

### महावितरणच्या प्रकरणी:

**अ)** वर्षभरातील प्रगतीपथावरील भांडवली कामे यांच्या खर्चातील १५ टक्के रक्कमेची भर, कर्मचारी खर्च, प्रशासकीय खर्च आणि साधारण खर्च यांच्यात केली जाते. कारण भांडवली कामे व संचालन सुव्यवस्था ही दोन कामे क्षेत्रातील मंडल कार्यालयाद्वारे केली जातात.

**ब)** पात्र मत्ता संपादनासाठी बांधकामाच्या काळातील व्याजाचे वर्षातील प्रगतीपथावरील भांडवली कामे यांच्यात जादा भांडवलीकरण कर्जाला लागू असलेल्या सरासरी व्याज दराच्या आधारे केले जाते.

**क)** कंत्राटातील किंमत विचलनाचे दावे कंपनीने स्वीकारले तर त्यांचा लेखा केला जातो.

**महापारेषणच्या प्रकरणी:**

या कंपनीने भारतीय लेखा मानकाच्या संक्रमण तारखेस, भारतीय लेखा मानक १०१ यानुसार प्रगतीपथावरील भांडवली कामाची पूर्वीच्या जी ए ए पी नुसार विद्यमान मूल्याचा ‘मानवी खर्च’ मानण्यात आले.

पीपीई बांधकामातील साहित्य खर्च, उभारणी आकार व इतर खर्च यांना भांडवलीकरणाच्या तारखेपर्यंत उभारणीच्या प्रगतीनुसार प्रगतीपथावरील भांडवली कामे असे दाखविले जाते.

कार्पोरेट कार्यालय व प्रकल्प कार्यालये येथे पीपीईसाठी केलेल्या खर्चाची ओळख निश्चिती केली जाते आणि रितसर तत्वावर संबंधित मत्तांचे खर्च यात वाटणी केले जाते.

वरील धोरणानुसार बांधकाम काळातील व्याज आणि खर्च (निव्वळ) यांना प्रगतीपथावरील भांडवली कामात वेगळी बाब म्हणून ठेवले जाते. आणि त्याच्या अखेरच्या शिलकीच्या प्रमाणात सदर मत्तेचे भांडवलीकरण करताना संविभाजन केले जाते.

कंत्राटातील दरात किंमत बदल / विनियम दरबदल यामुळे चुकती न झालेल्या दायित्वाचे लेखे कंत्राटातील अटीनुसार अंदाज तत्वावर केले जातात.

मंजूर केलेल्या प्रकल्पाची ओळख, सर्व्हेक्षण व शक्यता यांच्या अभ्यासासाठीच्या खर्चांना तो अभ्यास नाकारणेचा निर्णय किंवा तीन वर्षे यापैकीचे प्रथम त्या मुदतीत भांडवली कामे अंतर्गत ‘वेगळी बाब’ म्हणून दाखविली जाते. नाकारल्यास त्यावर्षी हा खर्च नफा - तोटा पत्रकात आकारला जातो.

## ५) विक्रीसाठी काढलेल्या चालू मत्ता :-

**महानिर्मितीच्या प्रकरणी**

चालू नसलेल्या मत्ता यांची विद्यमान रकमा त्या चालू ठेवण्यापेक्षा विक्री व्यवहारातून वसूल होणार असेल तर त्याचे वर्गीकरण ‘विक्रीसाठीच्या मत्ता’ असे केले जाते. मात्र जर विक्रीची चांगली शक्यता असेल आणि मत्ता सद्यस्थितीत त्वरित विक्रीसाठी उपलब्ध असेल अणि जर अशा मत्ता विक्रीच्या नेहमीच्या व रितसर अटीच्या अधीन राहून तर ही शर्त पूर्ण झाली असे मानले जाईल.

विक्रीसाठी घेतलेल्या असे वर्गीकरण केलेल्या चालू मत्तांचे मापन त्यांच्या कमी विद्यमान मूल्यानुसार आणि रास्त मूल्य वजा विक्री खर्च अशाप्रकारे केले जाते.

विक्रीसाठी घेतलेल्या असे ज्यांचे वर्गीकरण केले आहे असे पीपीईमधील नग आणि अमूर्त मत्ता यांचा घसारा किंवा कर्जफेड तरतुदी केल्या जात नाहीत.

## ६) वस्तूसूची :

**महानिर्मितीच्या संदर्भात -**

माल साठ्यामधील वस्तू, सुटे भाग याचे मूल्यांकन खर्चाच्या कमी स्तरावर होते किंवा निव्वळ वसुली योग्य मूल्य याप्रमाणे केले जाते. आणि वेटेड ॲव्हरेज कॉस्ट मेथड याप्रकारे खर्च निश्चित केला जातो. खर्चामध्ये खरेदी खर्च (मिळू शकणारा व्हॅटचा परतावा) आणि सदर वस्तूमाल त्यांच्या विद्यमान जागेवर व स्थितीत आणण्यासाठीचे खर्च समाविष्ट असतात. सेवा देऊ न शकणारे आणि निकामी वस्तू आणि सुटे भाग यांचे तोटे लेख्यांसाठी घेतलेल्या आढाव्यात निश्चित केले जातात.

**महावितरणच्या प्रकरणी :-**

ज्या वस्तूसूचीचे उपयुक्त आयुष्य एका वर्षापर्यंत आहे; त्यांचे मूल्य वेटेड सरासरी खर्चापेक्षा कमी आणि निव्वळ पुनर्विक्रीचे मौल्य यांच्या कमी स्तरानुसार केले जाते.

**महापारेषणच्या प्रकरणी :-**

वस्तूसूचीचे मूल्य खर्चाच्या कमी स्तरावर केले जाते. ते वेटेड ॲव्हरेजच्या आधारे आणि निव्वळ वसुली योग्य मूल्य प्रमाणे निश्चित केले जाते. वस्तू सूचीच्या किंमतीत खरेदी खर्च व ती वस्तू सध्याच्या जागेवर व स्थितीत आणण्याचे खर्च समाविष्ट असतात. वस्तूमाल प्रथम आत प्रथम बाहेर तत्वावर दिल्या जातात.

ज्या सुट्या भागांना पीपीई निकष पूर्ण करता येत नाही त्यांची नोंद वस्तूसूचीत केली जाते.

निकामी, मंद गतीचा व निरुपयोगी मालसाठा प्रत्यक्ष पडताळणीच्या वेळा ओळखून काढला जातो. व गरज असल्यास त्याची तरतूद केली जाते.

## ७) वित्तीय नसलेल्या मत्ता कमी करणे -

**मराविमं सुत्रधारीच्या प्रकरणी :**

ही कंपनी तिच्या प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला कोणती मत्ता कमी करण्यास योग्य आहे याचा आढावा घेते तसेच मागील काळात कमी करण्याच्या मत्तांबाबत उलट काही करण्याची चिन्हे आहेत किंवा कसे हे पाहते. तशी चिन्हे असली किंवा कमी करण्याच्या वार्षिक परिक्षणाची गरज असली तर कंपनी वसूली योग्य रक्कम निश्चित करते आणि मत्ता चालू ठेवण्याची रक्कम तिच्या वसूली योग्य रकमेपेक्षा जास्त असेल तर कमी करण्याच्या तोट्याला मान्यता देते. वसुली योग्य रक्कम ही रास्त मूल्य वजा विक्री खर्च आणि वापरमूल्य यातून नक्की केले जाते. वापरातील मूल्य निर्धारणासाठी भविष्यातील अंदाजित रोकडता प्रवाह त्यांच्या विद्यमान मूल्याइतके कमी केले जातात. त्यासाठी पैशाचे वेळेनुसार मूल्याप्रमाणे, बाजाराचे निर्धारण दर्शविणारा करपूर्व सवलत दर वापरला जातो. तसेच मत्ता विषयीच्या जोखीमा विचारात घेतल्या जातात. रास्त मूल्य वजा विल्हेवाट खर्च निश्चित करण्यासाठी सध्या बाजारातील व्यवहारांचा विचार केला जातो. जर असे व्यवहार ओळखता येत नसतील तर, एखादे योग्य मूल्यांकन नमुना वापरला जातो. ही मोजणी बहुविध मूल्यांकने, जाहीर शेअर व्यापार करणाऱ्या कंपन्यांच्या शेअर्सची उद्‌धृत प्रक्रिया किंवा रास्त मूल्याचे उपलब्ध निदर्शक यांचा उपयोग केला जातो.

चालू प्रवर्तनातील कमी करण्याचे तोटे, (यामध्ये वस्तूसूची कमी करणे, समाविष्ट असते) यांना नफा-तोटा पत्रकातील योग्य विभागात मान्यता दिली जाते. मात्र यामध्ये ज्या मालमत्तांचे 'इतर सर्वंकष उत्पन्न यामधील पूनर्मूल्यांकनानुसार पूर्वी मूल्यांकन केले होते त्यांना वगळले जाते. अशा मालमत्तांचे मूल्य कमी करण्यासाठी त्याचे अन्य कोणत्याही मागील पूनर्मूल्यांकनातील ओसीआयपर्यंतच्या रकमेप्रमाणे मान्यता दिली जाते.

**महावितरणच्या प्रकरणी :-**

प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला वित्तीय नसलेल्या मत्तांचा आढावा घेऊन कमी करण्याची चिन्हे आहेत का हे पाहिले जाते.

जर अशी चिन्हे आढळली किंवा मत्तांच्या वार्षिक परिक्षणाची गरज भासली तर कंपनी सदर मत्तेद्वारे वसूल होऊ शकणाऱ्या

रकमेचा अंदाज करते. कोणत्याही मत्तेचे वसूलीयोग्य मूल्य हे तिचे किंवा तिच्या रोख निर्मिती युनिट यांचे रास्त मूल्य वजा विल्हेवाट खर्च आणि वापरातील मूल्य यापेक्षा जास्त असते. व्यक्तिगत मत्तेची वसुलीयोग्य रक्कम निश्चित केली जाते. त्यासाठी ती मत्ता रोख प्रवाह निर्माण करणारी नसावी किंवा ते प्रवाह इतर मत्ता किंवा मत्ता समुहाहून वेगळे असावे. जेव्हा मत्ता किंवा सीजीयू यांचे विद्यमान रक्कम तिच्या वसुली योग्य रकमेपेक्षा जास्त होते, तेव्हा ती मत्ता कमी करण्याचा विचार केला जातो. आणि ती तिच्या वसुलीयोग्य रकमेइतकी कमी लिहिली जाते.

वापरातील मूल्य निर्धारणासाठी भविष्यातील रोकड प्रवाह विद्यमान मूल्याइतके कमी केले जातात. त्यासाठी सध्याचे बाजारपेठेतील वेळेनुसार पैशाचे मूल्य आणि मत्तेच्या विशिष्ट जोखीमा दर्शविणारा करपूर्व सवलत दर वापरला जातो. रास्तमूल्य वजा विल्हेवाट खर्च निश्चित करण्यासाठी, बाजारातील चालू व्यवहार विचारात घेण्यात येतात. जर असे व्यवहारांची ओळख निश्चिती होत नसेल तर योग्य मूल्यांकन मॉडेल वापरले जाते.

## महानिर्मितीच्या प्रकरणी :-

प्रत्येक ताळेबंद तारखेला वस्तूसूची व्यतिरिक्त वित्तीय नसलेल्या मत्ता, स्थगित कर मत्ता आणि विक्रीसाठी धरलेल्या चालू नसलेल्या मत्ता यांचा आढावा घेतला जातो. आणि मत्ता कमी करण्याची चिन्हे असल्याची पाहणी केली जाते.

जर अशी चिन्हे आढळली किंव त्यासाठी मत्ता कमी करण्याची वार्षिक परिक्षण आवश्यक असेल तर कंपनी मत्तांकडून वसुली योग्य रकमेचा अंदाज करते. कोणत्याही मत्तेचे वसुली योग्य मूल्य हे तिचे किंवा तिच्या रोख निर्मिती युनीट यांचे वसुली योग्य मूल्य हे तिचे किंवा तिच्या सीजीयू यांचे रास्त मूल्य वजा विल्हेवाट खर्च आणि वापरातील मूल्य यापेक्षा जास्त असते. जर व्यक्तिगत मत्ता इतर मत्ता किंवा मत्ता समुह यातून मोठ्या प्रमाणात वेगळ्याप्रकारे रोख प्रवाहांची निर्मिती करीत नसेल तर तिचे वसुली योग्य मूल्य निश्चित केले जाते.

जेव्हा मत्ता किंवा सीजीयूचे चालू रक्कम वसुली योग्य रकमेपेक्षा जास्त होते तेव्हा ती कमी करण्यास योग्य असल्याचे ठरवून ती वसुली योग्य मूल्याइतके कमी केले जाते.

वापरातील मूल्याचे निर्धारण करण्यासाठी भविष्यातील अंदाजित रोकडता प्रवाह त्याच्या विद्यमान मूल्याइतके कमी करण्यात येते. त्यासाठी पैशाचे वेळेनुरूप मूल्यावरुन चालू बाजार मूल्यांकरन आणि मत्तांच्या जोखीमा दर्शविणारा कर पूर्व सवलत दर वापरला जातो. रास्त मूल्य वजा विल्हेवाट खर्च निश्चित करण्यासाठी अलिकडच्या बाजारातील व्यवहार विचारात घेतले जातात, असे व्यवहार ओळखता आले नाही तर मूल्यांकनाचे योगय मॉडेल वापरले जाते.

## महापारेषणच्या प्रकरणी :-

### भारतीय लेखा मानक ३६ : मत्ता कमी करणे -

यामध्ये रोख निर्माण करणाऱ्या युनीटची व्याख्या दिली आहे. त्यानुसार प्रत्येक ताळेबंदाच्या तारेखस असे युनिटस् ओळखून काढण्यात येतात. जर अशा सीजीयू चालू ठेवण्यासाठी लागणारी रक्कम तिच्या वसुली योग्य रकमेपेक्षा जास्त असली तर (रास्त मूल्य वजा विल्हेवाट खर्च व वापरातील मूल्य यापेक्षा जास्त) तर कमी करण्याची हानी अशी मान्य केली जाते. चालू ठेवण्याची रक्कम वसुली योग्य रकमेइतकी कमी केली जाते आणि या कंपनीस नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. पूर्वीच्या लेखा कालावधीतील ज्या कमी करण्याचे तोटयाला मान्यता दिली होती; ती वसुलीयोग्य रकमेच्या अंदाजातील वाढीइतकी उलट केली जाते. मत्ता कमी केल्यानंतर तिचे सुधारित मूल्यानुसार उर्वरित उपयुक्त आयुष्यासाठी घसारा पुरविला जातो.

## ८) रोख व रोख सममूल्य -

रोख व रोख सममूल्य यामध्ये बँकेतील शिल्लक तसेच अल्पमुदतीसाठी ठेवलेली हातातील रक्कम, ज्यांचे रोखीत लवकर परिर्वतन करता येइल आणि मूल्यातील बदलांचा ज्यांना नगण्य स्वरूपाचा धोका आहे अशा गुंतवणुकी यांचा समावेश होतो. वित्तीय स्थितीच्या विवरणपत्रात चालू दायित्वे यामध्ये उसनवारी स्वरूपाचे थकीत स्वरूपाचे बँकांचे ओव्हरड्राफ्ट दाखविले जातात. आणि ते कंपनीच्या रोख व्यवस्थापनाचे एकात्मिक भाग मानले जातात.

## ९) महसूल मान्यता :

**मराविमं सुत्रधारी कं.लि. च्या प्रकरणी -** जेव्हा महसूलाचे आर्थिक लाभ कंपनीमध्ये प्रवाहित होण्याची शक्यता असेल आणि त्याची विश्वासार्ह मोजणी करणे शक्य असेल तरच त्या महसूलाला मान्यता दिली जाते. महसुलाची मोजणीसाठी मिळालेल्या/ मिळणाऱ्या बाबींचा वटाव, कपात आणि व्हॅट व सेवा कर किंवा शुल्के वगळून विचारात घेतली जातात. कंपनी विशिष्ट निकषानुसार तिच्या महसूल व्यवस्थेचे निर्धारण करते. म्हणजे वस्तू विक्री किंवा सेवा यातील महत्वाचे धोके व मोबदले लक्षात घेणे, त्याद्वारे तेथे मुख्य किंवा दलालामार्फत होत आहे किंवा कसे हे निश्चित केले जाते.

**अ)** **व्याजाचे उत्पन्न :-** ज्या वित्तीय विलेखांचे मापन कर्जफेड खर्चात होते/ आणि व्याज धारणकर्त्या वित्तीय मत्ता यांचे वर्गीकरण नफा किंवा तोटा यातील रास्त मूल्याच्या वित्तीय मत्ता असे होते, त्यांच्या व्याज उत्पन्नाला प्रभावी व्याज दर वापरून मान्यता दिली जाते. वित्तीय विलेखांचे अपेक्षित उपयुक्त आयुष्य विचारात घेऊन आणि भविष्यातील रोखे प्राप्तीचे अंदाज करून त्याच्या तंतोतंत प्रमाणात कपात करून इ.आय.आर. (दर) निश्चित केला जातो. किंवा अल्प मुदतीसाठी, योग्य असल्यास, वित्तीय मत्तांच्या निव्वळ चालू मूल्याप्रमाणे दर लावला जातो. उत्पन्नाच्या विवरण पत्रकात व्याजाचे उत्पन्नास 'वित्तीय उत्पन्न' म्हणून समाविष्ट केले जाते.

**ब)** **लाभांश उत्पन्न :** जेव्हा कंपनीला ही रक्कम घेण्याचा हक्क प्रस्थापित झाला असतो; तेव्हा लाभांशाच्या उत्पन्नाला मान्यता दिली जाते.

**क)** **भाड्याचे उत्पन्न :** जेथे मत्ताच्या मालकीच्या जोखीमा व मोबदला मोठ्या प्रमाणात भाडे देणाऱ्यांकडे निहित असतात अशा मत्तांच्या भाड्याच्या करारातील भाडेपट्टीच्या रकमांना, सरळ रेषा पद्धतीने आणि करारातील अटी व शर्तीप्रमाणे, नफा-तोटा पत्रकात मान्यता देण्यात येते.

**महानिर्मितीच्या प्रकरणी :**

**१)** ही कंपनी जेथे महसुलाची रक्कम विश्वासार्हरित्या मोजता येते आणि भविष्यात आर्थिक लाभ कंपनीकडे येण्याची शक्यता असते; तेव्हा महानिर्मिती कंपनी महसूलाला मान्यता देते.

**२)** माल विक्रीच्या महसूलाला खालील परिस्थितीत मान्यता दिली जाते :-

**अ)** जेव्हा मालाच्या भरीव मालकीच्या जोखीमा व मोबदला खरेदीदराकडे सुपूर्द केला जातो.

**ब)** जेव्हा कंपनीची या विक्री केलेल्या मालासंबंधीची व्यवस्थापकीय गुंतवणूक चालू ठेवण्यात येत नाही आणि विकलेल्या मालाच्या मालकीवर तिचे प्रभावी नियंत्रण नसते तेव्हा

**क)** महसूलाची विश्वासार्ह मोजणी करता येत असल्यास,

**ड)** या व्यवहाराचे आर्थिक लाभ कंपनीकडे प्रवाहित होणार असतील तर, आणि

**इ)** या व्यवहारात केलेला / होणारा खर्च विश्वासार्हरितीने मोजता येत असेल तर

**३)** वीज विक्रीच्या महसूलाचे रास्त मूल्याने मापन होते. मिळालेला / मिळणारा महसूल, महसूलातील निव्वळ, शासनाच्यावतीने गोळा केलेले कर व शुल्क आणि लागू होणाऱ्या व्यापारी सवलती किंवा कपाती यांचा हिशेब करता येतो.

**४)** म.वि.नि. आयोगाच्या मान्य वीज दराने वीज विक्रीची लेखा नोंद केली जाते. त्यात इंधन समायोजन आकार तसेच लेखाच्या कालावधीच्या अखेरीपर्यंतचा विना देयक महसूलाचे उपार्जन होते. ते म.वि.नि. आयोगाच्या समायोजन मान्यतेच्या अधीन असते.

**५)** व्याज उत्पन्नाला थकबाकीची रक्कम आणि लागू असलेल्या प्रभावी व्याज दर या बाबी विचारात घेऊन मान्यता दिली जाते.

**६)** फ्लाय ॲश (कोळसा राख) विक्री ग्राहकमान्य दराने केली जाते. यातून मिळणारी रक्कम 'फ्लाय ॲश वापर निधी' या वेगळ्या लेखाशीर्षात याविषयी केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाने दि. ३.११.२००९ रोजी दिलेल्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे केला जातो. हा निधी राख वापराच्या प्रोत्साहनासाठी खर्च केलेल्या खर्चाच्या मर्यादेत वापरला जातो.

**७)** इतर उत्पन्न उपार्जन तत्वावर मान्य केले जाते. भंगार विक्री/ नाकारलेला कोळसा या कंपनीच्या जागेतून प्रत्यक्ष उचलल्यावर त्यांचे लेखे केले जातात. कंपनी त्याची बीजके तयार करते. परिसमापनातील नुकसान व कंत्राटदारांना दिलेल्या अग्रिमाचे व्याज जेव्हा वर्षभरात ते प्रत्यक्ष आकारात तयार होईल तेव्हा स्थित मत्तांचे उत्पन्न / समायोजनास मान्यता मिळते.

**महावितरणच्या प्रकरणी :-**

**(अ) वीज विक्री -** जेव्हा वीज विक्रीचे आर्थिक लाभ कंपनीकडे प्रवाहित होतील आणि त्याची विश्वासार्ह मोजणी करता येईल तेव्हाच त्याला मान्यता मिळते. महसूल प्रत्यक्ष मिळणे किंवा मिळणार असेल त्याचा विचार करून ती मोजणी रास्त मूल्याने केली जाते. अंदाजित कपाती, सवलती आणि इतर तत्सम सवलती याची वजावट महसूलातून केली जाते.

**१)** वीज विक्रीचा लेखा म.वि.नि. आयोगाने मंजूर केलेल्या वीज दरानुसार ग्राहकांना दिलेल्या देयकांच्या आधारे केला जातो. त्यात जर काही इंधन समायोजन आकार असेल तर तो समाविष्ट केला जातो.

**२)** विनादेयक महसूलाचा लेखा वित्तीय वर्षाच्या अखेरीपर्यंत अंदाजे तत्वावर केला जातो. त्यात जर काही इंधन समायोजन आकार असेल तर तो समाविष्ट केला जातो.

**३)** वीज अधिनियम २०१३ चे कलम १३५ अन्वये वीज चोरी बाबत आणि कलम १२६ अन्वये विजेचा अनधिकृत वापरासाठी ग्राहक किंवा बाह्य व्यक्ती यांना सक्षम प्राधिकाऱ्यांनी केलेल्या निर्धारणानुसार दिलेल्या देयकांना लगेच पूर्णपणे मान्यता दिली जाते.

**४)** सलग तीन महिने वीज देयके भरण्यास कसूर करणाऱ्या ग्राहकांना विलंब भरणा आकार आणि थकबाकीचे व्याज याच्या महसूलास जमा करण्याच्या तत्वावर मान्यता दिली जाते. ग्राहकांचे डीपीएस व व्याज यांना स्थगित उत्पन्न (दायित्व) मानले जाते.

**ब) इतर प्रवर्तनीय उत्पन्न व इतर उत्पन्न :**

**१) नियामक उत्पन्न / खर्च :-** कंपनीच्या वीजदरांचे नियमन म.वि.नि. आयोग या नियामक मत्ता / दायित्वाचा लेखा मा. आयोगाच्या वीज दर नियमने / आदेश यात अधिसुचित केलेल्या तत्वाच्या आधारे केला जातो. भारतीय लेखा मानक ११४ 'नियामक स्थगन लेखे' नुसार नियामक मत्ता/दायित्वे यांना मान्यता दिली जाते. म्हणजेच लेखा वह्यातील नोंदीप्रमाणे प्रत्यक्ष केलेला महसुली खर्च आणि महसुली उत्पन्न यानुसार मान्यता मिळते. बहुवर्षीय वीजदर नियमने अंतर्गत मा. आयोगान केलेले कामगिरीचा आढावा / मध्यावधी आढावा यातून उद्भवलेली समायोजने आढावा पूर्ण झाल्यावर केली जातात.

**२)** भंगार विक्रीला वसुलीनंतर मान्यता दिली जाते.

**३)** चालू नसलेल्या गुंतवणुकीचा वरील व्याज उत्पन्नाचा लेखा उपार्जन तत्वावर केला जातो. त्यासाठी प्रभावी व्याज दर पद्धत वापरली जाते. चालू नसलेल्या गुंतवणुकी व्यतिरिक्त इतर व्याजाचा लेखा उपार्जन तत्वावर केला जातो.

**४)** जेव्हा लाभांश उत्पन्न मिळविण्याचा हक्क प्रस्थापित होतो तेव्हा त्याचा लेखा केला जातो.

**महापारेषणच्या प्रकणी :**

**महसूल मान्यता :-** मिळालेला / मिळण्याजोगा महसूलाचे मापन रास्त मूल्याने केले जाते. किंवा परताव्याची निव्वळ, व्यापारी भरपाई, सवलती इ. स्वरूपात मिळालेला रकमा महसूल म्हणून घोषित केल्या जातात.

**पारेषण उत्पन्न :-** वीज पारेषणाचा वितरण परवानाधारक संस्थाकडून महसूल याचे लेखे म.वि.नि. आयोगाच्या मासिक राज्यांतर्गत पारेषण दर आदेशाच्या आधारे केले जातात.

प्रवर्तनाचे महसूल म्हणजे - खुला प्रवेश आकार, एसएलडीसी आकार, रिशेड्युलिंग आकार यांना म.वि.नि. आयोगाच्या आदेशाप्रमाणे मान्यता मिळते.

**लाभांश उत्पन्न -** लाभांश मिळविण्याचा हक्क, प्रस्थापित केल्यावर त्याला मान्यता मिळते.

**व्याज उत्पन्न -** प्रभावी व्याज दर वापरून व्याज उत्पन्न मान्य केले जाते.

**भंगार विक्री -** भंगार विक्रीचे उत्पन्न मान्य केल्यावर त्याचे लेखे केले जातात.

**पर्यवेक्षण आकार -** ग्राहकाचे ठोक अंशदान यापासून मिळालेले पर्यवेक्षण आकारांना प्राप्तीच्या वर्षात मान्यता दिली जाते.

**इतर उत्पन्न -** इतर उत्पन्नाला उपार्जन तत्वावर मान्यता मिळते. मात्र जेव्हा अशा उत्पन्नाची अंतिम वसुलीची खात्री नसेल तर त्याचा अपवाद केला जातो.

## १०) कर्मचारी लाभ :-

### म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.लि. च्या प्रकरणी -

कंपनीच्या नोकरीनंतरच्या लाभामध्ये व्याख्यांकित लाभ योजना आणि व्याख्यांकित अंशदान योजना समाविष्ट असतात. याशिवाय कंपनी स्थगित भरपाई व भरपाईची गैरहजेरी या स्वरूपात इतर लाभ पुरवते.

व्याख्यांकित लाभांची निवृत्ती योजना यामध्ये कंपनी निवृत्तीच्या बंधनामध्ये उपदान समाविष्ट होते. या योजनेत कर्मचाऱ्याला

निवृत्तीच्या किंवा सेवा खंडित होण्याच्या वेळी एक रकमी उपदान दिले जाते. ते त्याचे वेतन व कंपनीतील कामाची वर्षे यावर आधारित असते. व्याख्यांकित लाभाच्या निवृत्ती योजनेमध्ये योजनेच्या मत्तांचे रास्त मूल्य आणि योजनेच्या दायित्वाचे विद्यमान मूल्य यातील फरकाला वित्तीय स्थितीच्या विवरणपत्रात मत्ता किंवा दायित्व अशाप्रकारे मान्यता दिली जाते. योजनेतील दायित्वांची गणना 'प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड' वापरून आणि वित्तीय स्थितीच्या विवरणपत्राच्या तारखेस असलेली प्रमुख विमागणिती गृहीते लावून केली जाते. ज्या मत्ता दीर्घ मुदतीच्या कर्मचारी लाभ निधीमध्ये किंवा पात्र विमा धोरणामध्ये धारण केलेल्या असतात; त्यांना नियोजन मत्ता म्हणतात.

व्याख्यांकित लाभ योजनेसंबंधीचे सर्व खर्चांना (निव्वळ व्याख्यांकित लाभ दायित्वाचे (मत्ता) पुनर्मूल्यांकन वगळून) त्यांचा नफा किंवा तोटा याप्रमाणे मान्यता दिली जाते. पुनर्मोजणीमध्ये विमागणिती प्राप्ती किंवा हानी आणि नियोजन मत्तांचे परतावे यांचा समावेश असतो. त्यांना वित्तीय स्थितीचे विवरणपत्रात तात्काळ मान्यता दिली जाते. (निव्वळ व्याख्यांकित दायित्व (मत्ता) यांच्या व्याजाची निव्वळ वगळून) यासोबत ज्या मुदतीत इतर सर्वंकष उत्पन्न मिळते; त्यातून काही मिळकत ठेवून घेतलेली असते. तिच्यातील खर्ची किंवा जमा यांनासुद्धा संलग्न मान्यता दिली जाते. पुनर्मोजणीचे नंतरच्या मुदतीतील नफा किंवा तोटा यामध्ये पुन: वर्गीकरण केले जात नाही.

या योजनांसंबंधी उत्पन्नाचे विवरणपत्रात आकारलेली रक्कम प्रवर्तनीय खर्चात समाविष्ट केली जात नाही. व्याख्यांकित अंशदान योजनेतील कंपनीचे अंशदानाला नफा किंवा तोटा यात त्यांच्या नियत वेळी मान्यता दिली जात नाही. कंपनीवर या योजनेत तिच्या मुदतीनुसार अंशदानाव्यतिरिक्त अन्य बंधन नाही.

**महानिर्मितीच्या प्रकणी :-**

**१)** अल्पमुदतीचे कर्मचारी लाभ :- कर्मचाऱ्यांनी ज्यावर्षी संबंधित सेवा दिली; त्या वर्षाच्या नफा व तोटा पत्रकात अल्प मुदतीच्या कर्मचारी लाभांना विना कपात रकमेतील खर्च अशी मान्यता दिली जाते.

**२) निवृत्तीनंतरचे कर्मचारी लाभ :-**

**अ)** व्याख्यांकित अंशदान योजना - कंपनी एक वेगळ्या विश्वस्त निधीमध्ये भविष्य निर्वाह निधीसाठी तिचे अंशदान आणि कर्मचाऱ्यांचे अंशदान यांचा भरणा करते. हा विश्वस्थ निधी समुहातील इतर कंपन्यांच्या निधीचेही व्यवस्थापन करतो. या निधीची गुंतवणूक परवानगी प्राप्त प्रतिभूतीमध्ये केले जाते. मुदतीमध्ये केलेले निर्धीमधील योगदानास खर्च म्हणून मान्यता मिळते आणि ते नफा-तोटा पत्रकात आकारले जाते.

**ब) व्याख्यांकित लाभ योजना :-**

**निवृत्तीनंतरचे लाभ -** व्याख्यांकित कर्मचारी लाभ यातील उपदानासारख्या दायित्वांची निश्चिती वर्षाच्या अखेरीस स्वतंत्र विमागणिती तरी यांचेकडून प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड वापरून केली जाते.

निव्वळ व्याख्यांकित दायित्वाचे पूनर्मापन केले जाते. त्यामध्ये विमागणिती प्राप्ती किंवा तोटे, निव्वळ मत्तांचे परतावे (व्याज वगळून) आणि मत्तांच्या मर्यादांचे परिणाम याचा समावेश असतो. (जर काही व्याज असल्यास ते वगळून) अशा पूनर्मापनाला इतर सर्वंकष उत्पन्न यामध्ये मान्यता दिली जाते.

**इतर दीर्घ मुदतीचे कर्मचारी लाभ :-**

इतर दीर्घ मुदतीच्या कर्मचारी लाभांची दायित्वे म्हणजे रजा रोखीकरण यांची निश्चिती स्वतंत्र विमागणिती तरी यांनी प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड वापरून केलेल्या विमागणिती मूल्यांकनानुसार केली जाते.

**अनुग्रहपूर्वक :** जेव्हा कंपनी कर्मचाऱ्यांना अनुग्रहपूर्वक देण्याची घोषणा करते; तेव्हा त्या अनुग्रहपूर्वक खर्चासाठी कंपनी उपार्जन करते.

## महावितरण कं.लि.च प्रकरणी :-

कर्मचाऱ्यांनी सेवा दिल्याच्या मुदतीमध्ये त्यांना काही लाभ उपार्जित केले जातात. यामध्ये पगार व वेतने, वार्षिक रजा आणि आजारीपणाची रजा यासंबंधीचे लाभांचे दायित्वाला मान्यता दिली जाते. कर्मचाऱ्यांना सेवेच्या बद्दल द्यावयाच्या लाभाची रक्कम विनाकपात दिली जाते.

अल्प मुदतीच्या कर्मचारी लाभासंबंधी मान्य केलेल्या दायित्वाचे मापन, सेवेच्या बदलात द्यावयाच्या अपेक्षित लाभाच्या विनाकपात रकमेमध्ये केले जाते.

**व्याख्यांकित अंशदान योजना :-**

जेव्हा कर्मचारी सेवा देतात तेव्हा त्यांचा अंशदानावर हक्क असतो. अशा निवृत्तीसाठीच्या लाभाच्या योजनेच्या व्याख्यांकित अंशदानाच्या पैसे भरण्याला खर्च म्हणून मान्यता दिली जाते.

**व्याख्यांकित लाभ योजना :-**

व्याख्यांकित लाभाच्या निवृत्ती योजनेसाठी द्यावयाच्या लाभाचा खर्च प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड वापरून केला जातो. त्यासाठी प्रत्येक अहवाल वर्षाच्या मुदतीच्या अखेरीस विमागणिती बदल पुढे नेण्यात येतात. यासाठी पुनर्मापन करून ते तात्काळ ताळेबंदात दर्शविले जाते. या पूनर्मापनात पुढील बाबी समाविष्ट असतात :- विमागणिती प्राप्ती व हानी, मत्तांच्या मर्यादा बदलल्यास त्याचे परिणाम (लागू असल्यास) आणि नियोजन मत्तांचा परतावा (निव्वळ व्याज वगळून) ज्या मुदतीत इतर सर्वंकष उत्पन्न मिळते त्यातील आकार किंवा जमा या उत्पन्नात मान्य केली जाते. इतर सर्वंकष उत्पन्नात मान्यता दिलेले पूनर्मापन हे तात्काळ ठेवून घेतलेल्या मिळकतीत दाखविले जाते. आणि त्याचे नफा किंवा तोटा यामध्ये पुनर्वर्गीकरण केले जात नाही. योजना दुरूस्त / सुधारित केल्यास त्या मुदतीमधील मागील सेवा खर्च नफा किंवा तोटा यात मान्य केला जातो. निव्वळ व्याजाचा हिशेब करण्यासाठी मुदतीच्या प्रारंभीच्या कपात केलेला दर निव्वळ व्याख्यांकित दायित्वे किंवा मत्ता यांना लावला जातो. ताळेबंदात मान्यता दिलेली निवृत्ती लाभाची बंधने ही कंपनीच्या व्याख्यांकित लाभ योजनेतील प्रत्यक्ष तूट किंवा लाभ दर्शवितात. या हिशेबात आधिक्य असल्यास ते उपलब्ध आर्थिक लाभाचे विद्यमान मूल्याइतके मर्यादित आहे. हे आर्थिक लाभ योजनेतील परतावे किंवा भविष्यातील अंशदानातील कपात या स्वरूपाचे आहेत. प्रारंभी जेव्हा कंपनी खंडित लाभाचे देकार मागे घेऊ शकत नाही. आणि जेव्हा कंपनी संबंधित पुनर्रचित खर्च मान्य करते तेव्हा खंडित लाभाचे दायित्व मान्य केले जाते.

## महापोरषणच्या प्रकरणी

### अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ

विनाकपात रकमेनुसार वित्तीय पत्रकात मान्य केले जातात. आणि ते दिलेल्या सेवेशी निगडीत असते.

### इतर दीर्घ मुदतीची कर्ज लाभाची बंधने :

सवेतन रजा आणि आजारपणाची रजा यांचे दायित्व बारा महिन्याच्या चुकते होणे अपेक्षित नसते. म्हणून त्यांचे मापन भविष्यातील अपेक्षित पैसे भरण्यासाठीच्या विद्यमान मूल्याने केले जाते. कर्मचाऱ्यांनी अहवाल काळाव्या अखेरीपर्यंत ज्या सेवा पुरविल्या त्यासंदर्भात भविष्यात पैसे देणे अपेक्षित असते. विमागणिती मूल्यांकनावर आधारित या काळासाठी त्याची प्रोजेक्टेड युनीट कार्ड मेथड वापरून या दायित्वाची मोजणी केली जाते.

सदर लाभांसाठी कॉर्पोरेट बाँडस्‌ची मुदती अखेरची प्राप्ती वापरुन सवलत दिली जाते. ही मुदत संबंधित बंधनाच्या मुदतीशी सुसंगत असते. मृत्यूदर समायोजने आणि विमागणिती गृहीते यामुळे पुनर्मोजणी करावी लागते. तिला नफा-तोटा पत्रकात मान्यता देण्यात येते.

**नोकरीनंतरचे लाभ :-** कंपनी खालील नोकरीनंतरच्या लाभाचे संचालन करते.

**१) व्याख्यांकित लाभ योजना -** जसे उपदान

**२) व्याख्यांकित अंशदान योजना -** जसे भविष्य निर्वाह निधी

### व्याख्यांकित लाभ योजना :-

व्याख्यांकित कर्मचारी लाभातील उपदान या बंधनाचे दायित्व स्वतंत्र विमागणिततज्ञांकडून वर्षनिहाय पद्धतीने आणि प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड वापरून केले जाते.

व्याख्यांकित लाभ बंधनाचे विद्यमान मूल्य, भविष्यातील अंदाजित रोख प्रवाह कमी करून केले जाते. तसेच त्यासाठी अहवाल मुदतीच्या अखेरीस सरकारी बाँडस्‌च्या बाजारातील प्राप्तीचा संदर्भ घेतला जातो. या बाँडची मुदत संबंधित बंधनाच्या मुदती इतकीच असते.

मृत्यू दराचे समायोजन आणि विमागणिती गृहीते यातील बदल यामुळे उद्‌भवणाऱ्या प्राप्ती व हानीचे पूनर्मापन करून त्यांना ज्या कालावधीत ते घडतात त्यासाठी मान्यता दिली जाते. या सरकारी बाँडची मुदत संबंधित बंधना एवढीच असते.

### व्याख्यांकित अंशदान योजना :

व्याख्यांकित अंशदान योजना यामध्ये भविष्य निर्वाह निधी आदी बाबी येतात. त्या खर्चानंतर नफा-तोटा पत्रकात आकारल्या जातात. याशिवाय काही कर्मचाऱ्यांसाठी भ.नि.निधीचे मासिक अंशदान एका वेगळ्या विश्वस्थाकडे जमा होते. हे विश्वस्थ समुहातील इतर कंपन्यांच्या निधीचेही व्यवस्थापन करतात. या विश्वस्थांकडून देय असलेल्या व्याजाचा किमान दर शासनाच्या अधिसूचित दराशी सुसंगत असतो. त्यात तूट झाल्यास तो भरून काढण्याचे कंपनीवर बंधन असते.

## कर्ज खर्च

### माराविमं सुत्रधारी प्रकरणी

कर्जफेडीच्या खर्चात कंपनीने निधी कर्जाने घेण्यासाठी व्याज व इतर खर्च यांचा समावेश असतो. कर्जाचे खर्च हे एखादी मत्ता मिळविणे, उभारणीं करणे किंवा मत्तेची खरेदी करणे यासंबंधी असतात. मत्ता तिच्या इच्छित वापर किंवा विक्री करण्यासाठी बराच वेळ लागतो. या मत्तेसाठी केलेल्या खर्चाच्या काही भागाचे भांडवलीकरण केले जाते. इतर सर्व कर्ज खर्च कालावधीतील गरजेनुसार केले जातात.

### महानिर्मितीच्या प्रकरणी :

कर्ज खर्चात निधी कर्जाने घेण्याच्यासंबंधी केलेले व्याज व इतर खर्च समाविष्ट असतात. हे कर्ज खर्च मत्ता घेणे, तिची उभारणी करणे आदि कामासाठी केले जातात. मत्ता तिच्या इच्छित कामास तयार होण्यास वेळ लागतो. ज्या महिन्यात मत्ता तशाप्रकारे तयार होते तोपर्यंत मत्तेच्या खर्चाच्या एका भागाचे भांडवलीकरण केले जाते. अन्य भांडवली मत्तांचे संपादन किंवा रचना यासाठी लागू नसलेल्या इतर कर्ज खर्चांना ज्या काळात तो खर्च केले त्याचा 'व्यय' अशी मान्यता दिली जाते.

### महापारेषणच्या प्रकरणी :-

कर्ज खर्चामध्ये निधी कर्जाने मिळविण्यासाठी करावे लागणारे व्याज व इतर खर्च यांचा समावेश असतो. कर्ज खर्चात विनिमयातील फरकाचे त्या मर्यादेत समायोजन केले जाते. संपादन, बांधकाम करुन मत्ता पात्र करण्यासाठी (मत्ता तिच्या इच्छित उपयोगासाठी तयार करण्यास बराच वेळ लागतो.) लागणाऱ्या खर्चाला या मत्तेचा भाग समजून तिचे भांडवलीकरण केले जाते. इतर सर्व कर्ज खर्चांना नफा-तोटा पत्रकात आकारले जाते.

### १३) भाडेपट्टी :- माराविमं सुत्रधारी प्रकरणी :

मत्ता तिचा काही भाग यासाठी भाडेपट्टीची व्यवस्था आहे किंवा कसे याची निश्चिती आरंभ तारखेच्या रचनेच्या आधारे केली जाते. या व्यवस्थेची पूर्ती एखादी विशिष्ट मत्ता किंवा अधिक मत्तांच्या वापरावर अवलंबून असते. मत्ता वापराचा हक्क या व्यवस्थेतून सांगितला जातो. व्यवस्थेत असा स्पष्ट निर्देश नसला तरी हक्क मानला जातो.

#### अ) कंपनी - भाडेकरू :

ज्या वित्तीय भाडेपट्टीमध्ये मालकी हक्काच्या जोखीमा आणि मोबदले मोठ्या प्रमाणात कंपनीकडे हस्तांतरित होतात, त्यांचे भांडवलीकरण भाडेपट्टी सुरू करतानाच आणि भाडेपट्टीच्या रास्त मूल्याने किंवा त्यापेक्षा कमी दराने, किमान भाडे रकमेच्या किमान मूल्याने केले जाते.

भाडेपट्टीच्या पैशाने संविभाजन वित्तीय आकार आणि भाडेपट्टी दायित्व यामध्ये केले जाते, जेणेकरून दायित्वाच्या उर्वरित शिलकीवर व्याजाचा दर स्थिर राहील.

वित्तीय आकारांना नफा किंवा तोटा यात मान्यता दिली जाते. भाडेकरूच्या वित्त भाडेपट्टीत प्रांरभी केलेले थेट खर्च, भाडेपट्टीची मुदत सुरू होतानाच्या भाडेपट्टीच्या मान्य केलेल्या रकमेत मिळविले जातात. भाडेपट्टीच्या मत्तेच्या उपयुक्त आयुष्यासाठी घसारा केला जातो. मात्र जर भाडेपट्टीच्या मुदतीच्या अखेरीला कंपनीला मालकी अधिकार मिळण्याची

योग्य खात्री असेल तर मत्तांचा घसारा अपेक्षित उपयुक्त आयुष्यापेक्षा भाड्याच्या कमी मुदतीसाठी केला जातो.

प्रवर्तनीय भाडेपट्टीची रक्कम तिच्या मुदतीसाठी सरळ रेषा पद्धतीने 'व्यय' अशी मान्य केली जाते. जेव्हा काही रक्कम आकस्मिक भाड्यासाठी दिली जात असेल तर तेव्हा तिला 'व्यय' म्हणून मान्यता दिली जाते.

## ब) कंपनी - भाडेपट्टीने देणारी संस्था :

कंपनीने वित्तीय भाडेपट्टी अंतर्गत काही मत्ता इतरांना भाडेपट्टीने दिल्या आहेत. भाडेपट्टीच्या मत्तामधील निव्वळ गुंतवणूक या समान मिळण्याजोग्या रकमेला मान्यता दिली जाते. कंपनीच्या निव्वळ गुंतवणुकीच्या मुदतीप्रमाणे मिळणाऱ्या परतावा दराच्या आधारे वित्तीय उत्पन्न मान्य केले जाते. वित्तीय भाड्याच्या थकीतांचाही विचार केला जातो. वित्तीय भाडेपट्टीमध्ये प्रारंभी केलेल्या थेट खर्चास वित्तीय भाड्याचा वापर येण्याचे मोजणीमध्ये केला जातो आणि भाडेपट्टीसाठी मान्य केलेले उत्पन्नाची रक्कम कमी केली जाते.

ज्या भाडेपट्टीमध्ये कंपनी मालकी संबंधीच्या सर्व जोखीमा व मोबदले मोठ्या प्रमाणात हस्तांतरित करीत नाही; त्याचे वर्गीकरण 'प्रवर्तनीय भाडेपट्टी' असे केले जाते. भाडेपट्टी प्रवर्तनाच्या वाटाघाटीस प्रारंभी केलेले थेट खर्च भाडेपट्टीच्या चालू रकमेत मिळविले जातात आणि त्यांना भाडेपट्टी उत्पन्नाच्या तत्वावर व मुदतीसाठी भाडेपट्टीचे उत्पन्न अशी मान्यता दिली जाते. प्रवर्तनीय भाडेपट्टी अंतर्गत भाड्याच्या रकमेस भाड्याच्या मुदतीसाठी सरळ रेषा पद्धतीने 'उत्पन्न' अशी मान्यता दिली जाते. आकस्मिक भाडी ज्या कालावधीत मिळतात त्यावेळी त्यांना उत्पन्न म्हणून मान्यता दिली जाते.

## महानिर्मिती प्रकरणी :-

### वित्त भाडेपट्टी :

ज्या मत्ता 'वित्तीय भाडेपट्टी' म्हणून संपादित केल्या आणि जेथे मालकीचे बहुतेक धोके व मोबदले कंपनीकडे आहेत; अशा मत्तांचे भांडवलीकरण भाडेपट्टीच्या प्रारंभी किमान भाडे रकमेच्या खालच्या स्तरावरील रास्त मूल्यानुसार किंवा किमान भाडे रक्कमच्या विद्यमान मूल्याप्रमाणे केले जाते, आणि तेवढ्या समान रकमेचे दायित्व निर्माण केले जाते. भाडेपट्टी रक्कमेची वाटणी दायित्व व व्याज खर्च यात केली जाते. त्यातून प्रत्येक कालावधीच्या थकीत दायित्वावर नियत कालावधीसाठी सातत्याने व्याजदर मिळविता येतो.

### भाडेपट्टी - प्रवर्तनीय :-

ज्या भाडेपट्टी व्यवस्थांचे वर्गीकरण वित्तीय भाडे यामध्ये केले जात नाही; त्यांना प्रवर्तनीय भाडेपट्टी असे म्हणण्यात येते. प्रवर्तनीय भाडेपट्टी अंतर्गत दिलेले पैसे याला नफा-तोटा पत्रकात सरळ रेषा पद्धतीने भाडेपट्टीच्या मुदतीसाठी मान्यता दिली जाते. मात्र, अपेक्षित साधारण चलनवाढीनुसार पैसे वाढविण्याची व्यवस्था असली तर अशी मान्यता दिली जात नाही. जलविद्युत निर्मितीच्या सोयीसाठी महाराष्ट्र शासनासोबत भाडेपट्टीचे करार केलेले नाहीत.

### महावितरण प्रकरणी :-

प्रवर्तनीय भाड्याचे पैसे / उत्पन्न यांना नफा - तोटा पत्रकात सरळ रेषा पद्धतीने भाडेपट्टीच्या मुदतीसाठी मान्यता दिली जाते. जेव्हा अपेक्षित साधारण चलनवाढीनुसार भाडे वाढविण्याची व्यवस्था केलेली असते व त्यातून भाड्याने देणाऱ्याला अपेक्षित चलनवाढीमुळे वाढणाऱ्या खर्चाची भरपाई होऊ शकते, अशा वाढीला ज्यावर्षी असे लाभ उपार्जित होतात तेव्हा मान्यता मिळते. कंपनीची कोणतेही वित्तीय भाडे व्यवस्था नाही.

## महापारेषण प्रकरणी :-

### वित्तीय भाडेपट्टी -

ज्या वित्तीय भाडेपट्टी म्हणून संपादित केलेल्या मत्तांमध्ये कंपनीला मोठ्या प्रमाणात मालकीच्या सर्व जोखीमा व मोबदले मिळतात; त्यांचे भाडेपट्टीच्या सुरूवातीच्या खालील स्तरावरील रास्त मूल्यानुसार किंवा किमान भाडे रकमेच्या रास्त मूल्यानुसार भांडवलीकरण केले जाते. आणि तत्समान रकमेचे दायित्व निर्माण केले जाते. भरलेल्या भाडेपट्टीची वाटणी दायित्वे आणि व्याज दर यामध्ये करून प्रत्येक कालावधीमधील थकीत दायित्वावर सतत कालासाठी व्याज दर मिळविता येतो.

### प्रवर्तनीय भाडे :

ज्या भाडे व्यवस्थेचे वर्गीकरणे वित्त भाड्यांमध्ये केले जात नाही त्यांना प्रवर्तनीय भाडेपट्टी म्हटले जाते. प्रवर्तनीय भाडेपट्टी अंतर्गत दिलेल्या रकमेला नफा-तोटा पत्रकात, सरळ रेषा पद्धतीने, भाडेपट्टीच्या मुदतीसाठी मान्यता दिली जाते. मात्र या भाड्यामध्ये अपेक्षित साधारण चलनवाढीनुसार वाढ करण्याची व्यवस्था नसावी. तसे असल्यास मान्यता दिली जात नाही. जमिनीच्या भाड्याच्या व्यवस्थेला वित्त भाडेपट्टी मानले जाते कारण जमीन ही ज्यांचा अखंड उपयोग केला जातो अशा उपकेंद्र बांधण्यासाठी वापरली जाते.

## १४. शासकीय अनुदाने :

### महानिर्मिती प्रकरणी :

जेव्हा अनुदाने मिळतील याची योग्य हमी असते आणि त्याच्या सर्व अटींचे पालन केले जाते तेव्हाच शासकी अनुदानांना मान्यता दिली जाते.

जेव्हा अनुदान एखाद्या खर्चाच्या बाबीशी संलग्न असते; तेव्हा त्याला नफा तोटा पत्रकात योग्य पद्धतीच्या तत्वावर आणि ज्या संलग्न खर्चाच्या भरपाईसाठी त्याचा हेतु आहे; ते खर्च केल्यानंतर, त्यांच्या मुदतीसाठी नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

जेव्हा अनुदान पीपीइशी संबंधित असते; तेव्हा संबंधित पीपीइचा खर्च त्याच्या ठोक मूल्यानुसार दाखविला जातो. आणि त्याचे अनुदानाला दायित्व (स्थगीत उत्पन्न) मानले जाते आणि ते नफा - तोटा पत्रकात पद्धतीच्या आधारे मत्तेच्या उपयुक्त आयुष्यासाठी जमा केले जाते.

### महावितरण प्रकरणी :-

जोपर्यंत कंपनी शासकीय अनुदानांच्या सर्व अटींचे अनुपालन करील व अनुदान मिळेल याची निश्चित हमी मिळेपर्यंत अनुदानाला मान्यता दिली जात नाही.

उत्पन्नाशी संलग्न शासकीय अनुदाने निश्चित केल्यावर नफा-तोटा पत्रकात त्यांच्या इच्छित भरपाईच्या काळासाठी मान्य केली जातात आणि इतर उत्पन्नात सादर केली जातात.

पीपीइतील बाबी खरेदी करण्यासाठीचे शासकीय अनुदान वित्तीय विवरणपत्रात भांडवली अनुदान असे दर्शविले जाते

आणि नफा-तोटा पत्रकात मत्तेच्या अपेक्षित आयुष्यासाठी पद्धतशीर तत्वावर जमा केले जाते आणि इतर प्रवर्तनीय उत्पन्नात सादर केले जाते.

**महापारेषणच्या प्रकरणी :-**

जेव्हा अनुदान मिळण्याचे आणि कंपनीकडून त्याच्या अटींचे पालन होण्याची योग्य हमी असते तेव्हा शासकीय अनुदानाला रास्त मूल्यानुसार मान्यता दिली जाते.

जेव्हा अनुदान एखाद्या बाबीच्या खर्चाशी संलग्न असते; तेव्हा त्याला संबंधित खर्चाच्या मुदतीसाठी, नफा-तोटा पत्रकात पद्धतीच्या आधारे आणि ज्या हेतुसाठी खर्चाची भरपाई करायची आहे त्यासाठी मान्यता दिली जाते.

पीपीइ संबंधित शासकीय अनुदाने, चालू नसलेल्या दायित्वामध्ये स्थगित उत्पन्न म्हणून समाविष्ट केल्या जातात आणि नफा-तोटा पत्रकात सरळ रेषा पद्धतीने संबंधित मत्तांच्या अपेक्षित आयुष्यासाठी जमा केल्या जातात व इतर उत्पन्नामध्ये दाखविल्या जातात.

## १५. खर्च आणि उत्पन्न यांचा लेखा / वर्गीकरण :

**महानिर्मितीच्या प्रकरणी :-**

मागील वर्षातील व प्रदेश मर्यादेच्या वर असलेले एकत्रित उत्पन्न/ खर्च यांत पूर्वलक्षी प्रभावाने सुधारणा केल्या जातात.

प्रत्येक प्रकरणातील प्रवेश मर्यादेपर्यंतचे आधीच केलेले खर्च केल्यानंतर महसुलात आकारले जातात.

विम्याच्या दाव्यांचा स्वीकारण्याच्या तत्वावर लेखा केला जातो.

इतर सर्व दावे/ हक्क यांचे लेखे प्रत्येक प्रकरणी गुणवत्तेप्रमाणे केले जातात.

## १६. गुंतवणुकी :-

**महनिर्मितीच्या प्रकरणी :-**

उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त साहसी कंपन्या यांच्या समभागातील गुंतवणुकी खर्चानुसार नोंदल्या जातात आणि कमी करण्याच्यादृष्टीने प्रत्येक अहवाल तारखेला त्यांचा आढावा घेतला जातो.

कंपनीने भारतीय लेखा मानकात संक्रमण करणाच्या तारखेला म्हणजे १ एप्रिल २०१५ रोजी पूर्वीच्या सर्वसाधारणपणे स्विकारलेल्या लेखातत्वांप्रमाणे उपकंपन्या सहयोगी व संयुक्त साहस कंपन्यांच्या समभागातील गुंतवणुकीचे चालू मूल्य याला मानीव खर्च म्हणून पुढे नेण्याचे ठरविले आहे.

## १७. परकीय चलनातील व्यवहार : महानिर्मितीच्या प्रकरणी :-

परकीय चलनातील व्यवहार प्रारंभी त्यांच्या संबंधित विनियम दराने त्याच्या तारखेला नोंदले जातात.

परकीय चलनातील आर्थिक मत्ता व दायित्वे याचे अहवाल तारखेच्या स्पॉटरेटमध्ये रूपांतर केले जाते.

पैशातील बाबींचे रूपांतरण किंवा चुकते करताना उद्‌भवणारा विनिमय फरक नफा-तोटा पत्रकात 'विनियम दर

विचलन' किंवा 'वित्तीय खर्च' (कर्जाऊ खर्चाच्या समायोजनाच्या मर्यादेत) याप्रमाणे व प्रत्येक प्रकरणाचा विचार करून मान्य केला जातो.

### महापारेषण प्रकरणी :-

#### कामासाठीची आणि सादर करण्याचे चलन :-

वित्तीय विवरणपत्रे भारतीय रुपया यात सादर केले जातात. भारतीय रुपया हेही कंपनीचे कामाचे आणि सादर करण्याचे चलन आहे.

#### व्यवहार आणि शिलकी :-

परकीय चलनातील व्यवहारांना त्या तारखेच्या विद्यमान विनिमय दराने मान्यता दिली जाते. परकीय चलनात व्यवहार चुकते केल्यानंतर प्रत्यक्ष झालेली हानी किंवा प्राप्ती यांना नफा-तोट्यात मान्यता दिली जाते. परकीय चलनातील द्रव्य मत्ता आणि द्रव्य दायित्वे यांचे वर्षाच्या अखेरीस आणि वर्ष अखेरच्या विनिमय दराने रूपांतर केले जाते. आणि त्यातून निर्णायक विनिमय फरकांना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

### १८. प्रतिभाग मिळकत :-

कंपनीच्या प्रतिभाग मिळकत निश्चितीसाठी कंपनीच्या शेअर धारकांना लागू होणाऱ्या निव्वळ नफ्यावर आधारित असते. यापैकी मूळ प्रतिभाग मिळकतीचा हिशेब करण्यासाठी वर्षभरात अदत्त शेअर्सची वेटेड सरासरी संख्या वापरली जाते.

सौम्यकृत प्रतिभाग मिळकतीचा हिशेब करण्यासाठी वर्षभरातील वेटेड ॲव्हरेज नंबर ऑफ शेअर्स आणि डायल्यूटीव्ह कॉमन इक्विव्हॅलंट शेअर्स यांच्या अदत्त शेअर्सचा वापर केला जातो.

(यातील पर्यायांसाठी ट्रेझरी स्टॉक मेथड वापरण्यात येते) जिथे निकाल अँटी डायलूटीव्ह असण्याची शक्यता असते; तेव्हा अपवाद केला जातो.

### १९. कर व उत्पन्न :-

#### अ) चालू आयकर :

चालू आणि त्याआधीच्या कालावधीतील चालू आयकर मत्ता आणि दायित्वे यांची मोजणी करून कर प्राधिकाऱ्यांना दिलेली किंवा द्यावयाची अपेक्षित रक्कम ठरविली जाते. चालू आयकराच्या बाबी इक्विटीमध्ये थेट मान्य केल्या जातात. कंपनी ठरावित कालावधीने कर प्रपत्रासंबंधी घेतलेल्या स्थितीविषयी मूल्यमापन करते, त्यात लागू होणारी कर नियमनांचा अर्थ लावणे आणि लागू असल्यास तरतुदींची स्थापना केली जाते.

#### ब) स्थगित कर :-

अहवालाव्या तारखेला मत्ता व दायित्वाच्या कराचा पाया आणि वित्तीय अहवालाच्या हेतुसाठी विद्यमान रकमा यांच्यातील हंगामी फरकासाठी स्थगित कर दायित्वाचे तरतूद केली जाते. स्थगित कर दायित्वांना सर्व करयोग्य हंगामी फरकांसाठी मान्यता दिली जाते. याला अपवाद खालील प्रसंगी केला जातो. व्यवसाय संयोग नसलेल्या एखाद्या व्यवहारात मत्ता किंवा दायित्व यांच्या ख्यातिमूल्य प्रारंभी मान्य केल्यामुळे स्थगित कर दायित्व उद्‌भवते आणि या व्यवहाराच्या वेळी लेख्यातील नफा किंवा कर योग्य नफा/(कर तोटा) याला बाधा येत नाही; तेव्हा

उपकंपन्या व सहयोगी कंपन्या यातील गुंतवणुकी आणि संयुक्त साहस कंपन्यामधील व्याज यांच्याशी संलग्न करयोग्य हंगामी फरक याबाबत हंगामी फरकाचे नियंत्रण शक्य असते. आणि हंगामी फरक भविष्यात उलटे होण्याचा अंदाज केलेला नसतो तेथे सर्व कपात योग्य हंगामी फरक वापर न करता पुढे नेलेल्या कर जमा आणि कर तोटे यासाठी स्थगीत कर मत्ता मान्य केले जातात. ही मान्यता, कपात योग्य हंगामी फरकासाठी संभाव्य कर नफा उपलब्ध होणे आणि न वापरलेले कर जमा आणि कर तोटे यांचा वापर केला जाणे, यांच्या मर्यादेत असते. यामध्ये खालील प्रकरणी अपवाद केला जातो :-

जेव्हा उद्योग संयोग नसलेल्या एखाद्या व्यवहारातील मत्ता किंवा दायित्व यांना प्रारंभिक मान्यता दिल्यामुळे कपात योग्य हंगामी फरकासंबंधी स्थगित कर मत्ता उद्‌भवते; आणि अशा व्यवहाराच्या वेळी, त्यामुळे नफ्याचा लेखा किंवा कर योग्य नफा/ कर तोटा यांना बाधा होत नाही, तेव्हा

उपकंपन्या आणि सहयोगी कंपन्या यातील गुंतवणुकी आणि संयुक्त साहस संस्थांमधील व्याज याच्याशी संलग्न असलेले कपात योग्य हंगामी फरक यांच्याबाबत स्थगीत कर मत्ता मान्य केल्या जातात. मात्र त्याची मान्यता, हंगामी फरक भविष्यात उलट होण्याचा संभव असणे आणि कर योग्य नफा उपलब्ध होऊन हंगामी फरकांचा वापर होणे, या मर्यादेत असते.

प्रत्येक अहवाल तारखेला स्थगीत कर मत्तांच्या पुढे नेलेल्या रकमेचा आढावा घेण्यात येतो आणि या स्थगीत कर मत्तांचे पूर्ण किंवा अशंत: वापर करण्यासाठी परवानगी देईल इतका करयोग्य नफा उपलब्ध नसेला तर त्यामर्यादेत ती रक्कम कमी केली जाते. अमान्य केलेल्या स्थगीत कर मत्तांचे पुनर्निधारण प्रत्येक अहवाल तारखेला केले जाते. आणि ही मान्यता, भविष्यातील करयोग्य नफा स्थगीत कर मत्तांची भरपाई करू शकेल असेल तर त्या मर्यादेत ती मान्यता दिली जाते.

ज्यावर्षी मत्ता वसुली होईल किंवा दायित्वे चुकती केली जातील, त्यावर्षासाठी जे कर दर लागू होण्याची अपेक्षा असेल त्यानुसार स्थगीत कर मत्ता व दायित्वे यांची मोजणी केली जाते. कर दर व केलेले कर कायदे यांच्यावर किंवा अहवाल तारखेपर्यंत कायदे केले जाणार असल्यास त्यांच्या आधारे ही मोजणी केली जाते.

नफा किंवा तोटा यांच्या बाहेरच्या बाकीसंबंधी स्थगीत कर मान्य केले तर ती मान्यता नफा व तोटा यांच्या बाहेर असते. स्थगीत कराच्या बाबींच्या मुळाशी असलेले इतर सर्वंकश उत्पनांतर्गत व्यवहार किंवा थेट इक्विटीमधील व्यवहार यांना मान्यता दिली जाते.

जर चालू उत्पन्नाच्या कर मत्तांचे, चालू कर दायित्वासोबत वजावट करण्यासंबंधी कायेशिररित्या अंमलबजावणीचा हक्क अस्तित्वात असेल, तर स्थगीत कर मत्ता आणि दायित्वे यांची भरपाई करता येते. मात्र स्थगीत करार संबंधित कर कंपनी व कर प्राधिकरण यांच्याशी निगडीत असले पाहिजेत.

## २०. तरतुदी, आकस्मिक दायित्वे, आकस्मिक मत्ता आणि बांधिलकी :-

## माराविमं सुत्रधारी कंपनी प्रकरणी :

### अ) सर्व साधारण :-

जेव्हा कंपनीवर एखादे विद्यमान बंधन (कायदेशीर किंवा रचनात्मक) मागील काही घटनेमुळे आले असते, आणि त्या बंधनाची पूर्ती करण्यासाठी आर्थिक लाभाच्या संसाधनांचे बहिर्गमन होण्याची शक्यता असते; आणि बंधनाच्या रकमेचा विश्वासार्ह अंदाज करता येतो तेव्हा त्यासाठी केलेल्या तरतुदींना मान्यता दिली जाते.

जेव्हा कंपनीला एखादी तरतूद संपूर्ण किंवा काही भागात परत मिळेल अशी अपेक्षा असते; तेव्हा त्या तरतुदीला स्वतंत्र मत्ता अशी मान्यता दिली जाते. मात्र ती प्रतीपूर्ती खात्रीची हवी. कोणत्याही तरतुदीच्या संबंधी केलेले खर्च उत्पन्नाच्या

विवरण पत्रकात कोणत्याही प्रतिपूर्तीची निव्वळ अशा प्रकारे सादर केली जाते.

जर पैशांच्या वेळेवरील किंमतीचा परिणाम महत्वाचा असेल तर चालू कर दर वापरून तरतुदीत कसर केली जाते ती योग्य व दायित्वाच्या जोखीमीनुसार निश्चित व योग्य असावी. जेव्हा सवलत/कसर वापरली असेल तर वेळेनुसार तरतुदीमध्ये केलेल्या वाढीला वित्त खर्च असे मान्य केले जाते.

**ब) आकस्मिकता -**

आकस्मिक दायित्वे जर उद्योग संयोगाचा भाग म्हणून गृहीत धरली असतील तर त्यांना फक्त त्यांच्या रास्त मूल्यानुसार मान्यता दिली जाते. आकस्मिक मत्तांना मान्यता दिली जात नाही. मात्र जेव्हा उत्पन्न वसूल होण्याची चांगली शक्यता असेल तर संबंधित मत्तेला आकस्मिक मानले जात नाही. तर फक्त मत्ता असेच मानले जाते. आकस्मिक दायित्वाची माहिती वित्तीय विवरणपत्रांच्या टिपांमध्ये प्रगट केली जाते. मात्र त्यासाठी आर्थिक लाभ संबंधित संसाधनाचे बहिर्गमन नसावे. जर आर्थिक लाभाचा प्रवाह कंपनीकडे येणे संभवत असेल तर हीच बाब आकस्मिक मत्तांनाही लागू होते.

## महानिर्मिती प्रकरणी :-

जेव्हा एखाद्या मागील घटनेमुळे विद्यमान काळात बंधन असते आणि बंधन चुकते करण्यासाठी कंपनीच्या आथिक लाभासंबंधीची संसाधने बाहेर जाणे संभवनीय असते आणि त्या बंधनाचे विश्वासार्ह अंदाज करता येतो; तेव्हा त्याच्या तरतुदींना मान्यता दिली जाते.

जर पैशाचे वेळेचे मूल्य खूप मोठ्या प्रमाणात असेल तर, योग्य सवलत दराने तरतुदीमध्ये सवलत केली जाते. अशी सवलत वापरण्यास जर काळाच्या ओघात तरतुदीमध्ये वाढ झाली असेल तर काळाच्या ओघात वाढलेल्या तरतुदीस वित्त खर्च म्हणून मान्यता दिली जाते.

आकस्मिक दायित्वे ही संभवनीय बंधने असतात. कंपनीचे ज्यांच्यावर नियंत्रण नाही; अशा भविष्यातील घटनांमुळे आकस्मिक दायित्वांचे अस्तित्व साधार असल्याचे ठरते किंवा ज्या विद्यमान बंधनामुळे कंपनीची संसाधने बाहेर जाणे संभवनीय नसते किंवा बंधनाच्या रकमेची मोजणी खात्रीने विश्वासपूर्ण करता येत नाही.

आकस्मिक दायित्वांना वित्तीय विवरणपत्रात मान्यता नसते. पण जेव्हा आर्थिक संसाधने बाहेर जाण्याची शक्यता खूप कमी आहे; असा विचार असला तरी ती प्रकट केली जातात.

आकस्मिक दायित्वे आणि भांडवली बांधिलकी संबंधित बाबीप्रमाणे प्रकट केल्या जातात. त्या प्रत्येक प्रकरणी प्रवेश मर्यादेपेक्षा जास्त असल्या पाहिजे.

जेव्हा आर्थिक लाभ आत येणे संभवनीय असेल तेव्हा आकस्मिक दायित्वे वित्तीय विवरणपत्रात प्रकट केली जात नाहीत.

## महावितरणच्या प्रकरणी :-

जेव्हा एखाद्या जुन्या घटनेमुळे कंपनीवर विद्यमान बंधन असते; आणि ते चुकते करण्यासाठी संसाधने बाहेर जाण्याची शक्यता असते तसेच त्यासंबंधी तांत्रिक मूल्यमापन व अनुभवाच्या आधारे विश्वासार्ह अंदाज करणे शक्य असते, तेव्हा त्याच्या तरतुदीला मान्यता दिली जाते. या तरतुदी त्यांच्या विद्यमान मूल्याइतक्या कमी करता येत नाहीत. ताळेबंदाच्या तारखेला व्यवस्थापनाला ते चुकती करण्यासाठी अंदाज करावे लागतात. ज्या दायित्वांचे भविष्यातील फलांचा अंदाज निश्चितपणे करता येत नाही, त्यांना मान्यता दिली जात नाही. अशा आकस्मिक दायित्वांना मान्यता नसली तरी त्या व्यवस्थापनाच्या न्यायनिर्णयानुसार लेख्यांच्या टिपांमध्ये प्रकट केल्या

जातात. प्रत्येक ताळेबंदाच्या तारखांना त्याचा आढावा घेऊन चालू व्यवस्थापकीय अंदाजात त्यांची समायोजने दाखविली जातात.

आर्थिक लाभ मिळणे शक्य असेल तर आकस्मिक मत्ता प्रकट केल्या जातात. आकस्मिक मत्तांचे बाबत जर आर्थिक लाभ कंपनीत प्रवाहित होत असतील तर त्या प्रकट केल्या जातात. तसेच व्यवहार्य असेल तर त्यांचे आर्थिक परिणामही प्रकट केले जातील.

**महापारेषणच्या प्रकरणी :**

**तरतुदी :-** जेव्हा एखाद्या भूतकालीन घटनेमुळे कंपनीवर बंधन आले असेल (कायदेशीर किंवा रचनात्मक) आणि ते बंधन चुकते करण्यासाठी आर्थिक लाभाची संसाधने बाहेर जाणार असतील तसेच त्यांची रकमेची विश्वासार्ह मोजणी करता येत असेल तर, त्याच्या तरतुदी मान्य केल्या जातात. जर पैशाचे वेळेनुसार मूल्य खूप असेल तर तरतुदीमध्ये कसर केली जाते. कसर काढून घेण्यास नफा-तोटा पत्रकात वित्त खर्च अशी मान्यता दिली जाते. प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेस तरतुदींचा आढावा घेऊन त्याचे चालू सर्वोकृष्ट अंदाजांमध्ये समावेश करण्यासाठी समायोजने केली जातात.

**आकस्मिकता :-** जेव्हा एखाद्या मागील घटनांमुळे एखादे संभाव्य बंधन उद्‌भवते, कंपनीचे नियंत्रण नसलेल्या भविष्यातील घटनांमुळे त्याला पुष्टि मिळते; किंवा अशा बंधनाच्या हिशेब चुकता करण्यासाठी कंपनीची आर्थिक संसाधने बाहेर जाण्याची शक्यता असते, आणि त्यातील रकमेचा अंदाज करता येत नाही, अशावेळी आकस्मिक दायित्व प्रकट केली जातात. त्याची माहिती वित्तीय विवरणात प्रकट केली जाते. आकस्मिक मत्ता प्रकट केल्या जात नाहीत.

## २१) अपवादात्मक बाबी :-

उत्पन्न पत्रकामध्ये सामान्य कृतीतील उत्पन्न व खर्च यांच्या काही बाबी नेहमी घडणाऱ्या नसतात. त्यांचा आकार, स्वरूप किंवा प्रसंग यानुसार त्यांचे कंपनीच्या कामगिरीवर होणारे परिणाम स्पष्ट करण्यासाठी त्या बाबी वेगळ्या दाखविल्या जातात. त्यांना अपवादात्मक बाबी म्हटले जाते.

## २२) महापूर, आग, वादळे यामुळे होणाऱ्या हानीचा लेखा

महापूर, आगी, वादळे इ. मुळे कंपनीच्या स्थिर मत्तांची हानी यासाठी उपलब्ध माहितीनुसार तरतूद केली जाते. जर काही जादा/ कमी तरतूद असेल तर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेनंतर त्याला मान्यता दिली जाते.

## २३) 'चालू आणि चालू नसलेल्या' असे वर्गीकरण करणे :-

कंपनी ताळेबंदामध्ये मत्ता व दायित्वे यांचे सादरीकरणासाठी त्यांच्या चालू/ चालू नसलेल्या असे वर्गीकरण करणे.

मत्ता खालील परिस्थितीत चालू असतात

नेहमीच्या प्रवर्तन चक्रात ज्याची वसुली, विक्री किंवा वापर होणे अपेक्षित असते

व्यापारी हेतुसाठी धारण केल्या जातील.

अहवाल तारखेनंतर बारा महिन्यांत त्याची वसुली होणे अपेक्षित असते किंवा रोख किंवा रोख समतूल्य (जर देवघेव किंवा

दायित्वे चुकते करण्यासाठी अहवाल तारखेनंतर किमान बारा महिन्यात वापरली नसेल तर.)

इतर सर्व मत्ता यांचे चालू नसलेल्या असे वर्गीकरण केले जाते.

**चालू दायित्वे :-** खालील परिस्थितीमध्ये दायित्वांचे 'चालू' असे वर्गीकरण होते.

नेहमीच्या प्रवर्तन चक्रात जी दायित्वे चुकती केली जाणे अपेक्षित असते.

जे प्रामुख्याने व्यापारी हेतुसाठी धारण केले जाते.

अहवाल मुदतीनंतर बारा महिन्यांनी चुकता करण्यास योग्य होते.

किंवा जेव्हा अहवाल मुदतीनंतर बारा महिन्यांनी दायित्वाचा स्थगित किंवा चुकते करण्याचा विनाअट अधिकार नसतो तेव्हा स्थगित कर मत्ता / दायित्व यांचे चालू नसलेले असे वर्गीकरण केले जाते.

इतर सर्व मत्तांचे 'चालू नसलेल्या' असे वर्गीकरण केले जाते.

## २४) रास्त मूल्यांचे मापन / मोजणी

कंपनी प्रत्येक ताळेबंद तारखेस वित्तीय विलेख म्हणजे डेरिव्हेटीव्हज् किंवा इतर गुंतवणुकी यांचे रास्त मूल्याने मापन करते. रास्त मूल्य म्हणजे एखादी मत्ता विकल्यानंतर मिळणारी किंमत किंवा दायित्व हस्तांतरित करण्यासाठी भरलेली किंमत. मात्र हा व्यवहार कायदेशीर / सुव्यवस्थित पद्धतीने व मापनाच्या तारखेला बाजारातील भाग घेणाऱ्यांमध्ये झाला पाहिजे. जेव्हा मत्ता विक्री किंवा दायित्वाचे हस्तांतरण यांचा व्यवहार मत्ता किंवा दायित्व यांच्या प्रमुख बाजारपेठेत होतो किंवा प्रमुख बाजारपेठ नसली तर मत्ता किंवा दायित्व यांच्या अधिक लाभदायी बाजारपेठेत होतो तेव्हा रास्त मूल्यांनुसार त्याचे मापन झाले असे गृहीत धरले जाते. ही सर्वात लाभदायक बाजारपेठ कंपनीला सहज प्राप्य असली पाहिजे.

मत्ता किंवा दायित्व यांचे मापनासाठी रास्त मूल्य वापरले यासाठी असे गृहीत धरले जाते की, बाजारपेठेतील सहभागी घटक मत्ता व दायित्वे यांची किंमत करताना त्याचे सर्वोकृष्ट आर्थिक हितासाठी वापरतील.

एखाद्या वित्तीय नसलेली मत्तेचे रास्त मूल्यात मापन करून ती करताना बाजारात सहभागी झालेल्या एका घटकाकडे त्या मत्तेचा सर्वोच्च व सर्वोत्तम वापर करून आर्थिक लाभ निर्माण करण्याचे किंवा ती मत्ता बाजारातील सहभागी होणाऱ्या दुसऱ्या घटकाला सर्वोच्च व उत्तम वापरासाठी विकणे यासाठीच्या पात्रतेचा विचार केला जातो.

कंपनी परिस्थितीशी अनुरूप अशी मूल्यांकनाची तंत्रे वापरते. रास्त मूल्याने मापन करण्यासाठी पुरेशी माहिती उपलब्ध करते. संबंधित निरिक्षण योग्य इनपुटस्चा कमाल वापर करते आणि त्यावेळी ज्यांचे निरीक्षण करता येत नाही अशी इनपुटस् कमीत कमी वापर करते.

ज्या सर्व मत्ता व दायित्वे यांचे रास्त मूल्याने मोजणी करावयाची आहे किंवा ती वित्तीय विवरणपत्रात प्रकट करावयाची आहे; त्यांची येथे खालील दिलेल्या रास्त मूल्यांच्या क्रमवारीत वर्गवारी केली जाते. रास्त मूल्य मापनात संपूर्णपणे महत्वाच्या इनपूटची सर्वात कमी स्तराच्या आधारे ती करण्यात आली आहे.

**स्तर १ -** उद्धृत केलेला (समायोजन न केलेले) बाजार किंमती - चांगल्या कार्यशिल बाजारपेठेत समान मत्ता किंवा दायित्वे यांच्या

**स्तर २ -** ज्या मूल्यांकन तंत्रासाठीचा सर्वात खालच्या स्तरावरील इनपूटचा स्तर - याचे रास्त मूल्यांकनासाठी थेट किंवा अप्रत्यक्ष निरिक्षण करता येते.

**स्तर ३ -** ज्या मूल्यांकन तंत्रासाठी सर्वात खालचा स्तरावरील इनपूटचे निरिक्षण करता येत नाही असा स्तर.

ज्या मत्ता व दायित्वे ताळेबंदात पुन्हा आवर्ती तत्वाने मान्य केल्या जातात. त्यांचे क्रमवारीतील स्तरामध्ये स्थानांतरण झाले किंवा कसे हे निश्चित करण्यासाठी कंपनी प्रत्येक अहवाल कालाच्या अखेरीस वर्गाचे पुन: निर्धारण करते (रास्त मूल्य मापनासाठी संपूर्णपणे महत्वाची असणारा सर्वात खालचा स्तर याच्या आधारे)

रास्त मूल्यांच्या प्रकटनासाठी कंपनीने मत्ता व दायित्वे यांच्या स्वरूपानुसार श्रेणी ठरविल्या आहेत. यासाठी मत्ता व दायित्वे यांची वैशिष्ट्ये व जोखीमा आणि वरती स्पष्ट केल्याप्रमाणे वरील स्तरांपैकी प्रत्येक स्तर निश्चित केला आहे.

## २५. वित्तीय विलेख :

**वित्तीय मत्ता - प्रारंभिक मान्यता व मोजणी**

सर्व वित्तीय मत्तांना प्रारंभी त्यांचे रास्त मूल्य अधिक वित्तीय मत्ता संपादनाचे व्यवहार खर्च यानुसार मान्यता दिली आहे. ज्या वित्तीय मत्तांचे नफा किंवा तोटे यातील रास्त मूल्यानुसार नोंदणी झालेली नाही त्यांचा व्यवहार खर्च विचारात घेतला आहे.

वित्तीय मत्तांचे वर्गीकरण केले आहे. प्रांरभिक मान्यतेच्यावेळी वित्तीय मत्ता रास्त मूल्याने मोजल्या आहेत किंवा वित्तीय मत्ता कर्ज फेडीच्या खर्चानुसार मोजल्या आहेत.

**त्यानंतरची मोजणी :-**

नंतरच्या मोजणीसाठी वित्तीय मत्तांच्या मोजणीचे खालील दोन स्थूल श्रेणीत वर्गीकरण केले आहे. १ रास्त मूल्यांप्रमाणे वित्तीय मत्ता २. कर्जफेडीच्या खर्चानुसार वित्तीय मत्ता.

जेथे मत्तांचे मापन रास्त मूल्याने केले तेथे प्राप्ती व हानी यांना नफा तोटा पत्रकात संपूर्णत: मान्यता दिली (नफा किंवा तोटयातील रास्त मूल्य) किंवा त्यांना इतर सर्वंकष उत्पन्नात मान्यता दिली. (इतर सर्वंकष उत्पन्नातील रास्त मूल्ये)

खालील दोन अटींचे पालन करणाऱ्या वित्तीय मत्तांची मोजणी कर्जफेड खर्चानुसार केली (कमी करण्यासाठी कमी लिहिलेल्या खर्चाची निव्वळ) जर मत्ता रास्त मूल्यांने नफा - तोटा यामध्ये नामनिर्देशित केली नसेल तर.

**बिझनेस मॉडेल टेस्ट :**

कंपनीच्या बिझनेस मॉडेल टेस्टचे उद्दिष्ट वित्तीय मत्ता कंत्राटातील रोकडता प्रवाह गोळा करण्यासाठी वित्तीय मत्ता धारणे करणे, हे असते. (रास्त मूल्यातील बदल वसुलीसाठी कंत्राटाची मुदत पूर्ण होण्यापूर्वी विकण्याऐवजी)

## कॅश फ्लो कॅरेक्टरस्टिक टेस्ट

वित्तीय मत्तांच्या कंत्राटातील अटीमुळे विनिर्देशित तारखांना रोकडता प्रवाह मिळतो. त्यात प्रामुख्याने थकीत रकमेचे मुद्दल व व्याज यांचे पैसे असतात.

**कर्जफेडीचे खर्च :-**

कर्ज विलेखात खालील दोन अटींची पूर्तता होत असेल तर त्यांची मोजणी कर्जफेड खर्चानुसार केली जाते. सदर मत्ता खालील उद्दिष्टे असलेल्या बिझनेस मॉडेलमध्ये धारण केलेली असावी.

- कंत्राटातील रोकडता प्रवाह जमा करण्यासाठी मत्ता धारण करणे, आणि
- मत्तांच्या कंत्राटातील अटीमुळे विनिर्देशित तारखांना रोकडता प्रवाह उद्‌भवणे
- यामध्ये पूर्णपणे मुद्दल व व्याज - (थकीत मुद्दल रकमेचे) असतात. प्रारंभिक मान्यतेनंतर अशा वित्तीय मत्तांचे नंतर प्रभावी व्याज दर पद्धत वापरून कर्जफेड खर्चानुसार मोजणी केली जाते आणि अशा कर्जफेडींना नफा-तोटा पत्रकात मान्यता मिळते.

## कर्ज विलेख - नफा-तोटा यातील रास्त मूल्यानुसार

कर्ज विलेखांची मोजणी करण्यासाठी नफा व तोटा मार्फत रास्त मूल्य ही अवशेषात्मक श्रेणी आहे. प्रारंभीच्या मोजणीनंतर रास्त मूल्यात कोणतेही बदल झाले तर त्यांना नफा - तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. या बदलात - व्याज उत्पन्न, मत्ता कमी करण्यातील तोटे, इतर निव्वळ प्राप्ती आणि हानी यांचा समावेश असतो.

## समभागातील गुंतवणुकी

भारतीय लेखा मानक क्र. १०९ याच्या व्याप्तीप्रमाणे सर्व समभाग मत्ता रास्त मूल्याने मोजल्या जातात. व्यापारासाठी धारण केलेले समभाग विलेखांचे वर्गीकरणे मध्ये केले जाते. इतर सर्व गुंतवणुकींचे वर्गीकरण इतर सर्वंकष उत्पन्नातील रास्त मूल्यानुसार किंवा नफा व तोटा यातील रास्त मूल्यानुसार यामध्ये करणेबाबत कंपनी निर्णय घेते. कंपनी अशी निवड प्रत्येक विलेखनिहाय करते. प्रारंभीच्या मान्यतेनुसार वर्गीकरण केले जाते व ते रद्द करता येत नाही.

इतर सर्वंकष उत्पन्नातील रास्त मूल्यानुसार अंतर्गत वर्गीकरण केलेल्या सर्व समभाग विलेखांबाबत जे बदल होतात (लाभांश वगळता) त्यांना इतर सर्वंकष उत्पन्नात मान्यता दिली जाते. इतर सर्वंकष उत्पन्नातील मधील रकमांचे नफा तोटा पत्रकात पुनर्चक्रीकरण केले जात नाही. या गुंतवणुकी विकल्यानंतरही तसे केले जात नाही.

नफा व तोटा यातील रास्त मूल्यानुसार श्रेणीत समाविष्ट केलेल्या समभाग विलेखांचे मापन रास्त मूल्याने केले जाते. रास्त मूल्यातील बदलाना नफा-तोटा पत्रकात मान्यता मिळते. उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त साहस कंपन्या यातील समभाग विलेख यांना खर्च वजा कमी करणे याप्रकारे पुढे नेले जाते.

**वित्तीय मत्ता कमी करणे :** भारतीय लेखा मानक क्र. १०९ नुसार, कंपनी ज्या वित्तीय मत्तांचे मापन कर्जफेड खर्च आणि इतर सर्वंकष उत्पन्नातील रास्त मूल्यानुसार प्रमाणे पुढे नेण्यात येतात, त्यांचे मापन व कमी करण्याचे तोटे मान्य करण्यासाठी अपेक्षित पत तोटा मॉडेल लागू करते.

व्यापारी येणी यातील तोटऱ्याच्या भरपाई सिंपलीफाईड ॲप्रोच अनुसरून प्रत्येक अहवाल तारखेला लाईफ टाईम अपेक्षित पत तोटा च्या समान रकमेने मापन केले जाते.

मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीची परवाना समाप्ती विचारात घेता, महावितरणने २०१०च्या प्रकरण क्र. ८५ नुसार महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या परवान्याच्या निरस्तीकरण/निलंबनासाठी याचिका दाखल केली होती. त्याचप्रमाणे मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीने परवान्याच्या मंजुरीकरणासाठी २०१० च्या प्रकरण क्र. ८७ नुसार याचिका दाखल केली होती. ३१/०१/२०११ रोजी मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटी लि. चे परवाना समाप्ती विचारात घेऊन, महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने २७/०१/२०११ च्या आदेशानुसार महावितरणला मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटी लि. च्या क्षेत्रात विद्युत पुरवठा करण्यास आणि महावितरणच्या बाजूने परवाना देण्याचे ठरविले होते. त्यानुसार, महावितरण ०१/०२/२०११ पासून मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या पायाभूत सुविधांचा वापर करुन त्या क्षेत्रात वीज पुरवठा करत आहे.

मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटी लि.ने महाराष्ट्र विज नियामक आयोगाच्या दि. २७/१/२०११ च्या आदेशाला आव्हान दिले आहे आणि २०११ च्या प्रकरण क्र. ३९ नुसार माननीय विजेसाठी लवाद न्यायाधीकरणात याचिका दाखल केली आहे. माननीय विज लवाद न्यायाधीकरणाचा आदेश दि. १६/१२/२०११ आणि महाराष्ट्र वीज नियामक आयोगाला परवाना मंजुर करण्याचा निर्णयाचा आढावा घेण्यासाठी आणि महावितरणद्वारे मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या क्षेत्रामध्ये वीज पुरविण्याच्या विद्यमान व्यवस्थेचा अवलंब करण्याचे निर्देश, महावितरणद्वारा मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या वितरण जाळ्याच्या उपयोगासाठी शुल्काचा भरणा करण्याच्या अधीन आहे.

त्यानुसार, महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने पुढील बाबी ऐकण्यास सुरुवात केली :

i) २०१० चे प्रकरण क्र.८५- मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या क्षेत्रामध्ये मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीचा परवाना रद्द करण्यासाठी महावितरणचा अर्ज

ii) २०१० चे प्रकरण क्र. ८७ - मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या क्षेत्रातील परवाना मंजूर करण्यासाठी मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीचा अर्ज

iii) २०१२ चे प्रकरण क्र. २४ - महावितरणकडून मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या मालमत्तेच्या होणाऱ्या वापरासाठी शुल्क निश्चित करण्यासाठी मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीची याचिका

महाराष्ट्र विज नियामक आयोगाने प्रकरण क्र. ८५ आणि ८७ या दोन्ही प्रकरणांमध्ये महावितरणच्या बाजूने परवाना जारी करण्याचा निर्णय घेतला, असे नमूद केले की महावितरणला एक मानण्यात आलेला परवाना आहे. मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीचा परवाना समाप्त झाल्यानंतर ताज्या परवान्याची आवश्यकता नाही. या दोन्ही प्रकरणी महाराष्ट्र विज नियामक आयोगाच्या आदेशाविरोधात मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीने वीज लवाद न्यायाधिकरणात याचिका क्र. २०१४ साठी २२२ आणि २०१४ साठी २२३ नुसार याचिका दाखल केली आहे. ह्या याचिका माननीय वीज लवाद न्यायाधिकरणात अद्याप प्रलंबित आहेत.

वापरकर्ता शुल्कासाठी मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीची याचिकेमध्ये (याचिका क्र.२४) महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने महावितरणला मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या मालमत्तेचे मूल्यमापन करण्याचे निर्देश दिले आणि महावितरणला मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या मालमत्तेचा वापर करण्यासाठी अंतरिम शुल्क म्हणून १ कोटी रुपये देण्याची आणि महावितरणला मालमत्तेचे मूल्यांकन करण्यासाठी आवश्यक तपशील पुरविण्यासाठी मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीला निर्देश दिले. तथापि, मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटी महावितरणला निश्चित मालमत्ता नोंदणी आणि आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास अयशस्वी ठरली असल्याने, अंतरिम

शुल्क दिले जात नव्हते. आणि मूल्यांकन करणे शक्य नव्हते. हे विचारात घेता महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीचे प्रकरण क्र. २०१२ साठी २४ बंद केले आणि असे नमूद केले की, मालमत्तेचे मूल्यांकन नसताना, मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या मत्ता महावितरणने वितरणासाठी वापरल्यामुळे देय असलेले शुल्क महाराष्ट्र वीज नियामक आयोग ठरवू शकत नाही.

मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीने प्रकरण क्र. २०१२ साठी २४ विरुद्ध विज लवाद न्यायाधीकरणात याचिका क्र. २०१४ साठी २२१ दाखल केली आहे. ज्यामध्ये वीज लवाद न्यायाधिकरणाने दि. १३/०३/२०१५ च्या आदेशानुसार महावितरणला रु. १ कोटी रुपये मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीला अंतरिम व्यवस्था म्हणून देण्याचे निर्देश दिले आणि महाराष्ट्र वीज नियामक आयोगाला मालमत्तेचे मूल्यमापन करण्याचे निर्देश दिले. वीज लवाद न्यायाधिकरणाच्या आदेशाला महावितरणने माननीय सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाने रु. १ कोटी दरमहा मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीला देण्याऐवजी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाला देण्याचे निर्देश दिले.

माननीय वीज लवाद न्यााधिकरणाच्या दि. १३.०३.२०१५ च्या आदेशाद्वारे याचिका क्रमांक २२१ मध्ये निर्देशित केल्यानुसार मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को- ऑपरेटीव्ह सोसायटीच्या मालमत्तेचे मूल्यांकन करण्यासाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मेसर्स आलिया कन्सलटंटला नियुक्त केले. त्यानुसार, मेसर्स आलिया कन्सलटंटने मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या मालमत्तेचे मूल्यांकन १ एप्रिल, २०१६ ला केले आहे आणि त्याचा मूल्यांकन अहवाल महाराष्ट्र वीज नियामक आयोगाला सादर केला आहे. वरील मूल्यांकन अहवालानुसार, महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीला देय असणारे मासिक शुल्क दि.०२.०५.२०१६ च्या आदेशानुसार निर्धारीत केले आहे. महावितरण, वरील आदेशामुळे दुखावले आहे आणि महावितरणे महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या दि.०२.०५.२०१६ च्या आदेशाविरोधात माननीय वीज लवाद न्यायाधिकरणात याचिका क्र.२०१६ साठी १०८ दाखल करुन आव्हान दिले आहे आणि माननीय वीज लवाद न्यायाधिकरणाने वरील याचिकेवर खालील आदेश दिले आहेत ते असे निर्देश देतात-

**अ)** महावितरणने मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीला देण्यात येणारी रक्कम त्यावर जमा झालेल्या व्याजासहित एकत्रित रु.६४ कोटी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे जमा केले आणि परिणामी वापरकर्ता शुल्क म्हणून समायोजित केले.

**ब)** महावितरण मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीला दरमहा रु.१ कोटी सातत्याने अदा करेल.

**क)** माननीय वीज लवाद न्याधिकरणाने महावितरणला निर्देश दिले की, मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीला दिलेले रु.१ कोटी वजा केल्यानंतर, महाराष्ट्र वीज नियामक आयोगाबरोबर ठरविलेल्या मासिक वेळापत्रकाप्रमाणे महावितरण दरमहा शुल्क जमा करेल. त्याप्रमाणे, महावितरणने मार्च २०१७ पर्यंत रु. ७४ कोटी मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ह सोसायटीला दिले आणि रु.३९४ कोटी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे जमा केले. त्यामुळे महावितरणने एकूण रु.४६८ कोटी वापरकर्ता शुल्क म्हणून दिले.

## २) सतत आणि निरंतर नसलेल्या पुरवठ्यादरम्यानच्या दरांमध्ये बदल

प्रशुल्क आदेशाच्या एक महीन्यानंतर मिळालेल्या अर्ज विरोधात प्रशुल्कात बदल केल्यामुळे महावितरणने उच्चदाब ग्राहकांना क्रेडिट दिले आहे. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने महावितरणच्या वार्षिक महसूल आवश्यकतांनुसार १८७ कोटींचा दावा त्यांच्या दि.२६.०६.२०१५ च्या बहुवर्षीय दर आदेशानुसार नामंजुर केला आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने त्याच्या पुर्वीच्या आदेशामध्ये उच्चदाब प्रशुल्क श्रेणी बदलवुन ती सतत ते निरंतन नसलेल्याकडे निर्देशित केली,फक्त जेव्हा ग्राहक केवळ प्रशुल्क आदेशाच्या एक महिन्याच्या आत अर्ज करतील.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगावरील महावितरणची बहुवर्षीय दर आदेशासाठी पुनर्विलोकन याचिका, दि.१९.०८.२०१६ च्या

त्यांच्या निर्णयामध्ये नियमन प्रशुल्क आदेशाच्यावर लागू आहे कारण ही वैधानिक तरतूद आहे. ही महावितरणची भुमिका स्वीकारली आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचे मानक कार्यप्रणाली नियमन, खंड ९.२ असे म्हणते की, ग्राहकांकडून अर्ज मिळाल्यापासून दुसऱ्या वीज देयके चक्राच्या आत दरात बदल करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने महावितरणची पुर्नविलोकन याचिका स्वीकारली आहे आणि महावितरणच्या बाजूने आदेश दिला आहे. त्यातील निर्देशानुसार दरात बदल करण्यासाठी सर्व अर्जदारांवर योग्य ती कारवाई करावी आणि त्याचे परिणाम महाराष्ट्र वीज नियामक आयोगाला जमा करावेत.

ग्राहकांना परतफेड केल्या जाणाऱ्या दर बदलाचा परिणाम रू.१५१ कोटी आहे. जे आधीपासूनच महाराष्ट्र वीज नियामक आयोगाला सादर केले गेले आहेत आणि ते खात्यांच्या पुस्तकात दिले गेले आहे.

**३) शिलकी कायम करणे:**

I) व्यापारी येणी व व्यापारी देणी, दिलेली व घेतलेली कर्जे व अग्रीमे, इतर चालू किंवा चालू नसलेली दायित्त्वे /मत्ता आदि मेळ कायम करणे व आवश्यक तेथे समायोजन करणे या कृतींच्या अधीन आहे. संबंधित व्यक्तींसोबत ती केली जातील. कोणत्याही भौतिक फरकामुळे चालू वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रावर त्याचा परिणाम व्हावा हे व्यवस्थापनास अपेक्षित नाही.

II) टपाल कचेऱ्या व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांच्याकडील शिलकी कायम केल्याबद्दल माहिती उपलब्ध नाही. म्हणून या शिलकी मेळ करणे कायम करणे व आवश्यक तेथे समायोजने करणे यांच्या अधीन आहेत. कोणत्याही भौतिक फरकामुळे चालू वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रावर त्याचा परिणाम व्हावा हे व्यवस्थापनास अपेक्षित नाही.

**४) प्रगतीपथावरील भांडवली कामे आणि मालमत्ता, कारखाने व यंत्रसामुग्री आणि उपकरणे:**

एसएपी-ईआरपी यंत्रणेत निर्माण होणाऱ्या कार्य पूर्णत्वाच्या अहवालावर आधारित मालमत्ता तयार केली आहे. जेव्हा प्रणालीमध्ये भांडवलीकरणाची तारीख ही प्रत्यक्ष भांडवलीकरणानंतर असेल तेव्हा अंतर कालावधीसाठी घसाऱ्याची गणना आणि लेखा केला जातो. काही प्रकरणांमध्ये काम पूर्ण झालेले असते परंतु चालू वर्षामध्ये त्याचे भांडवलीकरण केले जात नाही. यामुळे घसारा आकारला न जाणे असे परिणाम होऊन त्याच्या रकमेचा अंदाज करता येत नाही.

**५) बँकेसोबत मेळ करण्याची विवरणपत्रे:**

राष्ट्रीयीकृत/ शेड्युल्ड बँकांमध्ये असलेल्या खात्यांच्या बाबतीत, सलोखा केला गेला आहे. मात्र माहितीच्या अभावी आणि जुन्या माहितीची उपलब्धता नसल्यामुळे मेळ केलेल्या काही बाबींवर लेखा पुस्तकात योग्य ती प्रक्रीया करणे प्रलंबित आहे. त्यांच्या परिणामांचा अंदाज करता येत नाही.

**६) आर्थिक साधने:**

मालमत्ता आणि दायित्त्वांचे वर्गीकरण खालील परिशिष्टात दिले आहे.

**अ) आर्थिक जोखीम व्यवस्थापन :**

**जोखीम व्यवस्थापन रचना**

त्यांच्या सामान्य संचलनामध्ये, महावितरणच्या उपक्रमांना विविध प्रकारच्या जोखीमांना तोंड द्यावे लागते जे वित्तीय साधनांशी निगडीत असतात आणि बाजारांशी ते जेथे कार्यरत असतात. महावितरणची स्वत:ची जोखीम व्यवस्थापन प्रक्रीया आहे जी निसमित मध्यांतराने चालविली जाते. मुख्य जोखमींचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

**ब) नियामक जोखीम**

महावितरण वार्षिक महसुलाची आवश्यकता महाराष्ट्र वीज नियामक आयोगाला सादर करते. महाराष्ट्र वीज नियामक

आयोग योग्य ती काळजी आणि विवेक तपासणीनंतर ग्राहकांना आकारले जाणारे दर निश्चित करते. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने निर्धारीत केलेला दर महाराष्ट्र वीज नियामक आयोग (बहुवर्षीय दरपत्रक) विनियमांवर आधारित आहे जो नियमितपणे सुधारित होतो. दर संबंधित नियमांनुसार निर्धारीत मानकांनुसार निर्धारीत केले आहेत. सर्वसाधारण मापदंड किंवा मार्गदर्शक नियामक तरतुदींमध्ये किंवा फेरबदलांचा कोणताही बदल कंपनीच्या वीज विक्रीवरील उत्पन्नावर परिणाम करेल.

महावितरणे आर्थिक जोखमीची ओळख पटवली आणि त्यांना तीन भागांमध्ये श्रेणीबद्ध केले जे उदा: १) पत जोखीम २) रोकड सुलभता जोखीम ३) बाजारातील जोखीम.

प्रत्येक अशा वर्गातील जोखीम स्रोतांविषयी तपशील खालीलप्रमाणे आहेत :

**i) पत जोखीम:**

जेव्हा कंपनीचे ग्राहक किंवा अन्य व्यवहारातील संस्था तिचे करारानुसार असलेली बंधने पूर्ण करू शकत नाही, तेव्हा कंपनीला वित्तीय नुकसान करणारी पतविषयक जोखीम उद्भवते. त्यामुळे ग्राहकांकडील येणी आणि गुंतवणुकीची प्रतिभुती याबाबत धोके निर्माण होतात. म्हणून कंपनी संशयास्पद ऋणे, येणी आणि कमी होणारी प्राप्ती यासाठी भरपाईची तरतूद स्थापित करते तसेच व्यापारातून आणि इतर येणी व गुंतवणुकी यांचे तोटयांचा अंदाज कंपनी करून ठेवते. खाली दिलेल्या वित्तीय विलेखांच्या प्रकरणी पत पुरवठ्यात होणारे कमाल धोके हे त्यांच्यावरील रकमांच्या संदर्भात मर्यादीत केले जातात.

**अ) व्यापारी येणी**

ग्राहकांच्या व्यापक पायावर तसेच महाराष्ट्र राज्यातील वीजेचे प्राथमिक वितरक म्हणून कंपनीची जबाबदारी पूर्ण करणे विचारात घेऊन कंपनी व्यापारी येण्यांवरील अपेक्षित पत तोटयाचे भत्ते लेखातत्त्वांनुसार ठरविते.

कंपनीची व्यापारी येणी ही कमी कालावधीसाठी असतात आणि जोपर्यंत देयके देण्यात कसुर होत नाही तोपर्यंत कोणताही संविदात्मक व्याजदर लावू नये. अशा परिस्थितीमध्ये जेव्हा ग्राहक थकबाकी देतो, तेव्हा अंतिम घटकावरील व्याज वसूल करावे. त्यानुसार व्यापारी येण्यांसाठी प्रभावी व्याजदर नगण्य मानला जातो आणि अशा व्यापारी येण्यांशी संलग्न असणाऱ्या वेळेच्या मूल्यांच्या धोक्याचे निर्धारण व्यापारी येण्यांच्या अपेक्षित पत तोटयांचा अंदाज करण्यासाठी विचारात घेतले जाते.

जर ग्राहकांनी देयके देय तारखेला दिली नाहीत, व्यापारी येणी अल्प मुदतीची असतील, ज्यामुळे मालमत्तेचा दर्जा कमी झाला आहे. हे विचारात घेऊन आजीवन अपेक्षित पत तोटा मोजला जातो. भारतीय लेखा मानक १०९ नुसार तरतूद सारणीवरून तोटयांवरील भत्ते (तजवीज) ठरविण्याचा व्यवहारिक उपयुक्त पर्याय कंपनीने निवडला आहे. ही सारणी ग्राहकांची योग्य गटबद्धता किंवा ग्राहकांचे विभाग आणि त्यांची वृद्धिंगता विचारात घेते. सध्याच्या वित्तीय वर्षासाठी कंपनीने ग्राहकांच्या वर्तणुकीवर कोणतीही पुढील दृश्य माहिती तपासलेली नाही.

मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ही सोसायटीच्या येण्यासंबंधी, महावितरणने थकबाकीच्या पुर्नप्राप्तीसाठी दिवाणी न्यायालय, श्रीरामपूर येथे दावा दाखल केला आहे.  जर त्याचा निर्णय महावितरणच्या बाजूने लागला तर थकबाकीविरुद्ध वितरण जाळ्याच्या किंमतीची भरपाई करता येईल. याशिवाय मिळालेल्या फर्मानाच्या पूर्ततेसाठी इतर मत्ता जसे जमीन आणि इमारती वळविणेदेखील शक्य आहे. पुढे, या प्राप्य रक्कमांचा संशयास्पद म्हणून वापर केल्याने नागरी कार्यवाहीवर विपरित परिणाम होऊ शकतो. त्यावरुन मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटीव्ही सोसायटीकडून येणाऱ्या प्राप्तीवर रु. २३१६ कोटीवर अपेक्षित पत तोटा प्रदान करु नये.

तसेच महावितरणने सुरु केलेल्या पुर्नप्राप्तीसाठी कायदेशीर कार्यवाहीचा विचार करुन ग्लोबल टॉवर लिमिटेड, जळगावच्या वितरणधारकांसाठी १३६ कोटी रुपयांच्या रकमेवर अपेक्षित पत तोटयाची तरतूद करण्यात आली नाही.

मराविमं सुत्रधारी कंपनीने पत्र क्र. एम एस ई बी एच सी एल / एफ आर पी/०३६ दि. १३.०४.२०१६ नुसार जुन्या प्राप्तीसाठी रु. ४८१ कोटी आणि संशयास्पद कर्जाच्या तरतुदीसाठी रु. १४९७ कोटी रुपये महावितरणला हस्तांतरीत केले. महाराष्ट्र राज्य विज मंडळाच्या पुनर्रचनेच्यावेळी दि. २०.०५.२००५ रोजीच्या कॅबिनेट नोटमध्ये हे समाविष्ट केले गेले नाही आणि तात्पुरते मराविमं सुत्रधारी कंपनीच्या पुस्तकात ठेवले. हे आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये लेखांकित करण्यात आले आणि चांगले समजले जाणारे असुरक्षित म्हणून व्यापारी प्राप्तीची थकबाकी म्हणून दाखविण्यात आले आहेत. अपेक्षित पत तोट्याची गणना करण्यासाठी, माहिती तंत्रज्ञानातील माहितीच्या आधारावर व्यापारातील प्राप्ती विचारात घेतली जाते आणि उपरोक्त व्यापार प्राप्ती आधीपासून माहिती तंत्रज्ञानातील माहितीमध्ये समाविष्ट केली गेली आहे. म्हणूनच १ एप्रिल २०१५ रोजी त्यांचा व्यापारातील प्राप्ती म्हणून विचार केला गेला आहे.

पुस्तकातील खात्यांनुसार ग्राहकांकडून मिळणारे एकूण उत्पन्न रु. ३२,७६८ कोटी (मागील वर्षी रु. २७६३७ कोटी) आणि माहिती तंत्रज्ञानातील माहितीनुसार रु. ३६,१६० कोटी (मागील वर्षी रु. ३०,६४९ कोटी) मेळामधील फरक रु. ३,३९२ कोटी (मागील वर्षी रु. ३,०१२ कोटी) अजून प्रक्रियेत आहे. तथापि अपेक्षित पततोट्याच्या गणनेसाठी व्यापारातील प्राप्ती माहिती तंत्रज्ञानातील माहितीनुसार विचार घेतली जाते, ह्यातील माहिती खालच्या पातळीवर उपलब्ध असल्याने अधिक विश्वसनीय आहे. सुरक्षा ठेव रक्कमेच्या प्रमाणात व्यापरातील प्राप्ती सुरक्षित, प्राप्ती योग्य मानल्या जातात आणि उर्वरित असुरक्षित प्राप्तीसाठी अपेक्षित पत तोट्याची तरतूद केली जाते.

ग्राहकांकडून सुरक्षा ठेवी पुस्तकातील खात्यांनुसार आणि माहिती तंत्रज्ञानातील माहितीनुसार अनुक्रमे रु. ६,४४५ कोटी आणि ६,४२८ कोटी पुस्तकातील खात्यानुसार आणि माहिती तंत्रज्ञानातील माहितीनुसार ग्राहकांकडून सुरक्षा ठेव दरम्यान १६ कोटी रुपयांचा (वित्तीय वर्ष २०१५-१६ साठी ५४ कोटी) फरक आहे.

**व्यापारी येण्याच्या संदर्भातील अपेक्षित पत तोट्यासाठी केलेल्या तजवीजीचे स्थानांतर खालील तक्यात दिले आहे.**

**(रक्कम कोटीं मध्ये)**

| **तपशील** | **रक्कम** |
|---|---|
| १ एप्रिल २०१५ रोजी अपेक्षित पत तोट्याची तजवीज | ५,९६० |
| वित्तीय वर्ष २०१५-१६ दरम्यान वाढ | १,१३६ |
| वित्तीय वर्ष २०१५-१६ दरम्यान निर्लेखित केलेले रक्कम | १६ |
| ३१ मार्च, २०१६ रोजी अपेक्षित पत तोट्याची तजवीज | ७,११२ |
| वित्तीय वर्ष २०१६-१७ दरम्यान वाढ | ५८७ |
| वित्तीय वर्ष २०१६-१७ दरम्यान निर्लेखित केलेली रक्कम | ६० |
| ३१ मार्च २०१७ रोजी अपेक्षित पत तोट्याची तजवीज | ७,७६० |

**ब) इतर प्राप्ती**

व्यापारातील प्राप्ती व्यतिरिक्त, कंपनीने १ एप्रिल २०१५ पासून इतर वित्तीय मत्तांवर अपेक्षित पत तोट्याच्या (फक्त वेळेचे मूल्य) तजवीजीसाठी मान्यता दिली आहे.

इतर येण्यांच्या संदर्भातील अपेक्षित पत तोट्यासाठी केलेल्या तजवीजीचे स्थानांतर खालील तक्त्यात दिले आहे.

**(रक्कम कोटी मध्ये)**

| तपशील | रक्कम |
|---|---|
| १ एप्रिल २०१५ रोजीची अपेक्षित पत तोट्याची तजवीज | ० |
| वित्तीय वर्ष २०१५-१६ दरम्यान स्थानांतरण | ५४ |
| ३१ मार्च २०१६ रोजीची अपेक्षित पत तोट्याची तजवीज | ५४ |
| वित्तीय वर्ष २०१६-१७ दरम्यान स्थानांतरण | ४२ |
| ३१ मार्च २०१७ रोजीची अपेक्षित पत तोट्याची तजवीज | ९७ |

व्यापारातील प्राप्ती आणि इतर प्राप्तीवरील अपेक्षित पत तोट्याच्या मोजणीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**पत जोखमीचे केंद्रीकरण यावर टीपा**

महावितरणकडे कोणतेही पत जोखमीचे केंद्रीकरण नाही. यात वीज वापराच्या निरनिराळ्या नमुन्यांसह विविध श्रेणीमध्ये २५० लाखांहुन अधिक ग्राहक आहेत.

**क) रोख व रोख सममूल्य**

**(रक्कम कोटींमध्ये)**

| | ३१.०३.२०१७ रोजी | ३१.०३.२०१६ रोजी | ०१.०४.२०१५ रोजी |
|---|---|---|---|
| रोख व रोख सममूल्य | १,३९४ | ५१५ | ४३६ |

**ड) गुंतवणुकी**

उपकंपन्यांमधील गुंतवणुकी आणि इतर गुंतवणुकी विशिष्ट हेतुसाठी आहेत.

**ii) रोकड सुलभतेचे धोके**

रोकड सुलभतेचे धोके म्हणजे महावितरण तिची वित्तीय बंधने वेळेवर पूर्ण करु शकत नाही ते धोके. महावितरण तिचे व्यवहार आणि वित्तीय आश्वासने वेळेवर पूर्ण करण्याची हमी मिळावी म्हणून रोकड सुलभतेचे प्रभावी व्यवस्थापन करण्यावर लक्ष केंद्रीत करते. महावितरणच्या कर्जावर पुरेशा मर्यादा असतात. त्याला संचालक मंडळाची योग्य ती मान्यता असते. महावितरणच्या रोकड सुलभता स्त्रोतांमध्ये प्रवर्तनीय रोकडता प्रवाह, रोख व रोख सममूल्य, बँकांचे निधी व विनानिधी आधारित प्रवाह यांचा समावेश होतो. उद्योग व्यवसायाचे काम सुरळित व सतत चालू रहावे यासाठी रोख व निधी प्रवाह व्यवस्थापन याकडे दैनंदिन लक्ष दिले जाते.

**अ) वित्तिय रचना**

महावितरणच्या विविध बँकातील निधी व विनानिधी यावर मर्यादा असतात. महावितरणच्या संचालक मंडळाने मंजुर केलेल्या कर्ज, उसनवारी यांच्या पुरेशा मर्यादा आहेत. निधीच्या स्त्रोताची विविधता आणि शक्तीवान रोकडता प्रवाह यामुळे आवश्यक ती भांडवली शिस्त लागते. या वित्तीय उत्पादनामध्ये खरेदीदारांमध्ये पत कर्ज, स्वच्छ व प्रतिभूती असलेली देशांतर्गत मुदतीची कर्जे यांचा समावेश होतो.

**ब) खेळते भांडवल सुविधा आणि दिलेल्या प्रतिभूतीसाठी व्यवस्था**

खेळत्या भांडवलाच्या सुविधेमध्ये (निधीवर आधारित आणि विनानिधी) रोख कर्जाची सुविधा आणि खेळत्या भांडवलाच्या मागणीसाठी कर्जे यासाठी एकत्रितपणे रु. ७००० कोटींची (मागील वर्षी रु. ७००० कोटी) व्यवस्था विविध बँकांमध्ये केली गेली आहे. तपशील खाली दिले आहेत.

| तपशील | निधीवर आधारित मर्यादा (रोख कर्ज/ सुविधा/खेळत्या भांडवलासाठी कर्जाची मागणी) | ३१.०३.२०१७ रोजी निधीवर आधारित मर्यादेसाठी शिल्लक | ३१.०३.२०१७ रोजी खेळत्या भांडवलासाठी कर्जाच्या मागणीची शिल्लक | विनानिधी आधारित मर्यादा | ३१.०३.२०१६ रोजी विनानिधी आधारित मर्यादेची शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| कॅनरा बँक | १,५०० | - | १,५०० | २,०५० | १,८२६ |
| बँक ऑफ महाराष्ट्र | ६३७ | - | | ११७ | १८ |
| बँक ऑफ इंडिया | ३४० | - | ३४, | ९५० | २०२ |
| आय डी बी आय बँक | १५० | - | | ३५० | - |
| युनायटेड बँक ऑफ इंडिया | ४९० | - | ४९० | - | - |
| सिंडिकेट बँक | ३८२ | - | ३५० | ३३ | - |
| **एकूण** | **३,५००** | **-** | **२,६८०** | **३,५००** | **२,०४७** |

उपरोक्त कामकाजाच्या सुविधा विना- एस्क्रो (निलंबलेख संपत्ती) मंडळाच्या सध्याच्या आणि भविष्यातील पुस्तकी कर्जाच्या तारणगहाणने सुरक्षित आहेत.

उदय योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाकडन प्राप्त झालेले कर्ज लक्षात घेता, ३१.०३.२०१७ रोजी रोख कर्ज वापरण्यात आलेले नाही.

**क) वित्तीय दायित्वांची परिपक्तता**

वित्तीय दायित्वांच्या मुदतींचे विवरण यासोबत जोडलेले आहे.

करारानुसार आणि करार नसलेल्या रोकडता प्रवाहातील रकमा खालील तक्त्यात प्रकट केल्या आहेत.

**iii)** बाजारपेठेतील धोके - बाजारातील धोक्यांचे पुढील धोक्यांमध्ये वर्गीकरण केले आहे. १) चलनातील धोके २) व्याजदरांचे धोके

**अ) चलनातील धोके**

महावितरणने कोणताही चलनातला धोका नाही कारण त्यात परकीय चलन कर्जाचा कोणताही खुलासा नाही.

**ब) व्याजदरातील धोक्यांचा खुलासा**

कर्जावरील व्याजदरातील संभाव्य बदलांमुळे महावितरणला व्याजदर जोखीम उद्‌भवते. महावितरणच्या व्याजधारक वित्तीय विलेखातील व्याजदरांची रुपरेखा खालीलप्रमाणे आहे.

**(रक्कम कोटी मध्ये)**

| | **धारण केलेली रक्कम** | | |
|---|---|---|---|
| | ३१.०३.२०१७ | ३१.०३.२०१६ | ०१.०४.२०१५ |
| स्थिर दरांचे विलेख | | | |
| वित्तीय दायित्वे - कर्जे (उसनवारी) | ७०२८ | २४३ | १०२३ |
| दर बदल होणारे विलेख | | | |
| वित्तीय दायित्व - कर्जे (उसनवारी) | २०,५४० | १३,४५७ | १३,४११ |

### क) दर बदल होण्याच्या विलेखांसाठी रोकडता प्रवाहाचे विश्लेषण

अहवालाच्या तारखेला व्याजदरात २५ आधार अंक (बेसीस पॉइंट) इतका रास्त व शक्य बदल झाला असता तर त्यामुळे नफा किंवा तोटा यात होणारी वाढ/ (घट) खालील तक्त्यात दिली आहे तसेच निदर्शक २५ आधार अंक (बेसीस पॉइंट) (०.२५%) यामुळे स्थलांतर हे केवळ दिशादर्शक आहे आणि त्यातून व्यवस्थापनाचे व्याजदराबद्दलचे अंदाज व्यक्त होत नाहीत.

**(रुपये लाखांत)**

| | २५ बीपी वाढ | २५ बीपी वाढ | २५ बीपी वाढ | २५ बीपी वाढ | २५ बीपी वाढ | २५ बीपी वाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३१.०३.२०१७ | | ३१.०३.२०१६ | | ३१.०३.२०१५ | |
| बदलत्या (चल) दराची कर्जे | (३३.७८) | ३३.७८ | (३३.०४) | ३३.०४ | (३०.९७) | ३०.९७ |
| रोखप्रवाह संवेदनशीलता (निव्वळ) | (३३.७८) | ३३.७८ | (३३.०४) | ३३.०४ | (३०.९७) | ३०.९७ |

### ७) नियामक मत्ता

भारतीय लेखामानक ११४ रेग्युलेटरी डेफ्रेल खात्यांप्रमाणे, वीज वितरणाचा व्यवसाय ही दर नियामक क्रिया आहे. ज्यामध्ये महाराष्ट्र वीज नियामक आयोग, नियामक वितरण कंपन्यांकडून प्रचलित नियमनांनुसार त्यांच्या ग्राहकांना आकारल्या जाणाऱ्या शुल्काचा दर ठरविते.

महाराष्ट्र वीज नियामक आयोग बहुवर्षीय दर नियमन २०१५, (बहुवर्षीय दर नियमन) १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ दरम्यान सुरु होणाऱ्या कालावधीसाठी लागू आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने महावितरणसाठी वित्तीय वर्ष २०१६-१७ ते वित्तीय वर्ष २०१९-२० या कालावधीसाठी दर ठरविले आहेत.

पूर्वीच्या भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या लेखामानकांचा वापर महावितरणने नियामक मत्ता/दायित्वे यांना मान्यता देण्यासाठी केला. त्याचप्रमाणे भारतीय लेखामानक ११४ नुसार त्यांना मान्यता देणे चालू आहे.

पुढील वर्षासाठी पडताळणीसाठी निर्धारित दरपत्रक पार पाडताना अंदाजित महसुलातील अंतर महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मान्य करणे अपेक्षित आहे. त्या मर्यादेपर्यंत नियामक मत्तांना मान्यता दिली जाते.

**३१ मार्च २०१७ रोजीचा महावितरणचा नियामक मत्ता/दायित्वे यांमधील मेळ खालीलप्रमाणे** **(रक्कम कोटी मध्ये)**

| | | ३१.०३.२०१७ रोजी | ३१.०३.२०१६ रोजी | ३१.०३.२०१५ रोजी |
|---|---|---|---|---|
| अ) | प्रारंभिक नियामक मत्ता | २५२४ | २२४ | ३९५ |
| | वर्षादरम्यान नियामक उत्पन्न | | | |
| | i) वीज खरेदीची किंमत | ४७,५१६ | ४४,०३४ | ४९,०८८ |
| | ii) आर ओ ई वगळून इतर आकारणीच्या नियमांनुसार इतर खर्च | ११,४८४ | १५,८२३ | ८,७६५ |
| | iii) वर्षातील महसुलाचा हिशब | ५६,६८५ | ५७,५५७ | ५७,६२९ |
| ब) | नियामक उत्पन्न/(खर्च) (i+ii+iii) | २,३१५ | २,३०० | २२४ |
| क) | मागील वर्षाचे मंजूर केलेले/नामंजूर केलेले उत्पन्न | -२,५२४ | ० | -३९५ |
| ड) = अ+ब+क | अखेरच्या नियामक मत्ता | २,३१५ | २,५२४ | २२४ |

## ८) वीजदरातील सवलतीसाठी महाराष्ट्र शासनाचे अर्थसहाय्य :

विद्युत अधिनियम २००३ चे कलम ६१ व ६२ अनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला वीजदर निश्चितीचे अधिकार आहेत. तसेच या अधिनियमाच्या कलम ५६ नुसार राज्य शासनाला ग्राहकांना वीज दरामध्ये सवलती देण्याचे अधिकार आहेत.

ग्राहकांना किंवा ग्राहकांच्या श्रेणींना दिलेल्या सवलतीपोटी राज्य शासन कंपनीला प्रतिपूर्ती देते. ही प्रतिपूर्ती म्हणजे अर्थसहाय्य नसते. त्यामुळे कंपनी तिच्या लेखा पुस्तकात या सवलतीचा लेखा ''महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त होणारी येणी'' आणि ''वीज विक्रीचा महसूल'' म्हणून महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचा वीज दरासोबत करते म्हणून ग्राहकांना महाराष्ट्र शासनाने दिलेले सवलत अर्थसहाय्य यांना कंपनीचे 'अर्थसहाय्याचे उत्पन्न' अशाप्रकारे नोंदले जात नाही.

म.वि.नि.आयोग वीज दरांची निश्चिती करताना राज्य शासनातर्फे ग्राहकांना किंवा ग्राहकांच्या काही श्रेणींना जर काही सवलत दिली जात असेल तर त्याचा विचार करीत नाही. म.रा.वि.नि आयोगाने निश्चित केले की, वीज दर हे पूर्ण वीज दर असतात आणि त्यामध्ये कोणतेही अर्थसहाय्य केलेले/सवलत दिलेले दर समाविष्ट नसतात. अशा प्रकारे ऊर्जा विक्रीचा महसूल यात सवलती दराची नोंद असते ती म.वि.नि. आयोगाच्या दराने असते. म्हणजेच कोणत्याही ग्राहकाला किंवा ग्राहक श्रेणीला वीज दरात शासनाने सवलत/अर्थसहाय्य दिले तरी त्याचा समावेश नसतो. म्हणून महाराष्ट्र शासनाने दिलेले अर्थसहाय्य हे संबंधित ग्राहक/ग्राहकांची श्रेणी यांच्या कृतीने त्यांच्या देयकाचे प्रमाणात केलेला अंशतः भरणा आहे.

**(रक्कम कोटी मध्ये)**

| **वर्ष** | **प्रारंभिक शिल्लक महाराष्ट्र शासनाकडून मिळालेली** | **लेखा केलेले अनुदान** | **अनुदान मिळालेले / समायोजित केलेले** | **महाराष्ट्र शासनाकडून येण्यासंबंधी शिल्लक** |
|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | २६२० | ६७७५ | ७७१६ | १६८० |
| २०१६-१७ | १६८० | ७७८० | ६२३० | ३२३० |

## ९) वितरण फ्रेंचायजी करार खंडित करणे :

### i) मेसर्स ग्लोबल टॉवर लि.

औरंगाबाद परिसरातील विविक्षित वितरण फ्रेंचायजी क्षेत्रासाठी एक वितरण फ्रेंचायजी करार मे. ग्लोबल टॉवर लि. सोबत दि. २३/२/२०११ रोजी केला होता. आणि हे क्षेत्र जी टी एल यांना दि. १/५/२०११ रोजी सुपूर्द केले होते. डी एफ एच तरतुदीनुसार महावितरणकडून औरंगाबादच्या डी एफ क्षेत्राच्या अंतर्गत पॉइंटवर येथून दिलेल्या विजेसाठी जी टी एल ने ठराविक मुदतीत बीजकाची रक्कम भरणे आवश्यक होते. जी टी एल महावितरणच्या बीजकाची रक्कम वेळेत भरु शकत नव्हती त्यामुळे थकबाकी वाढत गेली.

जी टी एल सोबतच्या वितरण फ्रेंचायजी करार दि. १० नोव्हेंबर २०१४ पासून खंडित करण्यात आला आणि कंपनीने वितरण फ्रेंचायजी क्षेत्र पुढील प्रवर्तनासाठी आपल्या ताब्यात घेतले. जी टी एल सोबत अंतिम येणे अजून चुकते झालेले नाही आणि मंडळासोबत योग्य विचार विमर्श चालू आहे. म्हणून दि. ३१ मार्च २०१७ पर्यंत जी टी एल कडून येणे रक्कम १३,६२१.२२ लाख पुस्तकात दाखवून ती अंतिम समझोत्याच्या अधीन आहे. प्राप्य रक्कम पुनर्प्राप्तीसाठी कायदेशीर कार्यवाही सुरु केली जात आहे.

### ii) मेसर्स क्रॉम्प्टन ग्रीव्हस् लि.

जळगावच्या विविक्षित क्षेत्रासाठीच्या वीज वितरण फ्रेंचायजी क्षेत्रासाठी मेसर्स क्रॉम्प्टन ग्रीव्हस् लि. सोबत करार करुन ते क्षेत्र दि. १/११/२०११ रोजी मेसर्स सी जी एलकडे सुपूर्द केले. मात्र महावितरणने दिलेल्या बीजकाची रक्कम सी जी एल वेळेवर भरु शकली नाही. यामुळे सी जी एल चा या विविक्षित क्षेत्रासाठी केलेल्या वितरण फ्रेंचायजी करार महावितरणने १०/८/२०१५ पासून समाप्त केला आणि इतर क्षेत्राचे कार्य महावितरणने दि. १२/०८/२०१५ पासून पुन्हा आपल्याकडे घेतले.

वितरण फ्रेंचायजी कराराच्या समाप्तीनंतर स्वतंत्र लेखापरिक्षकाने सी जी एल ची सर्व चलने पडताळण्यास सांगितले आणि सी जी एल ची शेवटची थकबाकीची रक्वम सक्षम प्राधिकाऱ्याने एकदा मंजूर केल्यानंतर सी जी एल च्या चुकार देयकांवर स्वतंत्रपणे व्याज आकारले जाईल असे मत व्यक्त केले.

दुसरीकडे सी जी एलने नोडल ऑफिसला विविध प्रतिदावे सादर केले. सी जी एल च्या सर्व दाव्यांची छाननी करण्यात येते.

निव्वळ देय रक्कम रु. ३५ कोटी सी जी एल ला दिले ते खालीलप्रमाणे

**(रक्कम कोटी मध्ये)**

| व्यवहाराची तारीख | हस्तांतरित रक्कम | लाभार्थीचे नाव | लाभार्थीच्या खात्यावर प्राप्त झालेल्या जमा रकमेची तारीख |
|---|---|---|---|
| १३.०१.२०१७ | ८ | मेसर्स क्रॉम्प्टन ग्रीव्हस् लि. | १६.०१.२०१७ |
| १.०३.२०१७ | १३ | मेसर्स क्रॉम्प्टन ग्रीव्हस् लि. | ०२.०३.२०१७ |
| २३.०३.२०१७ | १४ | मेसर्स क्रॉम्प्टन ग्रीव्हस् लि. | २४.०३.२०१७ |
| **एकूण** | **३५** | | |

मेसर्स क्रॉम्प्टन ग्रीव्हस् लि., स्वतंत्र लेखापरिक्षक आणि नोडल व झोनल कार्यसंघ यांच्याबरोबर संयुक्त बैठक दिनांक १४.०२.२०१७ रोजी झाली. बैठकीदरम्यान, स्वतंत्र लेखापरिक्षकांनी दोन्ही पक्षांना त्यांचे भागाचे व्याज, जर असेल तर त्याची गणना करण्यासाठी विचारले.

मेसर्स क्रॉम्प्टन ग्रीव्हस् लि.ने मूल्यवर्धित करासाठी रु.१ कोटी रुपयांसाठी आणखी एक दावा दि. २.०४.२०१७ रोजी दाखल केला. सी जी एल च्या बाजूने न संपणारे दावे दाखल करणे विचारात घेता, खाते बंद करण्यास अंतिम स्वरुप देता आलेले नाही. शेवटी महावितरणने सी जी एल ला ११ कोटी रुपयांचे व्याज लावले आणि २८.०६.२०१७ रोजी स्वतंत्र लेखापरिक्षकांकडून व्याज परिक्षण लेखापरिक्षित करण्यात आले.

१४.०२.२०१७ च्या बैठकीदरम्यानच्या चर्चेनुसार, व्याजाची गणनांची माहिती सी जी एल ला पत्र क्रमांक सीई/जे एल जी/झेड/ एफ अॅन्ड ए / सी जी एल/१९७७ दिनांक २८.०७.२०१७ नुसार नोडल कार्यालय जळगावकडून देण्यात आली.

तथापि सीजीएलद्वारे पत्र क्र. सी जी एल/डी एफ/जे एल जी/जे एल वाय /०२ दिनांक ३१.०७.२०१७ नुसार कळविले आहे की, प्राप्तीयोग्य रक्कम बदलण्याची शक्यता असल्यामुळे या टप्प्यावर व्याजनिश्चिती करणे स्वीकार्य नाही.

महावितरणने राखून ठेवलेला मूल्यवर्धित कराचा नवीनतम दावा आणि थकबाकीच्या रकमेचे संकलन विचारात घेता, निव्वळ प्राप्तीयोग्य रक्कम व्याज प्रभावित केल्यानंतर रु. ५ कोटी येते.

माहित तंत्रज्ञान डाटा बेसनुसार सी जी एलच्या फ्रेंचायजी कालावधी दरम्यान ग्राहकांची थकबाकी सध्या रु. ७७ कोटी आहे. निव्वळ वसुली रु. ५ कोटी सीजीएल कालावधीतील थकबाकीची वसुली करुन सहज समायोजित केले जाऊ शकतात.

**१०) विलंब भरणा आकार व थकबाकीवरील व्याज यांचे लेखा धोरणातील बदल:**

जे ग्राहक सतत तीन महिने त्यांच्या देयकाचे पैसे भरत नाहीत त्यांच्यावर लावण्यात येणारा विलंब भरणा आकार व थकबाकी वरील व्याज या संबंधीचे महसूली लेखा करण्याची पद्धत ऑक्टोबर २०१५ च्या देयक महिन्यापासून बदलण्यात आली. आणि हा लेखा उपार्जन तत्वावर करण्याऐवजी प्राप्तीच्या तत्वाच्या आधारे करण्याचे ठरले. अशा ग्राहकांवर लावलेला विलंब भरणा आकार व व्याज याला लेखा पुस्तकात स्थगित उत्पन्न (दायित्व) असे मानण्यात येईल. तो मिळाल्यानंतर त्यास उत्पन्न म्हणून मान्यता देऊन त्याचे स्थगित उत्पन्न (दायित्व) येथून स्थानांतरण केले जाईल.

यापूर्वी जर ग्राहकाने दिलेल्या मुदतीत मागील महिन्यचे देयक भरले नाही तर चालू महिन्याचे देयक तयार करताना डी पी एस व थकबाकीवरील व्याज याला उपार्जन तत्वावर 'उत्पन्न' म्हणून मान्यता दिली जात असे.

चालू वर्षी रु. २०७१ कोटी (मागील वर्षी रु.१०० कोटी) एवढी रक्कम स्थगित उत्पन्नाची नोंदली आहे. आणि ती या वर्षीची चालू दायित्व म्हणून दाखविली जाते.

## ११) कर आकारणी

### i) चालू कर

आयकर कायद्याच्या १९६१ च्या नियमांनुसार वर्षभरात कोणतेही करपात्र उत्पन्न नसल्यामुळे आयकरासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. आणखी, आयकर कायदा १९६१ च्या कलम ११५ जेबी अंतर्गत किमान वैकल्पिक करानुसार कोणतेही कर दायित्व नाही.

### ii) स्थगित कर

**स्थगित करात खालील गोष्टींचा समावेश आहे.**

**(रक्कम कोटीमध्ये)**

| अनु.क्र. | तपशील | ३१.०३.२०१७ रोजी | ३१.०३.२०१६ रोजी |
|---|---|---|---|
| | स्थगित कर दायित्वे | | |
| १. | घसाऱ्यामधील फरक | ५,१०१ | ४,४१९ |
| | स्थगित कर मत्ता | | |
| १. | देयकांच्या आधारावर मान्य खर्च | १,३५२ | १,२७१ |
| २. | अशोषित घसारा/हानी | ५,८३९ | ३,८४५ |
| ३. | संशयास्पद कर्जासाठी तरतूद | २,४७२ | १३० |
| | निव्वळ स्थगित कर मत्ता/(दायित्वे) | ४,५६२ | ८२८ |

भविष्यात करयोग्य उत्पन्न निर्माण होण्याबाबतीत अनिश्चितता लक्षात घेता, स्थगित मालमत्ता तयार केली गेली नाही.

## १२) मालमत्तेचे (नुकसान) कमजोरी

मत्तांच्या कमजोरीसाठी भारतीय लेखामानक ३६ नुसार व्यवस्थापनाने त्यांच्या मत्तांचा आर्थिक कामगिरीच्या संदर्भात आढावा घेतला आहे. पुनरावलोकनाच्या आधारावर, व्यवस्थापनाचे मत असे आहे की, कंपनीच्या मत्तांची आर्थिक कामगिरी वाजवी आहे आणि म्हणूनच ताळेबंदाच्या तारखेला तेथे कोणतीही कमजोरी नाही.

## १३) सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांबद्दल माहिती

सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे बहुगुणनत्व आणि खात्यांच्या ओळखीची अडचण लक्षात घेऊन एमएसएमईडी अधिनियम २००६ नुसार दिलेले व्याज/देय असलेल्या व्याजासह वर्षाच्या शेवटी न भरलेल्या रकमेबाबत प्रकटने दिलेली नाहीत.

## १४) परकीय चलनाचे कंत्राट

भारत सरकारच्या संस्थांना कंपनीने कोणतीही कंत्राटे दिलेली नाहीत. त्यामुळे परकीय चलनातील कंत्राटाच्या रकमा येणे/देणे नाहीत व त्याबाबत कोणतीही कृती करावयाची नाही.

## १५) संख्यात्मक तपशील

खरेदी केलेल्या व विक्री केलेल्या विजेच्या युनीटची संख्यात्मक माहिती खालीलप्रमाणे आहे.

**(एमकेडब्ल्यूएच मध्ये)**

| तपशील | वित्तीय वर्ष २०१६-१७ | वित्तीय वर्ष २०१६-१७ (%) | वित्तीय वर्ष २०१५-१६ | वित्तीय वर्ष २०१५-१६ (%) |
|---|---|---|---|---|
| एकूण वीज खरेदी | १,१८,३२८ | | १,१६,३२४ | |
| मुक्त प्रवेश गुंतवणूक | ७,६६१ | | *६,२८९ | |
| विक्रीसाठी एकूण उपलब्ध असलेली वीज | १,२५,९८९ | | *१,२२,६१३ | |
| वीजवाहक तारांची जाळी आणि पारेषण हानी | ९,१९५ | ७.३० | ७,५३७ | ६.१५ |
| विक्रीसाठी उपलब्ध असलेली वीज | १,१६,७९४ | | १,१५,०७६ | |
| मुक्त प्रवेश विक्री | ७,२०२ | | ५,९११ | |
| विकलेली वीज | ९९,६४७ | | ९८,३८३ | ८४.५८ |
| वितरण हानी | १७,१४७ | १४.६८ | १६,६९३ | १४.३५ |

वित्तीय वर्ष २०१५-१६ च्या रकमा पुन्हा वर्गीकृत केल्या आहेत. वरील माहिती कंपनीने ऊर्जा शिल्लक अहवाल याआधारे मिळविली असून लेखापरिक्षकांनी त्यावर विश्वास ठेवला आहे.

## १६) लेखापरिक्षकांचे पारिश्रमिक

**(रक्कम लाखांत)**

| अनु.क्र. | तपशील | वित्तीय वर्ष २०१६-१७ | वित्तीय वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|---|
| १ | वैधानिक लेखापरिक्षण | ९०.०० | ६६.०० |
| २ | खर्चाची परतफेड | ८.३५ | ५.४९ |
| ३ | लेखापरिक्षण शुल्कावर सेवा कर / जीएसटी | १६.२० | ११.६१ |

## १७) परकीय चलनातील खर्च (लेखा तत्वानुसार)

परकीय चलनात रु. ०.८२ लाख (मागील वर्षी १.९१ लाख) इतका प्रवास खर्चासाठी खर्च झाला.

## १८) सरकारी अनुदान व ग्राहकांचे योगदान

वितरण जाळ्यांच्या खर्चासाठी सरकारी अनुदान, अर्थसहाय्य आणि ग्राहकांचे योगदान प्राप्त झाले आहे. त्याचा सरकारी अनुदान म्हणूनच लेखा केला जातो. आणि त्या मत्तेच्या उपयुक्त जीवनाप्रती त्याची परतफेड केली जाते. या अनुदानाशी संलग्न कोणत्याही इतर अपूर्ण अटी व किंवा आकस्मिकता नाहीत.

**(रक्कम कोटी मध्ये)**

| तपशील | ३१.०३.२०१७ | ३१.०३.२०१६ |
|---|---|---|
| १ एप्रिल रोजी | ५,०७३ | ३,७७४ |
| वर्षादरम्यान प्राप्ती | २,०५० | १,७७१ |
| नफा आणि तोटा पत्रकात परतफेडीची तरतूद | ५५३ | ४७२ |
| ३१ मार्च रोजी | ६,५६९ | ५,०७३ |
| चालू | ७४८ | ६४४ |
| चालू नसलेले | ५,८२१ | ४,४२९ |

## १९ आर एपीडीआरपी योजना (भाग अ आणि ब) अंतर्गत कर्जाचे अनुदानात रुपांतर :

भारत सरकारच्या वीज मंत्रालयाचे पूनर्रचित वीज विकास आणि सुधारणा कार्यक्रम (आर पी डी आर पी) जुलै २००८ मध्ये सुरू केली. यात पुढील बाबींवर लक्ष केंद्रीत करण्यात आले.

आधार माहिती रेषा स्थापन करणे, जबाबदाऱ्या निश्चित करणे, एकूण तांत्रिक व वाणिज्य हानी कमी करण्यासाठी उप-पारेषणाचे व वितरणाचे जाळे बळकट करणे आणि १२ व्या योजनेत माहिती तंत्रज्ञानाचा अंगीकार करणे इ. योजनेतील प्रकल्प दोन भागात घेण्यात आले.

### ब) आर - एपीडीआरपी - भाग 'अ'

महावितरणाच्या अधिकार क्षेत्रातील ज्यांची जनसंख्या वर्ष २००१ च्या जनगणनेनुसार ३०,००० पेक्षा जास्त आहे. अशा १२८ शहरांत आर-एपीडीआरपी ची भाग - अ ची अंमलबजावणी होत आहे. तर जेथे लोकसंख्या वर्ष २००१ च्या जनगणनेनुसार ४ लाखांपेक्षा जास्त आहे, तेथे आर - एपीडीआरपी (भाग -अ) /स्काडा (सुपरव्हायजरी कंट्रोल ॲण्ड डेटा ॲक्वीझीशन अर्थात पर्यवेक्षकीय नियंत्रण आणि माहिती संपादन) अंमलात आणली आहे, तेथे वार्षिक उर्जा वापरही ३५० दशलक्ष युनिट झाला पाहिजे.

### भाग - ए चे उद्दिष्ट पुढीलप्रमाणे आहे :

आधार माहिती रेषा स्थापन करणे व उर्जा लेखे, परीक्षण, अंकेक्षण यासाठी माहिती तंत्रज्ञान वापर तसेच माहिती तंत्रज्ञान आधारित ग्राहक सेवा केंद्रे स्थापन करणे.

प्रारंभी मंजुरी प्राप्त प्रकल्पांना १०० टक्के निधी भारत सरकारच्या तर्फे कर्ज रुपाने पुरवला जाईल. त्याच्या अटी वित्त मंत्रालय निश्चित करेल. प्रकल्प पूर्ण झाल्यावर या कर्जाचे रुपांतर अनुदानात करण्यात येणार आहे. त्यासाठी स्वतंत्र संस्थेमार्फत योग्यतेसाठी पडताळणी केली जाईल.

(रक्कम कोटींत)

| तपशील | आर एपीडी आरपी भाग अ | आर एपीडी आरपी भाग ब - स्काडा | टिप्पणी |
|---|---|---|---|
| मंजूर रक्कम | २६० | ११७ | आर एपीड आरपी भाग अ<br>आरंभी ९१५ कोटी मंजूर रक्कम होती पीएफसीने २६० कोटींच्या सुधारित मंजुरीसाठी ३०/०१/२०१७ ला मान्यता मंजूर केली.<br>स्काडा भाग अ<br>प्रारंभिक मंजूरी १६१ कोटी रुपये होती तथापि शहरातील डीएमएस मध्ये घट झाल्यास मंजुरीत रकमेत ११७ कोटी रुपये सुधारणा करण्यात आली आहे. |
| पीएफसीतर्फे संवित-रण ३१.०३.२०१७ रोजी | १९२ | ४८ | |
| ३१.०३.२०१७ रोजी खर्च | २२५ | ३९ | |
| निविदकरण केल्यावर अनुदानात रुपांतरण करण्यास पात्र | २६० | १०३ | कराराच्या पत्रानुसार देण्यात आले. |

भाग - अ मधील सर्व १२८ शहरांचे प्रकल्प पूर्ण झाले व ते ऑक्टोबर २०१४ पासून कार्यान्वित झाल्याचे घोषित करण्यात आले. पीएफसीने नियुक्त केलेल्या तिसऱ्या पदाच्या खाजगी संस्थेने त्यांचे फेरपरिक्षण केले व दि. १२.०९.२०१६ रोजी पीएफसीला अहवाल सादर केल्याची माहिती आहे. ०२.०८.२०१७ रोजी पीएफसीला सादर केलेल्या उपयोग दाव्यासाठीच्या तिसऱ्या भागाची मुक्तता करावी. तिसऱ्या टप्याचे वितरण झाल्यानंतर १०% अंतिम हफ्ता हा पीएफसीला दिला जाईल. त्यानंतर कर्जाचे अनुदानात रुपांतरण करण्यात येईल.

**आर - एपीडीआरपी भाग - अ स्काडा**

सर्व ८ महानगरात नियंत्रण केंद्रीय कार्यान्वित केली.

एकुण २६८ रिमोट टर्मिनल युनिट्स पैकी २३१ ची स्थापना पूर्ण झाली.

एकुण १६५४ फिडर रिमोट टर्मिनल युनीट्स पैकी १५६४ युनीट स्थापन झाले.

अमरावती आणि मालेगाव शहरातील स्काडा पुर्ण.

सांगली, सोलापूर आणि कोल्हापुर शहरातील अधिकृत आरटीयू आणि एफआरटीयू साठी स्काडा पुर्ण केले आहेत. पीएफसीने डिसेंबर २०१७ पर्यंत स्काडासाठी प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी वाढविला आहे.

यातील पात्र रक्कम रु. १०३ कोटी असून पीएफसी तिचे डिसेंबर २०१८ दरम्यान अनुदानात रुपांतर करील अशी अपेक्षा आहे. (पीएफसीने नियुक्त केलेल्या तिसऱ्या पक्षाच्या खासगी संस्थेकडून फेर तपासणी झाल्यानंतर)

**आर - एपीडीआरपी भाग - ब**

आर - एपीडीआरपी भाग - २ यांची अंमलबजावणी महाराष्ट्रातील ज्या शहरांची संख्या वर्ष २००१ व्या जनगणनेनुसार ३०,००० पेक्षा जास्त आहे आणि जेथील एकूण तांत्रिक व वाणिज्यिक हानी १५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे अशा १२३ शहरांत (१२० भाग 'ब' मधील आणि ३ शहरे स्काडाला समर्थन करण्याच्या घटकांनीयुक्त असलेली) झाली. आर-एपीडीआरपी भाग - २ जून २०१० ते फेब्रुवारी २०१२ यासाठी मंजूर झाला.

**(रक्कम कोटी मध्ये)**

| तपशील | आर-एपीडीआरपी भाग - ब |
|---|---|
| मंजुर रक्कम | ३,१११ |
| ३१/०३/२०१७ रोजी पीएफसी / आरइ-सी यांनी संवितरीत केलेली रक्कम | १,७३३ |
| ३१/०३/२०१७पर्यंतचा खर्च | १,७९१ |
| अनुदानात रुपांतर होण्यास पात्र रक्कम | १,५५५<br>एकूण तांत्रिक व वाणिज्यिक हानी १५ टक्क्यांपेक्षा कमी झाल्यावर कर्जाच्या ५० टक्के रकमेचे अनुदानात रुपांतरण होईल. |

भाग - ब चे उद्दिष्ट - वितरण व क्षमता वर्धमाचे प्रकल्प बळकट करून एकूण तांत्रिक व वाणिज्यिक हानी १५ टक्केच्या खाली आणणे.

भाग - ब च्या प्रकल्पामुळे प्रत्येक शहरातील एकूण तांत्रिक व वाणिज्यिक हानी १५ टक्केपेक्षा कमी झाल्यावर कर्जाच्या ५० टक्के रकमेचे अनुदानात रुपांतरण होईल.

या अनुदानाचे १० टक्के या प्रमाणात ५ समान भाग होतील.

जर कंपनी एखाद्या विशेष वर्षात एकूण तांत्रिक व वाणिज्यिक हानी १५ टक्क्याने कमी करण्यात अयशस्वी झाली तर त्यावर्षाच्या अनुदानाच्या वाटपाचे पुन:कर्जात रुपांतरण होईल. तांत्रिक व वाणिज्यिक हानीच्या आधारभूत रेषेपेक्षा १५ टक्क्यांच्या लक्षापेक्षा जितकी दूर असेल त्याप्रमाणात अनुदानाचे कर्जात रुपांतरण होईल.

११९ शहरांतील काम पूर्ण झाले आणि पीएफसीने उर्वरित ४ शहरांसाठी प्रकल्प कालावधी मार्च २०१८ पर्यंत वाढविला आहे.

जी शहरे पूर्ण झाली आहेत असे घोषित केले आहे त्यांच्या तांत्रिक व वाणिज्यिक हानीची पडताळणी करण्यासाठी पीएफसीने तिसऱ्या पक्षाच्या स्वतंत्र संस्थेची नियुक्ती केली आहे.

ही योजना पूर्ण झाल्यानंतर कर्जाचे अनुदानात रुपांतरण करावयाच्या निकषांनुसार पीएफसी रुपांतरणाबाबत विचार करेल.

## २०) दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना आणि समेकित विद्युत विकास योजना

ग्रामीण भागांसाठी कृषि आणि बिगर कृषि फिडर वेगळे करण्याकरिता, उपपारेषण आणि वितरण पायाभूत सुविधा व ग्रामीण

विद्युतीकरणाचे सशक्तीकरण आणि क्षमतावाढ करण्यासाठी भारत सरकारने ''दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना'' सुरु केली आहे. या योजनेत राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेचा (आरजीजीवीवाय) आधीचा कार्यक्रम समाविष्ट आहे. ग्रामीण विद्युतीकरण निगम ही नोडल एजन्सी आहे.

शहरी क्षेत्रातील उपपारेषण आणि वितरण जाळ्यांच्या सशक्तीकरणासाठी आणि शहरी भागात डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफॉर्मर/फीडर/ग्राहकांसाठी मीटर लावण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने समेकित विद्युत विकास योजना सुरु केली. तांत्रिक आणि वाणिज्यिक हानी कमी करण्यासाठी या योजनेची मदत होईल. माहिती तंत्रज्ञानाच्या आस्थापनेमुळे ऊर्जालेखा/लेखापरिक्षण यंत्रणेची स्थापना, मीटरनुसार उपभोगावर आधारित वीज बीले आणि वसुली करण्याच्या क्षमतेत सुधारणा करणे शक्य होईल. वीज वित्त निगम ही नोडल एजन्सी आहे.

महावितरणने दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना आणि समेकित विद्युत विकास योजनेत भाग घेतला आहे आणि या योजनांच्या अंतर्गत प्रकल्प परिपूर्ण आधारावर कार्यान्वित केले आहेत. या योजने अंतर्गत प्राप्त झालेली रक्कम वेगळ्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. आणि ऊर्जा मंत्रालयाच्या निर्देशानुसार, आणि वापरलेल्या अनुदानाच्या घटकावर कमावलेले व्याज भारत शासनाच्या खात्यात नियमितपणे पाठविले जाईल.

**३१.०३.२०१७ रोजी मिळालेले अनुदान, वापरलेले, वापरल्यानंतरची शिल्लक आणि मुदत ठेवीची रक्कम खालीलप्रमाणे आहे.**

**(रक्कम कोटी मध्ये)**

| तपशील | डीडीयुनेजीवाय | आयपीडीएस | एकूण |
|---|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | निरंक | निरंक | निरंक |
| प्राप्त अनुदान | २५२.८८ | १७६.८३ | ४२९.७१ |
| वापरलेले अनुदान | ५.६५ | १५.७० | २१.३५ |
| वापरल्यानंतरची शिल्लक | २४७.२३ | १६१.१३ | ४०८.३६ |
| मुदत ठेव रक्कम (कॅनरा बँक) | २४७.९७ | १६३.६० | ४११.५७ |
| भारत शासनाला देय व्याज | १.१६ | ०.८९ | ३.६९ |

टीपा - २०१६-१७ मध्ये रु. १.६३ कोटी महाराष्ट्र शासनाला दिले.

## २१) उज्वल डिसकॉम ॲश्युरन्स योजना (उदय)

कर्जात अडकलेल्या वितरण व्यवस्थेला कायमस्वरुपी आणि शाश्वत उपाययोजना सुनिश्चित करण्यासाठी वित्तीय स्थिरता आणि वाढ साध्य करण्यासाठी भारत सरकारने २० नोव्हेंबर २०१५ ला उदय योजना सुरु केली.

ऊर्जा मंत्रालय भारत सरकार, महाराष्ट्र शासन आणि महावितरण यांच्यामध्ये ७/१०/२०१६ रोजी त्रिपक्षीय सामंजस्य करार कार्यान्वित करण्यात आला.

सामंजस्य करारानुसार, महाराष्ट्र शासनाने ३० सप्टेंबर २०१५ पर्यंतची महावितरणची मध्यम मुदतीची आणि अल्प मुदतीची कर्जे रु. ४९५९ कोटी घेतली. (रु. ६६१३ कोटीपैकी ७५% आहे.) घेतलेली कर्जे महावितरणला खालील तक्त्यांमध्ये वर्णन केल्याप्रमाणे अनुदान/कर्जे म्हणून हस्तांतरित केले जाईल.

**(रुपये कोटीमधे)**

| वर्ष | एकूण घेतलेली कर्जे | महावितरणला अनुदानाच्या रुपात हस्तांतरित केलेले (रु.) | महावितरणला कर्जाच्या रुपात हस्तांतरित केलेले (रु.) | महावितरणला समभागाच्या रुपात हस्तांतरित केलेले (रु.) | महावितरणची राज्य शासनाच्या कर्जासाठीची थकबाकी (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | २०% | ९९१ | ३,९६८* | - | ३,९६८ |
| २०१७-१८ | २०% | ९९२ | | | २,९७६ |
| २०१८-१९ | २०% | ९९२ | | | १,९८४ |
| २०१९-२० | २०% | ९९२ | | | ९९२ |
| २०२०-२१ | २०% | ९९२ | | | - |
| | एकूण | ४९५९ | | | |

वित्तीय वर्ष २०१६-१७ मध्ये महाराष्ट्र शासनाने अल्प मुदतीची कर्जे रु. ४९५९ कोटी रकमेची घेतली आणि महावितरणला हस्तांतरित केली. राज्य शासनाची कर्जे रु.३९६८ कोटीची महाराष्ट्र शासनाकडून अनुदानाच्या रुपात समान गुणोत्तरामध्ये पुढील ४ वर्षांसाठी वित्तीय वर्ष २०१७-१८ पासून ते वित्तीय वर्ष २०२०-२१ पर्यंत म्हणजेच रु. ९९२ कोटी प्रतिवर्षी महावितरणला समायोजित करण्यात आले.

महावितरण, भविष्यकाळात, जर असेल तर, वित्तीय वर्षातील महाराष्ट्र सरकारच्या थकबाकीवर ज्या दराने महाराष्ट्र शासनाने गैर वैधानिक रोखता प्रमाण रोखे (नॉन - एसएलआर बाँड) जारी केले असतील त्या दराने महाराष्ट्र शासनास व्याज देईल.

रु. ४९५९ कोटीचे रोखे विरित करण्यासाठी आणि महावितरणकडे असलेल्या उर्वरित २५% कर्जाची हमी महावितरणला देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि. २७/१२/२०१६ ला शासन निर्णय जारी केला आहे.

महाराष्ट्र शासनाने आरबीआयद्वारे रोखे जारी केले आणि १३.०२.२०१६ रोजी महावितरणला रु. ४९५९७५ लाख (रु. २९५९ कोटी ७.३८% प्रतिवर्षी आणि रु. २००० कोटी ७.३३% प्रतिवर्षी) हस्तांतिर केले.

उदय योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या कर्जाच्या थकबाकीवरील व्याजासाठी ३१.०३.२०१७ रोजी रु. ४७ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

उर्वरित २५% कर्जासाठी, महावितरण पूर्ण/अंशत: राज्य सरकारकडून हमी असलेले रोखे जारी करेल किंवा त्यांना बँक/वित्तीय संस्थांकडून कर्ज किंवा रोखे यामध्ये रुपांतरित केले जाईल त्यांचे व्याज बँक आधार दर अधिक ०.१ पेक्षा जास्त नसेल. महावितरण आणि महाराष्ट्र शासन महावितरणकडे उरलेल्या मध्यम मुदतीच्या आणि अल्प मुदतीच्या कर्जांसाठी देणाऱ्या रकमेची मुख्य रक्कम आणि व्याज यांचा वेळेवर भरणा करेल अशी खात्री होते.

**महाराष्ट्र शासनकडे महावितरणचे भविष्यातील नुकसान खालीलप्रमाणे वर्गीकृत रितीने होईल.**

| वर्ष | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|
| राज्याने घेतलेले मागील वर्षातील महावितरणचे नुकसान | २०१४-१५ च्या नुकसानापैकी ०% | २०१५-१६ च्या नुकसानापैकी ०% | २०१६-१७ च्या नुकसानापैकी ५% | २०१७-१८ च्या नुकसानापैकी १०% | २०१८-१९ च्या नुकसानापैकी २५% | मागील वर्षाच्या नुकसानापैकी ५०% |

महावितरणकडे उरलेल्या रु. १,६५३ कोटीच्या मध्यम मुदतीच्या आणि अल्प मुदतीच्या कर्जाची मुख्य रक्कम आणि व्याज देण्याची परतफेड करण्याची हमी देण्याबद्दल महावितरणने दि. २०/०२/२०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र शासनाला विनंती केली आहे. महाराष्ट्र शासनाकडून हमी अद्याप प्रलंबित आहे.

महाराष्ट्र शासनाने दि. ३१/०३/२०१७ च्या शासन निर्णयाने निराकरण केले की, रु. ४९५९ कोटी रुपयांच्या राज्य कर्जासाठी पहिल्या हफ्त्याची परतफेड म्हणून महावितरणला अनुदान म्हणून ९९१ कोटी रुपये समायोजित करावे.

### २२) पीडी ऍमनेस्टी योजना २०१६ (नवप्रकाश योजना)

महावितरणने पीडी ऍमनेस्टी योजना २०१६ (नवप्रकाश योजना) सुरु केली आहे जी कायमस्वरुपी वीजप्रवाह खंडित केलेल्या ग्राहकांना काही प्रोत्साहन देऊन जुन्या थकबाकीचे पैसे देण्यास प्रवृत्त करेल.

ही योजना शेती आणि सार्वजनिक पाणी वगळता इतर सर्व ग्राहकांसाठी आहे. ३१.०३.२०१६ रोजी किंवा त्यापूर्वी कायमस्वरुपी खंडित केलेले ग्राहक या योजनेसाठी पात्र आहेत ही योजना १ नोव्हेंबर २०१६ रोजी अंमलात आली आणि ६ महिन्यांसाठी वैध आहे. प्रस्तावित ऍमनेस्टी योजनेचा कालावधी ६ महिन्यांकरिता आहे आणि त्यानंतर अस्तित्वात असलेल्या एक वेळ समझोत्यानंतर योजना आहे तशी सुरु राहील. महावितरणने विलंब भरणा शुल्क व व्याज रक्कम रु. २ कोटी आणि रु. ४१ कोटी अनुक्रमे सोडून दिले आहे आणि त्या रकमा संशयास्पद कर्जाच्या तरतुदीविरुद्ध समायोजित केल्या आहेत. ३१ मार्च, २०१७ पर्यंत या योजनेचा लाभ घेतलेल्या ग्राहकांना रु. ३ कोटीचे प्रोत्साहन दिले जाते.

### २३) कृषि ग्राहकांना अतिरिक्त पुरवठा करण्यासाठी राजस्व अनुदान

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या भारनियमन करारानुसार, दररोज ८ ते १० तास वीजपुरवठा शेतकऱ्यांना देण्यात येतो.तथापि, महाराष्ट्र शासनाने, दि.८.०९.२०१६ ते २२.१०.२०१६ या कालावधीत सुरुवातीच्या काळात कृषी ग्राहकांना अतिरिक्त सरासरी ३ तास (एकूण १२ तास) वीज पुरविण्यासाठी निर्देश दिले.

महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाप्रमाणे, महावितरणने माननीय महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे याचिका दाखल केली आणि महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने त्यांच्या २२.९.२०१६ रोजीच्या दैनिक आदेशानुसार कृषी ग्राहकांना दररोज १२ तास वीज पुरवठा करण्याची परवानगी दिली. महाराष्ट्र शासनाने राज्यातील कृषी ग्राहकांना दररोज १२ तास वीज पुरवठा करण्याचा त्यांचा निर्णय २३.१०.२०१६ पासून ते १५.१२.२०१६ पर्यंत वाढविला आहे आणि महावितरणला त्यासाठी आर्थिक भारासाठी मागणी करण्याची विनंती केली आहे. प्रत्यक्ष वाचन मिळाल्यानंतर अतिरिक्त पुरवठ्याची मागणी ८.०९.२०१६ ते १५.१२.०२०१६ या

कालावधीसाठी रु. १२५४ कोटी आहे आणि अंतिम मागणी दि. २८.०२.२०१७ च्या पत्राद्वारे महाराष्ट्र शासनाला उभी केली आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिवांनी दि. २२.०५.२०१७ च्या कार्यालयीन निवेदनाद्वारे ऊर्जा विभाग आणि वित्त विभाग यांना वरील खर्चाला पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजुरी दिल्याचे कळविले आहे.

माननीय महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दि. २०.०६.२०१७ च्या त्यांच्या आदेशानुसार २०१६ साठीचे प्रकरण क्र. १२० मध्ये असे निर्देश दिले की, महावितरणने रु. १२५४ कोटीचे अनुदान सोडण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा पाठपुरावा करावा आणि असे नमूद केले की, एखाद्या वेळेस महाराष्ट्र शासनाने अनुदान दिले नाही किंवा ते गरजेपेक्षा कमी असेल तर या विचलनाचा आर्थिक परिणाम ग्राहकांना दिला जाऊ शकत नाहा आणि कदाचित महावितरणला तो सहन करावा लागेल.

ऊर्जा मंत्रालयाने उपस्थित केलेल्या प्रश्नांचे महावितरणने दि. २१.०७.२०१७ च्या पत्राद्वारे पालन केले आहे आणि हक्कप्रक्रिया चालू आहे. ०८.०९.२०१६ ते १५.१२.२०१६ या कालावधीत अतिरिक्त वीज पुरवठ्यासाठी रु. १२५४ कोटींचा अतिरिक्त भार महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झाला आहे, ते २०१६-१७ मध्ये महसूल अनुदान म्हणून निश्चित केले आहे.

## २४) आकस्मिक राखीव साठी योगदान

बहुवर्षीय दर नियमन क्र. ३४.१ नुसार, महावितरणला आकस्मिक राखीवमध्ये योगदान देणे गरजेचे आहे, वार्षिक स्थिर मालमत्तेच्या मूळ किंमतीच्या ०.२५% पेक्षा कमी नाही. ह्या योगदानास वर्षाअखेरीस सहा महिन्यांच्या आत इंडियन ट्रस्ट ॲक्ट १८८२ अंतर्गत परवानगी असलेल्या प्रतिभूतीमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

महावितरणने आकस्मिक राखीव रु. ६८५ कोटी रुपयांचा निर्माण केला आहे. (चालू वर्षातील रु. १०८ कोटींचा समावेश आहे.) परंतु निधीच्या कमतरतेमुळे महावितरणने रु. १८५ कोटी मार्च २०१७ पर्यंत परवानाधारक प्रतिभूतींमध्ये गुंतवले आहेत.

## २५) वीजेच्या तारा टाकण्यासंबंधी सेवा शुल्क परतावा

नवीन जोडणी देताना महावितरणने ग्राहकांकडून वीजेच्या तारा टाकण्यासंबंधी सेवा शुल्क वसूल केले होते. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दि. ०८.०९.२००६ रोजी आदेश काढला आणि महावितरणला असे निर्देश दिले की, पारेषण व्यवस्थेचा वितरण बिंदूपासून ते मुख्य वितरणापर्यंतच्या पायाभूत सुविधांवरील खर्च महावितरणने उचलला पाहिजे.

म्हणूनच महावितरणने, याचिका क्र. २००७ साठी २२ महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दि. ०८.०९.२०१६ च्या आदेशानुसार वीजेच्या तारा टाकण्यासंबंधी सेवा शुल्काची वसुली नाकारल्याप्रकरणी वीजेसाठीच्या लवाद न्यायाधीकरणात दाखल केली आहे.

वीजेसाठीच्या लवाद न्यायाधिकरणाने महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या आदेशाचे समर्थन केले आहे आणि निर्देश दिले आहे की, वीजेच्या तारा टाकण्यासंबंधीचे सेवा शुल्क महसूल पत्रकाद्वारे वसूल करण्याची परवानगी दिली जात आहे. त्यानंतर महावितरणने माननीय सर्वोच्च न्यायालयात वीज लवाद न्यायाधीकरणाच्या आदेशाविरुद्ध दिवाणी याचिका दाखल केली.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने दि. १० नोव्हेंबर, २०१६ रोजीची याचिका फेटाळून महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या अनुसूचित शुल्काशिवाय (शेड्युल्ड चार्जेस) इतर कोणतेही शुल्क वसूल न करण्याचे महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्णयाचे समर्थन केले.

त्यानुसार, जानेवारी २००५ ते एप्रिल २००७ या कालावधीमध्ये जमा केलेले सेवा जोडणी शुल्क रु. १७८ कोटी संपूर्ण योगदान रु. ७३ कोटी आणि मीटर किंमत रु. १२५ कोटी ग्राहकांना व्याजासह परत करणे आवश्यक आहे. आणि त्याच्या परिणामासाठी वित्तीय वर्ष २०१६-१७ मध्ये आवश्यक त्या तरतुदी करुन त्याचा लेखा केला गेला आहे.

**२६) पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य वीज विद्युत मंडळाची वित्तीय पुनर्रचना योजना :**

